## प्रकरण ३

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा

**3.1 प्रास्ताविक.......... 83**

**3.1.1 – गोमंतकातील सामाजिक पार्श्वभूमी व नव्वदोत्तरी गोव्यातील सामाजिक स्थित्यंतरे.......... 83**

**3.1.2 – नव्वदोत्तरी गोमंतकीय सांस्कृतिक जीवन .......... 86**

**3.1.3 – नव्वदोत्तरी गोव्यातील राजकीय परिस्थिती व निगडीत प्रश्न.......... 86**

**3.2 नव्वदोत्तरी कालखंडातील गोमंतकीय लेखकांचे कथा लेखन.......... 88**

**3.2.1 विठ्ठल ठाकूर यांचे कथालेखन.......... 88**

**3.2.1.1 मनोविश्लेषणात्मक व मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करणाऱ्या कथा.......... 89**

**3.2.1.2 स्त्री जीवनातील दु:खाचे चित्रण .......... 92**

**3.2.1.3 मानवी भावविश्वाचे चित्रण करत कथांमध्ये आलेल्या जगण्याच्या शोकांतिका.......... 93**

**3.2.1.4 व्यक्त झालेले जीवनविषयक तत्त्वज्ञान .......... 96**

**3.2.1.5 गोवा मुक्तीनंतर स्वातंत्र्यसैनिकांचे जीवन चित्रण.......... 98**

**3.2.2. पु. शि. नार्वेकर यांचे कथालेखन.......... 99**

**3.2.2.1 गोवा मुक्तिपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीवर मुक्तीनंतरच्या कालखंडातील सामाजिक बदलांचे चित्रण.......... 99**

**3.2.2.2 गोवा मुक्तिपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीवर पोर्तुगीजांच्या राजसत्तेतील अन्याय अत्याचारांचे चित्रण.......... 101**

**3.2.2.3 गोवा मुक्तिचळवळीचे चित्रण.......... 103**

**3.2.2.4 मानवी वृत्तीप्रवृत्तींचे चित्रण .......... 104**

**3.2.2.5 गोवा मुक्तिनंतरच्या कालखंडातील स्वातंत्र्यसैनिकांच्या व्यथांचे चित्रण .......... 108**

**3.2.2.6 असफल प्रेमाकथा.......... 109**

**3.2.2.7 किस्स्यात्मक निवेदन करणाऱ्या कथा.......... 111**

**3.2.2.8 मिथकातून स्त्रीजीवानावर भाष्य .......... 112**

**3.2.3 गजानन रायकर यांचे कथालेखन .......... 113**

3.2.3.1 पोर्तुगीज सत्तेच्या पार्श्वभूमीवर, गोवा स्वातंत्र्यसंग्राम व जनतेवरील अन्याय अत्याचाराचे चित्रण ........ 114
3.2.3.2 जातीव्यवस्था व कुळवाड्यांच्या प्रश्नांचे चित्रण ........ 114
3.2.3.3 गोमंतकीय समाजजीवनातील बदलांचे चित्रण ........ 118
3.2.3.4 गोवा मुक्तिसंग्रामाच्या पार्श्वभूमीचे चित्रण ........ 119
3.2.3.5 मनोविश्लेषणात्मक कथा ........ 122
3.2.3.6 व्यक्तिकेंद्रीततेतून भिन्न प्रवृत्तींचे चित्रण ........ 123
3.2.3.7 उत्कट प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या कथा ........ 124
3.2.4 विठ्ठल गांवस यांचे कथालेखन ........ 126
3.2.4.1 ख्रिस्ती समाजजीवनाचा वेध घेणाऱ्या कथा ........ 127
3.2.4.2 समाज वास्तवाचा वेध घेणाऱ्या कथा ........ 129
3.2.4.3 मानवी मनोवृत्तींवर भाष्य करणाऱ्या कथा ........ 132
3.2.4.4 सुशिक्षिताच्या मानसिक कोंडीचे चित्रण ........ 134
3.2.4.5 प्रेमभावनेचे चित्रण ........ 136
3.2.4.6. भ्रष्टाचार व राजकारणाचे चित्रण ........ 137
3.2.4.7 गोमंतकातील सामाजिक समस्यांचे चित्रण ........ 139
3.2.4.8 स्त्री जीवन व स्त्री समस्यांचे चित्रण ........ 139
3.2.5 नारायण महाले यांचे कथा लेखन ........ 142
3.2.5.1 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण ........ 143
3.2.5.2 गोमंतकीय समकालीन प्रश्नांचे चित्रण ........ 143
3.2.5.3 गोमंतकीय समाजजीवनातील बदलांचे चित्रण ........ 145
3.2.5.4 स्त्री जीवनाच्या व्यथा ........ 145
3.2.6 मिलिंद म्हामल यांचे कथा लेखन ........ 146
3.2.6.1 भाऊबंदकीचे चित्रण ........ 146
3.2.6.2 आधुनिक जगण्यात निर्माण झालेल्या गोमंतकातील बदलांचे चित्रण ........ 147
3.2.6.3 स्त्री जीवनाचे चित्रण ........ 148
3.2.6.4 शहरी जीवनात झालेली माणसांची ओढताण ........ 150
3.2.6.5 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण ........ 150

**3.2.6.6 पर्यावरणीय प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या कथा ........................................................ 151**

**3.2.6.7 गोव्यातील बदलांचे ग्रामसंस्कृतीवर उमटलेले पडसाद......................................... 153**

**3.2.7 चंद्रकांत गावस यांचे कथालेखन ...................................................................... 156**

**3.2.7.1 शारीरिक वासना व मानवी जीवनमूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण .............................. 156**

**3.2.7.2 प्रेम भावना व उदात्त प्रेमाचे चित्रण ................................................................ 158**

**3.2.8 ज्ञानेश्वर कोलवेकर यांचे कथालेखन.................................................................. 159**

**3.2.8.1 स्त्री दु: ख, भावनाविवशता व स्त्री स्वभावाच्या भिन्न पैलूंचे चित्रण ..................... 160**

**3.2.8.2 गोमंतकीय सोनार समाजाचा व्यावसायिक संघर्ष मांडणाऱ्या कथा....................... 164**

**3.2.8.3 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण .......................................................................... 167**

**3.2.8.4 सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न ............................................ 169**

**3.2.8.5 गोव्यात असलेल्या परप्रांतीयांचा प्रश्न................................................................ 172**

**3.2.9 सु. म. तडकोड यांचे कथालेखन ...................................................................... 173**

**3.2.10 उदय नाईक यांचे कथालेखन.......................................................................... 176**

**3.2.10.1 सामाजिक स्पंदने टिपत मानवतावादी दृष्टीकोनाची उपेक्षा व्यक्त करणाऱ्या समाजात बळावलेल्या प्रवृत्तींचे चित्रण करणाऱ्या कथा ............................................................ 176**

**3.2.10.2 बोधप्रधान स्वरूपाच्या कथा........................................................................ 180**

**3.2.10.3 समकालीन सामाजिक प्रश्नांवर, समाज वास्तवावर भाष्य ................................ 181**

**3.2.11 दयाराम पाडलोस्कर यांचे कथा लेखन............................................................ 188**

**3.2.11.1 स्त्री जीवनाच्या शोकांतिका.......................................................................... 189**

**3.2.11.2 व्यक्तींच्या दु:खद कहाण्या........................................................................... 194**

**3.2.11.3 प्रेमभावनेचे चित्रण...................................................................................... 197**

**3.2.11.4 मूल्यऱ्हासाचे चित्रण .................................................................................. 198**

**3.2.11.5 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण ...................................................................... 198**

**3.2.11.6 सर्वसामन्यांच्या जगण्याचे चित्रण ................................................................ 200**

**3.2.11.7 ग्रामीण समाजजीवनातील 'बावळा'ची क्षणचित्रे ............................................ 202**

**3.2.12 गजानन देसाई यांचे कथालेखन...................................................................... 208**

**3.2.12.1 ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण.................................................................... 208**

**3.2.12.2 भाटकरशाहीतील अनैतिकतेचे चित्रण ........................................................... 210**

**3.2.12.3 मानवी वृत्तींचे चित्रण ........................................................................ 210**

**3.2.12.4 सर्वसामान्य माणसांच्या जगण्याचे चित्रण ........................................................ 212**

**3.2.12.5 समाजातील रूढी पद्धतींवर भाष्य........................................................................ 212**

**3.2.12.6 स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण........................................................................ 215**

**3.2.12.7 जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारी कथा ........................................................ 215**

**3.3 नव्वदोत्तरी कालखंडातील स्त्रियांचे कथा लेखन........................................................216**

**3.3.1 वासंती नाडकर्णी यांची अनुभवसंपन्न कथा........................................................ 216**

**3.3.2. माधवी देसाई यांचे कथा लेखन........................................................................ 217**

**3.3.2.1. स्त्रियांच्या भावविश्वाचे चित्रण........................................................................ 218**

**3.3.2.2. स्त्रीवादी स्वरूपाचे कथा लेखन........................................................................ 221**

**3.3.2.3. माणसांच्या हतबलतेच्या कहाण्या........................................................................ 222**

**3.3.3. ज्योती कुंकळकर यांची स्त्री जीवनातील स्पंदने टिपणारी कथा........................................ 223**

**3.3.4 मेघना कुरुंदवाडकर यांचे कथालेखन........................................................................ 225**

**3.3.4.1 स्त्री जीवनाच्या शोकांतिका........................................................................ 225**

**3.3.4.2 स्त्री स्वभावाच्या भिन्न छाटा ........................................................................ 226**

**3.3.4.3 स्त्रियांचे भावविश्व........................................................................ 227**

**3.3.5 आरती दिनकर यांचे कथा लेखन ........................................................................ 228**

**3.3.5.1 आधुनिक स्त्री जीवनावर भाष्य........................................................................ 228**

**3.3.5.2 तटस्थ स्त्री भूमिका ........................................................................ 229**

**3.3.5.3 स्त्री जीवनातील प्रश्नांवर भाष्य........................................................................ 229**

**3.3.5.4 विशुद्ध विनोदी कथा ........................................................................ 230**

**3.3.6 अंजली आमोणकर यांचे कथा लेखन ........................................................................ 231**

**3.3.6.1 नातेसंबंधांवर भाष्य........................................................................ 231**

**3.3.6.2 स्त्री जीवनाचे चित्रण........................................................................ 231**

**3.3.6.3 रहस्यात्मक स्वरूपाच्या कथा........................................................................ 232**

**3.3.7 हेमा नायक यांचे स्त्री जाणिवा व्यक्त करणारे व स्त्रीवादी स्वरूपाचे कथा लेखन................ 233**

**3.3.8 प्रतिभा कारंजकर यांच्या कथेतील अनुभव विश्व ........................................................ 235**

**3.3.8.1 आधुनिक नातेसंबंधांवर भाष्य........................................................................ 236**

**3.3.8.2 स्त्रियांचे भावविश्व ........ 238**

**3.3.9 रेखा पौडवाल यांचे कथालेखन ........ 239**

**3.3.9.1 स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचे चित्रण ........ 239**

**3.3.9.2 स्त्रियांच्या भावविश्वाचे चित्रण ........ 240**

**3.3.9.3 स्त्री स्वभावाच्या भिन्न छटांचे चित्रण ........ 241**

**3.3.9.4 स्त्री पुरुष नातेसंबंधातील गुंते ........ 242**

**3.3.9.5 मानवी जगण्यातील शोकांतिका व मानवी वृत्ती प्रवृत्तीवर भाष्य ........ 242**

**3.3.9.6 व्यवहारीक जगण्यात मानवी संवेदनशीलतेवर भाष्य ........ 243**

**3.3.10 सुजाता सिंगबाळ यांची स्त्री पुरुषांच्या स्नेहविश्वाचे भावबंध टिपणारी कथा ........ 243**

**3.3.11 गिरिजा मुरगोडी यांच्या स्त्री जीवनावर भाष्य करणाऱ्या कथा ........ 245**

**3.4 समारोप ........ 248**

**संदर्भ ........ 250**

# प्रकरण ३

# नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा

## 3.1 प्रास्ताविक

प्रत्येक कालखंड आपल्यासोबत अनेक बदलांना स्वीकारून आकार घेताना आपल्याला दिसून येतो. प्रत्येक कालखंडातील बदलांचे पडसाद समाज, संस्कृती, राजकारण, नातेसंबंध अशा भिन्न पातळीवर मानवी जीवनाला आकार देत असतात. मानवी जगण्यावर उमटलेले हे पडसाद साहित्यातून सहजपणे उतरतानाही दिसून येतात. नव्वदोत्तरी कालखंड हा प्रचंड उलथापालथींचा कालखंड. नव्वदोत्तरी कालखंडाच्या चौथ्या दशकातील पूर्वार्धात आज २०२४ मध्ये समाज पोहोचला असता विलक्षण बदलांना सामोरे जात असल्याचा प्रत्यय येतो. परिणामी गोवा हे जरी छोटे राज्य असले तरी या बदलांना गोवा व गोवेकर सामोरे जात आहेत. गोमंतकीय कथेत समाजातील व लोकजीवनातील उलथापालथी, गोमंतकीय माणसाचे प्रश्न, इथली संस्कृती, राजकीय स्थित्यंतरे इत्यादींचे चित्रण झाले आहे. जीवनानुभवांचा स्वीकार करत नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा आकार घेत आहे. आशयानुरूप समृद्ध होत चाललेल्या व गोमंतकीय कथा म्हणत आपली स्वायत्तता टिकवू पाहणाऱ्या नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाशयाच्या भिन्न वैशिष्ट्यांचा विचार करणे गरजेचे ठरते.

### 3.1.1 – गोमंतकातील सामाजिक पार्श्वभूमी व नव्वदोत्तरी गोव्यातील सामाजिक स्थित्यंतरे

गोमंतकीय मराठी कथा ही मूळ प्रवाहाला समांतर जाणारी कथा मानली जाते. पण गोमंतक हा भारतापासून पोर्तुगीज काळापासून अलिप्त राहिलेला प्रदेश असल्याकारणाने या प्रदेशातील सामाजिक स्थित्यंतरांचा ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या अनुषंगाने विचार करणे रास्त ठरते. १९६१ हे गोवा मुक्तीचे साल आहे. १९६० नंतरच्या कालखंडात मूळ मराठी साहित्यपरंपरेत वेगवेगळे साहित्यप्रवाह निर्माण झाले, त्यात अस्तित्ववादी विचारसरणी अनुसरणारे साहित्य, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, प्रादेशिक, महानगरीय, आदिवासी, भटक्या विमुक्त जमातींचे जीवन चित्रण करण्याचा प्रयत्न करत भिन्न प्रवाहातील वास्तवदर्शी लिखाण होऊ लागले. गोमंतकातही वास्तवदर्शी लिखाण या कालखंडात होऊ लागले पण गोवा मुक्तिनंतरच्या कालखंडातील गोमंतकीय समाजजीवनातील स्थित्यंतरांना चित्रित करत हे लेखन होत होते. काळाबरोबर गोमंतकीय समाजजीवनात बदल होत आहेत. व १९९० नंतरची गोमंतकीय साहित्यपरंपरा या बदलांना स्वीकारत आकार

घेत असल्याचे आपल्याला दिसून येते. पोर्तुगीज राजवटीत गोमंतकीय लोकांच्या जमिनी बळकावण्यात आल्या व भाटकारशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. गोवा मुक्तीनंतच्या कालखंडातही ही स्थिती बदलली नव्हती. गोमंतकातील उच्चवर्णीय समाज हा भाटकर व त्यांच्या शेतजमिनी व पिकांची काळजी घेणारा मुंडकार अशी ही व्यवस्था होती. मुंडकरांना देखरेखीबरोबर थोडी जागा घरे बांधण्यासाठी पुरविली गेली. कालांतराने मुंडकार म्हणून कुळांची काळजी घेणारा प्रामुख्याने गोमंतकीय बहुजन समाज शिक्षित झाला, नोकरी व्यवसाय करू लागला, छोट्या झोपड्यांच्या जागी त्याच जमिनींवर कॉन्क्रीटची घरे बांधली जाऊ लागली. व मालकीहक्काचा प्रश्न निर्माण झाला. अशा वेळी कुळ – मुंडकार कायदा निर्माण होऊन काही अंशी सरकारने समाजाचा हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला पण गोव्यात मोठ्या प्रमाणात पर्यटनामुळे निर्माण झालेले शॅक्स, अतिथीगृहे, बार (मद्यालये), तसेच औद्योगिकीकरण व विकासाच्या नावाखाली या शेतीजामिनी कधी गोव्याबाहेरील व्यावसायिकांना विकल्या जाऊ लागल्या तर कधी सरकारकडून बदल्यात लाखो रुपये पैसे देऊन हस्तगत करण्याचा प्रयत्न झाला. कधी कधी पैशाची हाव असल्यामूळे सुपीक शेतजमिनी व्यावसायिकांना विकल्या गेल्याने कुळ-मुंडकाराच्या पोटा पाण्याचाही प्रश्न उपस्थित झाला. शेती व्यवसाय गावागावात नष्ट होऊ लागला. आणि भाटकर व मुंडकारांबरोबर भाऊबंदकीत प्रश्न निर्माण होऊ लगले. त्याचे चित्रण गोमंतकीय मराठी कथेमधून दिसून येते.

जागतिकीकरणामुळे गोमंतकीय समाजजीवनात झपाट्याने बदल होत असल्येचे चित्र दिसते. गोवा हे पर्यटनक्षेत्र म्हणून विकसित झाले आहे. पर्यटनाच्या विकासाबरोबर ड्रग्स, वेश्या व्यवसाय या सगळया गोष्टी तेजीने चालताना आपल्याला दिसून येतात. हरमल, मोरजी, काणकोण सारखी गावे गोव्याच्या नकाशावर पर्यटनाचे केंद्रबिंदू ठरलेली आहेत. यामुळे ग्रामीण जीवनाचा काही अंशी ऱ्हास होत अनैतिक गोष्टींमुळे आजची पिढी अधोगतीच्या दिशेने वाटचाल करतना आपल्याला दिसून येते. व्यसनाधीन होत ड्रग्सच्या विळख्यात सापडलेली गोमंतकीय पिढी आज आपल्याला सर्रासपणे दिसू लागलेली आहे. अनेक पर्यटक स्त्रियाही वासनेला बळी पडलेल्या आहेत. स्कार्लेट प्रकरण हे गोव्यातील पर्यटक स्त्रीवर झालेला बलात्कार व खून प्रकरण अत्यंत गाजले. पर्यटनामुळे वेश्याव्यवसायाला गोव्यात गती मिळाली.

विकासाच्या नावावर गोव्यातील पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून जन आंदोलने झाली. मेळावली येथे किंवा काणकोण मधील भगवती पठारावर होणाऱ्या आय.आय.टी ला विरोध झाला. नायलन 66 सारखे

प्रकल्प रद्ध करण्यात आले. खाण व्यवसायात बक्कळ पैसा मिळत असल्याकारणाने  पारंपारिक शेती व्यवसाय नाकारून खाण व्यवसायाकडे लोक वाळू लागले. खाण व्यवसायमुळे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले, प्रदूषण वाढले त्याचप्रमाणे अपघातांची संख्या वाढली अनेक तरुण अपघाती बळी पडल्याने अनेक घरे उद्ध्वस्त झाली. अति उत्खननामुळे आणि वाढत्या खाण विषयक समस्यांमुळे खाण बंदी लादली गेली. अनेक संस्था पर्यावरण रक्षणार्थ निर्माण झाल्या. क्लॉड अल्वारीस यांनी गोवा सुरक्षा मंचाची स्थापना केली व खाणबंदीचा हा लढा सुदृढ केला. दुसऱ्या बाजूने टॉनी फर्नांडीस सारख्या गोमंतकीयांनी ट्रक मालक असोसिएशन सारख्या संस्था सुरू केल्या. एकीकडे पर्यावरण रक्षणार्थ खाणबंदी तर दुसरीकडे सर्व पारंपारिक व्यवसायापासून दुरावत पूर्णपणे खाण व्यवसायावर अवलंबून असलेला सर्वसामान्य गोमंतकीय माणूस असा संघर्ष निर्माण झाला. न्यायालयाच्या याचिकेनुसार खाणबंदी लादल्याने शेवटी पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी छोट्या मोठ्या व्यवसायांमध्ये गोमंतकीयांनी उदरनिर्वाहाचा प्रश्न काही प्रमाणात सोडवला तर दुसऱ्या बाजूने पर्यटनाला बळकटी देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांनी खाण व्यवसायाला पर्याय म्हणून पर्यटनाच्या विकासाच्या दिशा ठरविल्या. पण पर्यटनाच्या विकासाबरोबर गोमंतकीय प्रश्नांमध्ये भर पडल्याचे दिसून येते. गोव्याची जीवनदायिनी असलेल्या म्हादई नदीवर कर्नाटककडून कळसा भांडुरा प्रकल्पाची बांधणी सुरू झाल्याने म्हादई नदीचे पाणी अडविल्यास गोव्यात भविष्यकाळात निर्माण होऊ शकणारी पाणीटंचाई, बागायती शेती व समाजजीवनावर एकूण होणाऱ्या दुष्परिणामांमुळे कर्नाटकातील कळसा भांडुरा प्रकल्पास गोव्याकडून विरोध झाला. तसेच पेडणे तालुक्यात पर्यटनविकास व गोवेकरांना नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध करून देण्याच्या लालसेने, पेडणेस्थित मोपा येथील लोकांच्या शेतजमिनी बळकावण्याचा प्रयत्न झाला. विकसनशील अशा गोव्याच्या वाटचालीत पर्यावरण व गोवेकाराचा बळी जात असताना अनेक प्रकल्पांना विरोध होत गेला व गोव्यातील जनजीवनात या विकसनशीलतेचे पडसाद बऱ्याच प्रमाणात उमटले.

गोमंतकातील भाषिक वाद संपुष्टात आणण्याच्या प्रयत्नात कोंकणीला राजभाषा व मराठीला सहभाषेचा मान दिला गेला. मराठी कोंकणी वाद काही प्रमाणात बाह्यदृष्ट्या शिथिल झाला. भाषिक समन्वय साधण्याचा प्रयत्न झाला. पण नव्वदोत्तरी कालखंडात गोव्यात भाषिक प्रश्न एक नवा आयाम स्वीकारून जोमाने पुढे येऊ लागला. जागतिकीकरणामुळे इंग्रजीला दिले गेलेले असाधारण महत्त्व आणि त्यामुळे निर्माण होऊ पाहणारा भाषिक एकजिनसीपणा बहुभाषिक अशा गोमंतकीयाच्या पचनी पडला नाही. शालेय विद्यार्थ्यांचे प्राथमिक स्थरावरील शिक्षण इंग्रजी सारख्या पाश्चात्य भाषेतून न होता ते त्यांच्या मातृभाषेतून व्हावे यासाठी प्रयत्न होऊ

लागले. माध्यमप्रश्न पुढे आला. मातृभाषेतून शिक्षणाची गरज जनमानसापुढे आणण्याच्या प्रयत्नात तरुणाई रस्त्यावर उतरली. माध्यम प्रश्न या कालखंडात प्रकर्षाने पुढे आला.

परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे गोव्यात पोटापाण्यासाठी येऊ लागले. त्यामुळे गोमंतकात गुन्ह्यांचा आकडाही वाढला. खून, दरोडे, मारामारी, बलात्कारांची संख्या वाढली. बरीचशी गोमंतकीय तरुणाई अखाती देशांमध्ये कामानिमित्त जाऊ लागली, ख्रिस्ती समाजातील अनेक युवक 'बोटींवर' जाऊ लागल्याकारणाने नातेसंबंधांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले. या सर्व प्रश्नाचा पाया हा संपत्ती व पैसा होता तसेच आधुनिकीकरण व जागतिकीकरणामुळे वाढलेल्या गोमंतकीय माणसांच्या जगण्यासंदर्भातल्या व आपल्या राहणीमानासंदर्भातल्या अपेक्षा होत्या, हे आपल्याला दिसून येते.

### 3.1.2 – नव्वदोत्तरी गोमंतकीय सांस्कृतिक जीवन

गोमंतकीय प्रदेशात अनेक स्थित्यंतरे निर्माण झाली. पोर्तुगीजांबरोबर इथे भोज, यादव, राष्ट्रकुट, कदंब अशा वेगवेगळ्या राजवटी होऊन गेल्या. या राजवटींनी गोव्याला एक सांस्कृतिक संचित दिले. गोमंतकात धालो, फुगडी, तोंणयामेळ, मुसळ, गजा नृत्य किंवा चपय, तालगडी, शिगमो अशी अनेक लोकनृत्ये, भिन्न समारंभात गायली जाणारी लोकगीते, लोककथा, लोकदैवते, इ. गोष्टींमुळे लोकसंस्कृती निर्माण झाली. गोमंतकीय प्रदेशाच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, चालिरीती या प्रदेशाच्या लोकसंस्कृतीचा एक भाग बनलेल्या आहेत. आधुनिक जगण्याशी समरस झालेल्या शहरी गोव्यातील उदा. पणजी, मडगाव, वास्को या गोव्यातील प्रमुख शहरातील लोकजीवनाला व सांस्कृतिक जीवनाला नवतेचे हादरे पोहोचत आहेत, तर दुसरीकडे काणकोण, सांगे, सत्तरी या तालुक्यातील काही ग्रामीण भागांमध्ये लोकजीवनाचे, सांस्कृतिक जीवनाचे जतन करताना दिसून येते. त्यामुळे नव्वदोत्तरी गोमंतकातील सांस्कृतिक जीवनाचा पूर्ण ऱ्हास झाला आहे असे न म्हणता, गोव्यातील भागांपरत्वे गोमंतकीय लोकसंस्कृती व एकूण सांस्कृतिक जीवन अबाधित असल्याचे दिसून येते.

### 3.1.3 – नव्वदोत्तरी गोव्यातील राजकीय परिस्थिती व निगडीत प्रश्न

गोवा हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने अत्यंत छोटे राज्य आहे, केवळ ४० विधानसभा मतदारसंघ व दोनच लोकसभा मतदारसंघ असलेल्या गोव्यातील राजकारण मात्र अत्यंत क्लिष्ट आहे. गोव्यात मुख्य लढत ही नव्वदोत्तरी काळात प्रामुख्याने दोन राजकीय पक्षांमध्ये असल्याचे आपल्याला दिसून येते. याविषयी मयुरेश

कोण्णूर लिहितात, “६० वर्षांपूर्वी मुक्त झाल्यानंतर दोन-अडीच दशकं गोव्यात इथल्या स्थानिक पक्षांचं वर्चस्व होतं. ८० च्या दशकामध्ये काँग्रेसनं सत्तेवर मांड टाकली आणि त्यापाठोपाठ पुढच्या दशकात भाजपनं आपला जम बसवला. तीन दशकं हे दोन पक्ष सत्ता राबवत आहेत.”[1] २०१७ साली भाजपने बऱ्याच मतदारसंघात मताधिक्क्य गमावूनही सत्ता मिळवली. आणि त्यानंतर गोव्यातील भाजपचा चेहराच बदलला. २०१९ तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर मुख्यमंत्रीपदावर असताना गोव्यातील राजकारणात अनेक स्थित्यंतरे निर्माण झाली. अर्ध्याहून अधिक विधानसभेतील भाजपा काँग्रेसमधील आमदारांची बनली. याचदरम्यान कधी नव्हे तो गोव्यात प्रवेश न झालेले अन्य राज्यातील प्रादेशिक पक्ष गोव्यात प्रवेशकर्ते झाले. ‘आप’ (आम आदमी पार्टी), ‘तृणमूल’ इत्यादी पक्षांनी गोव्याची राजकीय गणिते बिघडवली. काँग्रेसमध्ये प्रचलित असलेले अनेक चेहरे दुसऱ्या पक्षांत वळले. त्यामुळे राजकारण्यांच्या पक्षबदलीला ‘माकडउड्या’ संबोधित, मतदारांच्या विश्वासाला तडा दिला देल्याने मतदारही त्रस्त झाला व आपला राग रोष व्यक्त करू लागला. राजकीय दृष्टीने दर समस्येचा फायदा घेत परप्रांतीयांना गोव्याचे मतदार बनू देत गोव्यात स्थायिक होण्याची मुभा निर्माण झाल्याने इथल्या भाषा, सांस्कृतिक जीवनाला धोके निर्माण झाल्याचे जनतेला बजावत, ‘रेवोल्युशनरी गोवन्स’ सारखे नवीन पक्ष गोवा व मूळ गोवेकरांना बचावण्याच्या हेतूने POGO म्हणजेच ‘People of Goan origin’ बिल समंत करण्याच्या हेतूने गोव्यातील राजकारणात प्रवेशकर्ते झाले. परप्रांतीय गोव्याच्या सांस्कृतिक जीवनाला व गोमंतकीयांना गोवाबाह्य करतील, या प्रश्नाला राजकीय वलय प्राप्त झाले. गोव्यात जात व धर्मकेंद्री स्वरूपाचा प्रचार निवडणुकांमध्ये होत नाही असे मानले जाते. पण ‘आप’ने ३० टक्क्यांपेक्षा अधिक असलेल्या भंडारी समाजातून आलेल्या अमित पालेकरांना मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित केले, तसेच सत्तेत आल्यास ख्रिस्ती धर्मातील उमेदवारास उपमुख्यमंत्री करू अशी घोषणा केली. हिंदू व ख्रिस्ती समाजातील लोकांचे प्राबल्य असलेल्या या राज्यातील धर्मसंस्थांचे राजकारणात असलेले स्थान व्यक्त करताना मयुरेश कोण्णूर लिहितात, “चर्च व त्याच्याशी संबंधित संस्था थेट राजकीय भूमिका घेत नाहीत, पण मतदान करताना काय विचार करावा हे मात्र सांगतात. त्याचे राजकीय परिणाम होतात. उदाहरणार्थ जेव्हा २०१२ साली मनोहर पर्रिकरांनी काँग्रेसच्या भ्रष्टाचाराविरूद्ध रान उठावलं होतं तेव्हा चर्चनंही पक्षाचं नाव न घेता भ्रष्टाचारविरुद्ध मतदान करावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती.”[2] गोव्यातील भाजपने हिंदुत्वाची कट्टर भूमिका घेतली नसली तरी धार्मिक पर्यटनासंबंधी कार्यक्रमात बोलत असताना पोर्तुगीजांनी मोडलेल्या मंदिरांच्या पुनर्स्थापनेसंदर्भात मुख्यमंत्रीडॉ. प्रमोद सावंत बोलले पण त्यानंतर इथला अधार्मिक सलोखा बिघडेल अशा लोकांच्या नाराजीच्या सुराच्या जाणीवेने त्याबद्दल पुढे बोलणे त्यांनी

टाळले. एकूण गोव्यातील मागच्या दशकातील राजकीय डावपेचांनी इथल्या राजकीय व्यवस्थेबद्दल जनमानसात राग असल्याचे दिसून येते. गोमंतकीय सामाजिक प्रश्नांपेक्षा इथली राजकीय संस्कृती उधळून टाकणे हा गोवेकरांचा आज प्रश्न बनलेला आहे.

### 3.2 नव्वदोत्तरी कालखंडातील गोमंतकीय लेखकांचे कथा लेखन

नव्वदोत्तरी कालखंडात कथा हा साहित्यप्रकार गोमंतकात बहरलेला आपल्याला दिसून येतो. या कालखंडात लेखन करणारे व १९६१ पूर्व गोवा मुक्तिपूर्व पोर्तुगीज सत्तेचा काळ व १९६१ नंतरचा गोवा मुक्तीचा काळ अनुभवलेले लेखक विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर, ज्यांनी १९९० नंतरच्या कालखंडातही लेखन केले व त्यानंतर याच कालखंडात जीवनानुभावातील बदलाला सामोरे जात लिहिणारे चंद्रकांत गांवस, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल गांवस, नारायण महाले, मिलिंद म्हामल, चंद्रकांत गांवस, सु. म. तडकोड, उदय नाईक, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई यांच्या कथाविश्वातील आशयाविश्व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाविश्वाला पूर्वसुरींच्या कथालेखनापासून वेगळेपणा प्रदान करते.

#### 3.2.1 विठ्ठल ठाकूर यांचे कथालेखन

विठ्ठल ठाकूर यांचा 'आवर्त' (१९८९) हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. 'आवर्त' या संग्रहातील कथा व त्यांच्या नवीन कथा समग्रपणे 'भार' या कथासंग्रहातून २००९ सालात प्रकाशित झाल्या. या कथासंग्रहातील कथांना विविधांगी स्वरुपाची आशयसूत्रे लाभेलेली दिसून येतात. 'भार' या कथासंग्रहातील 'भार' या कथेमध्ये गोमंत ग्राम जीवनातील रूढी परंपरा व लोकसमजुतीचा आधार घेत कथानक आकारास आल्याचे दिसून येते. अंगात देवाचा अवसर येण्याच्या गोमंतकातील लोकसमजुतीच्या आधारे या कथेचे कथासूत्र गुंफलेले दिसून येते. समाजव्यवस्थेतील उच्च नीचतेमुळे सर्वसामान्य गरिबांच्या झालेल्या गळचेपीचे चित्रण ठाकुर यांच्या 'भार', 'गिधाड', 'शरीरवस्त्रे', 'स्वातंत्र्य' या कथांमधून दिसून येते. माणसांच्या शोकांतिका मांडत निराशेच्या प्रवासात सूक्ष्म असा आशावादी सूर व्यक्त करणाऱ्या कथांचे लेखन झालेले दिसून येते. भिन्न मानवी मनोवृत्तींचे विश्व त्यांची कथा साकारताना दिसते.

### 3.2.1.1 मनोविश्लेषणात्मक व मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करणाऱ्या कथा

गोमंतकीय मराठी कथेच्या स्थित्यंतराच्या कालखंडात लिहिणारे महत्त्वाचे कथाकार म्हणून विठ्ठल ठाकूर यांच्या विचार करावा लागतो. १९८० च्या दशकात कथालेखन करणाऱ्या विठ्ठल ठाकुरांच्या कथेवर नवकथेचा प्रभाव दिसून येतो. तत्कालीन पुर्वासुरीच्या कथेचा हा प्रभावही म्हणता येईल. 'भार' या कथासंग्रहामध्ये आलेल्या बहुतांशी कथा या मनोविश्लेषणात्मक आहेत. त्यांच्या 'सांगाड्याची विकृती' ही कथा विलक्षण वेगळया आशयाची ठरते. हरकिसन व डॉक्टर या पात्रांच्या माध्यमातून मानवी स्वभाव विकृती. दुसऱ्याला त्रास देत आनंद लुटण्याच्या विकृतीवर लेखक भाष्य करतात. 'ओळख' या कथेत पोटदुखी असलेला निवेदक डॉक्टरकडे आपला नंबर दुरचा असल्याकारणाने रांगेत ताटकळत उभा राहतो. अधून मधून ओळखीने जाणाऱ्यांना नावे ठेवतो व स्वत:ही ओळखीनेच आत घुसतो. 'इमानी' या कथेत श्वानाच्या माध्यमातून मानवी वृत्तीप्रवृत्तींवर भाष्य करण्याचा प्रयत्न लेखक करतात. नुकत्याच पिल्लांना जन्म देणारी कुत्री दार वेळी कुत्र्याच्या भक्षी आपल्या पिल्लांना किमान यावेळी तरी जगता यावे म्हणून धडपडते. पिल्लं मोठी व्हायला लागतात तशी ती जगण्याची आशा तिच्या मनात पल्लवित होते आणि अचानक एके दिवशी एक माणूस येऊन तिच्या पिल्लांना पाण्यात डुंबवून मारतो. मागे एकच पिल्लू तो ठेवतो आणि एके दिवशी त्या पिल्लासही आपल्या घरी घेऊन जातो. पिल्लू मोठे होत जाते तसे कात्री दुरून आपल्या मुलाला मालकाचाच घात करण्याची शिकवण देत असते. भाकरीचा तुकडा जरी मिळत असेल तरी इतर भावंडांना बुडवून मारल्याचे सांगत असते. एखाद्या चोरालाही मालकाच्या घरात घुसू देण्याचा सल्ला देते. तिचे पोर हे ऐकून मानही हलवते. आणि एके दिवशी ती मालकाच्या घराजवळ येते  आपल्या पिल्लाशी बोलत असता मालकाला तिच्या मरतुकड्या रुपाकडे पाहून संताप येतो. मालक तिच्याच पोराला तिच्यावर भुंकण्यास सांगतो. आणि मालकाची भाकरी खाणारे पिल्लू इमानीपणे आपल्याच जन्मदात्रीवर बेंबीच्या देठापासून ओरडू लागते. कधीच आपल्या पिल्लाजवळ परत न येण्याचा निर्णय करत दु:खी कष्टी होत ती परतते. शेवटी भाकरी देणाऱ्याशी इमानदार राहणाऱ्या पिल्लाच्या वर्तनातून वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करतात. ही कथा एका जन्मदात्रीच्या हतबलतेची कहाणी ठरते.

'तातोबा' या कथेत कटकारस्थानी तातोबाच्या मनोवृत्तीतून मानवी वृत्तीप्रवृत्तींवर लेखक प्रकाश टाकतात. गावगाड्यात महारांची होणारी फसवणूक व स्वत:साठी संधी तयार करत पैशांच्या हौसेने डाव खेळणारा धूर्त तातोबा 'तातोबा' या कथेत दिसून येतो. 'भार' ही मनोविश्लेषणात्मक स्वरुपाची कथा ठरते. गोमंतकातल्या

देवाच्या अवसर येण्याच्या प्रथेवर आधारित अशी ही कथा आहे. आपल्या अंगी देवाचा अवसर काही वर्षे न आल्याने आपला मान हिरावला जाईल या भितीने असलेल्या भाबड्या सावळयाची ही कथा येते. सावळयाला ४ मुली असतात. सावळयाच्या चार मुलींपैकी मोठी असलेली मोगा वयात आलेली पण वेडपट असते. या गोष्टीचा फायदा गावातील पहिल्या गावकाराचा मान असलेला जळगावकर घेतो. सावळयाला अंगात अवसर येण्यासाठी ताकीद देणारा जळगावकर सावळयाच्या मोगा या मुलीच्या अब्रूला हात घालतो. आपल्या मुलीकडून ही वार्ता ऐकताच तो हबकतो. व देवळात पोहोचतो. जळगावकारला पाहताच त्याच्या अंगात संताप येतो व भार यायला लागतो. सावळयाला अवसर आल्याने सर्वांचा जीव भांड्यात पडतो. अंगात अवसर आल्यानंतर चार फेरी मारून तलवार उचलायची रीत असते. त्यावेळी गावातील पैलवान अवसर येणाऱ्या माणसाला काबूत ठेवत असते. सावळया कोणाच्याही ध्यानी मनी नसताना तीन फेऱ्यांवर तलवार उचलतो व काही कळण्याआधी जळगावकाराच्या मानेवर प्रहार करतो. जळगावकर तलवारीसह खाली कोसळतो. सावळयाला आवरायचं प्रयत्न होतो. परशुरामाचा खराखुरा अवसर आल्याने तो घुमतच राहतो. ‘भार’ या कथेमध्ये येणाऱ्या सावळयाच्या मानसिकतेचा मनोविश्लेषणात्मक पद्धतीने विचार करावा लागतो.

‘नकार’ या कथेत अत्यंत व्यवहारी असलेल्या सुधाने भावनाप्रधान व कविमनाच्या  दीपकडून त्याचा पगार? काम? घर या प्रश्नांची उत्तरे मिळत नसल्याने त्याला नाकारते. सुधाच्या नकारानंतर आपण सुखवस्तू घराण्यातील व इंजिनियरपदी असल्याचे दीपने सांगताच सुधाला खऱ्या स्थितीची जाणीव होते. पण सुधाच्या व्यावहारिक दृष्टीकोनाला न स्वीकारता कवितेच्या अधीन जाऊ पाहणारा दीप व दीपची स्थिती समजताच खंती होऊन निघणारी सुधा अशा पद्धतीने मानवी मनोवृत्तीतील भिन्न कंगोरे उलगडण्याचा प्रयत्न लेखक करतात. ‘निरभ्र’ या कथेत एका सर्वसामन्य डॉक्टरच्या सर्वसामान्य अशा मनोवृत्तीचे चित्रण आले आहे. पेशंटाला न लुटता इमानी असलेला, श्रीमंत पेशंटकडून जास्ती पैसे आकारल्याने झोपू न शकणारा असा डॉक्टर सुखात्मे कथेत येतो. आपण आयुष्यभर जपलेल्या तत्वांनी समाधानी राहायचे? की अन्य डॉक्टरांसारखे आपणही संपत्ती मिळवू शकलो असतो या विचारांनी खंती व्हायचे? या मानसिक द्वंद्वात अडकलेल्या सुखात्मेच्या मानसिकतेचे चित्रण लेखक करतात. जीवनाचा अर्थ शोधू पाहणाऱ्या मानवी मनोवस्थेचे चित्रण ‘वारूळ’ या कथेमध्ये लेखक करतात.

एका कलाकाराच्या मनोवृत्तीचा उलगडा करणारी, माणूस वेडा असला तरी त्याच्यातील कलावंत जात नाही अशा आशयाची ‘वेडा’ ही कथा महत्त्वपूर्ण ठरते. नाटकात गायक कलाकार असलेला निवेदक सारंग रागात आपल्या होणाऱ्या चुका कोणीतरी निदर्शनास आणाव्यात या प्रयत्नात असतो. पण त्याला रसिकांची फक्त वाहवाच मिळत असते. मैफिलीत जाणकारांचे येणे होते पण तरी चूक कोणालाच दिसत नाही पण एक वीस वर्षाचा मुलगा येऊन त्याला त्याची सारंग राग छेडताना होणारी चूक दाखवून देतो. आपला गुरु होण्यास त्याला तो विनवतो, त्यावेळी पोलिसाकडून निवेदकाला समजते की जाफर खॉं नावाच्या गुरूकडे शिकणारा त्याचा शिष्य जयवंत आरोंदेकर असून गुरूच्या निधनानंतर त्याच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे. संगीतातला जाणकार असलेल्या त्या मुलाची कहाणी ऐकून बधीर होणाऱ्या निवेदक, अशापद्धतीने ‘वेडा’ही कथा येते.

मानवी प्रवृत्तींवर भाष्य करणारी ‘आघात’ ही कथा ठरते. फादर जॉन व मार्थाच्या कार्याने प्रेरित झालेला तो स्वत: फादर बनतो. मार्थाशी विवाह करून फादर जॉनच्या धर्मकार्यात हातभार लावण्याचा विचारात असलेला तो, मार्थाच्या मृत्युनंतर आयुष्यातील पोकळी भरून काढण्यासाठी फादर बनतो. गावातील लोकांमध्ये चांगले विचार पेरतो, पण नवीन पिढीतील आंतोन सारख्या तरुणांमुळे समाज व्यसनाधीन होत अधोगतीकडे जाताना बघून स्वत: गाव सोडण्याचा विचार मनात येताच, तो बाजूला सारून परिस्थितीपुढे लढण्याचा निर्णय घेतो. त्यावेळी सुकुर या चर्चमधल्या सेवकाकडून त्याला कळते की गावात घडणारी पापे ही फादर जॉन व मार्थाच्या कर्माची फळे आहेत. मार्था व फादर जॉनमध्ये संबंध होते व ती गरोदारही होतो. त्या दोन व्यक्तींवर विश्वास ठेवून आपले संपूर्ण जीवन सत्कर्मी वाहिले त्या फादर जॉन व मार्थाच्या प्रतारणेचा आघाताने आपल्या आत्म्यावर खिळे ठोकून आपल्याला जीवंतपाणी टांगल्याचे त्याला वाटू लागते

लग्नबंधनात अडकलेले सुरेश व सुषमा. शारीरिक सुखाप्रती पत्नीच्या अनिच्छेपुढे भावनिक बंड पुकारणाऱ्या पतीची ‘बेसूर’ ही कथा येते. सुरेशच्या कलेवर प्रेम करणारी, पत्नी म्हणून सर्व बाबतीत परिपूर्ण असलेल्या सुषमाचे चित्रण लेखक करतात. चित्रकार असलेल्या सुरेशला भावनिक आविष्काराने साकारात, चित्रासारखेच दोघांचे मन व शरीराच्या एकजिनसीपणातून आविष्कृत झालेले मूल हवे असते. त्यासाठी तिच्यापासून दूर होत तिच्यात बदलांची अपेक्षा ठेवतो. सुषमाची मनासिक व शारीरिक प्रतारणाक करू शकत नसल्याची ग्वाही देतो. आपल्या पतीला नव्याने उलगडत सुषमा मनाने सुरेशच्या मिठीचा अर्थ उलगडण्याचा

प्रयत्न करते. स्त्री पुरुषाच्या मनोवृत्तीचे चित्रण कारण भावनिक पातळीवर नात्याचा वेध घेण्याचा लेखक प्रयत्न करतात.

**3.2.1.2 स्त्री जीवनातील दु:खाचे चित्रण**

रुक्मिणी आणि नीलिमा या दोन्ही व्यक्तिरेखांच्या माध्यमातून स्त्री जीवनाचे दु:ख मांडणारी 'नाव' ही कथा ठरते. शेवटच्या काही दिवसात सुनेमुळे मुलापासून सुरावलेली, हॉस्पिटलमध्ये एकाकी अवस्थेत असलेली रुक्मिणी विरंगुळा म्हणून आपल्यासारखीच एकाकी असेल्या निलीमाकडे जाते, तिला लढण्याचे बळ देते. मुलगी झाल्यासच घरी नेऊ म्हणणारी सासू व नवऱ्यामुळे नीलिमा खचलेली असते. मातृत्व हे किती सुंदर असते याची जाणीव रुक्मिणी नीलिमाला करून देते. नीलिमाचे प्रसूतीचे दिवस जवळ येत असतात अन रुक्मिणीचे निधन होते निधनानंतर मुलगा मृतदेह घेऊन जातो. रुक्मिणीला शेवटची पाहता न आल्याने नीलिमा खंतावते. लगेचच नीलिमाला कळा येऊ लागतात. नीलिमा प्रसूत होते व तिच्या नवऱ्याच्या व सासूच्या इच्छेनुसार कन्यारत्नही प्राप्त होते. आपल्याला जगण्यास बाळ देणाऱ्या, मातृत्वाचा अर्थ पटवून देणाऱ्या रुक्मिणीचे नाव नीलिमा आपल्या मुलीला ठेवते अशा आशयाची ही कथा येते. नात्यांमधील भावबंधाचे चित्रण या कथेत येते. मानवी जीवनव्यवहार व भावनिक पातळीवरील द्वंद्व हा विठ्ठल ठाकूर यांच्या कथाविश्वातील आशयसूत्राचा महत्त्वाचा भाग ठरतो.

मानवी जगण्यातली धडपड 'शरीरवस्त्रे' या कथेत लेखक चित्रित करतात. शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावणारा, व्यसनाधीन झालेला, वेश्यागृहाच नाद लागलेला आणि तरुणींना प्रेमाच्या नादात फसवून गरोदर राहिल्यानंतर आपल्या पैशांनी स्वत:ची सोडवणूक करणारा 'तो', लीना नावाच्या एका सध्या भोळ्या तरुणीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतो. लीनाचे वडील त्याच क्षणी तिथे पोहोचतात व त्याचा खून करतात. लीनाचा बाप तुरुंगात जातो. कमावण्याचे स्त्रोत हरवल्याने लीना हतबल होते आपल्या आई व भावंडांसाठी कोठ्यात देहविक्रीचे काम करते. कालांतराने ती देहविक्रीचे काम करत असल्याचे समजताच तिला घरातून बेदखल केले जाते. गरोदर असलेल्या लीनाच्या पोटी तोच जन्म घेतो. वेश्या असलेल्या आईच्या जगण्याची ससेहोलपट सहन करणारा दिपू, जमनाबाईच्या कोठ्यात स्वत:च्या आईसाठी गिऱ्हाईक शोधणाऱ्या दिपूची दयनीय स्थिती लेखक मांडतात. वय जास्ती झाल्याने गिऱ्हाईक मिळेनाशी झाल्याने दिपूसह लीनाला कोठी सोडून फुटपाथवर जगावे लागते. फुटपाथवर दिपू भीक मागायला लागतो. उघड्यावर थाटलेल्या संसारामुळे लीना अनेकांच्या वासनांची

शिकार होते. हे सारे तो सहन करतो व एके दिवशी लीना मरण पावते. या कथेत स्त्रीची व्यथा मांडण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. शोकाकूल  परिस्थितीपुढे हतबल होत लीनाने स्वीकारलेला वेश्याव्यवसाय, आपल्याच भावंडांच्या हितासाठी हे जीवन स्वीकारणारी पण शेवटी घरातूनच हाकललेली स्त्री, स्वत:च्या मुलाकडून गिऱ्हाईक मिळवण्यासाठी चालणारे प्रयत्न पाहणारी आई, वय झाल्यानंतर दारूड्यांच्या व म्हाताऱ्यांच्या वासनेची शिकार झालेली, खंगत चाललेल्या शरीराला पोटा पाण्यासाठी श्रृंगार करणारी स्त्री, वय झाल्याने गिऱ्हाईकाअभावी फुटपाथवर संसार थाटण्यास आलेली पण तिथेही वासनेची शिकार झालेली आणि मृत्युनंतर अंत्यविधी करण्याची ऐपतही नसल्याने मुलाकडून परिस्थितीपोटी टाकलेली अशी स्त्री लेखक चित्रित करतात.

### 3.2.1.3 मानवी भावविश्वाचे चित्रण करत कथांमध्ये आलेल्या जगण्याच्या शोकांतिका

'घर' ही एका जमातीच्या जीवनाची कहाणी आलेली आहे. गावाच्या पाठीमागे असलेल्या एका पर्वतावर लोक जात नव्हते कारण तिथे एका जमातीचा देव होता. जमातीतील सर्व विधी पर्वताच्या पायथ्याशी करण्यात येत असे. मूल जन्मले की पायथ्याशी नेत तिथली माती त्याच्या कपाळाला लावली जायची, लग्नप्रसंगी नारळाचा विडा ठेवला जायचा, संकट काळी गाऱ्हाणे घातले जायचे. कित्येक वर्षांनी पर्वतावरील एक मोठी शिळा कोसळण्याची चिन्हे असल्याने गावावर संकट ओढवते. आळवनृत्य करून संकट टाळण्यासाठी त्या जमातीतील लोकांकडून आळवणी केली जाते. परिणामी सर्व लोक गाव सोडून जातात. कथेतील नायक मुन्नी या आपल्या पत्नीसोबत राहतो. नायकाच्या मुलाचा तिथेच जन्म होतो. नायक संकट विसरण्याचा प्रयत्न करतो. मुलाच्या जन्मानंतर विधी पार पडण्यासाठी पर्वताच्या पायथ्याशी गेले असता मोठा खडक कोसळतो. नायक आपल्या मुलाला व पत्नीस वाचविण्यास समर्थ ठरतो. त्याच्या घराचा मात्र चोळामोळा होतो. आपले बाळ सुखरूप असल्याने तो म्हणतो, "नवीन घर बांधलं पाहिजे, बाळा, फक्त घरच बांधलं पाहिजे!". घर गेल्याची खंत असली तरी मरणातून दारातून वाचलेल्या नायकाचे भावनिक द्वंद्व 'घर' या कथेत लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. मानवी भावनिक द्वंद्व मांडणारी 'पाप' ही कथा ठरते. निवेदक असलेल्या डॉ. विनयचा मित्र पंकजचे सविता देसाई या मुलीवर प्रेम जडते. देशप्रेमामुळे आपले सर्वस्व देशासाठी समर्पित करू पाहणारी सविता पंकजला नकार देते. पंकज जर देशासाठी काही करेल तर आपले हृदय पंकजला देण्याचे सांगते. पंकज सैन्यात दाखल होतो. भारत पाकिस्तान युद्धात लढून वीरचक्र प्राप्त करण्याचा निश्चय तो करतो पण लढत असताना

त्याच्या शरीराला जखमा होतात. हात पाय मोडतात, डॉ विनय त्याच्यावर उपचार करताना त्याला सविताने एक श्रीमंत माणसाशी लग्न केल्याचे समजते. तो हतबल होतो व डॉक्टरना आपल्याला विष देऊन या जगातून सोडवण्यास सांगतो. डॉक्टर ते नाकारतो पण आपण त्याची इच्छा पूर्ण न करता त्याला प्रचंड त्रास देत पाप करत असल्याचे त्याला वाटते व भरपूर झोपेचे औषध देत डॉक्टर आपल्या जिवलग मित्राचा शेवटचा निरोप घेतो.

संगीत कलेच्या स्वप्नपूर्ततेच्या पार्श्वभूमीवर आधारलेली ‘हरवलेली सूर’ ही कथा महत्त्वाची ठरते. विश्वंभरबुवा या आपल्या गुरुकडून संगीताचे ज्ञान प्राप्त करून गुरूंची स्वप्नपूर्ती करणाऱ्या निष्ठावान कलावंत श्रीरंगची ही कथा आहे. कधी काळी विश्वनाथबुवा व विश्वास या दोन्ही मुरारीबुवांच्या शिष्यांची कुवरसिंग डाकूच्या दरोड्यातील नाट्यमय घडामोडींमुळे ताटातूट होते. आपल्या मित्राच्या नसण्याने जबलपूरच्या गायनाच्या मैफिलीत न उतरणारे विश्वनाथ बुवा, भंगलेले दोघांचे स्वप्न घेत जगत असतात. श्रीरंग या आपल्याच शिष्यामुळे विश्वनाथबुवा यांची झालेली स्वप्नपूर्ती व विश्वास असण्याची जाणीव व त्यातून सापडलेले हरवलेले सूर अशी ही कथा येते. अत्यंत चित्रमय पद्धतीने नात्यातील भावनिक ओढताण व दोन जीवांची त्यांच्यातील नात्याला शोधण्याची धडपड लेखक ‘भेट’ या कथेतून मांडतात.

‘देणगी’ या कथेत हतबल मास्तरांची कथा येते. आयुष्यभर दानशूर, दयाळू अशी विशेषणे स्वत:वर लादत इतरांसाठी निरपेक्षपणे कार्य केले पण स्वत:च्या मुलीचे लग्नही करता न आल्याने हतबल झालेल्या बापाच्या मानसिकतेचे चित्रण या कथेत येते. अत्यंत चित्रमय पद्धतीने वर्णन आलेली ‘भेट’ ही कथा मानवी नातेसंबंधांवर भाष्य करणारी ठरते. मेडिकलच्या त्याच्या शिक्षणात आपल्यामुळे त्याचे लक्ष विचलित होऊ नये म्हणून आपले प्रेम असलेल्या त्याच्याशी बहिणीचे नाते स्वीकारणारी सविता, लग्न न झालेली पण समाजापासून संरक्षण मिळावे म्हणून मंगळसूत्र व कुंकू घालणारी सविता तिचे त्याच्यावरचे उदात्त प्रेम व जगण्याचे गुपित त्याला समजते. पण शेवटी दोघांमध्ये झालेल्या नात्याला भावकीचे नाव देत एकमेकांपासून दुरावलेल्या मनांचे चित्रण या कथेत येते.

भविष्य अंधुक असल्यामुळे वर्तमानापासून दूर पळू पाहणारा तो, बेकारी मुळे जगण्याला कंटाळलेला, संध्याकाळी शेजारच्यांच्या घरातून ‘पाहिजे’च्या जाहिराती वाचून नोकरीसाठी वणवण फिरणारा, इंटरव्ह्यूवला फिरणारा, तुटलेली चप्पल घालून फिरत असल्याने मोठमोठ्या पदांवर असलेल्या आपल्या जुन्या वर्गमित्रांच्या नजरेतून मुद्दामहून दुर्लक्षिला गेलेला, काम नसल्यामुळे आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांच्या चिंतेचा विषय

ठरलेला, अनेक अनुभवांचे गाठोडे असल्याने लेखन करू पाहणारा पण कागदाला पाच पैसे पडतात, नोकरीचे अर्ज करण्यासाठी कागद लागतील या विचारांनी लेखनाला स्थगती देणारा, प्रयत्न करूनही फळ मिळत नसल्याने इतरांचे बोलणे ऐकणारा, अशी एकूण तरुणाच्या नैराश्येचे चित्रण करणारी ‘नुसताच’ ही कथा येते.

‘मुक्ती’ या कथेत सखारामच्या आयुष्यात आलेले अनेक चढउतर आणि त्या चढउतारांना सामोरे जात निर्माण झालेल्या सखारामच्या मनोवस्थेचे चित्रण ‘मुक्ती’ या कथेत आलेले आहे. आयुष्यात अनेक खस्ता खाल्लेल्या सखारामला आपल्याला बायकोही त्रास देणार अस वाटत असते. पण सुदैवाने त्याला चांगली बायको मिळते पण तीन मुलांनंतर तिचे निधन होते. बायकोच्या निधनानंतर केवळ आपल्या बायकोला मुक्ती मिळावी म्हणून तो धडपडतो. पैशांअभावी आपल्याला विधी करता येत नसल्याने आपल्याकडे असलेल्या छोट्या जागेचा तुकडा गहण ठेवण्याचा प्रयत्न करतो, पण जर घेतलेले पैसे फेडता आले नाहीत तर जमिनीचा तुकडाही आपल्या हातून जाणार, आपल्या मुलांचे भवितव्य काय या विचारांनी त्रस्त होत शेवटी विधीपेक्षा आपल्या गरिबाचे पोट महत्त्वाचे वाटते. श्रीमंताचे आत्मे अमुक्त राहू शकतात पण गरिबांना मुक्त व्हावंच लागतं, अशा विचारांचे वादळ त्याच्या मनात माजते. व शेवटी जमिनीचे गहाण ठेवलेले कागद फाडून टाकत, गहाण ठेवलेल्या गृहस्थाकडे तो जातो अशी कथा येते. ‘शरीरविक्री’ या कथेत शरीरविक्री करणाऱ्या आईच्या निधनानंतर फुटपाथवर आईची विल्हेवाट कशी लावणार या विचारांनी भरल्या मानाने तिचा मृतदेह टाकून दुसऱ्या शहरात जाणारा दिपू येतो. फुटपाथवर भीक मागून पैसे जमवून बूटपॉलिशचा धंदा करू पाहणाऱ्या दिपूला तिथल्या दादाला भिकेच्या मिळकतीतून कमिशन द्यावे लागते. यातून वाट काढावी म्हणून बूटपॉलिश विक्रेत्याकडे तो पैसे देऊ लागतो. रक्कम जमल्यानंतर बूटपॉलिश करणाऱ्यास बूटपॉलिशचे सामान आणून देण्याचा बेत आखतो. पन्नास साठ रुपये जमताच बूटपॉलिशचा व्यवसाय करणारा गृहस्थ पैसे घेऊन पळून जातो. हतबल दिपू ओक्साबोक्शी रडतो. शेवटी आपल्याला कमिशनपर पैसे न दिल्याने आपली फसवणूक केल्याने दादा दिपूच्या पोटात सुरा भोसकून त्याचा खून करतो. तो पुन्हा आकाशात झेप घेतो व पुन्हा जन्म घेतो. आयुष्यात माणसाची होलपट संपत नाही. आयुष्यातील अनेक भोगांना सामोरे जात त्याला पुन्हा एकदा जन्म घेत आत्म्यास नवीन वस्त्र धारण करावे लागते हे त्याच्या कथेतून सांगण्याचा प्रयत्न करतात. दिपूच्या माध्यमातून मानवी जगण्यातील निरंतर दुःखाचे चित्रण लेखक करतात. निराशेच्या प्रवासातला सूक्ष्म असा आशावादी सूर व्यक्त करणारी ‘चित्रकार’ ही कथा आहे. आपली मुलगी हरवल्यानंतर उद्ध्वस्त झालेला, सुखी संसार व आपल्यासारखीच चित्रकलेची दृष्टी असलेल्या आपल्या मुलीच्या प्रतिक्षेत असलेला चित्रकार या कथेत येतो. कधीतरी आपली

मुलगी परत येईल व सवयीनुसार आपल्या चित्रातले बारकावे हेरत चुकांची दुरुस्ती करेल या आशेने जगणाऱ्या चित्रकाराच्या मनातले द्वंद्व मांडत, लेखक चित्रकाराची भावनिक अवस्था मांडताना लिहितात, ‘‘उद्या तो चित्रकार कुठं असेल? कदाचित कुठल्यातरी फुटपाथवर आपली पोतडी रिती करील. त्यावर एक भव्य चित्र काढलं जाईल. निर्जीव फुटपाथ क्षणात सजीव करून टाकेल सूर्य अस्ताला गेला की ते चित्र तो परत पुसून टाकील. त्याच निराश चेहऱ्याने आणि असं कुठपर्यंत तर त्याची बेटी मिळेपर्यंत, कदाचित त्याच्या अंतापर्यंतही!’’ [3]

‘गिधाड’ या कथेत ग्रामीण समाज व्यवस्थेत जगणाऱ्या गणपपच्या कुटुंबाची सावकारामुळे झालेल्या वाताहतीचे चित्रण लेखक करतात. सावकाराच्या शेतात भरपूर कष्ट करून पिकवलेल्या सहा वाट्यांपैकी पाच वाटे सावकाराला देत एक वाटा आपल्यासाठी ठेवत अगदी निष्ठेने काम करणारा गणपा या कथेमध्ये येतो. लग्न होऊन एका मुलाच्या जन्मानंतर अत्यंत समाधानाने जगात असता सावकाराची कुदृष्टी त्याच्या बायकोवर पडते व सावकार तिची अब्रू लुटतो. पत्नीच्या सांगण्यानुसार मुलासाठी तो हतबल बनतो. आपल्यावर झालेल्या अत्याचारानंतर मानसिक आघात सहन न झाल्याने गणपाची पत्नी आत्महत्या करते. मुलाला प्रचंड ताप येतो, डॉक्टरकडे नेण्यास मदतीसाठी सावकाराचा छकडा तो मागतो. पण सावकाराकडून नकार मिळाल्याने पायी जातो पण डॉक्टरपर्यंत पोहोचेतोवर तो आपल्या मुलालाही गमावतो. मृतदेह घेऊन परतताना गिधाड यांच्या भोवती घिरट्या घालते. गिधाडात त्याला सावकाराचा भास होतो. गणपाची हतबलता व समाजव्यवस्थेत सर्वसामान्यांची होणारी गोची याचे चित्रण ‘गिधाड’ या कथेत येते.

### 3.2.1.4 व्यक्त झालेले जीवनविषयक तत्त्वज्ञान

‘ओझं’ ही कथा दोन भिन्न संस्कृतीतल्या दंतकथांवर आधारलेली कथा वाटते. म्हाताऱ्याची व सिंदबादची एका बेटावर भेट होते. सिंदबाद त्या बेटावर अडकतो व म्हाताराही ओहोळ ओलांडून पलीकडे असलेल्या आपल्या घरी जाऊ पाहतो. सिंदबादला आपल्याला खांद्यावर घेत पलीकडे नेण्याची याचना म्हातारा करतो. सिंदबादच्या संस्कृतीत एक गोष्ट ऐकीव असते, त्या गोष्टीनुसार एके काळी दर्यावर्दी असलेल्या सिंदबादला अडकलेल्या म्हाताऱ्याची दया येते व तो त्याला पलीकडे पोहोचवतो, पण म्हाताऱ्यामुळे सिंदबादला विलक्षण दु:खांना सामोरे जावे लागते. या ऐकीव दंतकथेमुळे सिंदबाद म्हाताऱ्याला पलीकडे पोहोचवण्यास नकार देतो. सिंदबादच्या ऐकण्यात असलेल्या दंतकथेनुसार सिंदबादने म्हाताऱ्याला मदत केल्याने म्हाताऱ्याच्या दैवी रूपाकडून वर मिळालेला असतो. सिंदबाद या सर्व कथा दंतकथा मानतो पण शेवटी म्हाताऱ्याला पलीकडे

पोहोचविल्यास आपल्याला खायला मिळेल व आपला जीव वाचेल या आशेने सिंदबाद म्हाताऱ्याला पलीकडे पोहोचवण्याचा निर्णय घेत म्हाताऱ्याला आपल्या खांद्यावर बसवतो. त्यावेळी म्हातारा एका बेटासंदर्भात गौप्यस्फोट करतो. द्वीपलक्ष नावाच्या अस्तित्वरेषेच्या बाहेर असलेल्या या बेटावर भूकंपामुळे माणसाच्या मेंदूवर परिणाम झालेला असतो. इथला माणुस दुसऱ्याचे तारुण्य शोषून तरुण बनू लागतो. त्यामुळे बेटावरील सर्व माणसे एकमेकांचे वैरी बनतात. आपण सोडून बेटावरील सर्वजण बेट सोडून जगभरात विखुरल्याचे सांगतो. कोणाच्याही खांद्यावर दोन दिवस बसून तारुण्य शोषत असल्याचे सांगताच सिंदबाद भयभीत होतो. सिंदबादचे तारुण्य शोषून म्हाताऱ्याच्या जागेवर आता सिंदबाद येणार असतो व पुढे सिंदबाद स्वत: म्हातारा बनत एका तरुणाचे तारुण्य शोषून घेणारा असतो. द्राक्षांची दारू पाजून म्हाताऱ्याकडून सुटका करून घ्यायची हे दंतकथेत असल्याने द्राक्षं मिळविण्याचा एक विफल प्रयत्न सिंदबाद करतो. जीवनाचे तत्वज्ञान या कथेतून मांडण्याचा लेखक प्रयत्न करतात. आपल्या जीवनप्रवासात प्रत्येकाला संघर्ष हा करावाच लागतो, अनेकांच्या  ओझ्याचा भार घ्यावाच लागतो. कालांतराने तिच ओझी पुढच्या पिढीच्या खांद्यावर येतात पण जगण्याचा प्रवास काही थांबत नाही.

'चाकोरी' ही अशाच पद्धतीची कथा येते. एका कफनीवाल्या साधूच्या भेटीनंतर पर्णशिखी या मायाप्रदेशात जाऊन, जगण्याच्या चाकोरीतून बाहेर पडत चिरंतन सुखाच्या शोधार्थ सुरू झालेल्या तिघांच्या अविरत, खडतर प्रवासाच्या पार्श्वभूमीवर असलेली 'चाकोरी' ही कथा ठरते. हिरव्यागार प्रदेशाच्या शोधात असलेले तिघे कशापद्धतीने चाकोरीबाह्य जगण्यासाठी खडतर प्रवास अवलंबतात, खडतर प्रवासात तिघांचे देह अस्थिपंजर बनतात, अनेक गावे लुटत पोटापाण्याची व्यवस्था करता करता त्यांना वाळवंटी प्रदेश लागतो, भुकेने अस्वस्थ झालेल्या तिघांना एकमेकांचे मांस खाण्याची इच्छा होते. त्यात थोरल्याचा बळी जातो. हिरवागार प्रदेश मागे राहिल्याचे समजताच धाकटा परतीच्या वाटेने जातो, आणि मधला चाकोरीबाह्य आयुष्य जगण्याचे समाधान व्यक्त करत असतानाच चाकोरीतच अडकतो. मानवी वृत्तीप्रवृत्तींवर ही कथा भाष्य करते. कितीही खडतर प्रवास केला तरी निसर्गाने बहाल केलेल्या चाकोरीबद्द आयुष्याची चाकोरी मोडणे अशक्यप्राय आहे. सृष्टी ही सुद्धा एक चाकोरीच आहे हे जीवनविषयक तत्वज्ञान थोरला, मधला व धाकटा या तीन जीवांच्या माध्यमातून लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. दंतकथेच्या पार्श्वभूमीवर आधारलेली 'चाकोरी' ही कथा जीवनगर्भीत आशयाचा एक मोठा पट मांडताना दिसते.

‘वेड’ या कथेतही माणसाच्या जगण्यातील प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा शोध सुरू असलेल्या वेड्या मनाचे भावबंध लेखक चित्रित करतात. हातांच्या रेषांचा अर्थ उलगडण्याचा प्रयत्न करणारा भगवान व पशु पक्षांच्या आवाजाचे अर्थ शोधू पाहणाऱ्या वृद्धाचे चित्रण लेखक करतात. माणसाला आयुष्यात असलेलं वेड जगवतं. मनातले वेड संपता आपणही संपतो. दारिद्रय व काळोखी जगण्याने संसारापासून अलिप्त राहू पाहणारा विसुभाऊ ‘काळोख’ या कथेत दिसून येतो. माणुस अनेकदा जगण्याशी अलिप्त राहू पाहतो. आपण अलिप्त का राहिलो हे जाणून घेण्यासाठी धडपडतो. आयुष्य ओढग्रस्त वाटू लागते, सभोवताली काळोख पसरला तरी रोजच्यासारखे जगावेच लागते अशा पद्धतीने जीवनावर भाष्य करणारी ‘काळोख’ ही कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. जगण्यातील विलक्षण असे अस्तित्वभान ‘ओझं’, ‘वेड’, ‘काळोख’ या कथांमधून व्यक्त होते.

### 3.2.1.5 गोवा मुक्तीनंतर स्वातंत्र्यसैनिकांचे जीवन चित्रण

पोर्तुगीजांच्या सत्तेत लाचार बनलेली माणसे आणि मुक्तीनंतरच्या कालखंडात त्यांच्यात आलेला मग्रूरपणा या पार्श्वभूमीवर ‘स्वातंत्र्य’ ही कथा येते. गोवा स्वातंत्र्यलढ्यात भूमिगत चळवळीमध्ये सक्रीय असलेला ‘तो’. पण मुक्तीनंतरच्या काळात त्याला इतरांकडून मिळणारी हीन वागणूक, संसार चालविण्यासाठी चाललेली त्याची धडपड, त्याच्या बेकारीमुळे घरच्यांची होत असलेली चिडचिड, त्याच्या वयात आलेल्या मुलीचे आपल्या गरजा पुरविण्यासाठी मुलांबरोबर फिरणे या सगळ्यात खंतावलेल्या त्याची व्यथा लेखक मांडतात. आपल्याला निस्वार्थीपणाचे प्रदर्शन करायचे होते म्हणूनच आपण आपला चळवळीतला साथीदार चौधरी मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांचा पी.ए. बनण्यास नकार दिला का? या प्रश्नाने त्याच्या मनात भावनिक द्वंद्व निर्माण होते. दुसरीकडे हेडमास्तर विद्यार्थिनीशी लाडीकपणे आगळीक करतो आणि कर्तव्यदक्ष्य आणि स्वाभिमानी असलेल्या त्याचा विरोध करताना विनयभंगाचा आळ घेतला जातो. एके काळी स्वातंत्र्य चळवळीत असताना पाटलांपासून मुलीची सोडवणूक करणाऱ्या त्याच्यावरच समाजाच्या दुषित नजरा हेरल्या जातात. सगळीकडे हेटाळणी होत असल्याने आपण खरेच स्वातंत्र्य मिळवले का? हा प्रश्न त्याच्या मनात उपस्थित होतो. आपल्याच माणसांचे बोलणे त्याच्या जिव्हारी लागते आणि एके दिवशी श्रमाने थकलेल्या आणि भुकेने व्याकुळ झालेल्या त्याचा अपघाती अंत होतो. मृत्युपश्चात तो स्वप्नरंजनात जातो, नेत्रपेढीत त्याच्या इच्छेनुसार नेत्र काढले जातात त्यावेळी आताच कुठेतरी स्वातंत्र्य मिळाल्याने त्याचा आत्मा कण्हतो. मृत्युनंतर माणसाच्या जीवनाचे भोग संपतात व खऱ्या अर्थाने सर्व पाशातून स्वातंत्र्य मिळते, असा जीवनाचा गहन अर्थ ही कथा मांडते.

### 3.2.2. पु. शि. नार्वेकर यांचे कथालेखन

पु. शि. नार्वेकर यांनी विपुल प्रमाणात लेखन केले. 'विघ्नहर्ता', 'मृगजळ', 'कलंदर', 'ब्लॅकीस्ट', 'मुखवटे' असे त्यांचे एकूण पाच कथासंग्रह प्रसिद्ध झाले . १९८० च्या दशकात लेखन करणाऱ्या पु. शि. नार्वेकर यांचे नव्वदोत्तरी कालखंडात प्रसिद्ध झालेले 'कलंदर'(१९९८), 'ब्लॅकीस्ट'(२००८), 'मुखवटे'(२०१२) असे तीन संग्रह महत्त्वाचे ठरतात. गोवा मुक्तिपूर्व व मुक्तीनंतरचा काळ जगलेल्या नार्वेकरांच्या कथा तत्कालीन भान जपताना आपल्याला दिसून येते.

### 3.2.2.1 गोवा मुक्तिपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीवर मुक्तीनंतरच्या कालखंडातील सामाजिक बदलांचे चित्रण

नार्वेकरांच्या 'महानंदा' या कथेत गोव्यातील कलावंत समाजातील मेनकेच्या सौंदर्यावर भाळलेला, बायको मुले असलेला तरी मेनकेशी नाते ठेऊ पाहणारा एक छोटा भाटकार येतो. गोवा मुक्तिपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीचे चित्रण करत मुक्तीनंतरच्या कालखंडातील सामाजिक बदलांचे चित्रण या कथेत लेखक करतात. एके काळी बागायतींवर अर्थव्यवस्थेची धुरा असलेल्या गोव्यात खनिज मालाच्या खाणी सुरू होतात. माडाच्या मोठमोठ्या बागा म्हणजे भाटे असलेले भाटकारांच्या मालकीच्या जमिनीवर 'मुंडकार' माडांची राखण व देखभाल करून त्यांच्या परवानगीने तिथेच संसार थाटायचे. मुक्तीनंतरच्या काळात 'मुंडकारांना' राहत्या जमिनीचा हक्क मिळाला. या बदलांचे चित्रण कथेत येते. घरच्या लक्ष्मीला प्रसन्न ठेऊन बाहेरच्या कलावंत समाजातील स्त्रियांशी संबंध ठेवणे प्रतिष्ठेचे मानण्याचा हा काळ होता. गोवा मुक्तीनंतर शेष विधी करून परंपरागत शरीरविक्रीस विरोध करत या परंपरेचे ओझे भिरकावण्याचा प्रयत्न झाल्याचे लेखक 'महानंदा' या कथेत लिहितात. गोवा मुक्तिपूर्व काळात त्याचे व मेनकेचे संबंध जुळतात. मेनकेच्या सौंदर्याने मंत्रमुग्ध होत निवेदक तिला मागणी घालण्यासाठी तिच्या घरी जातो. मेनका नकळत निवेदकाच्या प्रेमात पडते. घरात आलेल्या श्रीमंत गिऱ्हाईकाला झिडकारून एक सर्वसामान्य छोटा भाटकर असलेल्या निवेदकाशी मेनका एकनिष्ठ राहते. मेनकेची बहिण असलेल्या अंबूला एक गुजरती शेटजी आपली रखेली म्हणून ठेवतो व तिच्यावर ऐश्वर्याची उधळण करत मुंबईत बंगला थाटून देतो. दुसरीकडे निवेदकाच्या काजूच्या धंद्यात तोटा निर्माण झाल्याने तो कर्जबाजारी होतो. तो निर्धन झाल्यानंतरही मेनकेची आस्था व प्रेम अबाधित असते. अंबूकडून अनेक मोठ्या प्रस्तावांची मागणी तिच्यापुढे ठेवण्यात येते पण या सगळ्यांना झिडकारत निवेदकाशी एकनिष्ठ राहणारी, प्रसंगी स्वत:च्या जीवाचेही

बरे वाईट करू पाहणारी कलावंत समाजातील मेनका या कथेत येते. निवेदक तिला महानंदा संबोधतो. पैसा जास्त तिथे आपल्या देहाची किंमत ठरविणाऱ्या कलावंत स्त्रियांप्रती असलेला समाजाच्या मानसिकतेला फाटा देण्याचा प्रयत्न या कथेतून होतो.

'लग्न' या कथेत देवळातल्या पुजाऱ्याचा मुलगा असलेला शाम, शेवंता भाविणीची मुलगी असलेल्या सुरंगाच्या प्रेमात पडतो. तिला लग्नाचे वचन देतो. सुरंगा पूर्व परंपरेला विरोध करते व रखेली बनण्यास नकार देते. सुरंगाच्या आईला मात्र आपल्या मुलीने परंपरेचे पालन करावे अन्यथा देवीचा कोप होईल अशी धारणा असते. शाम गफलतीच्या क्षणी तिला लग्नाचे वचन देऊन बसलेला असतो पण परंपरेच्या चौकटीत जगणाऱ्या शामला लग्नाची जबाबदरी नको असते. भाविणीच्या मुलीशी लग्न केल्यास समाज काय म्हणेल असा प्रश्न त्याच्या पुढ्यात असतो. सुरंगाला खोटी वचने देत तिच्याशी विवाह न करता तो तिला आपल्यासोबत नेतो. दुसऱ्या गावात मास्तरकी करणाऱ्या शामरावासोबत सुरंगा  पळून जाते. लोकांमध्ये कुजबुज सुरू झाल्याने तो तिच्या गळयात मंगळसूत्र घालतो. लग्नासंदर्भात प्रश्न विचारल्यानंतर तो अनेक सबबी तिला देत राहतो. सुरंगा आता शामरावाच्या नाटकात भाग घेऊ लागते. 'संशयकल्लोळ' नाटकातील सुरंगाने साकारलेली रेवतीची भूमिका कौतुकास व चर्चेस पात्र ठरते. सुरंगेशी संसार थाटतो व दुसरीकडे त्याचे लग्न ठरवले जाते. सुरंगेला काही कळू न देता तो लग्न करण्याचे ठरवतो.आपला विश्वासघात करून लग्न करू पाहणाऱ्या शामरावचा कट तिला समजल्याने ती आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते पण बचावते. शामराववरचा विश्वास उडाल्याने तटस्थ भूमिका घेत आपल्या झालेल्या फसवणुकीने गळून न पडता नव्या जोमाने उठते व शामरावला सोडून नवीन आयुष्याची सुरूवात करते. तटस्थपणे आपण कोणाचीही रखेली बनणार नसल्याचा निर्णय घेते. एके काळी रखेली ठेवणे प्रतिष्ठेचे होते पण बदललेल्या काळाचे व समाजाच्या मानसिकतेचे चित्रण लेखक करतात. सुरंगेशी असलेल्या संबंधामुळे शामरावचे ठरलेले लग्नही मोडल्याचे कथेतून दिसून येते. सुरंगेशी लग्न करण्याच्या विचारात असलेल्या शामरावने आता मात्र सुरंगेला गमाविलेले असते. गोमंतकातील देवदासी प्रथेत आलेल्या वैचारिक बदलांचे चित्रण या कथेत येते.

राजकारणात हे समाजकारण असते. पण आजच्या राजकारणात शिरलेल्या स्वार्थी प्रवृत्तीचे चित्रण 'आव्हान' या कथेत येते. वेदगंगा पूल बांधणीच्या कामात हस्तक्षेप करून मोठा अनुभव नसलेल्या स्टिव्हन्सन कंपनीला कंत्राट देणारा मुख्यमंत्री कुलदीपसिंह या कथेत येतो. 'दैनिक सुदर्शन' मधील संपादक निरंजनदास यांनी

प्रसिद्ध केलेल्या निर्भीड अग्रलेखामुळे जनतेत खळबळ माजते. निवडणुकांवर त्यांचे गंभीर परिणाम होतील या भितीने 'दैनिक सुदर्शन'चा आवाज दाबण्याचा प्रयत्न होतो. आमदार असलेली चंचलादेवी मुख्यमंत्र्याशी आपल्या स्वार्थापोटी चांगले संबंध ठेवते. आपल्याला मंत्रिमंडळात घेण्याचे वचन दिल्याची जाणीव ती करून देत असते. चंचलादेवीचा नवरा कालिचरण हा वादळी व्यक्तिमत्वाचा जहाल कामगार पुढारी असतो. कामगार संपात मुख्यमंत्री कालिचरणला हाती घेऊन खेळी रचतो. आपल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे पुढे येऊ नये म्हणून कालिचरणाला हाताशी धरून संप पुकारतो. राजकारणामुळे कामगारांमध्ये दोन गट पाडले जातात. कालिचरण संप थांबविण्यासाठी दोन अटी पुढे मांडतो. कामगारांवरील चार्जशीट हटविण्याचा व संपाच्या दोन महिन्यांचा पगार कामगारांना देण्याचा व त्या बदलात नव्या कराराची मागणी सोडून संप मागे घेण्याचे ठरवतो. दुसऱ्या दिवशी संप मागे घेतल्याची बातमी वर्तमानपत्रात झळकते. मुख्यमंत्र्याचे न ऐकता संप मागे घेऊन मुख्यमंत्र्याला आव्हान दिल्याने रागाने लालबुंद झालेले मुख्यमंत्री चंचला देवीला फोन करतो. आपल्या हितासाठी संपाचे व कामगारांचे कशापद्धतीने राजकारण केले जाते याचे चित्रण 'आव्हान' या कथेत येते.

### 3.2.2.2 गोवा मुक्तिपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीवर पोर्तुगीजांच्या राजसत्तेतील अन्याय अत्याचारांचे चित्रण

गोवा मुक्तिपूर्व पार्श्वभूमीवर 'ब्लॅकीस्ट' ही कथा येते. भारतीय कस्टम व पोर्तुगीज आल्फांदला चुकवून गोव्यातून मालाची चोरवाटेने बेळगाव – मुंबईला आयात निर्यात करण्याचे काम करणारा, ब्लॅकीस्ट असलेल्या निवेदक रमेशला जुना मित्र रंगराव भेटतो. गोव्यात आल्फांदवर असलेला, ब्लॅकीस्टांवर पाळत ठेवणाऱ्या पोर्तुगीजांमधील 'मेस्तिस' जातीच्या रोबेर्तोची कथा रंगराव रमेशला सांगतो. रोबेर्तो मद्य व मदिराक्षींच्या गर्तेत रमणारा व अस्सल पोर्तुगीज एका बड्या सरकारी अधिकाऱ्याच्या मुलीशी लग्न करून ऐश्वर्य भोगणारा आहे. प्यारेलाल या कस्टम अधिकाऱ्याकडून सोन्याच्या ब्लॅकची माहिती रोबेर्तोला मिळत असते व दोघांमध्ये अवैधपद्धतीने मिळालेल्या घबाडाची समान वाटणी होते. बाबुराव केनाडीकरांच्या सुंदर बायकोवर रोबेर्तोची बुभुक्षित नजर जाते. ते सोन्याचे ब्लॅकीस्ट असल्याचे समजताच आनंदाने रोबेर्तो या गोष्टीचा फायदा घेण्याचे ठरवतो. सोन्याची बिस्कीटे केनाडीकरांच्या सुंदर बायकोने गुप्तभागात लपवून ठेवल्याचा रोबेर्तोचा संशय खरा ठरतो. केनाडीकर बायकोची अब्रू वाचविण्याची विनवणी करतो. लेडी डॉक्टरला आणून तपासणी करून बिस्किटे मिळवण्याचा कट रोबेर्तो रचतो व केनाडीकरच्या बायकोला स्वत:च्या बंगल्यावर नेत दुसऱ्या दिवशी सोडण्याचे

कबूल करतो व आपला डाव साधतो. पोटापाण्यासाठी धंदा करणाऱ्या सर्वसामान्य ब्लॅकीस्टांना पकडून त्यांना व त्याच्या स्त्रियांच्या अब्रू लुटणाऱ्या  पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या वासनाग्रस्त प्रवृत्तींचे चित्रण या कथेत येते.

निवेदनातून 'ब्लॅकीस्ट'या कथेचा पुढचा भाग वाटणारी 'चौकोन' ही कथा येते. रोबेर्तोच्या कुकर्माचा पुढचा भाग रंगराव रमेशपुढे कथन करतो. ल्युसिया नावाच्या मोठ्या अधिकाऱ्याच्या मुलीशी विवाहबद्ध झालेला रोबेर्तो स्त्रियांची अब्रू लुटतो. मारिया नावाच्या एका देखण्या नर्सवर तो भाळतो. रोबेर्तोच्या आल्फांदवर शिपाई असलेल्या  शाव्हियेरशी तिचे संबंध असतात. शाव्हियर व रोबेर्तो या दोहोंचे मारियाकडे येणे जाणे सुरू असते. रोबेर्तोकडे आल्फांदवर कामात असताना ब्लॅकीस्टांची तपासणी होते, सगळे निघून जातात व शाव्हियेरला नंतर एकूण शंभर तोळयांची पाच सोन्याची बिस्किटे सापडतात. रोबेर्तोला ती देण्याचा तो विचार करतो पण आपले आयुष्य स्थिरस्थावर होईल या आशेने ती बिस्किटे स्वत:जवळ ठेवतो. दुसऱ्या दिवशी रोबेर्तोला बिस्किटांना गुंडाळला जाणारा काळया वेष्टनचा तुकडा सापडतो. त्यातील बिस्किटे कुठे असा प्रश्न त्याला पडतो. या घटनेनंतर आठ दहा दिवसांनी शाव्हियेर मारियाकडे जातो. मारियाला तीन पवनांची सोन्याची साखळी देत आपण शंभर तोळे धाडसाने मिळविल्याचे सांगत लग्नाची मागणी घालतो. मारियालाही भोळाभाबडा, सज्जन असा शाव्हियेर आवडलेला असतो. फक्त रोबेर्तो आपल्याला त्याच्याशी लग्न करू देईल का हा तिचा प्रश्न असतो. रोबेर्तोला आपल्याला शाव्हियरने लग्नासाठी मागणी घातल्याचे सांगत मारिया रोबेर्तोला दूर लोटते. रोबेर्तो तिला शाव्हियरची पत्नी बनून आपली प्रेयसी म्हणून जगण्याचा सल्ला देतो पण शाव्हियरशी प्रतारणा करणे तिला पटत नाही. आपल्याला शाव्हियरने सोनसाखळी दिल्यापासून आपण त्याची झाल्याचे ती सांगते. ऐपत नसलेल्या शाव्हियरने साखळी दिल्याने रोबेर्तोला संशय येतो. आपल्याला सापडलेल्या वेष्टनाची त्याला आठवण होते व शाव्हियरवर शारीरिक अत्याचार करून गुन्हा कबुल करून घेत त्याला चार वर्षाच्या कोठडीची शिक्षा सुनावतो व दीवला पाठवणी करत आपला मार्ग मोकळा करतो. शेवटी या तीन रेषेत चौथी रेषा जुळते व 'चौकोन' ही कथा आकार घेते. आपला नवरा रोबेर्तो याचे परक्या स्त्रीबरोबर संबंध आहेत हे कळल्यावर बड्या अधिकाऱ्याची मुलगी असलेली ल्युसिया शाव्हियरची सोडवणूक करते व मारिया व शाव्हियरच्या संसाराची सुखाने सुरूवात होते. गोवा मुक्तिपूर्व काळात मिस्तिसांकडून होणाऱ्या सर्वसामान्य गोमंतकीय जनता व स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे चित्रण 'चौकोन' या कथेत येते.

‘सूड’ या कथेतून गोवा मुक्तिपूर्व काळात स्त्रियांवर असलेल्या वाकड्या दृष्टीमुळे स्त्री जीवनाची झालेली वाताहत येते. राजाराम या आपल्या नवऱ्यासोबत हॉटेलचा धंदा थाटणाऱ्या मनोरमावर कॉज्मेरो मोंतेरो या पोर्तुगीज अधिकाऱ्याच्या ट्रकचा ड्रायव्हर असलेल्या युसूफची कुदृष्टी असते. क्रूरकर्मा म्हणून प्रसिद्ध असलेला, पोर्तुगीज सरकारच्या गुप्त पोलीस दलाचा प्रमुख असलेला कॉज्मेरो मोंतेरो गोवा मुक्तिसाठी चाललेली सत्याग्रह चळवळ तसेच भूमिगत असलेल्या क्रांतिकारक संघटनांचे कार्य चिरडून टाकण्याच्या प्रयत्नात असतो, असे चित्रण कथेत येते. मोन्तेरोचा ट्रक ड्रायव्हर असलेला युसूफ माजलेला असतो. मनोरमाच्या शरीराशी लगट करण्याचा तो प्रयत्न करतो. पण बलदंड अशा पतीमुळे तिची सुटका होते. दोन महिन्यांनी राजारामला मनोरमाच्या आईची तब्येत बरी नसल्याने दूर पेडणे गावात निघावे लागते. रात्रीच्या प्रहरी चालत जाणाऱ्या राजारामचा जयहिंद चळवळीतच सहभाग असल्याचे युसूफ मोन्तेरोला सांगतो व सूड उगविण्याचा प्रयत्न करतो. पण मोंतेरो राजारामला सोडण्याची आज्ञा देतो. युसूफ मोंतेरोला राजारामची पत्नी सुंदर असल्याचे सांगतो. स्त्रीच्या शरीरास चटावलेला मोंतेरो राजारामच्या घरात घुसत तिला जयहिंद चळवळीत अडकवून तिचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतो पण शेवटी खरोखरच तिच्या घरात भूमिगत क्रांतिकारक संघटनेची पत्रके सापडतात. राजाराम क्रांतिकारी ठरतो व पोर्तुगीजांसाठी दहशतवादी ठरतो. मनोरमाला अटक करून आपला डाव साधण्यास सज्ज असलेल्या युसूफ व मोंतेरोच्या वासनाग्रस्त नजरा मनोरमा हेरते व साडी बदलण्याचे निमित्त साधून मागील दारातून दाट झाडीत पसार होते व जीवाच्या आकांताने वाट मिळेल तिकडे पळत सुटते. जयहिंद चळवळीच्या नावाखाली गोवामुक्तिपूर्व कालखंडात पोर्तुगीज अधिकाऱ्यांकडून सर्वसामान्य स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे चित्रण ‘सूड’ या कथेत येते.

### 3.2.2.3 गोवा मुक्तिचळवळीचे चित्रण

प्रतिष्ठित घरात जन्मलेला पण वडिलांच्या मृत्युनंतर संसाराची ठोकर खाणाऱ्या व अवघ्या विसाव्या वर्षी गोवा स्वातंत्र्य संग्रामात निर्भयपणे लढा देणाऱ्या निवेदकाची कथा ‘प्रवाह’ या कथेत येते. गोवा मुक्तिपूर्व कालखंडातील मुक्तीसाठी केलेल्या चळवळींचे चित्रण या कथेत येते. पंधरा ऑगस्टला हिंदुस्थानातून मोठ्या संख्येने सत्याग्रही येणार असल्याचे कळताच सर्वत्र गोंधळ माजतो. गोमंतकीय जनतेत भीती पसरते. काही लोक बेळगावचा मार्ग धरतात. निवेदकही बेळगावला जातो व भितीने गोवा सोडून गेलेला निवेदक, वासू या आपल्या मित्राच्या एका मित्रामुळे नॅशनल कॉंग्रेस गोव्याच्या शिबिरात सहभागी होतो व नकळत मुक्तिलढ्याशी जोडला

जातो. गोवा मुक्तिपूर्व कालखंडात मराठी वर्तमानपात्रांवर लादलेली बंदी, जयहिंद वाल्यांची चळवळ, लोकांना लढण्यास प्रेरणा देणारे डॉ. राम मनोहर लोहिया, 'फ्री गोवा' या इंग्रजी साप्ताहिकातून गोवेकरांमध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा जागृत करणारे व्हिक्टर ब्रागांझा, सत्याग्रहींच्या तुकडीचा प्रमुख असलेल्या व्हिक्टर ब्रागांझाचे गांधी टोपी घालणे, 'व्हिवा पोर्तुगाल, व्हिवा सालाझार' म्हणण्यास विरोध दर्शवत 'जय हिंद'चे नारे लावणे, सत्याग्रहींवर पोर्तुगीजांनी 'पालमोत्री' या काटेरी पट्यांनी मारत केलेले अत्याचार, कॉज्मेरो मोंतेरो या पोर्तुगीज अधिकाऱ्याच्या आदेशाखाली सत्याग्रहींची होणारी छळवणूक, व्हिक्टर ब्रागांझाला झालेला आठ वर्षे व निवेदाकासह अन्य सत्याग्रहींना झालेला चार वर्षांचा कारावास इत्यादींचे चित्रण 'प्रवाह' या कथेत येते. सत्याग्रही असल्याने निवेदकाचे नाव सरकारच्या ब्लॅकलिस्टमध्ये येते व नोकरीसाठी वणवण सुरू होते. शेवटी भारतीय सेना गोव्यात शिरते व गोवा मुक्त होतो. निवेदकाला गावातील पोलीस स्टेशनवर झेंडा चढवण्याचा सन्मान दिला. स्वांतत्र्यनंतर गोव्यातील निवडणुकांचे चित्रण कथेत येते. निवेदकाला निवडणूक लढण्यास कॉंग्रेसचे तिकीट मिळत नाही. निवडणुकीची धामधूम संपते व स्वतंत्र झालेल्या गोव्यात निवेदकाचा संसार सुरू होतो. नोकरी नसल्याने वणवण सुरू होते, बायको सोडून जाते. संसारातील जाचाला कंटाळलेला तो बाई व बाटली यात गुरफटतो. व एके काळी स्वातंत्र्यवीर म्हणून 'हिरो' ठरलेला निवेदक आज मिळेल त्या दिशेने प्रवाहासोबत जात असतो. स्वातंत्र्यवीराच्या गोवामुक्तीनंतरच्या काळातील संसाराच्या वाताहतीचे चित्रण कथेत येते.

### 3.2.2.4 मानवी वृत्तीप्रवृत्तींचे चित्रण

नार्वेकरांच्या 'कलंदर' या कथासंग्रहात 'कलंदर वृत्तीच्या माणसांचे चित्रण झालेले दिसून येते. 'एक बाप आणि त्याचा मुलगा' या कथेत सज्जन, देवभक्त, प्रामाणिक, भाटकाराच्या भाटात प्रामाणिकपणे राबून काम करणारा कुष्टा येतो. पत्नीच्या निधनानंतर घरातील लक्ष्मी निघून जाते. कुष्टाचा मुलगा काशी मात्र वडिलांच्या वळणावर जात नाही. लाकडाचा भारा घेऊन येणाऱ्या आबोल्यावर अतिप्रसंग करतो, भाटकारांच्या भाटातील नारळ, सुपारी चोरून उद्योग करतो, चोऱ्या, मारामाऱ्या करत एका बाईशी संबंध ठेवतो, बंदुकीची भीती दाखवून वामन भाटकरचे पाच हजार रुपये लुटतो, इथपर्यंत त्याची कामगिरी थांबत नाही तर आवडू नावाची विधवा बाई आपल्या एकट्याची रखेली नसल्याचे समजताच तिच्याकडे आलेल्या माणसाचा तो खुनही करतो. गावात त्याची दहशत माजलेली असते. पोलीसही त्याच्या मागावर असतात. काशी आता गाव सोडून जातो. आपल्या मुलाच्या वर्तनाने काशी हादरतो. कित्येक महिन्यांनी आलेल्या आपल्या पोटच्या पोराला पकडून देण्यासाठी तो

भाटकारकडे जातो व पोलिसांना बोलाविण्यास भाटकारसोबत निघतो. आपल्या मुलावर नितांत प्रेम असलेला बाप आपल्या मुलाच्या क्रूरकर्माने विव्हळतो पण त्या कलंदरी प्रवृत्तीला कुठे तरी छेद द्यायचा असल्याने आपले सर्व बळ एकवटून त्याला पकडून देण्याचा प्रयत्न करतो.

'अंकुर' या कथेत मोठ्या इस्टेटीचे मालक असलेले विश्वनाथ बेलारीकर त्यांच्या शिवनाथ या छोट्या भावाचे उमा नावाच्या सुंदर स्त्रीशी लग्न लावून देतात. अध्यात्माची ओढ असलेला शिवनाथ तिला मागे टाकून पळून जातो. तारुण्याने रसरसलेली उमा एकटी पडते. कधीच वाड्याबाहेर न पडणारी उमा गर्भधारणा करते. घराण्याची अब्रू वाचविण्यासाठी गर्भ पाडण्याचा विचार केला जातो. पण ती त्याला कडाडून विरोध करते. आपली व्यथा ती जगुदादा म्हणून परिचित असलेल्या जगन्नाथला सांगते. प्रगल्भ विचारांचा जगुदादा यात उमेची चूक नसून पळून गेलेला शिवनाथ जबाबदार असल्याचे सांगतो. प्रसुतीनंतर मुलास नाहीसे करण्याचा कट आखला जातो पण जगुदादा हे सगळे कट फोल ठरवतो. उमेचा मुलगा शिवनाथचा मुलगा म्हणून वाढवला जातो. त्याचे मोठेपणी लग्न लावण्यात येते. त्याचाही मुलगा जन्माला येतो व सतीश नावाचा तो मुलगा इस्टेटीला वारसदार नसल्याने पुढचा भाटकार ठरतो. शिवनाथच्या नातवाला विश्वनाथच्या सुनेच्या मांडीवर बसवून सतीशला विश्वनाथाच्या मुलास दत्तक दिले जाते. ते पाहून उमा समाधानाने डोळे मिटते. शिवनाथ गेल्यानंतर झालेले मूल हे विश्वनाथचे असल्याने, विश्वनाथचाच नातू असलेल्या सतीशला त्याची हक्काची जागा मिळालेली असते असा गौप्यस्फोट या कथेत होतो. रहस्यात्मक पद्धतीने कथेला आकार दिलेला दिसतो. नवरा सोडून गेल्यानंतर शरीरसुखास आसुसलेली उमा व आपल्याच भावजयीशी संबंध ठेवणारा विश्वनाथ या दोन्ही व्यक्तिरेखांमधून मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करण्याचा प्रयत्न लेखक 'अंकुर' या कथेत करतात.

सर्व ऐश्वर्य पदरी असूनही मनात एक बोचरे शल्य घेऊन जीवन जगणारा निवेदक 'प्रायश्चित' या कथेत येतो. श्रीमंत भाटकार असलेल्या त्याला सरला नावाची सुंदर पत्नी व सर्व ऐश्वर्य लाभलेले असते. रमाकांत हा जंगल खात्यात काम करणारा 'ग्वार्द' (गार्ड) त्याचा मित्र असतो. शिकारीची आवड असलेला निवेदक आपला मित्राच्या मदतीने शिकारीस जातो. शिकारीची सर्व रणनीती आखली जाते. सावजाचा आवाज हेरून निवेदकाने सोडलेली गोळी रमाकांतला लागते व त्याचा मृत्यू होतो. मूल नसलेला व पश्चातापाने जगणारा निवेदक आपल्या कृत्याचे प्रायश्चित म्हणून आपली सगळी संपत्ती रक्ताचे नाते नसलेल्या रामाकांतच्या मुलाला देण्याचे ठरवतो. पोर्तुगीज राजवटीच्या पार्श्वभूमीवर ही कथा येते. पोर्तुगीज कायद्यानुसार आपल्याला मनुष्य वधाच्या गुन्ह्याखाली

अठ्ठावीस वर्षांची शिक्षा होणार म्हणून आपल्या हातून झालेला मृत्यू तो कबुल करत नाही. स्वत:च्याच हाताने चुकून रमाकांतच्या बंदुकीची गोळी सुटल्याचा रिपोर्ट केला जातो. आपल्या नवऱ्याच्या वाढत्या व्यसनाधीनतेचे कारण सरलाला समजते. व आपल्या नवऱ्याचे दुःख ते आपले दुःख म्हणून स्वीकारत रमाकांतच्या मुलाला संपत्ती देण्याचे निश्चित करते. संपत्ती देऊन गुन्ह्याचे प्रायश्चित केल्याने आता दारूची गरज नसल्याने मद्यपेयास हात घालणाऱ्या आपल्या नवऱ्याला बजावते.

अत्यंत परोपकारी वृत्तीच्या बाळकृष्ण म्हणजे बाळयाची ही कथा येते. बाळया जयश्रीशी विवाहबद्ध होऊ पाहतो पण भाटकाराच्या दिलीप या मुलाला भुललेली जयश्री बाळयाला नकार देते. जयश्रीला दिवस जातात पण दिलीप मुलाची जबाबदारी झिडकारतो व लग्न करण्यास नकार देतो. हतबल जयश्रीचे बाळंतपण सुखरूप पार पडावे म्हणून बाळया सर्वतोपरी मदत करतो, जयश्रीच्या मुलाच्या पित्याच्या जागी आपले नावही लावतो. पण जयश्रीचे मुल दगावते. परतलेल्या जयश्रीशी परत सलगी करण्याचा दिलीप प्रयत्न करतो पण यावेळी ती त्याचा तिरस्कार करते. दिलीप तिच्या चारित्र्यावर हल्ला करतो. बाळयालाही तिच्या चारित्र्याबद्दल सांगून त्याचे कान भरतो. पण बाळया जयश्रीवर मनापासून प्रेम करतो. व कलंदर वृत्तीने तिचा लग्नासाठी स्वीकार करतो अशा आशयाची 'कलंदर' ही कथा येते.

अत्यंत गरिबीत बालपण घालविलेला निशिकांत पैशांच्या लालसेने स्मगलिंगच्या व्यवसायात शिरतो. बक्कळ पैसा आल्यानंतर बंगला, गाडी हे सगळे वैभव मिळवतो पण सुखी जीवन जगण्याचे स्वप्न साकारण्यास अपयशी ठरतो. शीला या स्त्रीला नलिनीच्या अनुपस्थितीत घरी आणून अनैतिक संबंध ठेवतो. नलिनीला आपल्या पतीच्या अनैतिक संबंधाबद्दल माहिती मिळाल्यानंतर ती निशिकांतला सोडून जाते. साध्या परिस्थितीत समाधानी असलेली नलिनी चुकीच्या मार्गाने मिळविलेल्या ऐश्वर्यात दुःखी असते. निशिकांताचे दारूचे व्यसन वाढते. नलिनीने उलटतपासणी केल्यामुळे तिला मारहाणही करण्यात येते. आपण एकाकी राहू शकणार नसल्याने ती हे मुकाट्याने सहन करते. निशिकांत आपला पुरुषार्थ पत्नीवर गाजवतो व आपल्या अनैतिक संबंधांकडे कानाडोळा करण्याचा सल्ला देतो. नलिनीच्या जाण्यानंतर तो स्वत:ला सुधारू पाहतो. शेवटची स्मगलिंगची जबाबदारी पार पाडून या धंद्याला रामराम ठोकण्याचे ठरवतो. पण शेवटच्या वेळी कस्टम अधिकाऱ्यांच्या हाती लागतो. अतिमोहास बळी बदल्याने निशिकांतच्या संसाराच्या वाताहतीचे चित्रण 'मोह' या कथेत येते.

'मुखवटे' या कथासंग्रहात लेखकाने कथासूत्रांतून माणसाने परिधान केलेल्या अनेक मुखवट्यांवर प्रकाश टाकलेला आढळतो. 'मित्र' या कथेत कोल्हापूरला गेलेला निवेदक परिस्थितीमुळे मिळविलेल्या कामावर वेळेत रुजू न झाल्याने कोल्हापुरात अडकतो. वडिलांच्या मित्राच्या घरी अत्यंत आशेने जातो पण मदत मिळत नाही. पवार नावाचा एक माणुस त्याचा मित्र बनतो व त्या प्रवासात त्याला मदत करतो. कधी कधी आपली म्हणवणारी माणसे आपलेपणाचा मुखवटा परिधान करतात पण परक्यांसारखे वागतात तर कधी कधी परके असणारे मात्र आपले होतात. अशी 'मित्र' ही कथा येते. वीस वर्षांनी ते भेटतात, जुन्या आठवणी ताज्या होतात कालांतराने त्या दोन्ही मित्रांमध्ये ताटातुट होते व पंचवीस वर्षांपूर्वी आपण गोव्यात येऊ म्हणणाऱ्या पवाराची व त्याची पुन्हा भेट होत नाही.

'ताण' या कथेत गोव्यातून मुंबईत गेलेल्या आशा व निशा मुंबईतील पावसात अडकतात. मुसळधार पावसाला न जुमानता परीक्षा देण्यास बाहेर जातात पण त्यांना मदतीचा हात मिळत नाही. रात्री एक पोलीस त्यांना भेटतो व स्वत:च्या निवासस्थानी त्यांना आसरा देतो. पण अनोळखी माणसाच्या बरोबर रात्र घालवायची भीती त्या दोघींना वाटते. रात्रभर त्याचे डोळे उघडे असल्याने तो आपल्यावर पाळत ठेवत असल्याचा विचार करून दोघी आळीपाळीने झोपतात. सकाळी त्या पोलिसास डोळे उघडे ठेवून झोपण्याची विक्षिप्त सवय असल्याचे समजताच आपण एका सज्जन माणसाचा संशय घेतल्याचे दोघींना समजते.

'मुखवटे' या कथेत लोकांच्या अडीअडचणीला धावून जाणाऱ्या अप्पासाहेब देसायांच्या जमिनी कुळ कायदा आल्याने मुंडकारांना जातात. पण कधीच कोणाचा छळ न केलेल्या अप्पासाहेब देसायांचा गावात रूबाब मात्र कायम असतो. अप्पासाहेबांच्या सतीश या मुलाला वामनराव, विष्णूपंताच्या म्हणजेच आपल्या मेव्हण्याच्या मुलीची सोयरीक घेऊन आलेले असतात. गोव्यात लग्न निश्चितीसाठी प्रसाद घेणे म्हणजे देवास फुलांच्या पाकळयांचा कौल लावला जातो तसेच पत्रिका जुळविल्या जातात याचे चित्रण येते. विष्णुपंताच्या मुलीची कधी पत्रिका तर कधी प्रसाद होत नसल्याने लग्न जुळत नसते. गोव्यात हुंड्याच्या ऐवजी 'वस्ती घालणे' म्हणजेच कांकणे, पाटली, तोडा, गोट अशा दागिन्यांची मागणी केली जाते याचा उल्लेख कथेत येतो. त्यामुळे विष्णूपंताच्या मुलीचा निशाचा विवाह अडलेला असतो. निशा व सतीशचा विवाह जुळून येतो. सतिशलाही निशा पसंत पडते. अप्पासाहेब घराण्याच्या प्रतिष्ठेला जपत किमान कांकणे, पाटली, तोडा व गोट हे दागिने मुलीला द्यावे अशी इच्छा व्यक्त करतात. विष्णूपंताची ऐपत नसतानाही विवाह व्हावा म्हणून वामनराव मध्यस्थी

करत ते कबूलही करतात. लग्नाच्या दिवशी वामनराव आपल्या पत्नीचे गोट देतात व मुलीचा विवाह पार पाडण्यात येतो. विवाहानंतर निशा घरी जाते व परतताना चार दागिन्यांपैकी तीन दागिने घालून, आपल्या आत्याचे गोट तिला परत करून येते. अप्पासाहेबांची पत्नी तिला माहेरी जाऊन गोट घेऊनच परत घरी येण्यास सांगते त्यावेळी रोज कठोर वाटणारे अप्पासाहेब सून ही घरातली लक्ष्मी असल्याने आपल्या बायकोला सुनावतो. आपल्याला कधीही संपत्तीही हौस नव्हती, आपण फक्त स्वत:च्या साध्या वृत्तीमुळे लोकांकडून फसवू नये म्हणून कठोरपणाचा मुखवटा परिधान केल्याचे सांगतात व वात्सल्याने निशाचा स्वीकार करत खोट्या गोष्टीचा आधार घेऊ नये असे सांगतात.

### 3.2.2.5 गोवा मुक्तिनंतरच्या कालखंडातील स्वातंत्र्यसैनिकांच्या व्यथांचे चित्रण

गोवा मुक्तिपूर्व कालखंडात गोवा मुक्तीलढ्यात भाग घेतल्याने तो देशद्रोही ठरतो. पंधरा ऑगस्टला हिंदुस्थानातून मोठ्या संख्येने सत्याग्रही येणार असल्याचे कळताच सगळीकडे बंदोबस्त ठेवण्यात येतो. कॉज्मेरो मोंतेरोची दहशत सर्वत्र असल्याने सरहद्दीवरच्या पोलीसस्थानकातील मुख्य अधिकाऱ्याकडून माहिती मिळवत मोंतेरोही सत्याग्रहींवर पाळत ठेऊन असतो. गोवा हा पोर्तुगालचा सागरोत्तर प्रांत असल्याने गोव्याच्या सत्याग्रहींची छळणूक करण्यास आसुसलेला व्हिलार या कथेत येतो. पंधरा ऑगस्टला होणाऱ्या सत्याग्रहात गोव्याची सरहद्द ओलांडणाऱ्या सत्याग्रहींना कॉज्मेरो मोंतेरो ठार मारण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती पोर्तुगीज सरकारच्या पोलीस स्थानकावर काम करणारा कथा नायक सत्याग्रहींपर्यंत पोहोचवतो. तरी सत्याग्रही जीवाची पर्वा न करता घुसतात. पोलीस स्वकीय असल्याने गोळीबार करत नाहीत. व्हिलर बंदुका हिसकावून घेत एकटाच गोळीबार करू लागतो. आपण सरकारचे गुलाम असून परकीयांसाठी काम करत स्वकीयांचा बळी घेत आहोत या विचाराने अधिकाऱ्यांच्या मनात अपराधीपणाची भावना येते. व त्या भावनेने सर्व हुतात्म्यांच्या मृतदेहावर कथेचा निवेदक असलेला पोलीस अधिकारी प्रेते उघड्यावर न टाकता त्यांना अग्नी देण्याची आज्ञा देतो. मोंतेरोपर्यंत ही बातमी येते. माणुसकीच्या भावनेने कृत्य केल्याची सारवासारव करूनही कथा नायकाचा हुद्दा काढला जातो. मुक्तीनंतरही देशहितार्थ केलेल्या बंडखोरीला स्वकीयांनीही राजद्रोह मानल्याने व राजद्रोहाचे भांडवल करून आपली बढती रोखल्याने अपमानीत व वैफल्यग्रस्त झालेल्या अशा गोवा मुक्तीलढ्यात सक्रीय सहभागी असलेल्या देसाई या पोलीस अधिकाऱ्याचे निवेदन ‘राजद्रोह’ या कथेत येते.

गोवा मुक्तीनंतरच्या प्रथम निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘व्रतस्थ’ ही कथा येते. बहुजनसमाजास अधिकार मिळविणे व भाटकारशाही नष्ट करणे अशा अनेक मुक्तीनंतरच्या प्रश्नांचे भांडवल करून, तुरुंगवास भोगलेल्या देशभक्तांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून निवडणूक लढली जाते. गांधीवादाचा पुरस्कार करत, समाजहितार्थ झटणारा, समाजासाठी काम करण्यासाठी ब्रह्मचर्य व्रताची शपथ घेतलेला विनायकराव पराभूत होतो. सगळे देशभक्त, स्वातंत्र्यसैनिक पराभूत होतात व सरकार दरबारी आपली कामं करणारे, स्मगलिंगचा धंदा करणारे असे लोकप्रतिनिधी निवडले जातात. काही स्वातंत्र्यसैनिक निवडून येतात, स्वत: मुख्यमंत्रीपदी निवडलेले प्रतिनिधी देशभक्त असतात. खादी व ग्रामोद्योग महामंडळाची स्थापना केली जाते व त्याचे अध्यक्षपद विनायकरावांनी स्वीकारावे असे मुख्यमंत्र्यांना वाटते. पण विनायकराव आश्रम थाटून राजकारणात न जाता व्रतस्थ राहतो. ब्रह्मचार्याची शपथ घेतल्याने आपल्या मामेबहिणीसोबत विवाह ठरलेला असताना, तिच्यावर उत्कट प्रेम असतानाही आपले तत्व जपत ब्रह्मचारीच राहतो. आता त्याला ‘आचार्य’ हा मान समाजात मिळतो. मुख्यमंत्र्याशी ओळख असल्याने नोकरीसाठी वशिला लावण्यास विनायकरावांचा पुतण्या त्यांच्याकडे येतो. लाच मिळवून नोकरी मिळवणार ? असा प्रश्न पुतण्याला विचारतात. त्यांच्या तत्वनिष्ठेमुळेच ते मागे राहिल्याचे आचार्यांना त्यांचाच पुतण्या सुनावतो. आजचा समाज व आजची पिढी ही भ्रष्टाचारी होत चालली आहे व तत्त्वनिष्ठा जपून देशसेवा करणाऱ्यांना आज कोणी विचारातही घेत नसल्याचे वास्तव त्यांच्या लक्षात येते. गोवा मुक्तीनंतर पाहिलेली स्वप्ने धुळीस गेल्याच्या जाणीवेने ते अवस्थ होतात. व आपल्या ब्रह्मचर्यामुळे आपले प्रेम असलेल्या विभालाही झिडकारल्याच्या जाणीवेने हतबल होतात.

**3.2.2.6 असफल प्रेमाकथा**

एकमेकांवर नितांत प्रेम असलेल्या कालिंदी व मधुच्या प्रेमाची शोकांतिका ‘वंचना’ या कथेत येते. कालिंदी व मधु एकाच गावातील, एकाच जाती धर्मातील असतात तरी त्यांच्या विवाहाला दोन्ही घरातून विरोध करण्यात येतो. आई बाबांशी प्रतारणा करता येणार नसल्याने कालिंदी, “आपण दोघांनी रात्री बारा वाजता विष खाऊन आत्महत्या करू म्हणजे आपण स्वर्गात तरी एकत्र जाऊ” असा बेत आखते. पण मधु तिला, “तू मला जीवंतपणीच हवी” असल्याचे सांगतो. तेव्हा ती त्याच्या प्रेमावर संशय घेते. शेवटी ठरलेल्या दिवशी आपले प्रेम सिद्ध करण्यास मधु ठीक बारा वाजता विष घेत आपली जीवनयात्रा संपवतो. कालिंदीने आपला बेत आपल्या एका मैत्रिणीला सांगितल्याने ती तिच्या घरच्यांना कळवते. तिला आत्महत्या करण्यापासून रोखले जाते व तिला

मुंबईला मामाकडे पाठवले जाते. दुसरीकडे कालिंदीला आपले प्रेम सिद्ध करून मिलनाच्या आशेने थांबलेला मधुचा आत्मा तिच्यासाठी तळमळतो. कालिंदीने आपली फसवणूक करत शेवटी आत्महत्या न करता विवाहही केल्याचे त्याला समजते व आपल्या प्रतारणेचे उत्तर मिळविण्यासाठी तो कालिंदीच्या शोधार्थ फिरत असताना ती आपल्या पतीसोबत सुखी असल्याचे पाहतो. आपल्याला इतकी कठोर शिक्षा का दिली ? हा प्रश्न तो विचारत असतो. प्रेमासाठी स्वत:च्या जीवाची आहुती देणारा मधु ‘कलंदर’ ठरतो.

‘निळया डोळयांची मुलगी’ ही असफल प्रेमकथा येते. कालिंदी व कथा नायक श्रीकांतचे कॉलेजच्या दिवसात, नाटक, तालिमी या दरम्यान लाभलेल्या सहवासामुळे प्रेम जुळते. कालिंदीच्या निळया डोळयात तो स्वत:ला हरवतो. शिक्षण संपल्यानंतर श्रीकांतचे आपल्या गावी गोव्यात येण्याने त्यांची ताटातुट होते. प्रतिष्ठित वकिलाच्या घरातील कथा नायक व एक सर्वसामान्य मास्तरांची मुलगी असलेल्या कालिंदीचा विवाह आईवडिलांना अमान्य असल्याने श्रीकांत आई वडिलांच्या शब्दाबाहेर न जाता तिला भेटत नाही. तिच्या पत्रांना उत्तरे देण्याचे टाळतो. एल. एल. बी. करून वकिलीचे शिक्षण पूर्ण करतो. पण कालिंदी त्याच्या मनातून जात नसल्याने चांगल्या मुलींना नकार देणाऱ्या श्रीकांतच्या आईवडिलांकडून शेवटी कालिंदीशी विवाह करण्याची संमती मिळते. पण कित्येक वर्षे वाट थांबून शेवटी आपल्यावर एकतर्फी प्रेम करण्याऱ्या अरुणसोबत तिचा विवाह झालेला असतो. कित्येक वर्षांनी भेटलेली कालिंदी त्याला अनोळखी असल्याचे भासवते. तिच्या लग्नाच्या बातमीने व कायमच्या विरहाने कालिंदीने आपली फसवणूक केल्याचे म्हणत तो व्यसनाधीन होतो. कित्येक वर्षे आपण तुझी वाट बघितल्याचे सांगत कालिंदी त्याची कानउघडणी करते. दारू सोडून एका चांगल्या मुलीशी विवाह करून सुखी संसार करण्याचा सल्ला देते. तोही आपण प्रयत्न करण्याचे आश्वासन तिला देतो व मद्याच्या ग्लानीत आरामखुर्चीवर पडून राहतो. काही वेळाने त्याला समोरची खुर्ची खाली दिसते. मद्याचा ग्लानीत असलेल्या श्रीकांतला ती खरी कालिंदी होती की भास असा प्रश्न पडतो. प्रेमात योग्य वेळी योग्य निर्णय न घेतल्याने तिचा विरह सोसणारा प्रियकर ‘निळया डोळयांची मुलगी’ या कथेत दिसून येते. ‘कालयंत्र’ या कथेत कालिंदीवर उत्कट प्रेम करणारा निवेदक असलेला वासू कालिंदीवर त्याचे असलेले प्रेम व्यक्त करतो. कालिंदीही वासुवर असलेल्या प्रेमाची कबुली देते. कालिंदीचे अन्यत्र लग्न ठरण्याचे कळताच तिला रेल्वेस्टेशनवर बोलवून पळवून नेण्याचा कट आखतो पण शेवटी स्वत:च लोकलज्जेपोटी तिला दिलेल्या वेळी सकाळी पाच वाजता न जाता तिचा विश्वासघात करतो. कालिंदीचा दुसऱ्याशी विवाह होतो व त्यांची प्रेमकथा तिथेच संपुष्टात येते. आता तो भूतकाळात शिरून कालयंत्राची गरज असल्याचा विचार करतो. कालिंदीशी लग्न झाल्याची स्वप्ने पाहतो.

आता त्याला कालिंदीशिवाय दुसऱ्या स्त्रीशी विवाह करणे अमान्य असते. ‘निळया डोळयांची मुलगी’ व ‘कालयंत्र’ या दोन्ही असफल प्रेमाच्या कथा आहेत. दोन्ही कथेतील नायक हे भूतकाळात कृती करण्याऐवजी योग्य निर्णय न घेतल्याने असफल आहेत.

‘एक पक्ष्याची गोष्ट’ या कथेतही प्रेमाच्या विरहाचे चित्रण साळुंकी पक्षाच्या जोडीच्या माध्यमातून लेखक करतात. वृंदा व अरविंदचा प्रेमविवाह झालेला असतो. एक साळुंकीची जोडी वृंदा आपल्या घरी आणते. रोज आनंदाने बागडणाऱ्या त्या जोडप्यातील नर पक्षाचा मृत्यू होते. मादी असलेली साळुंखी त्याच्या विरहाने जगत असताना गतप्राण होते. माणुस हा स्वार्थी, आत्मकेंद्रित असल्याने पक्षांसारखे प्रेम त्याला करता येत नसल्याचे अरविंदचे म्हणणे असते. हे ऐकून मी तुमच्याविना आयुष्यच जगू शकणार नाही असे म्हणत वृंदा गहिवरते. पतीबरोबर सती जाण्याचा काळ संपल्याचे अरविंदला वाटत असते. पण आपले सर्वस्व अरविंद आहे असे म्हणणारी वृंदा अरविंदच्या अपघाती मृत्यूनंतर हादरते पण एका वर्षात विभाकर नावाच्या लहानपणीच्या मित्राशी विवाह करते. अरविंद व वृंदाचे एकमेकांवरचे उत्कट प्रेम असलेल्या नात्याचा साक्षीदार असलेला निवेदक शामरावास ते आधी पटत नाही. वृंदा ही अगदी चोवीस वर्षांची असल्याने पुनर्विवाह योग्यही वाटतो. पण नकळत नराच्या मृत्यूनंतर जीव सोडणारी मादी साळुंकी पक्षी त्याला आठवते. आजच्या बदलत्या समाजात माणसे मुखवटे घालून फिरत असतात जो त्यांनाही माहिती नसतो. वेळप्रसंगी स्वार्थी व आत्मकेंद्रित बनून आपल्या आयुष्याचा निर्णयही घेतात याचे चित्रण या कथेत येते.

### 3.2.2.7 किस्स्यात्मक निवेदन करणाऱ्या कथा

गोवा मुक्तीपूर्व काळातील खाण व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर ‘शिकार’ ही कथा येते. खाण व्यवसायासाठी लागणाऱ्या जिलेटीनचा साठा आणण्यासाठी तुकाराम व कृष्णा निघतात. रानडुकराची त्यांच्या गाडीला धडक बसून त्याचा मृत्यू होतो. डुकराची ‘शागुती’ म्हणजेच मटन करता येईल म्हणुन कृष्णाला तिथेच पाळत ठेवायला सांगून तुकाराम निघतो. पोर्तुगीज सैनिकांना सर्व हकीकत सांगून लवकरात लवकर जिलेटीन देण्याचे सांगतो. आता तेही डुकराच्या मांसासाठी आसुसतात. मेलेल्या डुकराचा वाटा करण्यासाठी जाताच तिथे डुक्कर व पाळत ठेवणारा कृष्णाही नसतो. वीस पंचवीस गिधाडांनी येऊन डुकराचा फडशा पाडल्याचे भयभीत अवस्थेत फणसाच्या फांदीवर लपलेला कृष्णा सांगतो. असा कथाभाग ‘शिकार’ या कथेत येतो. ‘आम्ही नाटक करतो त्याची गोष्ट’ ही कथाही किस्स्यात्मक स्वरूपात येताना दिसते. गोव्यातील सुरूवातीच्या पोर्तुगीजकालीन

नाट्यपरंपरेच्या पार्श्वभूमीवर या किस्स्याचे कथन येते. जयंत नाटकाची जबाबदारी घेतो. पुरुषांनी स्त्री भूमिका करण्याचा हा काळ असल्याने तरुण मुलांना स्त्री भूमिका देण्यात येतात. ऐतिहासिक नाटकाच्या भूमिका निश्चित केल्या जातात. उत्सवी नाटकांना लाभलेले देवाचे अधिष्ठानही या कथेत येते. नटांच्या वेशभूषा तयार करण्यासाठी उडणारी धांदल, जे आहे त्या पेहरावात लोकांमध्ये हशा पिकवत निभावलेले ऐतिहासिक नाटक, विजार चढविण्यास विसरलेला बाळू व प्रेक्षकामध्ये उठलेला हास्याचा कल्लोळ व ऐनवेळी आलेल्या पावसामुळे उधळलेले नाटक अशा एकूण गोमंतकीय नाट्यपरंपरेतील जुन्या आठवणी लेखक ताज्या करतात.

'ललितागौरीचे पुनरागमन' या कथेत सर्व लवाजम्यासह द्रविड देशाच्या महाराणी ललितागौरींना पुन्हा सिंहासनावर बसवण्याच्या कार्यक्रमाची पार्श्वभूमी कथेत आलेली दिसते. सोहळ्यासाठी गेलेला पत्रकार ललितागौरीच्या एका समर्थकाजवळ, ललितागौरी ही मान्सी भूखंड प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचे सांगतो. व त्या समर्थकासोबत अनेक समर्थक असल्याचे पाहून आपल्या बचावार्थ राणीसाहेबांवर दयानिधीने खोटा आरोप लादल्याने दयानिधीलाच तुरुंगात पाठवायला हवे होते म्हटल्याचे सांगतो. शेवटी त्याच्याकडून पैसे घेत राणीसाहेबांच्या विजयाप्रित्यर्थ मिठाई घेण्याचा बेत असल्याचे सांगताच ललितागौरीच्या समर्थकांमधील पैलवान त्याला सोडून देतो. मध्यप्रदेशातील 'बत्तीसगढ समाचार' या वृत्तपत्रात काम करणारा पत्रकार राज्यरोहण सोहळ्याच्या प्रत्यक्षदर्शी चित्रणासाठी द्रविडदेशात आलेला असतो. तिथे ललितागौरीशी त्याची भेट होते. हिंदी वृत्तपत्रकार आपणास हवा असल्याचे सांगत ललितागौरी त्याच्यापुढे कामाचा प्रस्ताव ठेवते. दीर्घ रजा घेण्याचा विचार करून ते काम तो स्वीकारतो. पैलवानालाही राणीच्या सुरक्षा रक्षकाचे काम मिळते. व पुढची बातमी शोधण्यास पत्रकार राज्यारोहण समारंभात चालू लागतो. पत्रकार की गुप्तहेर ? असा प्रश्न उपस्थित होत रहस्यकथा आलेली दिसून येते.

### 3.2.2.8 मिथकातून स्त्रीजीवानावर भाष्य

रामायण, महाभारतातील पौराणिक कथांतील स्त्री मिथकांच्या आधारे सद्यकालीन स्त्रीवर भाष्य करण्याचा प्रयत्न 'अहिल्या' व 'अंबा' या कथांमधून लेखक करतात. गौतम ऋषींची पत्नी असलेली अहिल्या गौतम ऋषींचे रूप घेऊन आलेल्या इंद्राकडून फसली जाते व आपले सर्वस्व त्याला देऊन बसल्याने गौतम ऋषींच्या शापाने शिळा होते. रामाचा त्या शिळेस स्पर्श होताच ती परत आपल्या रूपात येईल असा उ:शाप तिला मिळतो ह्या पौराणिक कथेच्या आधारे 'अहिल्या' ही कथा येते. 'अहिल्या' या कथेतील अहिल्या गौतम

ऋषींच्या वेशात आलेल्या इंद्राला आपण ओळखल्याचे पण त्याच्याशी संबंध ठेवण्याचा मोह झाल्याने आपले सर्वस्व त्यांना दिल्याचे सांगते. पापमुक्त झालेल्या अहिल्येचा परत स्वीकार करू पाहणाऱ्या गौतमऋषींना प्रश्न पडतो की अहिल्येबरोबर आपल्याला पाहणारे लोक काय म्हणतील? गौतम ऋषी तिला, ती तपाने अंतर्बाह्य पवित्र झाल्याचे सांगत जगातील पाच महापतीव्रतांमध्ये तिचे नाव घेतले जाईल असे सांगतात. पण आपली पूर्ण उपेक्षा झाल्याचे ती गौतम ऋषींना सांगते. गौतम ऋषी शाप दिल्यानंतर एकही दिवस आपल्या चिंतेने आपल्याकडे पुन्हा न फिरकल्याचे त्यांना बजावते. उपेक्षित आयुष्याने तिच्या सगळया इच्छा संपून जातात. आपण फक्त पापमुक्त झालो हे ऐकण्यासाठी जगल्याचे ती सांगते. व थरथर कापणारी अहिल्या कोसळते. स्त्रीला वारंवार आपल्या चारित्र्याची परीक्षा द्यावी लागली आहे. व स्वत:वरील लादलेले डाग पुसले जातील या अपेक्षेने त्या जगत आहेत. समाजाच्या भितीने नवीन आयुष्य सुरू करण्यास कचरत आहेत अशा स्त्रीचे दु:ख मांडण्याचा प्रयत्न ‘अहिल्या’ या कथेतून होताना दिसतो. ‘अंबा’ या कथेत शाल्वावर प्रेम असूनही भीष्मांचा पराक्रम पाहून अंबा भीष्मांबरोबर जाते. पण भीष्म ब्रह्मचारी असल्याने अंबेशी विवाह करण्यास नकार देतात. भीष्मांबरोबर अंबा स्वखुशीने गेल्यामुळे शाल्व राजाही अंबेचा स्वीकार करत नाही. भीष्मही तिची जबाबदारी झटकतात. माहेरचाही संबंध तुटतो. दोन पुरुषांच्या आकर्षणामुळे पतंगासारखे हेलकावे खावे लागलेल्या व शेवटी एकटीच राहिलेल्या अंबेच्या माध्यमातून लेखक स्त्री जीवनाचे चित्रण करतात. शाल्व व भीष्म दोन्ही पुरुष अंबेचा विचार न करता तिला झिडकारतात. पुरुषप्रधान संस्कृती स्त्री मनाचा विचार करत नाही. स्त्री ही फक्त सुंदर निर्जीव बाहुली असते. स्त्रीला दुय्यम स्थान देणारी समाजरचना जोपर्यंत बदलणार नाही तोपर्यंत आपल्या समाजात अशा असंख्य अंबा दुर्लक्षित राहतील, जळत राहतील, अशी स्त्रीची व्यथा मांडतात. आपल्या निर्णयाशी तटस्थ असलेल्या अंबेच्या चित्रणातून एक तटस्थ स्त्री लेखक चितारतात.

### 3.2.3 गजानन रायकर यांचे कथालेखन

गजानन रायकर हे कथाकार गोवामुक्तीलढ्याच्या पार्श्वभूमीवर गोमंतकीय समाजजीवनाचे चित्र रेखाटताना दिसून येतात. गोवा स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या गजानन रायकर यांनी स्वातंत्र्यसैनिक व लेखक अशा दुहेरी भूमिकेतून लेखन करताना अनेक विषय आपल्या कथेतून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. काव्यलेखनाबरोबरच ‘दादुली’(१९९०), ‘नातालीन’(२००५) असे रायकरांचे दोन कथासंग्रह

प्रसिद्ध झाले. शेतीपद्धतींचे वर्णन करत गोमंतकीय ग्रामीण जीवन, राहणीमान, गावगाड्यातील जातीव्यवस्था, ग्रामीण लोकसमजुती इ. गोष्टींचे चित्रण या कथेत येते.

### 3.2.3.1 पोर्तुगीज सत्तेच्या पार्श्वभूमीवर, गोवा स्वातंत्र्यसंग्राम व जनतेवरील अन्याय अत्याचाराचे चित्रण

पोर्तुगीज सत्तेच्या पार्श्वभूमीवर रायकरांची 'दादुली' ही कथा येते. लहानपणी कथा नायकाला जवळ घेणाऱ्या मारीमानाची 'दादुली' ही कथा येते. कथा नायकाच्या आईपश्चात शाणूला म्हणजेच कथा नायकाला मारीमाना लळा लावते. आई वडील काळे असूनही गोरा रंग असलेली मारीमाना ''हांव जालोले दादुली, चोन्द्रीमाचे राती' म्हणत आपण पौर्णिमेच्या रात्री जन्मल्याने गोरी झाल्याचे सांगते. गावातील पुरुषांच्या वासनायुक्त नजरा मारीमानावर खिळलेल्या असतात पण मारीमाना एकाच्याही जाळ्यात अडकत नाही. बाजार करून येत असताना पोर्तुगीज सोजिरांचे एक टोळके तिची छेड काढतात. तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतात आजूबाजूला असलेल्या एकाही माणसाला गोऱ्या सोजिरांना अडविणे शक्य होत नाही. मारीमाना पोर्तुगीज सोजिरांशी कणखरपणे लढते, त्यामुळे गावागावात तिची कीर्ती पसरते. मायाळू, कणखर अशा मारीमानाची अनेक रूपे या कथेतून दिसून येतात. अविवाहित असलेली मारीमाना लहानग्या कथा नायकाला जवळ घेते. तिचे लग्न ठरते व आपला विवाह ठरल्याच्या धुंदीत असलेली मारीमाना या कथेच्या शेवटी दिसून येते. मारीमानाच्या माध्यमातून पोर्तुगीजकालीन स्त्रीवरील अन्याय अत्याचाराचे चित्रण लेखक करतात.

### 3.2.3.2 जातीव्यवस्था व कुळवाड्यांच्या प्रश्नांचे चित्रण

गजानन रायकरांनी आपल्या कथेतून गोव्यातील कुळवाडी समाजाचे जगणे मांडण्याचा प्रयत्न केला. कुळवाडी स्त्रीचे प्रश्न मांडत 'नातालीन' या कथेमध्ये पोर्तुगीज अधिकारी व गोवा मुक्तीसाठी कार्य करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनाचे चित्रण करत पोर्तुगीजकालीन पार्श्वभूमी उभारत 'नातालीन' या स्त्रीच्या संघर्षमय जीवनाचे चित्रण केले. नातालीनचे लग्न एका खलाशासोबत होते व अत्यंत देखण्या असलेल्या नातालीनवर काही तरुणांची वाईट नजर असल्याने पतीच्या अनुपस्थितीत ती संरक्षण मागण्यास बड्या भाटकाराकडे जाते. भाटकार तिला खोटे आश्वासन देत दारू पाजून नशेत असलेल्या नातालीनच्या शरीराचा उपभोग घेत फसवणूक करतो. नातालीन त्याच्या जाळ्यात अडकते. गावातील आंबटशौकीन तरुण या गोष्टीची माहिती तिच्या पतीला

देतात व शेवटी पतीकडून नातालीनला सोडचिठ्ठी मिळते. जन्मभर भाटकाराची कुमारी म्हणून जगण्यापेक्षा शरीराचा धंदा करावा असे तिला वाटू लागते व ती शरीरविक्री करण्याचा कठोर निर्णय घेते. भाटकाराच्या आश्रयास गेली असता, भाटकाराच्या भोगवासनेस फसलेल्या नातालीन या ख्रिस्ती कुळवाडी स्त्रीची व्यथा लेखक मांडतात. 'परिवर्तन' या कथेतही 'भागेली' म्हणजेच कुळवाडी स्त्रीची व्यथा मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. रेखाबाय ही शंकरबाबाची पत्नी. रेखीव, सुंदर जरी असली तरी आरोग्य नाजूक असल्याने भाटकार शंकरबाबा शरीरसंबंधाच्या लालसेने तिला कंटाळतो. रेखाबाय मुलाला जन्म देते. पण तान्ह्या उमेशला अंगावरचे दूध पाजण्यास अशक्त असल्याने बाबनी भागेल्याची बायको उमेशला आपल्या दुधावर पोसते. शंकरबाबाही तिच्याकडे आकर्षिला जातो. येसूही त्याच्याकडे आकर्षित होते व शरीरसंबंध ठेवते. भाटकाराच्या वासनेला बळी पडलेली, कुळवाडी असलेली येसू या कथेत येते. येसूच्या पोटी जन्माला आलेले मूल रंगरूपाने उमेशसारखे दिसू लागते, भाटकाराचेच ते मूल असते. उमेशला आपण पाजताना त्याची मूर्ती डोळ्यात भरली व मूलही उमेशसारखे झाल्याची सबब ती बाबनीला देते. येसूच्या पोटी जन्माला आलेल्या आपल्या मुलाला काहीच कमी पडू नये याची काळजी शंकरबाब घेतो. येसूच्या मुलाचे गणेश असे नाव ठेवण्यात येते. गणेशच्या जन्मानंतर आपल्या शेत भाटांच्या देखरेखीचे मोठे जिकीरीचे काम शंकरबाब बाबनीला देतो. येसू बाबनीचा संसार आनंदात सुरू असतो. दुसरीकडे शंकरबाब भाटकार येसूकडून आपल्या वासनेचे शमन करून घेत असतो. भाटकाराची मुले उनाड बनतात व बाबनी भागेल्याची मुले अभ्यासू असल्याने कुळवाड्यांची मुले शिकली तर आपल्या गुरांना कोण राखणार, कुळवाड्यांना सरकारी नोकरी कोण देणार असा प्रश्न शंकरबाबा येसूला करतो. भाटकारी प्रवृत्तीचे चित्रण कथेत येते. भाटकरांना कुळवाड्यांच्या बायकांचा भोग हवा असतो पण कुळवाड्यांची मुले शिकून मोठी यशस्वी झालेली त्यांना पाहवत नाही हे येसूला समजते. बाबनी भाटकाराच्या जाचाला कंटाळून गाव सोडण्याचा विचार करतो. शंकरबाबचे लक्ष मात्र आता वयात आलेल्या येसूच्या यमुना या मुलीवर असते. तिच्या अब्रूवर त्याने हात घालण्याचा प्रयत्न करताच, यमुना ही शंकरबाबचीच मुलगी असल्याची जाणीव येसू करून देते. ती रणरागिणी बनून शंकरबाबला हाकलून देते. आपण केलेल्या चुकीची जाणीव येसूला होते व आपली परिस्थिती बदलण्याचा निश्चय ती करते. या कथेत लेखक कुळ मुंडकारांच्या जीवनाचे वास्तव चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करतात.

गोव्यातील मुंडकारावर भाष्य करणारी 'मुंडकार' ही कथा येते. टिचभर जमिनीचा तुकडा भाटकारांकडून मिळवुन पिढ्यानपिढ्या भाटकाराच्या घराण्याची सेवा करणाऱ्या कुळवाडी कुंटुंबाची व्यथा कथेत येते.

भाटकाराच्या छोट्याशा जमिनीच्या तुकड्यावर हिरूचा बाप झोपडी बांधून राहतो आणि त्याच्या पुढील सर्व पिढ्यांनी त्या भाटकाराची हमाली करावी असे ठरते. वृद्ध झालेला हिरू शेण सारवण्यास भाटकाराकडे जाण्याच्या तयारीत असतो. भाटकाराचा आठ वर्षाचा नातू आजोबाच्या वयाच्या हिरूला नावाने हाक मारत, अरे तूरेची भाषा करत बोलवतो. मुंडकारांप्रती आदरभाव नसल्याचे चित्रण या कथेत येते. हिरूचा मुलगा दसवंत, उभा जन्म भाटकाराची चाकरी करण्याचे नाकारतो. शेवटी शाणे या आपल्या सुनेच्या डोक्यावर शेणाने भरलेली टोपली देत हिरू स्वत: भाटकाराच्या दारी जातो. भाटकारांनी मुंडकारांच्या केलेल्या दिशाभुलीचे चित्रण या कथेत येते. दसवंतला शिक्षणाची ओढ असल्याने शिकविण्यास आर्थिक सहाय्य अपेक्षित असल्याने हिरू भाटकाराकडे जातो. दसवंतला शिकवून काहीएक फायदा नसल्याने आपल्या गुरांची राखण करण्यास पाठवण्याचा सल्ला भाटकार देतो. हिरुही मोठ्या अभिमानाने ते मान्य करतो. वास्तविक कुळांचा उद्धार होऊ नये म्हणून खेळलेली ही भाटकाराची खेळी असते. कुळांसाठी केलेल्या व्यवस्थेनुसार मुंडकार शेता भातात, कुळागरात राबून पिकाचा मोठा भाग खंड म्हणून भाटकारस देणे अपेक्षित असते. त्यात कोमुनिदादचा खंड वेगळा असतो. लेखक मुंडकार व्यवस्थेतील या अन्यायाचे चित्रण करत मुंडकारांचे कुटुंब कशापद्धतीने या चक्रात अडकले आहे व सात पिढ्यांना या नेमलेल्या चक्रात जगायचे आहे याचे चित्रण करतात. फक्त शेण काढण्याच्या निमित्ताने गेलेल्या दसवंताच्या बायकोला घरातल्या सर्व कामत राबवून घेतले जाते व घरी येताना कामाचा मोबदला म्हणून उष्टे खरकटे दिले जाते. दसवंत याला विरोध दर्शवितो. आजपर्यंत फक्त उष्ट्या खरकट्याच्या आशेने आपण गुलाम म्हणून जगलो असल्याचे सांगतो. दुसरीकडे उष्टे खरकटे जरी असले तरी तो देवाचा प्रसाद असल्याचे त्याच्या बायकोचे म्हणणे असते. अज्ञान व मुंडकारांच्या उपेक्षेचे चित्रण कथेत येते. ‘फटीमाम’ या कथेतील स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या, स्थानिकाची खंडाने जमीन कसणाऱ्या फटीमामाची फसवणूक होते. स्थानिक माणसाचे कुळ असलेल्या फटीमामला कसलाच पत्ता लागू न देता, जमीन श्रीमंताला विकली जाते. फटीमामा वर दुःखाचा डोंगर कोसळतो. पोलादी शरीराचा फटीमामा विश्वासाला तडा गेल्यामुळे अंथरूण धरतो. व त्यातच त्याचा अंत होतो. ग्रामजीवनाचा व ग्रामसंस्कृतीचा भाग असलेला फटीमामाच्या माध्यमातून भाटकारांकडून फसलेल्या कुळांची व्यथा लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात.

गोमंतकातील समाजव्यवस्था, जातिव्यवस्था व अस्पृश्यतेशी निगडीत दाहकता मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. अग्रशाळेतील समाराधना म्हणजेच ब्राह्मण भोजनाच्या पार्श्वभूमीवर ‘समाराधना’ ही कथा येते. समाराधनेसाठी ब्राह्मण आचारी व त्याला मदत करणारा कुळवाडी स्त्रियांचा ताफा कार्यरत असतो. आपल्या

हातानी मळलेल्या पीठाच्या पुरणपोळया, चिरलेली भाजी बामण म्हणजेच उच्चजातीचा सारस्वत समाज कसा खाईल? हा प्रश्न कुळवाड्यांच्या बायकांना पडतो. खाद्यपदार्थांची रेलचेल ही उच्चजातीच्या समाजासाठी असते. यात कुळवाड्यांच्या बायकांकडून झाड, पूस, वाढ अशी कामे करून घेणारा उच्चभ्रू समाजातील शेणयबाब येतो. ब्राह्मण स्त्रिया ऊंची वस्त्रे नेसून लवाजम्याने डुलत डुलत येतात. ब्राह्मण स्त्री पुरुषांच्या पंगतीत जेवणाची सुरूवात होते. खाद्यपदार्थांची रेलचेल व शेवटी हरहर महादेवची आरोळी ठोकून पंगत उठते. जेवणावळीत बसलेल्या काही सवाष्ण बायका उष्ट्या पत्रावळी व पानात शिल्लक राहिलेले अन्न घेऊन बाहेर येतात. बाहेर महार समाजातील बायका सूप, 'वल्ल्या'(टोपल्या), कुरपणे असा म्हारवताचा बाजार घेऊन बसलेल्या असतात. उष्ट्या पत्रावळीतील अन्नाने त्यांच्या तोंडाला पाणी सुटते. त्या उष्ट्या अन्नाच्या बदलात आपण बनवलेल्या टोपल्या, सुपे त्या विकतात. जितके चांगले उष्ट्या अन्नात पदार्थ तितकी चांगली वस्तू उच्चभ्रू बायका आपल्या ताब्यात घेतात. वस्तू घेऊन उष्ट्या अन्नाचे ताट त्यांच्या टोपल्यात फेकले जाते. अशा एकूण जातिव्यवस्थेतील दाहक वास्तवाचे चित्र लेखक उभारतात. हजारभर लोक जेऊन जातात. बाकी राहिलेले अन्न भटांकडे व महाजनांकडे पोहोचते केले जाते. सेवेकऱ्यांना व देवदासींना पाने दिली जातात. शेवटी कुळवाड्यांच्या राबणाऱ्या बायका उष्टी खरकटी काढून, शेण सारवत जणू कामालाच जुंपतात व उष्ट्या पत्रावळीतून जमा केलेले अन्न घेऊन आपल्या काळोखाच्या खोपीत अदृश्य होतात. असे म्हणत लेखक शेवटी कुळवाड्यांच्या जीवनातील न संपणाऱ्या दु:खाचे चित्रण करतात. ब्राह्मण, सारस्वत, कुळवाडी, महार अशा जातिव्यवस्थेतील टप्प्यांचे चित्रण करत त्यामध्ये असलेल्या विलक्षण असमानतेचे चित्र या कथेतून दर्शवतात. नृत्यकलेत पारंगत असलेल्या कलावंत समाजातील स्त्रियांच्या चित्रणातून 'तीन शेवती आमाड्या भोंवती' ही कथा आकार घेते. कलावंत समाजात जन्माला आलेली चिनू तारुण्याने अंगाकांतीने रसरसलेली असल्याने वयात आलेल्या नानूच्या ती नजरेत भरते. गायन कलेत ती पारंगत असते. तिच्या गायनाने ती लोकांना रिझवते. डोंगरी गाव व गावातील सुवारी वादन व इंत्रूज उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ही कथा आकार घेते. उत्सव संपल्यानंतर नानू चिनूच्याच घरी राहू लागतो. चिनूकडून घरी परतताना त्याला तिची आणि त्याची होणारी ताटातूट असह्य होते. चिनूची रक्त सळसळवणारी मिठी त्याला आठवू लागते. चिनूही त्याच्या वाटेकडे डोळा लावून बसलेली असते. जत्रेच्या निमित्ताने चिनूकडे गेलेला नानू घरी परतत नाही. चिनूचा नवीन बकरा अशी बायकांमध्ये बोलणी सुरू होतात तर दुसरीकडे आपला मुलगा चिनू या कलावंतिणीकडे असल्याचे राधा वाहिनीला समजते. त्यामुळे नानूला चिनूपासून परावृत्त करण्यासाठी नानूचे लग्न लावण्याचे ठरवले जाते. पण नानूवर चिनूची मोहिनी पडलेली असते.

लग्नाची जय्यत तयारी झालेली असते, नानू मात्र अस्वस्थ असतो. घरात ठेवलेल्या सोन्याच्या चिपा घेऊन तो पसार होतो व सोन्याच्या चिपा चिनूला देत आपण कायमचे तिच्या घरी थांबणार असल्याचे सांगतो. लेखक शेवटी लिहितात की नानू एका पिंजऱ्यातून दुसऱ्या पिंजऱ्यात अडकला जातो आणि चिनू आनंदाने "तीन शेवती आमाड्या भोंवती, आता कशें सोबलें गा भावजी" असे गीत गात असते. चिनू संपत्तीच्या लालसेने नानूला आपल्या जाळयात ओढते अशी एकूण कलावंतिणीच्या जीवनावर, परंपरागत चालत आलेल्या जीवनव्यवहारावर भाष्य करणारी ही कथा येते.

'गणेश' या कथेतून धर्मांतराने होणाऱ्या माणसाच्या वाताहतीचे चित्रण करत सामाजिक प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रयत्न लेखक करतात. गणेशची ही शोकांतिका ठरते. हिंदू म्हणून जन्माला आलेल्या गणेशला बाटवल्याने तो ख्रिस्ती बनतो. आठ वर्षाचा कथा नायक पंचवीस वर्षाच्या गणेशचे हाल बघत असतो. कथा नायकाच्या शेजारी राहणाऱ्या काकीचा भाऊ असलेल्या गणेशला त्याचे भाऊ घराबाहेर काढतात, बहिण घराबाहेर येऊन काकुळतीला आलेल्या गणेशला जेवण देते. जेवल्यानंतर आसवे गाळते व तो जेवलेल्या जागेवर शेण शिंपडते. त्याच्या घरच्यांसाठी तो बाटगा ठरतो. मूळ ख्रिस्ती नसल्याने ख्रिस्ती बांधव धर्मात घेत नाही. एक बाई जनावरांना अन्न टाकल्याप्रमाणे गणेशला पावाचे तुकडे टाकते. शेवटी बेवारस स्थितीत त्याचा मृत्यू होतो. मृत्युनंतरही त्याचा प्रश्न सुटत नाही. हिंदू, ख्रिस्ती हे दोन्ही धर्म त्याला मरणोत्तरही स्वीकारत नसल्याने शेवटी त्याचे प्रेत सडू नये म्हणू डोंगरात नेऊन सीमेच्या बाहेर जंगलात भावांकडून पुरले जाते. माणूस एका धर्मात जन्माला येतो. त्याला दुसरा धर्म बाटवतो व शेवटी दोन्ही धर्म त्याला झिडकारतात. कथा नायक एका धर्मपरिषदेत जातात तिथे त्यांना धर्ममार्तंडाना गणेश बाटगा का ठरला हे विचारावेसे वाटते. गणेशच आपले प्रश्न विचारत फिरत असल्याचे त्याला वाटते. त्याचा धर्म हिंदू की ख्रिस्ती? तो मानव की पशु? आपल्याला मुक्ती मिळेल की नाही? आपण कोण? माणूस नावाचे जनावर? असे आज फोफावणाऱ्या धार्मिक कट्टरपणाच्या दलदलीवर प्रश्न करत धर्मव्यवस्थेवर प्रहार करण्याचा प्रयत्न लेखक करतात.

### 3.2.3.3 गोमंतकीय समाजजीवनातील बदलांचे चित्रण

मुंडकार व्यवस्थेत बळी पडलेला दसवंता, या उपेक्षित जीवनातून बाहेर पडू पाहतो व शेवटी खाणीवर काम केल्यास श्रमाचा योग्य मोबदला मिळेल या आशेने खाणीवर कामासाठी जातो. गावातील शेत, कुळागरे याकडे आपला मुलगा पाठ फिरवत असल्याने हिरू कोसळतो. शेतजमिनीकडे मुलगा पाठ फिरवत असल्याचे

पाहुन हिरूच्या हृदयावरच झालेला तो प्रहार शेवटचा ठरतो व हिरूचा त्यातच अंत होतो. मुंडकार व्यवस्थेला विरोध करत व्यवस्थेला बळी पडायचे नसल्याने मातीपासून दुरावलेल्या व खाण व्यवसायाकडे आपला मोर्चा वळवणाऱ्या एका पिढीत होणाऱ्या बदलांचे सूचक वर्णन ‘मुंडकार’ या कथेत येते. कलावंत समाजातील स्त्रीच्या बदलत्या व पुरोगामी मानसिकतेचे चित्रण नंदिनी या कथेत येते. दिसायला सुंदर, गायनाचे धडे घेणारी, गायन कलेने संस्कारक्षम होत असलेली नंदिनी कलावंत समाजात जन्मलेली पण आपली विधिवत ‘शेष’(मुलींना देवदासी प्रथेत लोटणारी विधी) न घालता लग्न व्हावे अशा विचारांची ती तरुण स्त्री असते. दुसरीकडे आपल्या समाजातील सगळ्या मुली मुंबईला स्थायिक होत नाव कमावतात पण आपल्या मुलीने गावात राहून फटेबाब या श्रीमंत गृहस्थाची सेवा करावी. परंपरागत चालत आलेल्या आपल्या समाजातील अन्य स्त्रियांप्रमाणे आयुष्यभर फटेबाबाची रखेली म्हणून रहावे अशी तिच्या आईची इच्छा असते. नंदिनीचे प्रेम ब्राह्मण समाजातील नारायणवर असते. कलावंत स्त्री भाटकारांशी संबंध ठेवतात तसा संबंध नंदिनीने ठेवावा असे तो मिश्किलपणे नंदिनीला सांगतो. शेवटी आपले नंदिनीवर जीवापाड प्रेम जडल्याने तिच्याशी विवाह करण्याचा विचारही व्यक्त करतो. दुसऱ्या ठिकाणी तिच्याच समाजातील सोमनाथ आपल्या समाजातील स्त्रियांनी रखेलीपणा सोडून द्यावा, आयुष्भर त्यांचेच होऊन न राहता चार चौघांसारखे लग्न करावे म्हणून झटतो व नंदिनीला विवाहासाठी मागणी घालतो. नंदिनी तटस्थपणे ब्राह्मण असलेल्या नारायणचे व आपले एकमेकांवर प्रेम असल्याने सारी बंधने झुगारून आपल्याशी विवाहबद्ध होण्यास नारायण तयार असेल का ? असा प्रश्न विचारण्याचा निश्चय करते. समाजातील गहन वास्तव परिस्थितीवर व बदललेल्या सामाजिक मानसिकतेवर ही कथा प्रकाश टाकते.

### 3.2.3.4 गोवा मुक्तिसंग्रामाच्या पार्श्वभूमीचे चित्रण

‘नातालीन’ या कथेतील भाटकाराच्या भोगवासनेस बळी पडलेली नातालीन शरीर विक्रीचा धंदा सुरू करते. युरोपियन सोजिर व मेस्तिसांना झिंग आणणाऱ्या नातालीनकडे भोगवृत्तीने पहिले जाते. नातालीन पोटापाण्यासाठी बार थाटते. पोर्तुगीजांच्या आवडीचे गावठी डुक्कराची सागुती व चेरीस या खाद्यपदार्थांची विक्री करते. मासिएरा नावाची ऊंची दारू त्यांना पाजते व पोर्तुगीज अधिकाऱ्यांची शारीरिक भूक शमविण्यासाठी दोन खोल्यांची व्यवस्था करते. अधिकाऱ्यांची खलबते तिथे सुरू होतात. पोर्तुगीज अधिकारी असलेले तेनेंत रिबेरो व कपितांव मिरांद हे नातालीनचे गिऱ्हाईक असतात. कापितांव मिरांदला नातालीनचा प्रियकर असेच संबोधण्यात येते. पोर्तुगीज गुप्तहेर अधिकाऱ्यांना भेटण्यास नातालीनच्या बारमध्ये येत असल्याने नातालीनला

पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या रणनीतींचीही माहिती मिळत असते. आर्नाल कोशत नावाचा एक गृहस्थ नातालीनची ओळख एका तरुणाशी करून देतो व तिच्या घरात कामास ठेवण्यास सांगतो. नातालीनच्या आश्रयास असलेला पेद्रू पेरेरा नावाचा तरुण गिऱ्हाईकाची सेवा करतो. पोर्तुगीज अधिकाऱ्यांशी दोस्ती करतो. गोवा मुक्तीलढ्यात सक्रीय भाग घेणारा तो क्रांतिकारी सेनानी असतो. क्रांतिकारकांच्या हालचालींचा जोर वाढलेला असतो. मडगावात स्फोट घडविला जातो, गोवा मुक्ती फौज या क्रांतिकारकांच्या संघटनेकडून एकदोन पूल उडविले जातात, पोलीस चौकीवर हल्ला करून शस्त्रसाठा बळकावण्यात येतो. अनेक नागरिकांना संशयित म्हणून अटक केली जाते. त्यात एका इसमाकडून नातालीनच्या घरात वास्तव्यास असलेल्या क्रांतिकारी चळवळीचा भाग असलेल्या पेद्रू पेरेरा नाव धारण केलेल्या तरुणाची माहिती मिळते व नातालीनला अटक केली जाते. नातालीनच्या घरात असलेल्या तरुणाची माहिती नातालीनला मिळत असली तरी त्याचा गौप्यस्फोट न करता क्रांतिकारक चळवळींना ती मूक समर्थन देते. आपण मरणाला घाबरत नसून यापुढेही क्रांतिकाऱ्यांना मदत करेन असे ती पोर्तुगीज अधिकाऱ्यांना बजावते. आपल्या सारख्या अनेकांचा भोग घेणाऱ्या पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या भोगवादी प्रवृत्तीवर प्रहार करते. नातालीनला सोडण्यातच शाहाणपणा असल्याने तिला सोडण्यात येते. आपण शरीरविक्री केल्यामुळे आपल्या शीलास आणि मायभूमीस डाग लागला, पण तो पुसण्याची संधी आपल्याला मिळाली. पुढचे दिवस घाणेरड्या व्यवसायात न घालवता दूर खेड्यात राहण्याचा निर्णय ती घेते. तिच्या शरीरास आसुसलेला कापितांव मिरांद तिचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो पण त्याला यश लाभत नाही. गोवामुक्तिपूर्व कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेल्या या कथेत क्रांतिकारक चळवळींचे आणि क्रांतिकारकांच्या कार्याचे, भारतीयांप्रती पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या असलेल्या हीन वागणुकीचे चित्रण कथेत येते. पोर्तुगीजांच्या वासनेची शिकार झालेल्या नातालीनच्या माध्यमातून तत्कालीन भोगवस्तू म्हणून पहिल्या जाणाऱ्या स्त्रीजीवनाच्या संघर्षाचे चित्रण लेखक करतात. क्रांतिकारक चळवळींमध्ये व चळवळीबाहेर गोवामुक्तीच्या कार्यात सहभागी झालेल्या अनेकांच्या समर्पणाची ही कथा आहे.

'पहाटेपूर्वीचा अंधार' ही कथाही गोवा मुक्तीसंग्रामाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली दिसून येते. गोवा स्वतंत्र होतो व पोर्तुगीज सैन्य भारतीय सैन्याला शरण जाते. पोर्तुगीज असलेला बाबाजीन पोर्तुगालला निघून गेल्याने जायुचा संसारही उद्ध्वस्त होतो. बाबाजीन तिच्यासाठी सर्व वैभव ठेऊन जातो. गरीब वेश्येची मुलगी असलेल्या जायुला बाबाजीनमुळे प्रतिष्ठा मिळालेली असते. आईला एका महाजनाने ठेवलेले असल्याने आपण रखेली न बनता लग्न करण्याची तिची इच्छा असते, पण परिस्थिती तिला साथ देत नाही. जायुच्या आईला रखेली

म्हणून ठेवलेल्या महाजनाचा रक्तदाब वाढतो व त्याचे निधन होते. जायुच्या दोन्ही बहिणी मुंबईत स्थायिक होतात. जायुच्या माथी मात्र अत्यंत दरिद्री जीवन येते. जायुसाठीही धनिक भाटकार पाहण्याचा विचार तिच्या आईच्या मनात येतो. गोवा स्वातंत्र्याचा लढा तीव्र झालेला काळ या कथेत येतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्याने लढणाऱ्यांचे बळ वाढते. सरहद्दपलीकडे राहून लष्करी संघटना उभारल्या जातात. पोलिसचौक्यांवर हल्ला करून शस्त्रे पळविली जातात. त्यामुळे पोर्तुगीज सरकार हजारोंच्या संख्येने गोरे व निग्रो सैनिक बोटींवरुन गोव्यात आणतात. त्या सैनिकांच्या वासना शमविण्यासाठी नृत्यालये (क्लब) निर्माण होतात. अनेक तरुणी देहविक्री करू लागतात. जायु मात्र अशी बाजारबसवी न होता अधून मधून तिच्या आईकडे येणाऱ्या जगन्नाथ भाटकारामुळे तेनेंत बाबाजीन या पोर्तुगीज अधिकाऱ्याच्या आश्रयी जाते. मोठा सरकारी अंमलदार असलेला बाबाजीन मोठे घर भाड्याने घेतो व जायु सोबत आपला सुखी संसार थाटतो. गोवा मुक्तीचा क्षण जवळ येतो. मोर्चेबांधणी सुरू होते. भारतीय सैन्य गोवा मुक्त करण्यास येत असल्याच्या बातम्या येतात. देशभक्तांच्या लष्करी कारवायांमध्ये वाढ होते. तेनेंत बाबाजीन या कारवाया रोखण्यासाठी दिवस रात्र झटत असतो. भारतीय सैन्याला अडविण्याचे प्रयत्न सुरू असतात व शेवटी गोवा पोर्तुगीज राजवटीतून मुक्त होतो व पोर्तुगीज लष्कर भारतीय सैन्याला शरण जाते. बाबाजीनही जायुला तुझी आठवण काढत शेवटपर्यंत जीवन जगणार असल्याचे सांगत जायु व त्याच्या संसारवेलीवर उमललेल्या दोन्ही मुलांना घेऊन पोर्तुगालला जातो. जाताना जायुची जबाबदारी जगन्नाथला देतो. भाटकार आगोस्तीनने दिलेले घर जायुला खाली करावे लागते. गोवा मुक्तीनंतर समाजात असणाऱ्या प्रवृत्तींबद्दल लेखक जगन्नाथच्या माध्यमातून भाष्य करतात. पोर्तुगीजांचा सखा असलेला जगन्नाथ आता देशभक्त बनलेला असतो. गोवा स्वतंत्र झाल्यानंतर मिरवणुकीचे नेतृत्व करत असतो. एकेकाळी पोर्तुगीजांचा मित्र असलेला जगन्नाथ पोर्तुगीज प्रशासनाची निंदा करत असतो. गोव्यात लोकशाही प्रस्थापित झाल्याने निवडणुकीमध्ये सहभागी होण्याच्या तयारीत असतो. जगन्नाथाकडे आपले सगळे सामान देऊन गेलेल्या बाबाजीनने आपल्याला लुबाडले आहे व त्याच्या सामानाच्या विक्रीतून आपण त्याच्या पैशांची फेड करणार असल्याचे तो जायुला सांगतो. जायु तटस्थपणे त्याचा विरोध करते. रखेली असली तरी आपण बाबाजीनशी एकनिष्ठ राहणार असल्याचे सांगते. आपले उरले सुरले सामान नेत असल्याने गांधी टोपी घालून वावरणाऱ्या जगन्नाथच्या ढोंगी देशभक्तीचा धिक्कार करते. व आईबरोबर चुडतांच्या झोपडीत राहू लागते. स्वातंत्र्य मिळते पण जायुच्या नशिबी मात्र अंधारच राहतो. पाखल्याच्या व आपल्या मुलांच्या आठवणीत ती तळमळते स्वातंत्र्याने आपल्याला काही दिले नाही तर

नाही पण होते नव्हते तेही हिरावले असे मानते. अशा पद्धतीने गोवा मुक्तीनंतर पोर्तुगीजांशी संबंध असलेल्या स्त्री जीवनाच्या शोकांतिकेचे व जगन्नाथ सारख्या ढोंगी देशभक्तांच्या बळावलेल्या प्रवृत्तीचे चित्रण या कथेत येते.

### 3.2.3.5 मनोविश्लेषणात्मक कथा

गोमंतकीय ग्रामीण जीवनाचा भाग असलेला रेंदर व भाटकराच्या पार्श्वभूमीवर 'चक्रीवादळ' ही कथा येते. पुरुषी शिळ घालत, माडाच्या झाडावर चढून दारू बनविण्यासाठी त्याचा अर्क काढताना पुरुषी शीळ घालत मादक स्वरांनी मोहिनी घालणाऱ्या रॉकी रेंदेराच्या कोंकणी गीतांची मोहिनी काकीबायवर पडते. तिच्या वासना जागृत होत असतात. कुलीन भाटकारची सून असलेली, विलासबाब या बड्या सरकारी हुद्द्यावर असलेल्या गृहस्थाची बायको असलेली, शीतल व परेश या दोन गोंडस मुलांची आई असलेली काकीबाय नकळत रॉकीच्या सुरांकडे आकर्षिली जाते. माडाची सूर काढणाऱ्या 'पोंयकाप्या' ख्रिस्ती रेंदेराच्या सुरांचा मोह आपणास का पडावा? या प्रश्नाचे ती उत्तर शोधत असते. रॉकीचे विचार ती आपल्या मनातून झटकून टाकण्याचा प्रयत्न करते पण कुल, शील, भाटकारपण या सर्वांचा तिला विसर पडतो व ती रॉकीत अधिकच गुंतते. रॉकी माडावर चढून पोंय कापत असतो व काकीबाय आरामात व्हरांड्यात बसलेली असताना चक्रीवादळ उठते. रॉकी बसलेला माड चुडतांसहीत हलू लागतो. तो कसाबसा खाली उतरतो. काकीबाय त्याला बाहेर पावसात न भिजता आपल्या पडवीवरच्या बाकावर बसण्याचा सल्ला देते. रॉकीचे पावसात भिजलेले ओलेते रूप तिच्या मनात घर करून राहते. ती भलेबाब म्हणजेच आपल्या पतीच्या हडकुळया शरीराची व भरदार अशा रॉकीच्या शरीरयष्टीची मनोमन तुलना करते. आपल्या कुळाला कलंक लाभेल असे काही आपल्या हातून घडू नये याची काळजी घेणारी ती आपला मानसिक व्यभिचार मात्र चालूच ठेवते. रॉकीलाही तिच्या परिस्थितीची जाणीव नसते. रॉकी माडांचा खंड देण्यासाठी काकीबायच्या घरी आला असता तिला आनंदाची उकळी फुटते. रॉकीला पैशांची गरज असल्याचे समजताच ती खंड स्वीकारत नाही व गरजेच्या वेळी आपल्याकडे येण्यास सांगते. रॉकीविषयी तिची आत्मियता वाढत जाते व रॉकीही नि:संकोचपणे तिच्याकडून पैसे घेतो व तिच्या दातृत्वावर आपला धंदा जोमाने वाढवतो. अजून बक्कळ पैसे कमावण्यासाठी गल्फमध्ये जाण्याचे ठरवतो. तिथे जाण्यास एजंटला दहा हजार रुपये द्यावे लागणार असल्याने काकीबायकडे पैशांची मागणी करतो. आपल्याला आता त्याचे गाणे ऐकता येणार नाही व त्याच्या शरीराच्या दर्शनाने वासनांचे शमन करता येणार नसल्याने आधी ती त्याला इथेच थांबण्यास विनविते. पण वाढत जाणाऱ्या आपल्या वासनांना आळा घालण्यास दहा हजार देऊ करते. रॉकी गेल्यानंतर रॉकी

गात असलेली सगळी कांतारे म्हणजे गीते ती गाऊ लागते. तिच्या मनातले चक्रीवादळ मात्र शमलेले नसते अशापद्धतीने 'चक्रीवादळ' ही कथा येते. काकीबायच्या माध्यमातून वासनायुक्त स्त्री मनाचे चित्रण करण्यात आले आहे.

'एक संध्याकाळ एक स्वप्न' या कथेत एका दिशाहीन प्रवासात संध्याकाळी त्या दोघांची झालेली एकमेकांची भेट, एका काळोख्या रात्री तिच्यासोबत रत झालेला तो. आणि तिचे निर्विकार पणे उठून जाणे असे एकूण चित्रण येते. जन्मभर तिला शोधण्यासाठी पायपीट करणारा तो, चराचराला तिच्या अस्तित्वाचे प्रश्न विचारणारा तो, तिच्या अस्तित्वाची ग्वाही मिळत नसल्याने आयुष्याच्या अंतिम समयी निघून गेलेली ती, हे स्वप्न, सत्य, आभास की नुसत्या आपल्या अतृप्त मनाचे खेळ? या प्रश्नात अडकलेला तो असे एकूण मानवी मनोविश्लेषणात्मक विवेचन या कथेत येते.

### 3.2.3.6 व्यक्तिकेंद्रीततेतून भिन्न प्रवृत्तींचे चित्रण

कालोत्सवात हरिदासाचे काम अत्यंत चोख बजावणारा पांडुरंग, कथेचा निवेदक असलेल्या सावळ्याला सरस्वतीचे काम देतो. कालपुरुष देवालयाच्या अग्रशाळेत पांडुरंगाचे कुटुंब असते. पण दुर्दैवी पांडुरंगाच्या पायांचा आजार बळावतो व त्याला पाय कापणे भाग पडते. अधू झाल्याने बायको मुलांना घेऊन त्याला सोडून जाते. त्याच्या आईचे निधन होते व शेवटी तो एकाकी जीवन जगतो. आयुष्यभर कुबड्या घेऊन हरिदासाकी करतो. प्राण गेला तरी चालेल पण परंपरागत जीवनाशी अगदी एकरूप असलेल्या व निष्ठेने परंपरा चालवणाऱ्या पांडुरंगाची ही कथा येते. पांडुरंगाचा व्यवसायही नफ्यात चालत असतो. हरीदासकीतून मिळणाऱ्या पैशांवर तो गुजराण करत असतो. पण जीवनाबद्दल कोणतीही खंत व दु:ख व्यक्त न करणारा असा पांडुरंग असतो. जत्रा, उत्सवात आपल्याकडे असलेला लग्नात शिवलेला कोट व पांढरा शर्ट असा उत्साहाने पेहराव करणारा, एकटाच हरिकीर्तन करत श्रोता व वक्ता तो स्वत:च होणारा, अशा या पांडुरंगाचे निधन झाल्याचे कित्येक वर्षांनी गावी परतलेल्या निवेदकास समजते. गाव, भाविणी, त्यांचे संबंध कोणाशी आहेत या अनेक गोष्टी तिखट मीठ लाऊन सांगणारा पांडुरंग निवेदकाला आठवतो. जगणे हे आपले कर्तव्य असल्याने आपल्यासमोर असलेल्या परिस्थितीसोबत जगणाऱ्या पांडुरंगाने जितक्या निर्विकार पणे जीवनाला स्वीकारले तितक्याच निर्विकारपणे मृत्यूलाही स्वीकारले असेल असे निवेदकास वाटते. पांडुरंगाच्या माध्यमातून जीवनाशी बांधील असलेला व जीवनाकडे निर्विकारपणे बघणारा अशा प्रवृत्तीचे चित्रण या कथेतून लेखक करतात.

सावकाराच्या दुकानात धान्याची गोणी वाहण्याचे काम करणाऱ्या फटीमामाची 'फटीमाम' ही कथा येते. बैलगाडी घेऊन खानापूर बेळगावला जाणाऱ्या फटीमामांना वाघोबाचा सामना करावा लागतो. फटीमाम फटाक्यांची माळ पेटवून झाडीत फेकतो व वाघांना पळवून लावतो. घाटावरील वाटेत चोरट्यांना पिटाळून लावणारा फटीमाम असतो. गावातील कालोत्सवात राक्षसाची भूमिका बजावतो, रंगमंचावर प्रासंगिक हशाही पिकवतो. विष्णु बनून दैत्याचा वध करण्याऐवजी स्वत:च पळून जातो. रंगेल वृत्तीचा फटीमामा खेड्यातील सुतारणीशी संबंध ठेवतो. सुतारणीच्या नवऱ्याला हे समजूनही तो गप्प बसतो. सुतारणीला लुगडे घेणारा फटीमामा तिच्या नवऱ्याला धोतर जोडा घेतो. नाटकाची प्रचंड आवड असलेला मामा नाटकात भीम साकारतो व लोकांच्या कौतुकास पात्र ठरतो. शिमग्याच्या मेळात सोंग घेऊन नाचतो, हनुमंताचा मुखवटा घालून राम – लक्ष्मणाला खांद्यावर घेऊन नाचणारा मारुतीचे आकर्षण असलेल्या फटीमामला गाणी मात्र गाता येत नाहीत. कुकारे घातल्यासारखा त्यांचा आवाज पोरांची करमणूक करतो. दिसायला ओबड धोबड असलेला हा फटीमामा मनाने रसाळ व प्रेमळ असतो. ग्रामजीवनाशी समरसलेल्या व शेवटी फसलेल्या प्रवृत्तीचे चित्रण लेखक करतात. 'दादुली', 'नातालीन', आवडू मावशी' या व्यक्तिकेंद्रित स्वरूपाच्या कथांमध्येही स्त्री व तिचे जीवन केंद्रस्थानी असलेले आपल्याला दिसून येते.

### 3.2.3.7 उत्कट प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या कथा

'पिरू-प्रिया' 'कळा ज्या लागल्या जीवा' या कथांमधून उत्कट अशी प्रेमभावना व्यक्त करतात. कथा नायक पिरू या आपल्या प्रेयसीला आपले जीवन समृद्ध करणाऱ्या, मंद प्रकाश देणाऱ्या पणतीची उपमा देतात. स्वत: जळून स्वत:चे दु:ख गिळून दुसऱ्यांची आसवे पुसणाऱ्या आपल्या प्रेयसीबद्दल कथा नायक सावळा म्हणतो की आपली प्रेयसी या युगात सतीप्रमाणे जळत राहिली व आपण मात्र तिच्या सरणावर अश्रू गाळण्याशिवाय काहीच करू शकलो नाही. सावळ्याचे व पिररूचे लहानपणी प्रेम फुलते, आपल्या मुलांचे एकमेकांशी विवाह व्हावेत अशी इच्छा दोघांच्या वडिलांची असते. एकमेकांचा पहिला स्पर्श अनुभवलेली दोघं नाजूक भावनेने जवळ येतात. वडिलांच्या निधनानंतर भावाच्या हट्टाने पिरूच्या मनाविरुद्ध लग्न लावले जाते. पतीकडून तिचा छळ होतो. पिरूच्या माहेरी येण्यावर निर्बंध लादले जातात. लग्नानंतरही तनामनाने सावळ्याची असलेली पिरू पतीला शरीरसुख देऊ न शकल्याने सवतीचा स्वीकार करते. पिरूच्या विरहाने सावळा व्यसनाधीन होतो. सावळा दारू पीत बसलेला असताना पिरू येते. त्याच्या हातातील दारू हिसकावून घेते व दारूला स्पर्श

करणार नसल्याची त्याच्याकडून शपथ घेते. आपली शेवटची इच्छा म्हणून सावळयाने लग्न करावे असा हट्ट धरते. एका झटापटीत डोक्यावर काठी बसून कवटी फुटून तिचा मृत्यू होतो. सावळा मृतदेहाचे अंतिम दर्शन घेण्यास जातो पण तोपर्यंत तिची चिता जळून गेलेली असते. तिचा नवरा आपण तिला खूप छळल्याची कबुली देतो. नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोच्या भावाला कबूल केलेले पैसे न दिल्याने पतीवर पडणाऱ्या लाठ्या स्वत: झेलता झेलता तिचा अंत झालेला असतो. सर्वांसाठी ती जळते. सावळा मात्र शेवटपर्यंत तिच्या सरणावर आसवे गाळतो. पिरूच्या हट्टासाठी लग्न करत, पिरूच्या तस्बिरीला हार घालत ती देवता असल्याचे पत्नीस सांगतो. व नववधू तिच्या फोटोला कुंकू लावून आपल्या भांगात भरते. पिरू व सावळयाची उत्कट अशी प्रेमाची शोकांतिका लेखक चित्रित करतात. सावळयासाठी, त्याच्याशी लग्न न झाल्याने शेवटपर्यंत पिरू सतीसारखी जळते.

'कळा ज्या लागल्या जीवा' या कथेमध्ये कसबी नावाडी असलेला, हातात तासन तास वल्हे घेऊन वल्हवणारा, नाट्य संगीताच्या गीतांना घोळवत स्वत:चे दु:ख विसरणारा असा बेतू येतो. तरुण, कलासक्त वृत्तीचा, प्राणीमात्रांवर प्रेम असलेल्या बेतूचे पाग्याची मुलगी असलेल्या दुलूवर प्रेम जडते. बेतू पायाने अधू असतो. तिला आकर्षित करण्यासाठी तो गातो पण दुलू त्याच्याकडे दुर्लक्ष करून पाठ फिरवून चालू लागते. बेतू आपल्यावर जीव टाकत असल्याचे तिच्या लक्षात येते. तिला त्याची दयाही येते. तिला त्याचे गाणे आवडत असले तरी तिच्याजवळ गाणे ऐकण्यास वेळ नसतो, कारण दुलू रोज मडगावला मासे विकण्यासाठी जात असते. दुलूच्या मनातही बेतू भरलेला असतो पण बेतू पायाने अधू असल्याने ती त्याला टाळते. बेतूला दुलू दुष्ट परीच्या कथेतली दुष्ट परी वाटू लागते. तिला आपण सुखी ठेऊ शकणार नसल्याचे वाटू लागते. गावात सर्वजण दुलूचे आणि बेतूचे नाव जोडत असल्याने आपले चांगल्या ठिकाणी लग्न व्हायचे असले तर बेतूला आपल्या आयुष्यातून निघून जाण्याविषयी सांगते. आतून मात्र ती तुटलेली असते. बेतूही 'कळा ज्या लागल्या जीवा, मला की ईश्वरा ठाव्या' हे गीत गात आपले दु:ख व्यक्त करतो. तो खंगून जातो. दुलूचे लग्न ठरते. भरतीच्या वेळेला दुलूची वरात जाते जणू सागरही तिच्या आनंदात सामील झालेला असतो. निरोपाच्या समयी दुलूला बेतू विरहाने गात असल्याचे लक्षात येते. तिला रडू कोसळते. आई वडिलांपासून दूर जात असल्याने दुलू रडत असावी असे तिच्या नवऱ्याला वाटते. प्रेमा विरहाने ती विलाप करत असते. बेतू एकटा राहू लागतो. अन्नपाणी वेळेत घेत नसल्यामुळे त्याच्या शरीराचा सापळा झालेला असतो. त्याच्या आईला त्याची काळजी लागलेली असते. बेतूचे हालहाल होत निधन होते. दुलूवर संकट कोसळते. दुलू बेतूचे दर्शन घेते पण बेतूला विसरणे तिला शक्य नसते.वेडी झालेली दुलू बेतूच्याच आवाजात गात असल्याने. दुलूला बेतूच्या आत्म्याने पछाडले आहे असे गावकऱ्यांना

वाटते. बेपर्वा अवस्थेत ती गात किनाऱ्यावर फिरते. तिने केलेल्या कर्माचा भोग ती भोगतेय असा सूर गावातील बायकांमध्ये उमटतो. बेतू आणि दुलूच्या असफल प्रेमाची शोकांतिका या कथेतून लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. बेतूने आपल्यावर नितांत प्रेम केले, पण त्या प्रेमाच्या बदलात बेतूच्या शारीरिक व्यंगामुळे त्याला झिडकारल्याने दुलूच्या जीवाला बोचणाऱ्या कळा या कथेतून व्यक्त होताना दिसतात.

बापूसाहेब गावठाणकर हे सत्तरीतील प्रसिद्ध जमीनदार निवेदक हे मुंबईतील कॉलेजमधील बापूसाहेबांचे जुने मित्र असतात. वनस्पतींच्या अभ्यासासाठी निवेदक त्यांच्या गावात आले असता फुलूची व त्याची ओळख होते. फुलूला वनस्पतीचे माहिती असल्यामुळे बापूसाहेब निवेदकासोबत फुलुला पाठवतात. तिच्या नैसर्गिक ज्ञानापुढे निवेदकाचे पुस्तकी ज्ञान फिके पडते. तिच्या सोबत नटलेल्या वनश्रीला पाहताना निवेदक मंत्रमुग्ध होतो. तिचा फोटो घेण्यासाठी तिच्या केसात गजरा खोवतो. तिथल्या रानमेव्याची माहिती ती देत जाते. वनस्पतीचे संशोधन करण्याचा व नर्सरी थाटण्याचा विचारात असलेल्या निवेदक व फुलूच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळते. मांसाची सागोती करण्यासाठी आलेल्या फुलूच्या सहवासात कुजूची दारू पिल्याने निवेदकामधील पुरुष जागा होतो. नकळत तो तिला जवळ घेतो व तिच्या शरीराशी लगट करतो. दुसऱ्या दिवशी फुलू आपल्या जागेवर नसते. आठवडाभर ती फिरकत नाही. आपण तिच्यावर केलेल्या अतिप्रसंगामुळे ती आली नसल्याचे समजून निवेदक तिच्या घरी जातो. आपल्यासारख्या गावातील अशिक्षित मुलीला शरीराची उब दिल्याने फुलू कृतज्ञता व्यक्त करते. व निवेदकाचे नाव बदनाम होऊ नये म्हणून झुडूपात नाहीशी होते. निवेदकाने सहज माळलेला गजरा तिच्या केसात सुकलेल्या अवस्थेतही असतो. निवेदकाशी शारीरिकदृष्ट्या जवळ आल्याने मानसिकरीत्या, भावनिकरीत्या जोडल्या गेलेल्या फुलूच्या माध्यमातून उत्कट प्रेम भावनेमुळे आपल्या समोरच्या माणसाला आपले सर्वस्व बहाल करणाऱ्या हळव्या स्त्री मानसिकतेचे चित्रण 'झंपला ! प्रेम रंगला' या कथेत लेखक करतात.

### 3.2.4 विठ्ठल गांवस यांचे कथालेखन

विठ्ठल गांवस यांचे 'कॅथरीन'(१९९३), 'लवण'(२००३), 'ओझे'(२०१०), 'फिंगर बाऊल'(२०१९) असे चार कथासंग्रह प्रसिध्द झाले. गोमंतकीय पारंपारिक लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर, कृषीजीवन, शेतकरी आणि त्यांचे गुरावासरांची जुळलेले भावबंध, भाबड्या शेतकऱ्याची स्थिती, ग्रामीण समाजव्यवस्थेला छेद देत, गोमंतकातील कष्टकरी कुळवाडी समाज व भाटकारशाहीचे चित्रण, सर्वसामान्य शेतकऱ्याची व्यथा त्यांच्या

कथांत आल्याचे आपल्याला दिसून येते. आधुनिक जीवनात ग्रामजीवनाचा झालेली होलपट, गावातील वासानाधीन प्रवृत्तींचे चित्रण करत ग्रामीण जीवनातील वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला दिसून येतो. त्यांची कथा ग्रामीण जीवनाचेच चित्रण करत नाही तर बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळीवरील सद्यकालीन प्रश्नांना, सामाजिक बदलांना कथालेखानातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करते.

### 3.2.4.1 ख्रिस्ती समाजजीवनाचा वेध घेणाऱ्या कथा

विठ्ठल गांवस यांच्या 'कॅथरीन' या संग्रहातील पहिल्याच **'कॅथरीन'** या कथेचा विचार करणे गरजेचे ठरते. गोमंतकीय ख्रिस्ती समाज 'कॅथरीन' या कथासंग्रहाच्या केंद्रस्थानी असल्याचे आपल्याला दिसून येते. जॉकी नावाच्या दारुड्या नवऱ्याशी लग्न झाल्यानंतर उदरनिर्वाहासाठी 'कॅथरीन ताव्हेर्न' हे मद्यालय थाटणारी कॅथरीन या कथेत आलेली आहे. नवऱ्याच्या व्यसनी स्वभावामुळे नवऱ्यापासून दुरावलेली कॅथरीन गिऱ्हाईक म्हणून येणाऱ्या विजय नावाच्या परप्रांतीय मुलाच्या प्रेमात पडते. दु:खी कष्टी जीवन जगणाऱ्या कॅथरीनला दारुडा नवरा जेव्हा झोडपतो त्यावेळी नवऱ्यापासून कायमचे दूर होण्याचा निर्णय ती घेते व विजयसोबत 'गुंटूर' या गावी निघते. सद्यकालात गोमंतकात परप्रांतीयांचा आकडा वाढत असल्याचे दिसते हा मुद्दाही लेखक आपल्या या कथेच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न करत गोमंतकीय समाजजीवनाशी निगडीत प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करतात. गोमंतकीय समाजजीवनावर आधुनिक विचारांचे वारे लागल्यामुळे झालेल्या बदलांवर प्रकाश टाकणारी 'लिब्रूची इच्छा' ही कथा येते. कुवेतमध्ये असलेला आपला मुलगा डॉमनिक व मारीयान या आपल्या सुनेला मुल व्हावे ही इच्छा मनाशी असलेल्या लिब्रूचे चित्रण या कथेमध्ये आलेले आहे. डॉमनिकचा जन्म होऊन वर्षभरात लिब्रूच्या नवऱ्याचे निधन झाल्याने लिब्रू डुक्कर पाळण्याचा धंदा सुरू करते. फ्रायलन भटकार या तिच्या शेजाऱ्याचा तिला खूप आधार वाटत असल्याने त्यांच्या सांगण्यानुसार डॉमनिकला सुधारण्यासाठी त्याचे मारीयानशी लग्न लावून देते. नातवंडांचे तोंड बघण्याची इच्छा लिब्रूला असल्यामुळे डॉमनिकच्या कुवेतहून आलेल्या पत्रांमधून यासंदर्भात काही वाच्यता केली आहे का हे जाणून घेण्यासाठी लिब्रू डॉमनिकचे पत्र फ्रायलन भाटकाराकडून वाचून घेते. त्यावेळी आपला मुलगा डॉमनिक टेरेसचे घर बांधणार असल्याचे तिला समजते. टेरेसचे घर बांधल्यानंतर मारियान लिब्रूचे डुकरांचे 'घुड' मोडते. त्याचा लिब्रूला प्रचंड रागही येतो. मारियानच्या वागण्यातही बदल होतो. कधीच घरातून बाहेर न पडणारी मारियान मेकअप करून बाहेर पडू लागते.

आधुनिकीकरणामुळे कौलारू घरांचे टेरेस झाले व नुसत्या झगमगाटासाठी गोमंतकीय समाजजीवनात प्रचंड फरक पडला. पारंपारिक धंदे नाहीसे होऊ लागले याचे चित्रण या कथेच्या माध्यमातून लेखक करण्याचा प्रयत्न करतात.

**'वारस'** या कथेतून गोमंतकीय ख्रिस्ती धर्मात वारसा हक्कामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण केलेले आहे. लेखक म्हणतात की गोव्यात पोर्तुगीजकाळात वडिलोपार्जित मालमत्तेची समान वाटणी व्हायची. ही वाटणी होऊ नये म्हणून आपल्या मुलाला धर्मोपदेशकाच्या शिक्षणासाठी पाठवले जायचे आणि मुलगी असली तर तिला विवाह करण्यापासून परावृत्त केले जायचे. या पद्धतीचे दोन बळी म्हणजे फादर ग्रॅसियस व मार्था यांच्या जीवनाचे चित्रण 'वारस' या कथेमध्ये आलेले आहे. या कथेतील फादर ग्रॅसियस हा धर्मोपदेशक जरी असला तरी कुढून कुढून आपल्या इच्छेविरुद्ध जीवन जगणारा आहे. मान्युअल या आपल्या भावाच्या निधनाच्या वार्तेमुळे तो विचलित न होता निर्णय घेतो. भावापश्चात आपल्या अविवाहित बहिणीच्या मुलाला वारसाहक्क मिळवण्यासाठी प्रयत्न करतो. अनैतिक संबंधातून जन्माला आलेल्या मार्थाच्या मुलाला प्रायश्चित म्हणून फादर ग्रासियसने आपल्याकडे सोडून जायला सांगत, मुलाला सिस्टर ऑगाथा यांच्याकडे अनाथाश्रमात ठेवलेले असते व शेवटी त्या मुलाला भावाच्या निधनानंतर आपल्या घरी नेतो व मार्थाला 'आई' अशी हाक मारण्यास सागतो. मागे वळून न पाहता संसाराच्या मोहाकडे पाठ करून धर्मोपदेशनाच्या कार्यासाठी निघतो. इच्छेविरुद्ध संसाराचे जाळे तोडलेल्या फादर ग्रॅसियस यांच्या मनोवृत्तीचे चित्रण या कथेत आलेले आहे. गोमंतकीय उच्चभ्रू ख्रिस्ती समाजातील वास्तवाचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्नही या कथेच्या माध्यमातून होताना दिसतो.

'सांजाव' ही ख्रिस्ती समाजाच्या 'सांजाव' उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली कथा महत्त्वाची ठरते. व्हिवा सांजाव म्हणत सांजाव गीतांच्या तालात नाचणाऱ्या 'सांजाव' या ख्रिस्ती धर्मियांच्या उत्सवाचे चित्रण लेखक करतात. शॅरोनवर प्रेम करणारा ॲन्थनी आपले प्रेम सफल न झाल्याने सांजव उत्सवप्रसंगी विहिरीत झेप घेण्याच्या प्रथेनुसार शॅरोनच्या नवऱ्यासोबत स्वत:ही विहिरीत झेप घेतो. शॅरोनच्या नवऱ्याला विहिरीच्या तळाशी नेत त्याचा जीव घेऊ पाहणारा ॲन्थनी स्वत: बुडतो व शॅरोनचा नवराच त्याला वाचवतो अशा आशयाची कथा मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करताना दिसून येते. प्रेमामधील सूड भावनेला केंद्रस्थानी ठेवत, कथेला लाभलेल्या वैशिष्ट्यपूर्ण अशा सांजांव उत्सवाच्या पार्श्वभूमीमुळे ही कथा महत्त्वाची ठरते. प्रेमातील सूड भावना व माणुसकी या परस्परविरोधी भावनांचे चित्रण या कथेत आढळते. 'सांगाती' ही कथाकार विठ्ठल गांवस लिखित कथा ही अत्यंत महत्त्वाची आहे. 'ख्रिस्ती' कौटुंबिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर आलेल्या 'सांगाती' या कथेत एकाकी

असलेली मारिया, बार चालवून उदरनिर्वाह करते. कामिल हा तिचा प्रियकर नोकरीसाठी बोटीवर जातो आणि सहा वर्ष फिरकत नाही. शेवटी लहानपणापासून आईवडिल नसलेला म्हणून मारियाच्या आईवडिलांनी स्वीकारलेला, मारियावर प्रेम करणाऱ्या जुझेला ती स्वीकारते. गोवा मुक्तीनंतर पोर्तुगाल आपली जन्मभूमी मानणारा, गोव्यात अपमानीत होऊन जगण्यापेक्षा पोर्तुगालला जाणारा मारियाचा भाऊ याद्वारे गोवा मुक्तीनंतरच्या कालखंडातही पोर्तुगालचा उदो उदो करणारी गोमंतकीय ख्रिस्ती समाजात बळावलेल्या प्रवृत्तीचे चित्रण कथेत येते.

### 3.2.4.2 समाज वास्तवाचा वेध घेणाऱ्या कथा

**'गोल चेहऱ्याचा तरुण'** या कथेत वेश्यावस्तीतील बकाल स्थिती मांडण्याचा प्रयत्न लेखक करताना दिसतात. या वस्तीमध्ये पोलीस तैनात असले तरी ते सगळा गैरव्यवहार चालू असताना नुसती बघ्याची भूमिका स्वीकारताना दिसतात. वस्तीतील वेश्या हातवारे करून गिऱ्हाईक मिळवण्याच्या तयारीत असलेल्या वस्तीमध्ये रंगनाथ कुलकर्णी नावाचा एक तरुण फक्त वेश्येचे जीवन, तिचे प्रश्न समजून घेण्यासाठी त्या वस्तीत जातो. तिथे देवदासी आईची वेश्या असलेली मुलगी शारदा त्याला भेटते व तिच्या बोलण्यातून आपल्या पुस्तकी जगापेक्षा व्यवहारी जगातल्या बऱ्याच गोष्टींची जाणिव होते. लहान, मोठे, म्हातारे यांच्याकडे असलेल्या पैशांच्या जोरावर चालणाऱ्या अनैतिक अशा समाज वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखक करतात. वेश्यावस्तीत वेश्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी गेलेला रंगनाथ कुलकर्णी जेव्हा वस्तीत अनेक अनुभव घेतो, त्यावेळी त्याच्या रागाचा पारा अतिशय चढतो व तो म्हाताऱ्यावर हल्ला करण्यास पुढे सरसावतो. पण म्हाताऱ्याच्या आरडाओरडीमुळे शेवटी रांगनाथालाच मार खावा लागतो. पण त्याच्या मदतीस कोणी येत नाही. पोलीसही फक्त बघ्याची भूमिका स्वीकारतात. कायदा सुव्यवस्थेचे धाबे कसे दणाणले आहे याचे चित्रण या कथेमधून लेखक करण्याचा प्रयत्न करत असल्याने लेखकाकडे असलेले विलक्षण समाजभानही दिसते. मराठी साहित्यात महानगरीय स्वरूपाच्या लेखनामध्ये असे प्रश्न भाऊ पाध्येंसारख्या लेखकाच्या 'वासुनाका' या कादंबरीतून झालेले आढळतात. यात मुंबई महानगराचे चित्रण झालेले दिसते. पण गोवा हे अजून महानगर झाले नसले तरी शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेले राज्य म्हणावे लागते आणि नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतून शहरीकरणाच्या प्रक्रियेतील बदलत्या समाजवास्तवाचे पडसाद गोमंतकीय साहित्यकृतींमध्ये उमटलेले दिसतात.

लेखकाला असलेले समाजभान ‘गर्भजल’या कथेमध्ये दिसून येते. उच्चशिक्षित श्रीमंत कुटुंब असो वा अनाडी दरिद्री कुटुंब असो, वंशाचा दिवा सर्वांना हवा असतो आणि त्यासाठी कायद्याच्या विरुद्ध जाऊन गर्भनिदान चाचण्या केल्या जातात हे सत्य लेखक ‘गर्भजल’ या कथेतून मांडतात. शहरातील नावाजलेली रेडियोलॉजिस्ट असलेली ‘ती’ आणि गरीब दरिद्री ‘शांताव्वा’ या दोन भिन्न स्तरावरील स्त्री जीवनाचे चित्रण लेखक करतात. शांताव्वा पाचव्या मुलीच्या जन्मानंतर आपला पती मुलगा जन्माला येत नसल्याने दुसरा विवाह करणार, आपला छळ करणार या भितीने गर्भनिदान चाचणी करण्याचा प्रयत्न करते. रेडियोलॉजिस्ट असलेली ‘ती’ उच्चविद्याविभूषित असलेल्या आपल्या नवऱ्यास हे किस्से सांगत असते तर दुसरीकडे तिच्या नवऱ्यालाही पहिल्या मुलीनंतर मुलाची ओढ असल्याने गर्भ निदान करून घेण्याची उत्सुकता तिच्या सुशिक्षित नवऱ्यासही असल्याचे तिला कथेच्या शेवटी समजते. भारतीय खुजी मानसिकता व पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्ध लेखक भाष्य करतात. ‘भोग’ या कथेमध्ये समाज शिक्षित असो किंवा अशिक्षित स्त्रीला सदैव भोगवस्तू म्हणून पहिले जाते याचे चित्रण लेखक करतात. एड्स सारख्या सामाजिक प्रश्नांवर भाष्य करत एड्स पीडितांच्या व्यथा कथेमधून मांडतात. एड्स सेंटर मध्ये नर्स म्हणून काम करणारी सुमेधा ही सुशिक्षित स्त्री वेश्यावस्तीतील बायकांना एड्स प्रतिबंध करण्यास सूचना करते, पण स्वत:च्या नवऱ्यास ती प्रतिबंधकांचा वापर करण्याविषयी तयारी करण्यात अयशस्वी होते. हतबल होते. मनाविरुद्ध नवऱ्याशी संबंध ठेवते. तिच्या मनाची घालमेल ‘भोग’ या कथेमध्ये लेखक मांडतात. या कथेत मुतव्वाचीही कथा येते. एड्स झालेल्या मुतव्वाचा दादला तिच्या आजारपणात तिचा सांभाळ करतो. शिक्षित व सुशिक्षित या मधले अंतर लेखक मांडण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

खाण व्यवसायामुळे उद्ध्वस्त गोव्याचे परिणाम अनुभवून आपली शेतजमीन कोट्यावधी रुपयांच्या आशेने न विकण्याचा निर्णय घेणाऱ्या आजोबांची गोष्ट ‘गोष्ट आजोबांची’ या कथेमध्ये आलेली आहे. खाण व्यवसायाने सोनेरूपी माल तर मिळणार, आपण श्रीमंतही होऊ पण आपल्यामुळे शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होणार हे भान असलेले आजोबा शेवटी पैशांपायी शेती न विकण्याचा निर्णय घेतात. ‘देऊळ’ या कथेमधूनही खाण व्यवसायामुळे झालेल्या ग्रामजीवनाच्या विध्वंसाचे वास्तव चित्रण लेखक करतात. नंदनवन मानल्या जाणाऱ्या, धार्मिक सलोखा असलेल्या गोव्याचे बदलते चित्र विठ्ठल गांवस यांच्या ‘फिंगर बाऊल’ या कथासंग्रहातील ‘कहत कबीरा’ या कथेत लेखक मांडतात. हिंदू देवळात निष्ठेने अभंग भजन गाणाऱ्या मुसलमान कलावंतास, बिघडलेल्या धार्मिक सलोख्यामुळे, गोरक्षकांचा सामना करावा लागतो. दोन जमातीमधील भांडणे, मारामारी, पाकिस्तानी सेनेने किंवा अतिरेक्यांनी भारतीय जवानांस मारणे अशा अनेक कारणामुळे दोन्ही धर्मात

वादविवाद होत असल्याचे लेखक या कथेतून लिहितात. या वाद विवादांमुळे मौलवी कडून सूचना आल्याने शेवटी कथेतील मुसलमान कलावंतास कितीही अभंगांची ओढ असली तरी परिस्थितीमुळे हतबल होण्याची पाळी येते. ‘काळ बदलतो आहे’ या कथेत मोहिद्दीन शेख व रामकृष्ण मुळगावकर या दोहोंच्या मित्रत्वाच्या नात्याचे चित्रण करत दोहोंमध्ये धर्मापलीकडे असलेली दोस्ती, खाण व्यवसायात एकमेकांस स्पर्धक म्हणून न पाहता, एकमेकांना व्यवसाय कारभारात मदत करण्याची वृत्ती, दोहोंमध्ये असलेल्या नात्याचे चित्रण करत एकेकाळी असलेला धार्मिक सलोखा व आज बळावणाऱ्या धार्मिक आढीचे चित्रण लेखक करतात. आज प्रत्येक धर्मामध्ये आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत हे दर्शविण्याचा प्रयत्न होत असल्याचे लेखक सांगतात. आपल्याला आपला धर्म राष्ट्रापेक्षा मोठा वाटतो. छोटीशी घटना जरी घडली तरी ती आपल्या धर्माविरुद्ध असल्याचा आपण आव आणतो. शिक्षणाचा प्रसार होऊन धार्मिक भिंती मोडल्या जाण्याऐवजी अजून बळकट होत आहेत, अतिरेकी कारवायांमध्ये सहभागी युवक हे उच्चविद्याविभूषित आहेत असे सद्यस्थितीतील वास्तव लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. एके काळी हिंदू मुसलमान एकमेकांच्या सण समारंभात सामील व्हायचे, हिंदू स्त्री पिराच्या दर्ग्याला मूल होण्यासाठी नवस करायची. मुसलमान संतांनी रचलेले अभंग देवळादेवळातून गायले जायचे यात कुणाचीही हरकत नसे. असे भाष्य करत लेखकाची समकालीन प्रश्नाशी असलेली वैचारिक बैठक, समाजातील बदलांशी असलेली बांधिलकी कथांमधून व्यक्त होते. या बदलांमुळे लेखक अस्वस्थ होतात हे वाचकांना विठ्ठल गांवसांच्या कथेतून दिसून येते. दोन पिढ्यांमध्ये आलेल्या स्थित्यंतरांवर लेखक कथेतील पात्रांच्या माध्यमातून भाष्य करतात. एकीकडे सर्वधर्मसमभाव मानणारे मोहिद्दीन व दुसरीकडे मुस्लिम धर्मियांसाठी ‘मुस्लिम अर्बन कोपरेटिव्ह बँक’ उघडू पाहणारा त्यांचा मुलगा अल्ताब, एकीकडे परंपरागत अन्नछत्र चालवत गरजूंना एकेकाळी मोफत अन्न देणारे रामचंद्र व नंतर फाईव्ह स्टार हॉटेलमधून अन्न पुरवण्याचा व्यवसाय करणारा त्यांचा मुलगा हेमंत या पात्रांच्या माध्यमातून काळाच्या बदलत्या वास्तवावर लेखक भाष्य करतात.

आधुनिक नातेसंबंध व वाढते घटस्फोट या सद्यकालीन वास्तवावर प्रकाश टाकणारी ‘सवाई’ ही कथा ठरते. पत्नीकडून रोहन या मुलाच्या जन्मानंतर शरीरसुख मिळत नाही म्हणून विवाहबाह्य संबंधात रमलेला मारियो आपल्या पत्नीकडून घटस्फोट घेतो. वयात आल्यानंतर रोहन आपल्यामुळे गरोदर असलेल्या ॲनाला लग्न करण्याचे वचन देतो पण ॲना मोठ्या घराण्यातली मुलगी नसल्याने सर्व संबंध तोडतो. पैशांच्या हव्यासाने रीनाशी लग्न करतो व प्रसिद्ध असलेल्या तिच्या डॉक्टर वडिलांकडून पैसे मिळत नसल्याने तिला मारहाण करतो.

तिच्यापासून घटस्फोट मिळविण्याचा प्रयत्न करतो व शेवटी डॉ. कशाळकर या आपल्याच सासऱ्यांचा खूनही करतो. आधुनिक जीवनातील मूल्यहीनतेचे चित्रण करणारी ही कथा २००५ सालातील डॉ. श्रीकांत वेरेकर यांच्या खून प्रकरणाची आठवण करून देते.

### 3.2.4.3 मानवी मनोवृत्तींवर भाष्य करणाऱ्या कथा

पुरुषोत्तम भाटकारची वाईट नजर आपल्या बायकोवर असल्याने प्रसंगावधान राखून आपल्या बायकोच्या अब्रूवर हात टाकण्याच्या प्रयत्नात असलेल्या भाटकाराच्या मुलाच्या कमरेखालच्या भागावर आघात करून कुळवाडी असलेला कुष्टा त्याचा माज जिरवतो अशा आशयाची कथा 'माज' या कथेमध्ये आलेली आहे. विठ्ठल गांवसांच्या ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या 'जुळं' या कथेत पतीच्या निधनानंतर पुरुष स्पर्शाला आसुसलेली स्त्री गावातील एका कष्टकरी पुरुषाकडे ओढली जाते. पतीच्या निधनानंतर पुरुष स्पर्शाची तिला लागलेली ओढ लेखक चित्रित करतात. डोंगरावर फिरत असताना नाग नागिणीची प्रणयात गुंतलेली जोडी पाहून तिच्यात प्रणय भावना जागृत होतात. अशा कथानायिकेच्या मानसिकतेचे चित्रण कथेत येते. आपलं सर्वस्व ती त्याला देते व त्याच्यासोबत गाव सोडून जाण्याचे ठरवते.  तिच्या गाव सोडून जाण्याच्या निर्णयाला समंती देणारा तो शेवटी फिरकत नाही. एका प्रसंगी नागीण ही जाग्याची दैवत असल्याने गावकरी जुळयांना म्हणजेच जोडीला विलग करतात.काठीने बडवून नागाचा जीव घेतला. आपलीही स्थिती नागासारखी होणार, तिच्याशी संबंध ठेवल्यास आपल्यालाही जीवे मारले जाणार ही भीती मनात बाळगून शेवटी तो तिच्यासोबत पळून न जाण्याचा निर्णय घेतो. त्याच्यासोबत पळून जाण्यास घराबाहेर पडलेल्या तिच्या शोधात गावकरी रानात येत असल्याची चाहूल लागल्याने व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे आपल्याकडे नसल्याने ती स्वतःचा जीव संपवण्यास विहिरीकडे धाव घेते. मानवी मनातील सुप्त प्रणयभावनेचे चित्रण या कथेत येते. **'दृष्ट'** या कथेमध्ये गोमंतकीय चालीरीतींना केंद्रस्थानी ठेऊन दारिद्रय हा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे त्याचबरोबर मोरतू या पात्राच्या माध्यमातून मानवी वासानाविकारांवर भाष्य करण्याचा प्रयत्नही लेखक करतात. महार समाजातील वसाहतीतल्या दारिद्र्याचे चित्रण लेखक करतात. दिवसभर चालून एकही टोपली न खपल्यामुळे मोरतूच्या घरातील चूल पेटली तरी अन्न शिजवता येत नाही. किमान जर लग्न झाले तर पत्नीही काही काम धंदा करेल आणि पोटापाण्याची व्यवस्था होईल असे मोरतूची आई सुचवते. पण लग्न झाल्यानंतर मुलं जन्माला येणार आणि या स्थितीत मुलांचे संगोपन होणं शक्य नसल्याने मोरतू लग्नास तयार नसतो. महार समाजातील लोकांनी

लग्नप्रसंगी लोकांच्या घरी जाऊन त्यांच्या घरातील नवरा नवरीची दृष्ट काढण्याच्या प्रथेनुसार मोरतूला बोलावणे येते. मोरतूला दृष्ट काढण्याचा प्रकार आवडत नसला तरी पोटाच्या प्रश्नामुळे त्याला जावेच लागते. मंत्र गाऱ्हाणे नीट पाठ नसलेल्या मोरतूपुढे जेव्हा तारुण्याने रसरसलेली नवरी येते तेव्हा त्याच्या वासना जागृत होतात. त्याची दृष्टी तिच्यावर खिळते पण दुसऱ्याच क्षणी अर्धवट दृष्ट काढण्याचे सगळे सोपस्कार पार पाडून मोरतू तिथून निघतो व सुटकेचा निश्वास सोडतो पण त्या तरुण नवरीची मूर्ती त्याच्या मनचक्षुंसमोर राहते.

**'त्याची म्हैस परत आली'** या कथेत धोंडूच्या पळालेल्या म्हशीच्या परतण्यातून एक आशावादी दृष्टीकोन व्यक्त झालेला आहे. पळालेल्या म्हशीला शोधण्यासाठी गेलेल्या धोंडूला त्याला सोडून पळून गेलेल्या बायकोवरून हिणवलं जातं. कधीच न भांडणारी, कुठलाच हट्ट न करणारी गोदू आपल्याला सोडून का गेली? हा प्रश्न पडलेल्या, दुखावलेल्या धोंडूचे चित्रण लेखक करतात. गोदू आणि धोंडूच्या झालेल्या क्षुल्लक भांडणानंतर गोदू घरातून नाहीशी झालेली असते. गोदूचे विचार मनात घोळवत आपल्या म्हशीला शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या धोंडूची अवस्था लेखक कथेतून मांडण्याचा प्रयत्न करतात. थकलेला धोंडू भजनाचे बोल ऐकत देवळात शिरतो. गौळण गाण्यासाठी त्याला गावकऱ्यांकडून आग्रह केला जातो. धोंडू मनोमन म्हैस मिळावी असे सांकडे देवाला घालतो. धोंडूने दुसरे लग्न करावे असा त्याच्या आईचा आग्रह असतो, आठवडाभर म्हैस शोधून झाल्यावर अचानक धोंडूची म्हैस परतते. ती परतली तशी आपली गोदूही परतेल असा आशावादी दृष्टीकोन व्यक्त करत खेड्यातील धोंडूच्या मनाचे चित्रण या कथेत केले आहे. **'तुटलेल्या साखळ्या'** या कथेतून दोन श्वानांमध्ये त्यांच्या मालकांनी निर्माण केलेला दुरावा लेखक चित्रित करतात. आपल्या अस्लेशियन कुत्रीला नेटीव कुत्र्यांच्या जवळही जाऊ देणार नाही असे मालकिणीचे मत असते. कारण आपल्या कुत्रीची पिल्ले गावठी कुत्र्यांसारखी जन्माला येण्यास त्यांचा विरोध आसतो. त्यामुळे त्या दोघांना विरह सहन करावा लागतो. मालकीण आपल्या कुत्रीला साखळीने बांधते, शेजारच्या कुत्र्याला भेटल्यास मारही देते. मालकीण जेव्हा झोपते तेव्हा दोघे भेटण्याचा प्रयत्न करतात. मालकिणीची मुलगी ब्रोना आणि शेजारच्या घरातील निखिल यांचेही एकमेकांवर प्रेम असते. त्यात ब्रोना गरोदर राहिल्याने घराण्याच्या अब्रूचा प्रश्न असल्याने तिला डांबून ठेवले जाते. शेवटी सगळ्या साखळ्या भिरकावून देत ब्रोना आणि निखिल पळून जातात. व मालकिणीची कुत्रीही चार गोंडस पिलांना जन्म देते. यामुळे मालकिणीच्या निराशजनक मनस्थितीचे चित्रण लेखक करतात. घरच्या गरिबीमुळे संसाराची जबाबदारी पेलत असताना तरुणाची झालेली ओढताण, पुढे ऑफिसमध्ये तिच्याशी जुळलेले प्रेम व खूप प्रतिष्ठित इंजिनियर पती मिळाल्याने तिने दुसऱ्याशी विवाह करण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा झालेला प्रेमभंग व

आयुष्यातील उदासीनता व व्यसनाधीनता आणि त्यात भर म्हणून आधी शरीरसुखाचा मार्ग झिडकारत शेवटी वासानाधीन झालेल्या तरुणाच्या जीवनाचे चित्रण ‘अशीच एक संध्याकाळ’ या कथेत लेखक करतात. मानवी मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करतात. उच्चभ्रू ‘व्हडल्या’ भाटकराची सून असलेल्या रघुनाथच्या पत्नीला लागलेली अनावर अशी ओढ ‘पाऊस’ या कथेत लेखक चित्रित करतात. लग्नानंतर कामानिमित्त दूरगावी पणजीत असलेला रघुनाथ भरपावसात मध्यरात्री शनिवारी घरी परततो तेव्हा रघुनाथचे वडील रघुनाथला येऊ नकोस असे सांगतात. पण रघुनाथ स्वत:च्या जीवावर उदार होऊन घरी येतो म्हणुन नवदांपत्याने पणजीतच संसार थाटावा अशी सूचना रघुनाथचे वडील देतात. पणजीत संसार थाटण्यास विरोध करणारे वडिल एका अर्थी नवदांपत्याची एकमेकांना असलेली ओढ समजूनच हा निर्णय घेतात असे या कथेच्या शेवटी सूचित होते.

### 3.2.4.4 सुशिक्षिताच्या मानसिक कोंडीचे चित्रण

**‘हाक’** या कथेत बी. एस. ई. इन अग्रिकल्चरचे शिक्षण घेऊन प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करत नवीन प्रयोग शेतीमध्ये व्हावेत याहेतूने आपल्या वडिलांच्या सूचनेनुसार पुढच्या शिक्षणासाठी व पुढे अनुभव मिळावा म्हणून फक्त पाच वर्षांसाठी परवानगी मिळवून शहरात गेलेला परांजपे शहरातल्या सुखवस्तू जगण्याच्या आकर्षणामुळे आपल्या परंपरागत चालत आलेल्या शेती व्यवसायाकडे पाठ फिरवतात. सरकारी आस्थापनातील गैरव्यवहारांना बळी न पडता, कित्येक वर्षांनी आपल्या मनाची हाक ऐकत, सरकारी नोकरीला राजीनामा देत पुन्हा शेती व्यवसायाकडे वळतात. या कथेत सरकारी आस्थापनामधील भ्रष्टाचारावर भाष्य करण्याचा प्रयत्नही लेखक करतात. लेखक लिहितात, “दारावर टकटक आवाज झाला. तो उठून बाहेर आला. दाराच्या घळईमधून पेपर आत पडला. त्याने पेपर उचलला. ‘सरकार भ्रष्टाचार मुळासकट उपटून काढील, पंतप्रधानांचं जनतेला आश्वासन...’ आजची हेडलाईन. पंजाबमध्ये अतिरेक्यांचे अकरा बळी. कुठंतरी बलात्कार, मारामाऱ्या...बोट क्लबवर प्राध्यापकांचा प्रचंड मोर्चा...तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगाराकडे वळावे. मुख्यमंत्र्यांचे आवाहन. त्याने निर्विकार चेहऱ्याने पेपर वाचला व समोरच्या टेबलावर फेकून दिला.”[4] सद्यकालीन सामाजिक प्रश्नांचे भान या कथेमध्ये मांडत मध्यमवर्गीय सरकारी अधिकाऱ्याचे प्रश्न या कथेतील प्रमुख पात्राच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे.

‘अगतिक’ या कथेतून आईच्या निधनानंतर वडिलांच्या छायेत वाढलेल्या नास्तिक मुलाचे चित्रण लेखक करतात. पहिल्या पत्नीच्या मृत्युनंतर फक्त मुलाच्या भल्यासाठी दुसरा विवाह न करणारा, मुलाची काळजी

घेणाऱ्या नानाचे चित्रण लेखक करतात. देवळात देवपूजा व भिक्षुकीचे काम करणाऱ्या नाना या भटजींचा आपल्या वडिलांचे भिक्षुकीचे काम करण्याशी सहमत नसलेला मुलगा या कथेत येतो. शाळेत आलेल्या बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंताच्या भाषणामुळे तो प्रभावीत होतो व परमेश्वराचे अस्तित्व नाकारू लागतो. गावातील मुलांमध्ये नास्तिक विचारांचा प्रसार करण्यास सुरूवात करतो, त्यामुळे त्याला गावकऱ्यांचा रोष पत्करावा लागतो. मुलामध्ये व वडिलांच्या नात्यात गुंता वाढत जातो. नाना भटजींच्या मुलाने पौरोहित्य करावे अशी गावकऱ्यांचीही इच्छा असते. पण नाना भटजींचा मुलगा ते नाकारतो. गाव सोडून जातो. कालांतराने गावात परतल्यानंतर सगळे पूर्वीच्या गोष्टी विसरतात. शेवटी नानांच्या मृत्युप्रसंगी मुलाची काळजी असलेले नाना आपल्या मुलाला परंपरागत चालत आलेल्या देवकार्याची प्रथा चालू ठेवण्यास सांगतात. वडिलांनी आपला प्रेमाने सांभाळ केल्यामुळे व पोटापाण्याची सोय व्हावी म्हणून नास्तिकाचा आस्तिक बनत अगतिकपणे वडिलांची इच्छा प्रमाण मानून भिक्षुकीकडे वळलेल्या नानांच्या मुलाची कथा येते. नोकरीच्या प्रलोभनामुळे परंपरागत व्यवसायांना दुय्यम मानणाऱ्या तरुण पिढीच्या मानसिकतेवरही प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या कथेतून लेखक करताना दिसतात.

प्रोफेसर बारलिंगे या कथेतून तटस्थ व सामाजिक बांधिलकी असलेल्या प्राध्यापक असलेल्या बारलिंगेचे चित्रण आले आहे. प्रोफेसर बारलिंगे हा बुद्धिजीवी विचारवंत, देशाच्या समस्या या आपल्या समस्या मानणारा विचारवंत असतो. देशातील वाढती लोकसंख्या हा त्याच्यासाठी चिंतेचा विषय असतो. म्हणून सुप्रिया नावाच्या चुणचुणीत मुलीशी तो मूल होऊ न देण्याच्या अटीवर विवाहबद्ध होतो. स्वतंत्र विचारांची असलेली सुप्रिया ते मान्य करते. पण लग्नाला सात आठ वर्षे झाल्यानंतर तिच्यातल्या स्त्रिला मातृत्व खुणावते, ती चिडचिडी बनते त्यामुळे गर्भ पाडण्याच्या गोळया न घेता गर्भास जन्माला घालण्याचा ती विचार करते. आपली सुप्रियाने फसवणूक केली असे मानणारा बारलिंगे आपल्या मुलाच्या जन्मानंतर कोवळया मुलाला हातात घेत हृदयाशी कवटाळून धरतो. स्त्रिला खुणावणाऱ्या मातृत्वाबरोबरच पुरुषातही बाप दडलेला असतो याचे चित्रण लेखक करतात.

'आंदोलन' या कथेमध्ये शिक्षणक्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रो. केळकर यांची सामाजिक आंदोलनांबद्दलची असलेली निष्ठा लेखक चित्रित करण्याचा प्रयत्न करतात. विरोधी पक्षाकडून कोंकण रेल्वेला विरोध करणाऱ्या समितीकडून वक्ता म्हणून त्यांना निमंत्रण दिले जाते. वाईट अनुभव आल्याने आधी तो प्रस्ताव

ते नाकारतात. त्याच्यात आजारी असलेली त्यांची बायको त्यांना यासगळयात त्यांचा कसा वापर केला जातोय हे सांगत त्यांची कानउघडणी करते.

बदलत्या गोव्याचे वास्तव चित्र 'हार' या कथेतून मांडण्याचा लेखक प्रयत्न करतात. बकाल असलेल्या कामगारांच्या वस्तीत नवीनच हेडमास्तर म्हणून नेमणूक झालेल्या सावंत मास्तरांची, एका कर्तव्यदक्ष शिक्षकांची 'हार' ही कथा दिसून येते. शिक्षण क्षेत्रातील भष्ट्राचार निर्मूलन करत सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नात हेडमास्तर म्हणून बदली झालेल्या सावंत मास्तरांची, नाडकर्णी या शिक्षकाच्या खेळीमुळे झालेली हकालपट्टी यांचे चित्रण लेखक करतात.

'देऊळ' या कथेत बेकायदेशीररीत्या बांधलेले देऊळ पाडण्यासाठी चाललेली नानाची हतबलता लेखक चित्रित करतात. स्वेच्छा निवृत्ती घेऊन सुखद आयुष्याची स्वप्ने पाहत नाना नवीन फ्लॅट घेतात. बेकायदेशीररीत्या देऊळ बांधले जाते हे कळताच ते पाडण्यासाठी सोसायटीचे अध्यक्ष, पोलीस, मामलेदार, मुनिसिपालिटीचा CEO, ते मुख्यमंत्र्यापर्यंत ते पोहोचतात पण त्यांचा नाईलाज होतो. सर्वसामान्यांची हतबलता नानांच्या माध्यमातून लेखक चित्रित करतात. या कथेमधून लेखकाला असलेले समाजभान दिसून येते. लेखक लिहितात, "का बांधतात हे लोक अशी देवळे जागोजागी? घरातले देव नमस्कारासाठी पूजे-अर्चेसाठी पुरत नाहीत का त्यांना? रस्त्यावरच्या वळणावर हे देवळे बांधतात, मग ते क्रॉस उभे करतात, दर्गे तयार करतात... स्पर्धा वाढतच जाते. वाहतुकीला अडथळा होतो... अपघात होतात... निरपराध लोकांचे जीव जातात... याचे कुणालाही काही वाटत नाही. माणसांच्या जिवापेक्षा दगडाचा देव मोठा वाटतो का त्यांना? सर्वधर्मसमभाव राखणारे आपले निधर्मी लोकशाही सरकार कुणाच्याही वाटेला जात नाही... का? तर म्हणे लोकांच्या धार्मिक भावना दुखावतील म्हणून... कायद्यापेक्षा लोकांच्या भावना महत्त्वाच्या वाटतात त्यांना आणि आपले संत-महंत, धर्मगुरू, पाद्री, मुल्ला... यांनी तरी आपल्या या अनुयायांना आवरायला नको का? उलट तेच लोक तर अशा प्रकारांना उत्तेजन देतात. कसं होणार आपल्या या देशाचं? [5]

### 3.2.4.5 प्रेमभावनेचे चित्रण

**'पियानोचे स्वर'** या कथेला गोमंतकातील स्वातंत्र्य लढ्याची पार्श्वभूमी लाभलेली आहे. या कथेतील प्रमुख पात्र कॅप्टन कॅनेथ मॉश यांची आई भारतीय तर वडील ब्रिटीश होते. पोर्तुगीजांनी जेव्हा गोवा बंदराचा

विकास केला तेव्हा बोटी बंदरात धक्क्यापर्यंत आणण्यासाठी अनुभवी कॅप्टनची गरज असताना त्याचे वडील गोव्यात आलेले होते. पुढे अॅंग्लो पोर्तुगीज तरुणीच्या ते प्रेमात पडतात व तिच्याशी विवाहबद्ध होतात. यादरम्यान गोवा स्वातंत्र्य चळवळीला जोर येतो. अमानुषपणे पोर्तुगीज सैनिकांकडून भारततीय जनतेचा छळ केला जातो. गांधी – नेहरूंचा आवाज सगळीकडे दुमदुमत असतो. जे कॅप्टनच्या पत्नीला आवडत नाही. गोऱ्या लोकांनी काळ्यांवर राज्य करायचे हा ईश्वरी संकेत आहे, गोमंतकीय भूमीवर जोपर्यंत सेंट झेवियारचे प्रेत बंद पेटीत आहे तोपर्यंत पोर्तुगीज सत्ता इथे टिकेल अशी तिची धारणा असते. पण गोवा स्वतंत्र होतो. गोव्यातील सगळया नागरिकांना भारतीय संबोधले जाणार असल्याने पोर्तुगीजांना गोवा सोडून जाण्यासाठी भारत सरकारकडून सोयही केली जाते. आपण या नवीन सत्तेत अपमानित होऊन जगणार नाही म्हणत कॅप्टन कॅनथची पत्नी गोवा सोडते व तिच्या आठवणीत कित्येक वर्षे कॅप्टन कॅनथ पियानो जवळ करतो. आपली कथा निवेदक त्याचा मित्र रामानुजनला कथन करत असताना तो गतआठवणीनी गहिवरतो.

'अर्धांगिनी' ही उदात्त प्रेमकथा आहे. स्त्रीजीवनाचे चित्रण करत स्त्रीच्या पातिव्रत्याचे दर्शन या कथेतून होते. पहिल्या मुलाच्या जन्मानंतर एका दुसऱ्या स्त्रीशी संसार थाटून म्हातारपणी तिच्या निधनानंतर आपल्या पहिल्या प्रियेकडे परतलेल्या आजोबांची ही कथा आहे. या कथेतील स्त्री आपल्या सवतीच्या निधनाने, आजोबा म्हातारपणी एकटा पडू नये म्हणून त्याला आपल्याकडे बोलावून घेत त्याच्या पुढच्या जीवनाची सहचारिणी बनते. आयुष्याच्या उतारवयात आपल्या प्रियेला नीट ओळखेल्या आजोबांच्या मानसिक द्वंद्वाचे चित्रण लेखक करतात.

### 3.2.4.6. भ्रष्टाचार व राजकारणाचे चित्रण

**'निकाला नंतरची गोष्ट'** या कथेत गोव्यातील परप्रांतीयांच्या व्यथा, गरीबीचे चित्रण तसेच परप्रांतीयांच्या परिस्थितीने होत असलेल्या राजकारणावर भाष्य करण्याचा प्रयत्न करतात. दिवसभर काम करून पैसे मिळत नाही पण इलेक्शनच्या वेळी एक शिक्का मारून राजकर्त्यांकडून परप्रांतीयांना पैसे मिळतात हे वास्तव मांडण्याचा प्रयत्न करतात. वेगळे नाव देऊन ओळखपत्र तयार करून मतदार मिळवण्याचा घोळ या कथेत मांडण्याच्या लेखक प्रयत्न करतात.

‘फिंगर बाऊल’ या कथासंग्रहातील फिंगर बाऊल ही कथा गोमंतकीय राजकीय स्थिती, गोमंतकातील राजकारण्यांच्या माकडउड्या, सरकार स्थापन करण्यासाठी चाललेली चढाओढ याचे अत्यंत प्रत्ययकारी व प्रभावी चित्रण या कथेमध्ये झालेले दिसून येते. सर्वसामान्य मांस विक्री करणाऱ्या मार्कुसला ख्रिस्ती लोकांची मते मिळावी व विद्यमान आमदार सत्ताधारी उपमुख्यमंत्र्याचे न ऐकता मनमौजी करत असल्याने मार्कुसला तिकीट देण्याचे ठरविले जाते. ख्रिस्ती धर्मातील मुख्यमंत्री व्हायची उपमुख्यमंत्र्यांना लालसा असते. राजकारण व धार्मिक राजकारण समांतर जात असते असे लेखक या कथेत मांडण्याचा प्रयत्न करतात. आमदारांसोबत झालेल्या भेटीत सर्वसामान्य मार्कुस जेवण आटोपल्यानंतर दिलेल्या ‘फिंगर बाऊल’ मधील लिंबूच्या रसाचे पाणी हात न धुता गटागटा पितो. राजकारणात आणि झगमगाटीच्या राजकीय वर्तुळात पाय ठेवताच त्याची फजिती होते. सत्ताधारी पक्षासोबत विरोधी पक्षनेते पैंगीणकर व आमदार मिल्टन परेरा मार्कुसला तिकीट देण्यासाठी येतात. तेही अल्पसंख्याकांचे राजकारण साधण्यास मार्कुसचा वापर करू पाहतात. मार्कुस त्यांचा प्रस्ताव अमान्य करत उपमुख्यमंत्री सौंझाला भेटून तिकीट मिळविण्यासाठी धावपळ करतो. पण दिल्लीला हायकमांडकडे जात पैसे देऊन दुसऱ्याच कुणाला तरी तिकीट मिळते. शेवटी मार्कुस अपक्ष म्हणून फॉर्म भरतो व विजयी होतो. दोन्ही पक्षांना समान जागा मिळाल्याने मार्कुसची जागा मिळविण्यास दोन्ही पक्षांत चढाओढ निर्माण होते. पत्रकार परिषदेत आधीच्या सत्ताधारी पक्षास आपले समर्थन असल्याचे सांगून छोट्याशा मंत्रीपदापेक्षा पैगीणकरांनी दिलेले उपमुख्यमंत्रिपद स्वीकारत अर्थमंत्री होण्यापेक्षा पैसे कमावण्याच्या हेतूने सरकारी बांधकाम खात्याचे पद स्वीकारतो. सर्वसामान्य फिंगर बाऊलबद्दल अनभिज्ञ असलेला मार्कुस एक पक्का राजकारणी बनतो.

‘अदेशी’ या कथेमध्ये भारतीय नागरिकत्व सोडून पोर्तुगीज नागरिकत्व पत्करणाऱ्या आतोनची कथा आलेली आहे. पोर्तुगीजांना आपले पूर्वज व पोर्तुगाल आपली मातृभूमी मानणारा आतोन, भारतीय नागरिकत्व सोडून, पोर्तुगालला जातो. पोर्तुगालला युरोपियन युनियनची दारे खुली झाल्यानंतर इंग्लंडमध्ये स्थलांतर करतो. ब्रिटन युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्यानंतर पोर्तुगालच्या नागरिकांना व्हिसाशिवाय राहता येत नसल्याने इंग्लंडहून त्याची परत पोर्तुगालला पाठवणी होते. कधी काळी असलेला पोर्तुगालच्या नागरिकत्वाचा अभिमानही फोल ठरतो. काळ्या सावळ्या रंगमुळे आतोनला हेळसांड सहन करावी लागते. त्याला पोर्तुगालमध्ये कामही मिळेनासे होते. भारतीय नागरिकत्व गमावून शेवटी टुरिस्ट व्हिसावर गोमंतकात आलेल्या आतोनला व्हिसाची मुदत संपल्याने पोलिसांचा जाच सहन करावा लागतो. सरकारदरबारी खोळंबून असलेल्या पोर्तुगीज काळात जन्मलेल्या गोमंतकीय नागरिकांना दुहेरी नागरिकत्व देण्याच्या निर्णयाकडे आशा लावून असलेला आतोन शेवटी

आत्महत्या करतो. ‘ब्रेक्झिट’ या महत्त्वाच्या जागतिक पातळीवरील घडामोडींच्या गोमंतकावर उमटलेल्या पडसादाचे भान व व्यापक पातळीवर चित्रण करणारी विठ्ठल गांवस यांची ‘अदेशी’ कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. पोर्तुगीज सत्तेतून मुक्त झाल्यानंतरही पोर्तुगीजांचा फोल अभिमान बाळगणारे व भारतीय संस्कृतीची निंदा करणाऱ्या गोमंतकातील प्रवृत्तीचे चित्रण ‘अदेशी’ या कथेमध्ये आलेले आहे. विठ्ठल गांवस हे समकालीन गोमंतकीय सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रश्न, तसेच जागतिक पातळीवरील राजकारणाचे गोमंतकावर उमटलेल्या पडसादाचे चित्रण करणारे कथाकार ठरतात.

### 3.2.4.7 गोमंतकातील सामाजिक समस्यांचे चित्रण

‘निकाला नंतरची गोष्ट’ या कथेत गोमंतकातील ज्वलंत प्रश्न मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. फुटपाथवर उघड्यावर थाटलेल्या संसारातील गरीबीचे चित्रण करतात. या कथेत दुर्बलाचे जगणे चित्रित झालेले आहे. असहाय्यपणे भटकणाऱ्या माणसाला फुटपाथवर जीवन कंठणारी एक स्त्री आसरा देते, पोटभर जेऊ घालते. इतरांना जेवण देणाऱ्या बाईला त्या जेवणाचे थकलेले पैसेही नीट मिळत नाही व या भटक्या जगण्यामुळे तिला अनेकांच्या वासनांना बळी पडावे लागते. आणि ती गरोदर होते. परप्रांतीय स्त्रीवर गरिबीमुळे ओढवलेली स्थिती या कथेत लेखक मांडतात. म्युन्सिपालिटीच्या फुटपाथवर झोपणाऱ्या ‘घाटूयांची’ दोन मते दुसऱ्या पार्टीला जास्ती पडल्याने आपण हरलो म्हणत त्यांना चोपही दिला जातो. त्यात ‘आवू’ या गरोदर बाईलाही धक्क्याबुक्क्यांचा मार खावा लागतो.  तिला प्रचंड त्रास सहन करावे लागतात. गोव्यातील परप्रांतीयांच्या जगण्याची झालेली वाताहत तसेच नंदनवनासारख्या गोव्यात सगळीकडे घाण पसरण्याचे कारण हे फुटपाथवर झोपणारे परप्रांतीय आहेत ही गोवेकरांची परप्रांतीयांकडे पाहण्याची दृष्टी कथेतून मांडण्याचा लेखक प्रयत्न करतात. परप्रांतीयांना मतदानाच्या वेळी महत्त्व दिले जाते पण तद्नंतर त्यांच्या माथी त्रासच येतात हा सूर या कथेतून व्यक्त होतो.

### 3.2.4.8 स्त्री जीवन व स्त्री समस्यांचे चित्रण

**‘सौभाग्य’** या कथेत गोमंतकातील देवदासी समाजावर लेखक भाष्य करतात. गोमंतकीय कलावंत समाजातील नीतू या स्त्रीची व्यथा लेखकांनी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंपरागत पद्धतीनुसार माधव या उच्चवर्णीय पुरुषाची ठेवलेली बाई असलेली नीतू लग्नाचे बंधन नसतानाही माधवला आपला पती मानते. आपले संपूर्ण आयुष्य त्याला अर्पण करते, उतारवयातही त्यांची सेवा करावी असे तिला मनोमन वाटते पण शेवटी

पुरुषाला मरायला आपल्या हक्काचे घर लागते व मांडी द्यायला धर्मपत्नी लागते हे सत्य मांडण्याचा प्रयत्न कथेतून होताना दिसतो. माधवाच्या निधनानंतर नीतू जरी रखेली असली तरी ती विधवेचे जीवन स्वीकारते. यात कलावंत समाजातील पिढीतील जन्माला आलेल्या नव्या पिढीतील निमी, ह्या परंपरेला नकार देते व लग्नव्यवस्था स्वीकारते. शेवटी लग्न हे ही एक मर्यादित वेश्यापण असते अशी बंडखोर मतेही निमी या पात्राच्या माध्यमातून मांडली जातात.

ग्रामीण स्त्रीची विवंचना ‘चंवर’ या कथेमध्ये लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. ‘पेजेला देईल त्याला’ या कथेत प्रेमभंग झालेल्या देवदासी स्त्रीची व्यथा विठ्ठल गांवस मांडतात. गोमंतकातील देवदासी समाजातील स्त्री जीवनाचे चित्रण ‘सौभाग्य’ या कथेमध्येही गांवस करतात. आपले संपूर्ण आयुष्य कोणतीही अपेक्षा न ठेवता माधव या उच्चभ्रू समाजातील आधीच दुसरीशी विवाहबद्ध झालेल्या आपल्या प्रियकरास अर्पण करते. विठ्ठल गांवस यांच्या ‘फिंगर बाऊल’ या कथासंग्रहातील ‘पेजेला देईल त्याला...’ या कथेत प्रेमभंगाने फसलेल्या देवदासी समाजातील स्त्रीने शेवटी स्वीकारलेले वेश्या जीवनाचे चित्रण करत गोमंतकीय देवदासी प्रथेला केंद्रस्थानी ठेऊन कथा लेखन करतात. ‘पेजेला देईल त्याला’ या कथेत प्रेमभंग झालेल्या देवदासी स्त्रिची व्यथा लेखक मांडतात. ग्रामीण भागात देवदासी स्त्रियांकडे बघण्याची हीनता आणि त्यामुळे उच्चभ्रू समाजातील मुलाशी असलेल्या प्रेमाला असलेला विरोध, तिची झालेली फसवणूक आणि शेवटी पोटा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ‘पेजेला देईल त्याला शेजेवर घेईन म्हणणारी तटस्थ स्त्री लेखक चित्रित करतात. खूप काळानंतर आपल्या पत्नीच्या मृत्युनंतर भेटलेल्या आपल्या कधी काळच्या प्रियकराशी लग्न करणे ती नाकारते. पोटापाण्यासाठी आपण त्यास सर्वस्व देऊ असे सुचवते. व वेश्येच्या जीवनात समाधानी राहते.

‘सोबत’ या कथेमध्ये एका विधवा स्त्रीची जगण्याची धडपड व तिच्यावर असलेली नकुल या तरुणाची वाईट दृष्टी असा आशय असलेली कथा आहे. लक्ष्मी आपल्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर संसाराचा भार सांभाळते. दोन वेळचे जेवण मिळावे म्हणून बाजारात नारळ विकण्याचा धंदा करते. या दरम्यान रात्रीअपरात्री घरी येत असताना नकुलशी तिची ओळख होते. त्याच्या सायकलवरून घरी लवकर पोहोचेन या आशेने ती त्याची सोबत स्वीकारते. नकुल एके रात्री तिला आपल्यासोबत नाटकास येण्यास सुचवतो, पण शेजारच्या बायकांचे आपल्याविषयी बोलणे ऐकल्याने ती नाटकाला जाण्याचे नाकारते व थोडक्यात बचावते. त्याच रात्री वाळपईला

नाटकाला गेलेल्या नकुलने एका मुलीवर बलात्कार केल्याने त्याला अटक झाल्याचे  तिला दुसऱ्या दिवशी समजते. विधवा स्त्रीकडे समाज कशा दृष्टीने बघतो याचे चित्रण या कथेत लेखकाने केले आहे.

राजकीय कारस्थानाची बळी ठरलेल्या सुनीताची कथा 'अपहृत' या कथेत लेखक मांडतात. स्त्रीच्या चारित्र्यावर उठवलेल्या प्रश्नाने बंड करू पाहणाऱ्या सुनीताचे चित्रण इथे लेखक करतात. प्रतापराव या धुरंधर राजकारणी असलेल्या सासऱ्याची सून असलेल्या सुनीताचे अतिरेक्यांकडून अपहरण होते. सुनेच्या बदल्यात आपल्या साथीदारांना सोडण्याची अट घालण्यात येते. निस्वार्थपणे घर, संसार, मुलबाळ पैसा यामध्ये न रमता आपले सर्वस्व झोकून देणाऱ्या अमरसिंग व त्याच्या सहकाऱ्यांची तिला ओळख होते व दुसऱ्या बाजूने आपला नवरा समीर, सासरा प्रतापराव, आपला जुना मित्र असलेला व सध्या आपल्या घटस्फोटाचा खटला हाताळणारा ॲड. निर्मल या सगळयांची पैशांसाठी वाट्टेल ते करण्याची स्वार्थी वृत्ती तिला समजू लागते. नऊ दिवस अमरसिंग व साथीदारांच्या सहवासात राहून त्यांच्याशी मैत्रीही होते. तिच्या अंगाला स्पर्शही न करता ते तिला सोडून देतात. पण पांढरपेशा, सुशिक्षित व सज्जन समाज मात्र तिच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित करतो. आपल्या नवऱ्यापासून तिला घटस्फोट घेणे भाग पडते. पुरुषाशिवाय एखाद्या स्त्रीला एकटीने जगणे शक्य आहे का? या प्रश्नावरही ती विचार करते. आणि शेवटी अमरसिंग व त्याच्या सहकाऱ्यांची गाडी तिच्या जवळ थांबताच ती यावेळी बळजबरीने नव्हे तर आनंदाने त्यांच्यासोबत जाते. 'सोबत' व 'अपहृत' या दोन्ही कथेतून पुरुषाचा आधार हिरवलेल्या स्त्रियांच्या तटस्थ  वृत्तीचे चित्रण लेखक करतात.

'गुंता' या कथेत गोमंतकात येणाऱ्या परप्रांतीयांच्या दु:ख दारिद्र्याचे चित्रण लेखक करतात. आपल्या नवऱ्याला गोव्यात चांगले काम मिळेल या आशेने गोव्यात आलेल्या मुतव्वाला गोव्यात आल्यानंतर दरिद्री जीवन जगत फुटपाथांवर आपला संसार थाटावा लागतो. मुलाला शिकवून मोठा ऑफिसर बनविण्याचे स्वप्न ती पहाते पण शालेय परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ऐपतीमुळे पुढील शिक्षण देऊ शकत नाही. मुतव्वाचा मुलगा बेकार असल्याने वडील व मुलामध्ये खटके उडू लागतात. मुलगा वडिलांना मारहाण करतो व घर सोडून जातो. दोन दिवसांनी परतलेल्या मुलामध्ये व बापामध्ये परत हातघाई होते. वडिलांचा गळा आवळण्याच्या प्रयत्नात असलेल्या आपल्याच मुलाच्या डोक्यावर मुतव्वा दांड्याने प्रहार करते. किंचाळून निपचित पडलेल्या आपल्या मुलाचे डोके मांडीवर घेत ती ओक्साबोक्सी रडू लागते. परिस्थितीतून बाहेर पडू पाहणारी पण परिस्थितीच्या गुंत्यात हतबल झालेल्या स्त्रीचे चित्रण या कथेतून लेखक करतात.

संशयी वृत्तीमुळे नातेसंबंधात होणाऱ्या गुंत्याचे, ताणाचे व अनेकांच्या होणाऱ्या घुसमटीचे चित्रण 'घुसमट' या कथेत होताना दिसून येते. ख्रिस्ती कौटुंबिक पार्श्वभूमी लाभलेली ही कथा ठरते. नवऱ्याच्या मृत्यूनंतर आपली झालेली घुसमट ज्युली आपल्या मैत्रिणीकडे व्यक्त करते. नवऱ्याच्या आजारपणात त्याची देखभाल करणारी आपली बहिण ॲन तिला खटकू लागते. अविवाहित असलेल्या ॲनने अर्धांगवायूने आजारी असलेल्या आपल्या अधू झालेल्या नवऱ्याशी शारीरिक जवळीक साधून आपल्यातील नात्यामध्ये दुरावा निर्माण केल्याचे तिला सांगते. पतीच्या मृत्यूनंतर ज्युली आपल्या मैत्रिणीला हे सांगत असता ॲन ऐकते, आपल्याबद्दलचे आपल्या बहिणीचे दूषित मत ऐकताच ॲनची झालेली घुसमट व तिचे घर सोडून जाणे अशी ही कथा येते. नात्यांना वेळ न दिल्यास नात्यात दुरावा निर्माण झाल्याने आपल्याच बहिणीवर संशय घेणाऱ्या ज्युलीच्या घुसमटीचेही चित्रण करत स्त्री स्वभावाचे पैलू मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. नातेसंबंधांवर भाष्य करणारी 'घुसमट' ही कथा आहे.

'डाग' या कथेमध्ये एका तरुण स्त्रीची व्यथा लेखक मांडतात. पहिल्या नवऱ्याकडून मूल न झाल्याने समाजाकडून वांझ म्हणून हिणवली गेलेली, पहिल्या नवऱ्याच्या मृत्युनंतर वांझपणाचा डाग पुसण्यासाठी कायदेशीररित्या परसूशी विवाहबद्ध झालेली पण त्याचेही अपघाती निधन झाल्यानंतर वाईट नजर असलेल्या तरुणाच्या वासनेला बळी पडलेली व आनंद या आपल्याशी तिसऱ्यांदा लग्न करू पाहणाऱ्या तरुणांमध्ये आधार शोधणाऱ्या 'ती'चे चित्रण लेखक करात. विठ्ठल गांवासंच्या कथालेखनात ग्रामीण जीवन जगणाऱ्या स्त्रीपासून शहरी जीवन जगणारी मध्यमवर्गीय स्त्री आलेली दिसते.

### 3.2.5 नारायण महाले यांचे कथा लेखन

गोमंतकीय प्रादेशिक कथा लेखनात महत्त्वाचे कथाकार म्हणून नारायण महाले यांच्या कथांचा विचार करावा लागतो. नव्वदोत्तरी कालखंडात नारायण महाले यांचे 'अस्तित्व'(२००२), 'होमकांड'(२००६), 'आमोरी' (२००९), 'रागावणी'(२०११), 'होरावणी'(२०१३), 'घर कौलारू'(२०१९), 'नाळ' (२०२२), असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. वि. स. सुखटणकरांनी गोमंतकात निर्माण केलेल्या प्रादेशिक कथा लेखनाची धारा प्रवाहीत ठेवणारे महत्त्वाचे कथाकार म्हणून नारायण महाले यांच्या कथांचा विचार करावा लागतो. त्यांची कथा प्रादेशिकतेबरोबर ग्रामीणतेकडेही वळताना दिसून येते. ग्रामीण जीवनातील व्यक्तींचे अनेक नमुने त्यांची कथा टिपते तसेच समकालीन समाज वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न नारायण महाले यांची कथा करते. विविधांगी

अशा अनुभवविश्वाचा अविष्कार घडवून आणणारी नारायण महाले यांची नव्वदोत्तरी कालखंडातील कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

### 3.2.5.1 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण

'आमोरी' या कथासंग्रहातील 'आमोरी' या पहिल्या कथेत ख्रिस्तीसमाज जीवनाला केंद्रस्थानी ठेऊन. आखाती देशात काम करणाऱ्या गोमंतकीयांच्या कुटुंबाचे चित्रण करतात. भरपूर पैसे कमावण्याच्या नादात गोमंतकीयांच्या मनात वाढलेले परदेशाविषयीचे आकर्षण, आणि आपला प्रिय माणूस परदेशात गेल्याने नात्यांमध्ये आलेला साचलेपणा, नात्यातील गुंतागुंतीचे चित्रण लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक व नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण त्याची कथा करते. ख्रिस्ती कौटुंबिक पार्श्वभूमीचे चित्रण करत ख्रिस्ती समाजातील प्रश्न मांडण्याचा प्रयत्न लेखक करताना दिसून येतात.

'रागावणी' या कथासंग्रहातील 'नागडा' या कथेमध्ये आपल्या सुंदर अशा बेलिना या मुलीसाठी फॉरेनर नवरा मिळावा व आपल्याला रंगाने गोरा असलेला फॉरेनर जावई मिळावा अशी मनोमन इच्छा असलेला कायतान दिसून येतो. ख्रिस्ती धर्माच्या पार्श्वभूमीवर आलेली ही कथा असल्याचे दिसते. बेलिना व आंतोनचा विवाह गावाच्या परंपरेनुसार लहानपणातच ठरवलेला असतो. आंतोन रंगाने काळा असल्याने, रेंदेर असल्याने त्याला हिणवले जाते. बेलिना तरुणवयात जॉन या गोऱ्या फॉरेनरशी संबंध ठेवते. आपल्या मुलीचा विवाह जॉनशी लाऊन देण्याच्या तयारीत असताना जॉन फसवून जातो. कायतन पुन्हा आंतोनशी जवळीक वाढवत त्याचा विवाह आपल्या मुलीशी लावण्याचा प्रयत्न करतो. पुन्हा जुन्या आयुष्याला स्वीकारत आंतोनशी विवाह करण्याचा घाट घालतो. पण जॉनशी संबंध असलेल्या बेलिनाचा आंतोन स्वीकार करत नाही. कायतानच्या द्विधा मनस्थितीचे चित्रण लेखक करतात.

### 3.2.5.2 गोमंतकीय समकालीन प्रश्नांचे चित्रण

गोमंतकातील अनेक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या कथांचे लिखाणही लेखक करतात. 'बे एके बे' या कथेतून माध्यम प्रश्न मांडण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. अलीकडेच कोरोनोत्तर काळात प्रसिद्ध झालेला 'नाळ' हा कथासंग्रह महत्त्वाचा ठरतो. 'नाळ' या कथासंग्रहातील 'लॉकडाऊन', 'भावल्या' का कथांमधून कोरोनामुळे निर्माण झालेल्या गावगाड्यातील जीवनाच्या गोंधळाचे चित्रण येते. 'लॉकडाऊन' या कथेतील कोरोनामुळे

निर्माण झालेले गावातील भयग्रस्त वातावरण, दादीचा घरजावई आरोग्य खात्यात नोकरी करत असल्याने दादी व घरच्यांवर गावकऱ्यांच्या रोखलेल्या संशयग्रस्त नजरा व त्यामुळे घराशी तुटक वागणारे गावकरी, स्वत:चा जीव वाचविण्यास दर एकट्याची चाललेली कसरत व त्यामुळे नात्यात निर्माण झालेली दरी इत्यादींचे चित्रण येते. 'भावल्या' या कथेमध्ये कोरोनामुळे सणउत्सवांवर उमटलेले पडसाद, भावल्याच्या मृत्युनंतर त्याच्या अंत्यविधीसही गावकऱ्यांसाठी परका झालेला भावाला, कोरोनाचे भय असूनही सर्वांसाठी मदतीस आलेल्या सांगल्यावर खिळलेल्या संशयग्रस्त नजरा अशी कथा येते.

'एके रातीत – एके वातीत' या कथेत रस्ता चौपदरीकरणाच्या कामामुळे सरकारकडून बारकेल्याच्या घरावर झालेले अतिक्रमण व उघड्यावर पडलेला बारकेल्याचा संसार. बारकेल्याचा संसार सावरण्याचे फोल ठरलेले सरकारी यंत्रणेचे प्रयत्न व भाऊबांधकीमुळे राखून ठेवलेल्या जमिनीवरही मंत्र्यांच्या मदतीने भावांनी अतिक्रमण केल्यामुळे घराच्या बांधकामाचे भंग पावलेले स्वप्न अशी कथा येते. विकासाच्या नावाखाली सरकारकडून सर्वसामन्यांची होणारी पिळवणूक व आप्तांमुळे 'एका रातीत – एका वातीत' संपुष्टात येणारी सर्वसामान्याची स्वप्ने असा विषय मांडताना लेखकाच्या सजगतेचा प्रत्यय येतो.

'होरावणी' या संग्रहातील 'होरावणी' या कथेमध्ये पाणी टंचाईचा प्रश्न, ग्रामीण राजकारण, पाण्यासाठी निर्माण होऊ पाहणारे माणसामाणसांमधील युद्ध याचे चित्रण लेखक करतात. गोव्यात येणाऱ्या अनेक नवीन प्रकल्पामुळे होणारा पर्यावरणीय ऱ्हास तसेच समाजजीवनात होणाऱ्या बदलांचे पडसाद नारायण महालेंच्या कथालेखनात उमटलेले दिसून येतात. खाण व्यवसायामुळे देववाडीतील पर्यावरण व समाजजीवनात निर्माण झालेले प्रश्न, गावाचा विध्वंस करत इंद्रवाडीत होऊ पाहणारा तिळारी धरण प्रकल्प त्यामुळे पोखरलेले डोंगर, इंद्रवाडीतील देवराईत झालेली अमर्याद वृक्षतोड, गावात उद्भवलेला पाणी टंचाईचा प्रश्न, उद्ध्वस्त झालेली घरे, संसारात वाढलेला क्लेश इत्यादी गोष्टींवर लेखक प्रकाश टाकतात तसेच ग्रामजीवनातील विध्वंसाचे बालमनावर उमटलेल्या पडसादाचे चित्रण 'वाघाचे पंजे' या कथेमध्ये दिसून येते. 'पैसा' या कथेत तिळारी धरण प्रकल्पाच्या कालव्यांच्या बांधणीसाठी सर्वसामान्य गरीबांच्या बळकावलेल्या जागा व त्या जागेतील काजुंच्या मुळांच्या बदल्यात तुकू या गावकऱ्याला पाचशे रुपये व आनल्याला दहा हजारांपर्यंतची नुकसान भरपयी मोठ्या सेठांकडून मिळाल्यानंतर दोन लाखांची तुकू व आनल्याने रक्कम उचलल्याची गावात पसरलेली अफवा, लाखांच्या आशेने पैसे मागण्यास आनल्याच्या घरी पोहोचेलेले लोक व पतीकडे भरपूर पैसा असल्याच्या समजुतीने तुकुच्या

बायकोसोबत सोनाराकडे दागिने बनविण्यास गेलेली आनल्याची बायको अशापद्धतीने गरिबांच्या जीवनात उठलेले प्रश्न, प्रकल्पासाठी काजूची झाडे नष्ट केल्याने आनल्यापुढे संसार चालवण्यासाठी निर्माण झालेले पेच इत्यादी चित्रण 'पैसा' या कथेत येते. प्रकल्पाच्या नावाखाली सरकारदरबारी काम करत 'पैसा' कमावणारे मोठे सेठ व गरिबीच्या दरीत खोल खोल बुडणाऱ्या सर्वसामान्य गरीब माणसाची व्यथा लेखक मांडतात. 'होमकांड' या कथासंग्रहातील 'होमकांड' या कथेमध्येही डोंगरजळीमुळे नष्ट होणाऱ्या ग्रामजीवनाचा, तिथल्या प्रश्नांचा लेखक वास्तववादी वेध घेतात.

गावागावात वाढलेला भंगारअड्ड्यांचा प्रादुर्भाव, आपल्या घरातील सामानाची स्वत:च चोरी करून भंगारअड्ड्यात सामान विकत गरजा पुरविण्याची गावातील मुलांना सवय, पोलीस यंत्रणेला लाच देत स्वत:ला सोडवीत परप्रांतीयांना चोऱ्यांमध्ये अडकविण्याची भ्रष्टाचारी प्रवृत्ती, भंगारअड्ड्यात वावरणाऱ्या लमाण्यांच्या पोरींवर होणारे बलात्कार अशा एकूण ढासळलेल्या मूल्यव्यवस्थेचे चित्रण करत लेखक समाज वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न 'चोरी' या कथेत करतात.

### 3.2.5.3 गोमंतकीय समाजजीवनातील बदलांचे चित्रण

गोमंतकीय समाजजीवनात झालेल्या बदलांचे चित्रण लेखक 'घर कौलारू' या कथा संग्रहामध्ये करताना दिसून येतात. 'घर कौलारू' या कथेत जुन्या कौलारू घरांची जागा आज स्लॅबच्या नवीन घरांनी घेतलेली आहे पण गोमंतकीय माणसाच्या मनात मात्र जुनं कौलारू घर आकार घेत राहते हा भाव कथेतून व्यक्त केला.

### 3.2.5.4 स्त्री जीवनाच्या व्यथा

'सोयरीक' या कथेत गावातील मुलींच्या वळणावर पाळत ठेवणाऱ्या बायका व काहीच व्यभिचार न करताही अविवाहित तरुणींबद्दलच्या उठविल्या जाणाऱ्या अफवा, आपल्या अब्रूचा लिलाव सुरू होतोय व अब्रू चव्हाट्यावर येण्याच्या भितीने आपल्यापेक्षा वयस्क व दोन मुलांचा बाप असलेल्या पाडलोस्करासोबत 'सोयरीक' जुळवून लग्नास तयार झालेली बेबी अशी कथा येते. ग्रामीण खुजी मानसिकता, स्त्री कडे बघण्याची संकुचित वृत्ती व त्यामुळे स्त्रीजीवनात निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण या कथेत येते. 'दर्याचं पाणी' या कथेत दर्यापासून दुरावलेली स्थानिक माणसे व दर्याच्या ओढीने येणारे पर्यटक यांचे चित्रण येते.

### 3.2.6 मिलिंद म्हामल यांचे कथा लेखन

१९९० नंतरच्या कालखंडात गोमंतकीय जीवनात झपाट्याने झालेल्या बदलांचे चित्रण करणाऱ्या महत्त्वाच्या कथाकारांमध्ये मिलिंद म्हामल यांच्या कथेचा विचार करणे गरजेचे ठरते. मिलिंद म्हामल यांचे एकूण तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. यात 'चतुर्थी' (२००५) हा त्यांच्या पहिला संग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'आलकाण्याचो डोंगर' (२००८), 'मांड' (२०१४) असे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. नव्वदोत्तरी मराठी साहित्यात शहरीकरण आणि महानगरीकरणाच्या प्रक्रियेत भेडसाणाऱ्या प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न लेखक करत आहेत. आधुनिक काळात नातेसंबंधामध्ये निर्माण झालेले ताणेबाणे, तसेच जागतिकीकारणामुळे व एकूण 'खा-ऊ-जा' संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या बदलांचे चित्रण केलेले दिसून येते. गोमंतकीय कथाकार मिलिंद म्हामल यांनी आपल्या कथेतून गोमंतकीय प्रदेशात खा-उ-जा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या बदलत्या समाजजीवनाचे व समाजवास्तवाचे चित्रण 'चतुर्थी', 'अलकाण्याचो डोंगर', 'मांड' या कथासंग्रहातून केलेले आहे. शहरीकरणाची वाटचाल करणाऱ्या गोमंतकीय प्रदेशात पर्यटन व्यवसायामुळे परंपरागत संस्कृती नष्ट होऊन नवी संस्कृती आकार घेत आहे. यात संस्कृतीबरोबर पर्यावरण, ग्रामीण कृषिसंस्कृती संपुष्टात येत आहे. या बदलांमुळे भाऊबंदकीत, नातेसंबंधांमध्ये ताणतणाव निर्माण होत आहेत. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथाविश्वात बदलत्या समाजजीवनातील जीवनानुभव महामलांच्या कथेचा स्थायीभाव बनलेला दिसून येतो. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकार मिलिंद म्हामल यांच्या कथेतून जागतिकीकरणाच्या ओघात गोमंतकीय समाजजीवनात आलेले बदल, प्रगतीच्या, विकासाच्या दिशेकडे वळत असताना गोमंतकात निर्माण झालेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने मिलिंद म्हामल यांच्या कथेची चिकित्सा करणे महत्त्वाचे ठरते.

#### 3.2.6.1 भाऊबंदकीचे चित्रण

पैशांना प्राप्त झालेल्या अनन्यसाधारण महत्त्वामुळे, नात्यात आलेला दुरावा व भाऊबंदकीचा प्रश्न 'चतुर्थी' या कथेत येतो. या कथासंग्रहातील 'घर' या कथेमध्येही भाऊबंधकीमुळे निर्माण झालेले प्रश्न व आपाची शोकांतिका लेखक मांडतात. २० वर्षाचा असताना पायावर दगड पडून लंगडेपणा आल्याने आपा अविवाहीत राहतो. शिवा या आपल्या भावाच्या मुलांसाठी खर्च करतो. पुन्हा पन्नास वर्षाचा असताना 'घडपावरुन' खाली पडतो. सहा महिने कामाशिवाय राहतो. त्यात त्याचा मोठा भाऊ हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावतो. भावजयीला दीर जड वाटू लागतो. शेवटी बहिणीकडे जातो पण भाच्याच्या विवाहानंतर मामाच्या अस्तित्वामुळे

सासू सुनांमध्ये खटके उडायला लागल्यामुळे आपा स्वत:चे घर बांधायला घेतो. घरकाम चालू असताना एके दिवशी पाय घसरून नदीत पडल्याने त्याचा मृत्यू होतो. दिना हा आपाचाच भाचा त्याच्या घराचे काम पूर्ण करतो व घरातील वादविवादांमुळे आपाच्या घरात स्वत:चा संसार थाटतो. दिनाच्या लग्नाला चार वर्षं पूर्ण झाली तरी मूल होत नसल्याने व बायकोला स्वप्नात साप दिसत असल्याने आपाचे सगळे सामान, फोटो पाण्यात फेकण्याचा निर्णय घेत आपाचे नामोनिशाण मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. अशा पद्धतीने ग्रामीण जीवनातील समजुती व मानसिकतेवर भाष्य करणारी ही कथा ठरते.

### 3.2.6.2 आधुनिक जगण्यात निर्माण झालेल्या गोमंतकातील बदलांचे चित्रण

कृषी संस्कृती दुर्लक्षित केली गेल्याने गोमंतकीय समाज जीवनातील बदलांचे चित्रण 'गोलकारनीचा कुवेटकार' या कथेत लेखक करतात. 'आलकाण्याचो डोंगर' या कथेत पर्यटनाने ग्रामसंस्कृतीवर घाला घातल्याने व आलकाण्याच्या डोंगरावर आलकाणेश्वर देवाचे अस्तित्व असल्याची समजूत असलेले गावकरी डोंगरावर प्रवेश मिळत नसल्यामुळे पायथ्याशीच भांडार घालण्याची तयारी करतात. आलकाणेश्वराला डोंगरावर घडणाऱ्या अनैतिक गोष्टींची गाऱ्हाणे घालत जाणीव करून दिली जाते व परिस्थितीतून बाहेर काढण्याची जबाबदरी आलकाणेश्वरावर सोपवत हतबल झालेल्या माणसांचे चित्रण लेखक करतात. 'खेळ' या कथेमध्ये ग्राम संस्कृतीत झालेल्या परिवर्तनाचे, पर्यटनामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण करत गोमंतकीय तरुणाईला भेडसावणारे अमलीपदार्थांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करतात.

आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेल्या बदलांचे चित्रण 'पाषाण' या कथेतून लेखक करतात. रामपुरुष मंदिराच्या प्रश्नावर आधारलेली ही कथा ग्रामीण समाजजीवनातल्या लोकसमजुतींवर भाष्य करते. जाडजूड 'मद्यार', शेणाची जमीन असलेले कौलारू देऊळ अनेकांना खटकू लागते. त्यांना घुमटाकार छताचे, लांबी रुंदीने वाढलेले, गर्भघरात उंची टाईल्स असलेले मंदिर हवे असल्याने देवाकडे परवानगी घेण्यासाठी सांकडे घातले जाते. त्यासाठी वासू या गावकऱ्याच्या अंगात अवसर आणून त्याच्या तोंडून देवाचे शब्द वदवून घेण्याचा प्रयत्न केला जातो, पण वासूच्या अंगात अवसर येत नाही. शेवटी ग्रामपुरुषाच्या पाषाणाला प्रसाद पाकळी लावली जाते पण तो प्रयत्नही फसतो. गावातील शंकरनाना आणि तुकारामकाका या गृहस्थांचा देवळाचे मजबूत बांधकाम पडण्यास विरोध असतो. देवाच्या मनात देऊळ पाडायचे नसल्याने तो संमती देत नसल्याचे त्यांचे म्हणणे असते. तरी संमती मिळविण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. वातावरणाचा अंदाज घेत प्रसाद पाकळ्या

पाडल्या जातात व देवाची संमती मिळवली जाते. देऊळ पाडायच्या प्रयत्नात सगळ्यांची तारांबळ उडते. गावकरी जुन्या मंदिराच्या पाट्या उतरवताना, दगड बाजूला उतरवताना जखमीही होतात. देऊळ बांधकामात खणत असताना सापही सापडतो. दैवी असलेल्या 'जाग्यावयल्या' (त्या जागेचा) सापाला दुखावले गेले अशी समजूतही होते. तो जागचा हलत नाही. दुसऱ्या दिवशी साप खड्डयातच गतप्राण झालेला दिसून येतो. भटजींच्या सांगण्यानुसार देवळात पंचधातूंची सापाची मूर्ती पुजण्यात येते. देवळाचे बांधकामही पूर्ण होते. देवाचा पाषाण बदलून त्या जागी नव्या पाषाणाची पुनःप्रतिष्ठापना करण्याचे प्रयत्न होतात. जाणत्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून प्रयत्न चालू केले जातात. अवसर आलेली चार माणसे चार पाषाणांद्वारे देवाची प्रतिष्ठापना करतात. मुख्य देवाची प्रतिष्ठापना करण्यास मुख्य पाषाण उचलण्यास अवसर आलेल्या माणसासोबत अजून एका माणसाची गरज असते पण एखादी दैवी शक्ती अंगात संचारल्याप्रमाणे भार ते पाषाण स्वत:च उचलतो व जुन्याच पाषाणाची प्रतिष्ठापना करतो. जुने ते सोने सांगणारी ही कथा गोमंतकीय परंपरा, चालीरीतींवर भाष्य करते.

'अभिमान', 'हवा', 'रान', 'देवचार' या कथांमधून पर्यटनाच्या परिणामांचे चित्रण लेखक करतात. 'पांडुरंगाची प्रॉपर्टी' या कथेमध्ये पांडुरंगाच्या मरणानंतर त्याची स्वप्ने मातीमोल होत त्याच्या शेतजमिनी हस्तगत करून त्याचा उपयोग पर्यटकांच्या मौजमजेसाठी, त्यांच्या गरजा पुरवण्यासाठी होतो. तसेच 'आडवन' या कथेमध्येही भाटकाराची जागा बळकावून ती परप्रांतीयांना पर्यटन व्यवसाय थाटण्यास विकण्याचा प्रयत्न इ. चित्रणातून गोमंतकातील समाजजीवनातील बदलांचे चित्रण म्हामलांच्या कथेमध्ये दिसून येते.

### 3.2.6.3 स्त्री जीवनाचे चित्रण

स्त्री जीवनाला केंद्रस्थानी ठेवत स्त्री जीवनातील दु:खाचे चित्रण लेखक करतात. सासू सासऱ्याच्या पश्चात वडिलोपार्जित भात शेती विकण्याच्या मार्गावर असलेल्या पांडूला त्याची बायको शेकडेकारीन शेतजमीन विकू देत नाही. ओळीने पाच मुलीच जन्मल्याने पांडू या आपल्या नवऱ्याची मारझोडही ती सहन करते. मुलगा व्हावा म्हणून इतराशी संबंध ठेवत स्वत:च्या मनाविरुद्ध पापही करते. पण पाचवीही मुलगीच जन्माला येते. धाकटी मुलगी पाच वर्षाची असताना नवऱ्याच्या निधनानंतर शेकडेकारीन सर्व जबाबदारी उचलते. आपल्या मुलींना मुलासारखी वाढवते. घरात पुरुषमाणूस नसल्याने आणि कामास नोकर ठेवणे परवडत नसल्याने शेत नांगरणी, भाताची पेरणी, नडणी, भात कापणीपासून तांदूळ तयार होईपर्यंत सगळी कामे मुलींकडून करून घेते. त्यामुळे तिच्या मुली शेकडेकारनीचे पांडव अशा टिंगल टवाळयांचा विषयही बनतात. धाकटी मुलगी सुंदर

असते. परधर्मीय माणसासोबत ती पळून जाते. आधी थोडशी खंतावलेली शेकडेकारीन किमान एकटी मार्गी लागली म्हणून समाधानी होते. दरम्यान चार मुली आयुष्यात चमत्कार होईल या आशेने स्वामी नरेंद्र महाराजांच्या भक्तगण बनतात. पळून गेलेली पाचवी मुलगी नवऱ्याने सोडल्यामुळे एका वर्षाच्या मुलाला घेऊन शेकडेकारनीकडे परतते. आणि परत पाचही ‘शेकडेकारनीच्या पांडवांचा’ वनवास सुरू होतो. अविरत चालणाऱ्या स्त्रीच्या दु:खाचे यथार्थ चित्रण शेकडेकरीन व तिच्या पाच मुलींच्या माध्यमातून लेखक ‘शेकडेकारनीचे पांडव’ या कथेतून सांगू पाहतात.

‘थोरली’ या कथेतून थोरलीची व्यथा मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. लग्नानंतर सहा महिन्यांनी कामानिमित्त मुंबईला गेलेला नवरा परतत नाही. तब्बल दोन वर्षांनी आपला नवरा गुजराती बाईच्या प्रेमात पडल्याने तीच्यासोबत लग्न करून त्याने दुसरा संसार थाटल्याचे तिला समजते. पण थोरली लग्नबंधनाने लादून दिलेल्या संसारातील सर्व जबाबदाऱ्या निष्ठेने सांभाळते. चाळीस वर्षांनी नवऱ्याच्या निधनानंतर ती साचून ठेवलेले दु:ख व्यक्त करते. त्याच्या मृत्यूपत्रात मात्र आपल्या मृत्यूपश्चात आपल्या घराची संपत्ती दुसऱ्या बायकोला मिळावी असे नोंदविलेले असते. ते समजल्यानंतर ती त्रस्त होते. बऱ्याच दिवसांचा कोंडून ठेवलेला राग व्यक्त करते. आणि शेवटी नवऱ्याची दुसरी बायको मुलांना घेऊन येणार असल्याचे समजताच, तिची प्रकृती खालावते. एकीकडे दुसरी बायको गावात प्रवेश करते व दुसरीकडे थोरलीचे निधन होते. थोरलीच्या माध्यमातून सोशीक, फसलेल्या तरी निष्ठावान असलेल्या अशा स्त्रीचे चित्रण लेखक करतात.

‘सोबती’ या कथेत आपल्याला कॅन्सर असल्याने सुषमा आपला पती समीरसाठी बायको शोधण्यास वधू – वर सूचक मंडळात जाते. आपल्या पश्चात आपल्या नवऱ्यासाठी व मुलांसाठी आधार हवा या हेतूने हे पाऊल ती उचलते. घराची जबाबदारी सांभाळता सांभाळता स्वत:ला विसरलेली व घरच्यांना नकोशी असलेली पस्तीस वर्षाची घर सोडून आलेली सुधा वधू - वर सूचक मंडळात नोकरी करते. सुषमाने आपला पती समीरबरोबर लग्न करण्याचा मांडलेला प्रस्ताव मान्य करत सुधा सुषमाच्या घरी वास्तव्यास जाते. मुळात नर्स असलेली सुधा सुषमाची काळजी घेते. सुषमाची तब्येत सुधारू लागते. दुसरीकडे समीर सुधात तरुण वयातील सुषमाला पाहू लागतो. आपले हरवलेले सुख शोधता शोधता तो नकळत शारीरिक व भावनिकरीत्या तिच्यात गुंतला जातो. मुलांनाही सुधा आवडू लागते. व हळू हळू सुषमा दुर्लक्षित होते. समीर व मुलांकडून आपण दुर्लक्षित होतोय या जाणीवेने सुषमाचा रक्तदाब वाढतो. तिची अवस्था पाहून समीर कोसळतो. मुले कावरीबावरी होतात.

पण अखेरच्या काही क्षणाची सोबती असलेली सुषमा शेवटी प्राण सोडते. आपल्या निधनानंतर नवऱ्याची व मुलांची अबाळ होऊ नये म्हणून नवऱ्याचे लग्न ठरवणारी सुषमा तटस्थ, कर्तव्यदक्ष अशा स्त्री रुपात कथेत येते. माणसे एकमेकांशी भावनिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या गुंतली जातात, पण माणसांना माणसांची प्रत्यक्ष सोबत हवी असते अशा मानवी मनोवृत्तीचे चित्रण 'सोबत' या कथेत येते.

### 3.2.6.4 शहरी जीवनात झालेली माणसांची ओढताण

गावात एक सर्वसामान्य लाईनमनचे काम करत असलेल्या रामाला शहरात नोकरी मिळते. सरकारी वसाहतीत सदनिकेसाठी अर्ज करून तो शहरात खोली मिळवतो. लग्न करून संसार सुरू होतो. आरामशीर, सुखासीन जीवन जगू पाहणाऱ्या बायकोमुळे घरातील रगडा जाऊन मिक्सर येतो. पंखा असूनही उकाडा असह्य होतो. बायकोसाठी टि. व्ही., वॉशिंग मशीन यांची खरेदी केली जाते. गावात जीवन जगलेला राम, जीवनात आलेल्या बदलांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो. घरचा व गावाचा संबंध हळू हळू तुटला जातो. रामा सरकारी योजनेतून फ्लॅटही घेतो. मुले मोठी होतात, चांगले शिक्षण घेतात. रामा आता शहरी जीवनाला, नेहमीच्या धावपळ, दगदगीला कंटाळतो. मुलगी इंटरनेटवर 'एका मुलाच्या प्रेमात पडते व लग्न करू पहाते. मुलगा बेंगलोरला नोकरीस जातो व तिथेच स्थायिक होण्याचे ठरवतो. गावात घरी आई आजारी असते, भाऊ परदेशी असतो. स्वेच्छा निवृत्ती घेत शहरातील जीवन सोडून गावी जाऊन असलेली जमीन पिकवण्याचा तो निर्णय घेतो. शहरातील आधुनिक जगण्याला कंटाळून परत गावाकडे जाऊ पाहणारा रामा 'ओढ' या कथेमध्ये लेखक चित्रित करतात.

### 3.2.6.5 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण

लग्नसमारंभात खाण्याऱ्या मुलांना हावरट म्हणून अपमानीत करणारा नाना 'हावरट' या कथेत येतो. नाना मुलांना अपशब्द बोलत असल्याने मुले त्याच्यावर चिडतात. त्यामुळे आधी नानांच्या सायकलीची हवा काढली जाते आणि नंतर त्यांची सायकल नाहीशी होते. वेगवेगळया माध्यमातून नानावर चिडलेली मुले नानाच्या चिडक्या स्वभावामुळे त्याला त्रास देण्याचा प्रयत्न करतात. गावातील कोणत्याही कार्यक्रमाला पंगतीतल्या मुलांना हावरट म्हणणाऱ्या नानाच्या मुलाचे लग्न असल्याने नाना जय्यत तयारी करतो. वाड्यावरील सर्व मुले येणार हा विचार करून नाना भरपूर जेवणाचा बेत आखतो. पण नानाच्या वृत्तीमुळे पाच पंचवीस जाणत्या

मंडळींशिवाय सर्व मुले नानाच्या मुलाच्या लग्नाच्या पंगतीवर बहिष्कार टाकतात. नानांना मुले धडा शिकवतात. मुले येणार या आशेने नाना मात्र मंडपाच्या एका कोपऱ्यात त्यांची वाट पाहत थांबतात.

पुढील शिक्षणासाठी मामाकडे आलेल्या निवेदकाची मामांच्या खोलीवर राहणाऱ्या गिरणीकामगार मिस्त्रीशी ओळख होते. निवेदक कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना मेस्त्रीची मुलगी आरती त्याच्या आयुष्यात येते. बारावी नंतर पुढच्या शिक्षणासाठी ती आलेली असते. आरती विषयीचे आकर्षण त्याच्यात निर्माण होते व शेवटी चांगली मैत्रीही जमते व दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात. वयाच्या तेविसाव्या वर्षी महाविद्यालयाचे शेवटचे वर्ष संपल्यानंतर निवेदकाचा विवाह त्याच्याच सुमन या मामे बहिणीशी निश्चित केला जातो. पण निवेदक मात्र आरतीतच गुंतलेला असतो. निकाल लागल्यानंतर तो मामाकडे जातो व आरतीला भेटण्यासाठी मेस्त्रीच्या खोलीकडे वळतो. तिथे मेस्त्रीने आपल्या मुलीला खुप मारले व ती गावी निघून गेल्याचे त्याला समजते. त्याची प्रेमकथा अपुरीच राहते. आता सुमनने दिलेले जीवंत खेकडे घेऊन तो घरी परततो. सुमनशी विवाह करण्याव्यतिरिक्त त्याच्याकडे काहीच पर्याय नसतो. निवेदक खेकडे पकणाऱ्या आणि आपल्याला नकोशा असलेल्या सुमनच्या जाळयात अडकला जातो. अशी 'जाळं' ही कथा येते.

गोव्यातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संदर्भ असलेली 'बोंब' ही कथा महत्त्वाची ठरते. चैनी, इरसाल असलेला बाप्पा कमलाबाईसारख्या श्रमिक व कष्टकरी महिलेकडून दहा पावनांची साखळी दहा दिवसांसाठी नेतो आणि परत न करता गंडवतो. बाप्पा नायकिणीशी दुसरा संसार थाटतो. तिच्या व आपल्या मुलींची लग्ने लावून देतो. दुसरीकडे आपल्या पत्नीशी व तिन्ही मुलांशी असलेले संबंध आपल्याच कर्माने बिघडवतो. एका मुलाच्या नावाने सगळी संपत्ती करतो त्यामुळे इतर मुले त्याच्यापासून दुरावतात. आपली सर्व संपत्ती देऊ केलेला मुलगाही त्याला घरातून हाकलतो, त्याला मारहाण केली जाते. बाप्पा रस्त्यावर येतो. आपल्या संसाराचे, साखळी चोरून वाटोळे केलेल्याच्या जीवनाचे वाटोळे होणार अशी कमलाबाईने मारलेली बोंब सार्थ ठरते.

### 3.2.6.6 पर्यावरणीय प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या कथा

'झाड' ही त्यांची झाडांच्या कत्तलीचे चित्रण करणारी पर्यावरण केन्द्री कथा असल्याचे दिसते. ललित गद्याच्या बाजाची शैली असलेल्या या कथेतून कापलेल्या झाडाची वेदना, झाडाच्या सहवासातले क्षण रंगविलेले

आहेत. सदासर्वदा वर्दळ सामावून घेणारे, सावली देणारे, पारंब्यांशी खेळायला देणारे, झोके घेता येणारे वडाचे झाड, सुवासिनींनी पौर्णिमेस पुजलेले वडाचे झाड, आकाशाला गवसणी घालणारे वडाचे झाड, पिंपळ व बकुळीला आपल्या कुशीत घेऊन वाढवणारे वडाचे झाड अशा पद्धतीने झाडाची महती लेखक सांगतात. वडाच्या झाडाच्या फांद्या मंदिराच्या वर येतात. देवळातही लोकांची वर्दळ वाढत असते. हॉल, अग्रशाळा, शॉपिंग कॉम्प्लेक्स मधून देवस्थानाचे उत्पन्न वाढविण्यासाठी वडाच्या झाडाला पाडण्याचा विचार सुरू होतो. झाड कापण्यास एकही गावकरी फिरकत नाही. पन्नास हजारांच्या बोलीवर झाड कापण्याचे ठरते. अनेक कंत्राटदार येतात. कापणाऱ्यांना अनेक अडचणी येतात पण झाड जागचे हलत नाही. शेवटी अत्याधुनिक सामुग्री वापरून झाड पाडले जाते. त्यावेळी काही गावकऱ्यांसह विदेशी पर्यटकही मुसमुसून रडतात. वडाचे नामोनिशाणही उरत नाही. शुभमुहूर्तावर नवीन बांधकामाची सुरूवात करण्याचे ठरवले जाते.

'आठवे आश्चर्य' या कथेमध्येही डोंगर विकला गेल्याने झाडांची झालेली कत्तल, तिथे उभारलेली कॉन्क्रीटची जंगले व पर्यावरणाचा झालेला ऱ्हास याचे चित्रण लेखक करतात. 'आठवे आश्चर्य' ही पर्यावरण केंद्री कथा आहे. संकेतच्या बालमनाला पडलेले अनेक प्रश्न, डोंगर कोण विकत घेतो? झाडे कोण कापतो? झाडे तोडली तर पाऊस कसा पडणार? सगळे नियम धाब्यावर बसवून सरकारने बांधकामास परवानगी दिल्याचे आपण संकेतच्या बालमनास कसे सांगायचे असा प्रश्न निवेदकास पडतो. वनराई नष्ट होणार, काजूची झाडे कापली जाणार, फेणी काजुबिया मिळणार नाहीत, गणपतीच्या माटोळीसाठी लागणारे 'हरप', 'तिरडो', 'करमळां', 'कांगलां' ही रानफळे मिळणार नसल्याची भीती निवेदक या कथेत व्यक्त करतात. झाडे कापून शंभर ताजमहाल म्हणजेच शंभर बंगले बांधले जाणार असल्याचे कळताच, या शंभर ताजमहालांचे बालमनास आश्चर्य वाटते. मोरजीच्या डोंगरावरील दृश्य बालमनावर कोरल्याने, मोरजीच्या डोंगराला आठवे आश्चर्य म्हणणारा लहानगा संकेत या कथेत दिसून येतो. मोरजीतील तिन्ही आश्चर्ये पूर्ण झाल्यानंतर पर्यावरणावर व स्थानिकांवर काय परिणाम होतील याची निवेदकास असलेली भीती व तिन्ही आश्चर्ये पूर्ण झाल्यास, भविष्यातील गंभीर परिणामांची जाणीव नसलेल्या बालमनास होणारा आनंद अशी एकूण कथा येते. 'आठवे आश्चर्य' व 'पणजीची कहाणी' या दोन्ही कथांमध्ये लहान मुलांच्या मनोविश्वाचे चित्रण करत, त्यांच्या मनात पर्यावरणीय प्रश्न चित्रित करण्याचा प्रयत्न या कथेत झाला आहे.

### 3.2.6.7 गोव्यातील बदलांचे ग्रामसंस्कृतीवर उमटलेले पडसाद

पर्यटन व विकासाच्या नावाखाली गोव्यातील ग्रामसंस्कृती, अनेक गावे, माणसे उद्ध्वस्त होत असल्याचे चित्र 'लेनिनग्राड' ही म्हामलांची कथा व्यक्त करते. 'मांड' ही पारंपारिक गोमंतकीय लोकसंस्कृतीची पार्श्वभूमी असलेली कथा आहे. या कथेतून लेखक आधुनिक जीवनातून गोमंतकीय 'धालो' हरवत चालल्याचे वास्तव सांगतात. गावातल्या वयस्कर आजीच्या नवऱ्याच्या निधनानंतर धालो परंपरा चालू ठेवण्यास आजी सीतेला निवडते. आपल्याकडे असलेले लोकसाहित्याचे धन सीतेला देते. सीतेच्या पतीच्या निधनानंतर ही परंपरा पुढे कोण नेणार हा प्रश्न या कथेत उपस्थित होतो. गोमंतकीय मांडसंस्कृतीचे बदलते स्वरूप लेखक चित्रित करतात. आज अभ्यासाच्या हेतूने विद्यार्थ्यांना लोककलाकारांकडे जायला वेळ नसतो. स्थानिक लोककलाप्रकार बघण्यासाठी त्या त्या ठिकाणांना भेट द्यायला वेळ नसतो. आज मांडसंस्कृतीत भरपूर प्रमाणात भेसळ झालेली दिसून येत असल्याचे चित्र लेखक मांडतात. लोककलांना आलेले व्यवसायाचे स्वरूप स्पष्ट करतात. 'काळो आमो' या कथेमध्ये ग्रामजीवनाचा भाग असलेले आंब्याच्या झाडाचे कशापद्धतीने पर्यटन स्थळात रुपांतर होते याचे चित्रण येते.

एकत्रकुटुंबव्यवस्थेतून विभक्त कुटुंबव्यवस्थेत निर्माण झालेले भाऊबंदकी व कौटुंबिक प्रश्न त्यांच्या लिखाणात जाणवतात. 'अतृप्त आत्मे' ही अशाच पद्धतीची कथा ठरते आहे. सूर्याजीचा पणतू असलेला निवेदक गावात हक्काची जागा न मिळाल्यामुळे डिचोलीत जमीन घेऊन घर बांधतो. निवेदकाच्या जन्मानंतर सूर्याजीच नवा जन्म घेऊन परत आल्याचे मानले जाते. निवेदक कामानिमित्त गाव सोडून जातो. तब्येतीला त्रास होत असल्याकारणाने नाना निवेदकाची भेट घेतो. मागच्या पिढीतील निधन झालेले कुटुंबातील सगळे वयस्कर सदस्य आपल्याला स्वप्नात दिसू लागल्यामुळे आपल्या तब्येतीत बिघाड होत असल्याचे निवेदक सांगतो. दिवंगत आत्म्यांची सुटका न झाल्याने ते अतृप्त आत्मे आपल्या स्वप्नात येऊन या यातनांतून त्यांची सुटका करण्याचे सांगतात. त्याविषयी काही विधी करण्याविषयी सांगितले जाते. शेवटी कुळाच्या भल्यासाठी विधी करण्याचे ठरेत. जमिनीची कागदपत्रे प्रत्येकाच्या नावावर करण्याच्या अटीवर सूर्याजीच्या वंशावळीला सोडविण्याचे ठरते. यासाठी आकारला जाणारा खर्च वंशावळीतील प्रत्येक घराकडून आकारला जातो. विधीच्या दिवशी १०० माणसे एकत्र येतात. सर्वप्रथम निवेदकाच्या अंगात सूर्याजींचा भार येऊ लागतो. त्यानंतर अन्य कुटुंबियांच्या

शरीरांमध्ये मृतात्मे येऊ लागतात. सर्वांना विधी करून सोडविले जाते व शरीरांना मुक्त करत जाण्याची विनवणी केली जाते. ग्रामीण विधी परंपरा याचेही चित्र या कथेमध्ये दिसून येतेत.

ग्रामीण कृषी जीवनात होणाऱ्या बदलत्या स्थितीचे  चित्रण 'आजोबांची संपत्ती' या कथेत आलेले दिसून येते. कुळ -मुंडकार कायद्याच्या पार्श्वभूमीवर आधारलेली 'आजोबांची संपत्ती' ही कथा ग्रामीण समाजव्यवस्थेचे चित्रण करते. भाटकाराची शेती करणारे, भाटकाराचे कुळ म्हणजेच मुंडकार असलेले आजोबा शेती सांभाळायचे. आजोबांबरोबर छोटी मोठी कामे करणारा निवेदकही या कथेत दिसून येतो. कित्येक वर्षे निष्ठेने काम करणारे आजोबा भाटकाराचे खंड न चुकवता भरणारे होते. कुळ कायदा मंजुर झाल्यानंतर शेती भाट आपल्या नातवंडांकडे येणार असे त्यांना वाटत होते. आपण वेळोवेळी भरलेल्या पावत्या ते सांभाळून ठेवत ज्याचे महत्त्व निवेदकाच्या मोठ्या भावास समजत नाही व मोडी लिपीतल्या अनावश्यक पावत्या म्हणत त्या तो जाळून टाकतो. आजोबानंतर शेती करणारा कोणी उरत नाही. शेती पडिंग ठेवण्याची संख्या वाढते. आजोबाची नातवंडे घरदार थाटण्यासाठी जागा मिळावी म्हणून भाटकाराच्या शेताच्या जागेचा विचार करतात. त्यात भाऊबंदकीचे वाद निर्माण होतात. आजोबांनी घर दार व शेती राखून ठेवली जी त्यांची होती. आपण मात्र पुढच्या पिढीचा विचार केला नसल्याची खंत निवेदक व्यक्त करतो.

'गोशाळा', 'घर' या कथांमधूनही गोमंतकीय बदलत्या समाजजीवनाचे वास्तव चित्रण लेखक करतात. लहानपणी शाळा व गोशाळेत रमलेला निवेदक व त्याचा मित्र कृष्णाला शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पणजी या शहरात नोकरी मिळते. त्यांच्या भावंडांनाही शेतीजमिनीच्या बदल्यात सरकारी नोकऱ्या दिल्या जातात. शेती व गुरांची कामे यापासून दोघे दुरावतात. शहरी जीवन जगणाऱ्या प्रत्येकाला गुरं असह्य झाल्याचे चित्र त्यांना जोगोजागी दिसते. ऑफिसच्या बाहेर गुरं शेण करून ठेवत असल्याने कृष्णाला ऐकावे लागते. गुरांचा बंदोबस्त केला जातो. कालांतराने दोघे फ्लॅट घेतात.पण अजूनही मनाने मुळांशी बांधले असल्याने विनायकी, संकष्टीच्या वेळी गायीला गोग्रास देण्यास गाय शोधत बाहेर पडतात. शहरातील राहणीमानामुळे टाकलेल्या खाद्यपदार्थाबरोबर प्लास्टिकही गुरांच्या पोटात जाते याबद्दल लेखक बोलतात. आधी शहरी लोकांना गुरे नकोशी होती पण आज गावातील घरांमध्ये परिवर्तन झालेले आहे. गोठ्यांमध्ये गुरे पाळणे बंद होत परप्रांतीयांची गोठ्यात भाडेपट्टीवर निवासाची सोय केली जाते ज्यातून त्यांच्या कमाईचे साधन तयार होत आहे. पॅकेटबंद दुधाची विक्री दुकानांवर होत असल्याने गोपालन बंदच झालेले आहे अशी एकूण बदलती ग्रामीण जीवनातील स्थिती लेखक

मांडतात. घरातील देवकार्यात किमान शेण सारवता यावे म्हणून धडपडणारी निवेदकाची आई शेण मिळाल्याने सुखावते. मातीशी नाते जोडलेल्या एका पिढीतील स्त्रीचे प्रतिनिधित्व ती करते.

'पोसकी आवय' या कथेमध्ये स्वाभिमानी, मायाळू अशा आवयचे (आईचे) जीवनचित्रण लेखक करतात. कृष्णा हा तिचा नवरा भाटकाराविरुद्ध आपली शेतीभाती गमवतो. स्वामीचा शिष्य बनतो व कोर्टकचेरीत हरतो. संसारावरचे त्याचे मन उडते. पंढरपूरला गेलेला तिचा नवरा परतत नाही. बोकडांना पाळत उदरनिर्वाह करत, धनंजय या आपल्या मुलाला ती लहानाचा मोठा करते. पण तोही स्वामींचा शिष्य बनतो. त्याचे स्वामींची शिष्य असलेल्या मंगला या मुलीशी प्रेम जमते व तो लग्न करतो. सासू सुनेमध्ये खटके उडायला लागल्याने आवय वेगळी चूल मांडते. बँकची नोकरी मिळाल्याने गावात आलेल्या निवेदकास व त्याचा लहान मुलगा अजयला ती लळा लावते. मनोमन पंढरपूरला जाण्याची इच्छा मनी बाळगल्याने पंढरपूरला गेलेली आवय परतत नाही. तिला शोधण्यास गेलेला निवेदक दु:खी खंती होत परततो. इथे धनंजय पंढरपूरहून आलेल्या भवानीचे पूजन करतो पण स्वत:च्या आवयलाच विसरतो. नात्यांमधील संघर्षाचे चित्रण ही कथा करते. मिलिंद म्हामल ग्रामीण स्त्री दु:खाच्या कथा आपल्या कथासंग्रहात ओवताना दिसतात. कथेत राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारचे चित्रण लेखक करतात. आज गोव्यात मतदार ओढण्यासाठी राजकारण्यांकडून मोफत शिर्डी, कोल्हापूर, अष्टविनायकाच्या यात्रा घडविल्या जातात. सणसमारंभाला अन्नधान्नाच्या पिशव्या दिल्या जातात. राजकीय वर्तुळातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी अवलंबिलेल्या पद्धतींचे चित्रण या कथेतून दिसून येते.

'पत्रेकार' ही भ्रष्टाचारी प्रवृत्तींवर भाष्य करणारी कथा ठरते. ग्रामीण पातळीवरील राजकारण, पैशांच्या लालसेने बांधकामास परवानगी देणारे राजकारणी इ. चित्रण लेखक या कथेत करतात. नरेश मांद्रेकर हा पत्रकार गावातील गैरव्यवहारांना पुढे आणतो त्यामुळे पंचायत बसविली जाते. सनसेट हॉटेल गावात आणून रोजगार देण्याचा प्रस्ताव मांडला जातो. गैरव्यवहारांना आळा घालणाऱ्या पत्रकारांचा आवाज लाखो रुपये देत बंद पाडण्याचा प्रयत्न केला जातो. नरेश व अन्य दोन पत्रकार बेकायदेशीरित्या चालणाऱ्या कामांवर हफ्ते मागून पैसे मिळवतात. पत्रकारितेतील गैरव्यवहार स्पष्ट करत पत्रकारितेचे बदलते स्वरूप लेखक स्पष्ट करतात. आज बातम्या प्रसिद्ध करण्याऐवजी आमदारांच्या वाढदिनी विशेष लेख प्रसिद्ध होऊ लागले आहेत असे म्हणत पत्रकारितेतील भ्रष्टाचाराचे चित्रण लेखक करतात.

शहरीकरणाकडे वाटचाल करणाऱ्या गोमंतकीय प्रदेशात पर्यटन व्यवसायामुळे परंपरागत संस्कृती नष्ट होऊन नवी संस्कृती आकार घेत आहे. यात संस्कृतीबरोबर पर्यावरण, ग्रामीण कृषिसंस्कृती संपुष्टात येत आहे. या बदलांमुळे भाऊबंदकीत, नातेसंबंधांमध्ये ताणतणाव निर्माण होत आहेत तसेच प्रगतीची आणि विकासाची अयोग्य दिशा आकार घेत असल्याचे चित्रण त्यांच्या कथेमधून आलेले आहे.

### 3.2.7 चंद्रकांत गावस यांचे कथालेखन

चंद्रकांत गावस यांचा 'इभाड' या कथासंग्रहाबरोबर 'किस्से पर्यावरणाचे'(२००९) हा बालकथासंग्रह प्रसिद्ध झाला. भिन्न आशयसूत्रांना टिपत नवनवीन विषय 'इभाड' या संग्रहातून लेखक आणण्याचा प्रयत्न करतात. या कथासंग्रहात उदात्त अशा प्रेमभावनेचे चित्रण 'राधा', 'दुसरी अहिल्या', 'मखमली कोश' या कथांमधून दिसून येते. सजीव प्राणीमात्रांमध्ये असलेल्या कामवासनापूर्तीचे चित्रण त्यांची 'डाव' ही कथा करते. समलिंगी आकर्षण असलेल्या माणसाच्या जीवन वास्तवावर भाष्य करणारी 'तो' ही कथा येते. 'नारायण नावाची कथा' या कथेतून ग्रामीण लोकसमजुतींवर पात्रांच्या माध्यमातून अंधश्रद्धेवर केलेले भाष्य महत्त्वाचे ठरते. त्यांच्या 'तो', 'नारायण नावाची कथा', 'इभाड' या कथांमधून मानवी जीवनमूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण केलेले दिसून येते. मृत्यू हे मानवी जीवनाचे पूर्ण सत्य, असे जीवनविषयक तत्वज्ञान त्यांची 'शोध' ही कथा मांडते. चंद्रकांत गावसांच्या 'इभाड' या संग्रहातील कथांचा एकूण विचार केल्यास त्यांना असलेले समाजभान दिसून येते तसेच उदात्त प्रेम व मानवी वासनाविकृतींचे चित्रण झालेले दिसून येते. 'किस्से पर्यावरणाचे' या बालकथासंग्रहात पर्यावरणाविषयी अत्यंत महत्त्वाच्या विषयांना लेखक अत्यंत साध्या सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न करतात. यात 'अणुशक्ती' या कथेतून अणुऊर्जेची संहारकता व उपयुक्तता, 'प्रदूषणाचा भस्मासूर', 'सागरी किनारा' या कथेतून पर्यावर संरक्षण व संवर्धन, 'असे हे जगणे', 'वाळवंटातील जग' या कथांमधून जीवजंतूविषयी माहिती व पर्यावरण संवर्धन या विषयी संवादात्मक पद्धतीने महत्त्वाच्या विषयांवर भाष्य करतात.

#### 3.2.7.1 शारीरिक वासना व मानवी जीवनमूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण

चंद्रकांत म. गावस यांच्या 'इभाड' या कथासंग्रहातील 'डाव' या कथेत ग्रामीण पार्श्वभूमीवर भटुरगा व बाळू या दोन्ही बैलांची माळावर आलेल्या गाईसाठीची चढाओढ, कामवासनापूर्ततेची आग कोणत्याही परिस्थितीत शमविण्याचा प्रयत्न करणारा बाळू, अशापद्धतीने सजीव प्राणीमात्रांमध्ये असलेली कामवासना व

पूर्ततेसाठी कोणत्याही टोकाला जाण्याचा प्रयत्न अशा आशयाची ही कथा येते. समलिंगी संबंधावर भाष्य करणारी ‘तो’ ही कथा आहे. एका सुसंस्कृत घराण्यातील मुंबई सोडून गोव्यात आलेल्या २३-२४ वर्षांच्या तरुणाची ही कथा आहे. बुद्धिजीवी असलेला, साहित्याची आवड असलेला तो, आपले शिक्षण अर्धवट सोडून गोव्यात का आला हे कोडे उकलण्याच्या प्रयत्नात असलेल्या कथा निवेदक चंद्रकांतला कळलेले सत्य आणि त्याच्या मनाची घालमेल लेखक चित्रित करतात. वडिलांनीच स्वत:च्या शेजारी झोपवून समलिंगी संबंधाची लावलेली चटक, मुंबईत ‘होमो प्रॉस्टिटयूट’ म्हणून धंदा करत धंद्याला कंटाळलेला, वडिलांकडूनही सुटका व्हावी म्हणून आईच्या सल्ल्यानुसार गोव्यात येणाऱ्या, त्याच्या जीवनाचे सत्य, कथा निवेदक चंद्रकांतला समजल्यानंतर तो बधीर होतो, अस्वस्थ होतो. मानवी जीवनातील मूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रणही ही कथा करते. गोमंतकाच्या ग्रामीण जीवनातील लोकसमजुतींवर भाष्य करणारी ‘नारायण नावाची कथा’ या शीर्षकाची कथा येते. अंधश्रद्धेविरुद्धचा पुरोगामित्वाचा लढा नारायण बाबा व सुरेश या पात्रांच्या माध्यमातून लेखक मांडतात. गावातील लोकांच्या करणीमुळे देव धर्माचे काम होत नसल्याने ग्रामीण जीवन जगणाऱ्या भाबड्या लोकांकडून पैसे आकारत, चमत्काराच्या नावाने लोकांना फसवणारा बाबा, बाबाच्या विरोधात बोलणाऱ्या सुरेशला गावातून बहिष्कृत करण्याचा झालेला प्रयत्न आणि शेवटी लोकांना फसवून गावातील घरात राहणाऱ्या पोरीला पळवून घेऊन गेलेला नारायण बाबा अशी कथा येते. ‘इभाड’ या कथेत गाई वासरांना मुलाबाळाप्रमाणे जपणारा हरी आपली गाय आपल्या वासरांना जवळ घेत नसल्याने दूध मिळत नसल्याने, अनेकांच्या शेतात आपली गाय चोरी करत असल्याने इस्माईलला गाय विकतो. मालकापासून विलग न होऊ पाहणारी गाय शेवटी ३०० रुपयात विकली जाते. मारायला नेताना मालकाच्या नावाने व्याकूळ होणाऱ्या आपल्या गाईच्या आठवणीने हरी अस्वस्थ होतो व आपल्याला मिळालेले पैसे देवालयाच्या फंडपेटीत टाकत प्रायश्चित करतो अन्य आपल्या पापाची शिक्षा आपल्या उर्वरित ढोरापोरांना देऊन त्यांचा ‘इभाड’ करू नकोस म्हणत परमेश्वराला सांकडे घालतो. नवऱ्यापासून मूल होत नसल्याने सुधाकर या नवऱ्याच्याच मित्राशी संबंध ठेवून मूल जन्माला घालणारी अरुणा. पितृ सुखाच्या हर्षाने सुखावलेला तो, पण आपल्या नशिबी आलेल्या कलंकित पितृत्वाने थरारलेला, सर्व गोष्टी असह्य झालेला अरुण अशी ही कथा आहे.

### 3.2.7.2 प्रेम भावना व उदात्त प्रेमाचे चित्रण

उदात्त प्रेम भावनेचे चित्रण चंद्रकांत गावस यांच्या कथांमध्ये दिसते. यात तारुण्यात राधा या आपल्या प्रेयसीपासून विलग होत दुसरीशी विवाह थाटून संसार करणारा तो आणि तीस – पस्तीस वर्षे निरपेक्ष प्रेमाने एकटी राहिलेली राधा याचे चित्रण 'राधा' या कथेत येते. म्हातारपणी जिवलगाची खऱ्या अर्थाने गरज असते अशा भावविवशतेने पुन्हा आपल्या नातवंडात गुंतलेल्या लग्नाच्या बायकोला, स्थिरावलेल्या मुलांना सोडू पाहणारा व राधे समवेत उर्वरित आयुष्य घालवण्याचा निर्णय घेणारा तो, अशी उदात्त प्रेमाची कथा येते. प्रेमाचे उदात्तीकरण 'दुसरी अहिल्या' या कथेमध्येही दिसून येते. लग्नाने शरीरसुख मिळत नसल्याने आपला नवरा किशोर व पोटचा मुलगा रोहन यांच्यापासून दुरावलेली कांचन या कथेत येते. नंदन हा फक्त शरीरसुखासाठी आपल्याला जवळ घेतो. आपल्याकडे वेश्या म्हणून बघतो व आपण कधी सोडून जावू ह्याची शाश्वती त्याला वाटत नसल्याने, नंदन आपल्याशी दुसरा विवाह करू इच्छित नसल्याने ती त्याला झिडकारते. ही किशोरच्या उदात्त प्रेमाची कथा आहे. आपल्या पत्नीची नंदनप्रती असलेली शरीरासक्ती संपेपर्यंत दहा बारा वर्षांपर्यंत आपण वाट पाहू असे म्हणणारा किशोर, आणि नंदनने झिडकारल्यानंतर आपल्या पत्नीची शरीरसुखाची भूक शमल्यानंतर तिला पुन्हा आपल्या आयुष्यात घेऊन येऊ पाहणारा नवरा असे उदात्त माणसाचे चित्रण लेखक करतात. गीता व त्याची उदात्त प्रेमाची कथा 'मखमली कोश' या कथेत येते. एकाच गोत्राचे असल्याने लग्न होऊ न शकणारी दोन मने. एकमेकांच्या शरीराची असलेली ओढ. गीताच्या लग्नानंतर गीताला गरोदर पाहून दुखावलेला तो, आपण आपल्या पती अशोकमध्ये सदैव तुलाच पाहिले असा गौप्य स्फोट करणारी गीता, आणि आपल्या प्रियकराला हे त्याचेच मूल असल्याचे विनवणारी आणि तिच्या मुलाला आपलेच मानणारा तो अशी उदात्त कथा येते. भावनाविवशता, प्रेम, फसवणूक हा चंद्रकांत गावसांच्या कथेचा स्थायीभाव ठरतो. पूर्ण सत्याच्या शोधात असलेला नायक आणि पूर्ण सत्य म्हणजे मृत्यू या जीवनविषयक गहन गंभीर तत्वज्ञानाचा शोध लागल्यानंतर स्वत:ला मृत्यूच्या खाईत झोकून देणारा 'तो' अशी 'शोध' ही वेगळ्या आशयाची कथा येते.

'किस्से पर्यावरणाचे' हा छोटेखानी स्वरूपाचा बालकथासंग्रह लिहित चंद्रकांत गावस यांनी, सद्यकाळातील पर्यावरण विषयक महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. संवाद तंत्राचा वापर करत, लहान मुलांच्या मनातील कुतूहल असलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना कथेतून ज्ञान तसेच बोध देण्याचे कार्य लेखक करतात. 'अणुशक्ती' या कथेत अणुवस्त्रांच्या वापराने जगभरात निर्माण झालेला संहार, अणुउर्जा निर्मितीत

दुर्लक्ष झाल्यामुळे निर्माण होणारे अपघात यावर प्रकाश टाकत जबाबदारीने वापर केला तर अणुऊर्जा किती उत्तम आहे हे सांगण्याचा प्रयत्न करतात. 'प्रदूषणाचा भस्मासुर' या कथेत पैशांच्या लालसेने प्रदूषणात पडणारी भर तसेच स्वच्छ पर्यावरण व पर्यावरण संवर्धनाची गरज व उपाययोजना स्पष्ट करतात. 'असे हे जगणे' या कथेत मानवाव्यतिरिक्त अन्य सजीव प्राणि कसे जगतात, स्वत:चे काम स्वत: कसे करतात हे सांगत मुलांना आईवडिलांना मदत करण्याचा संदेश देतात. 'सागर किनारा' या कथेत आजोबा जलचरांविषयी तसेच समुद्र, नद्यांच्या पाण्याविषयी माहिती देत माणसाने समुद्र प्रदूषित केल्याचे सांगतात. 'वाळवंटातील जग' या कथेत वाळवंटातील जीवजंतूविषयीची माहिती देत, पाणी संवर्धनाच्या प्रयत्नांसाठी वाचकांना जागरूक करतात.

### 3.2.8 ज्ञानेश्वर कोलवेकर यांचे कथालेखन

ज्ञानेश्वर कोलवेकर यांचे 'भोलानाथ (२०१३), 'धडपड'(२०१६) 'गावबंधू'(२०१७) हे तीन संग्रह प्रसिद्ध झाले. 'धडपड' या कथासंग्रहातील अनेक कथांमध्ये मानवी मनाची धडपड चित्रित करण्याचा प्रयत्न लेखक करतात. स्त्री स्वभावाचे चांचल्य 'फडफड' या कथेमध्ये लेखक चित्रित करत जीवनाचे तत्त्वज्ञानही आपल्या कथांच्या माध्यमातून सांगताना दिसतात. त्यांच्या काही कथा सोनार समाजाच्या पार्श्वभूमीवर आहेत. आधुनिक विचारसरणीवर त्यांच्या कथा आधारलेल्या दिसून येतात. ज्ञानेश्वर कोलवेकरांची कथाबीजे ही गोमंतकीय समाजजीवनातल्या बदलाना केंद्रस्थानी ठेवते. ज्ञानेश्वर कोलवेकर हे स्वतः दैवज्ञ ब्राह्मण समाजात जन्माला आलेले लेखक. गोमंतकांत 'शेट' या नावाने सुपरिचित व प्रतिष्ठित मानला जाणारा हा दैवज्ञ ब्राह्मण समाज. 'शेट' म्हणजे सोनार असल्याने पिढीजात श्रीमंत म्हणून या समाजाचा विचार केला जातो. पण आज गोमंतकातील अनेक व्यवसाय परप्रांतिय पण करताना दिसतात. कधी काळी गोव्यातील शेटांचे कामगार असलेले परप्रांतिय त्यांचेच मालक झालेले आहेत. घराण्याची परंपरा व अनुवांशिकतेने लाभलेले कारागिरीचे ज्ञान व प्रतिभा यामुळे 'शेट' इथला ठप्प पडलेला धंदा सोडून मुंबई सारख्या शहरातील सोनारांसाठी काम करत आहे व अशा कारागीरांना आज योग्य मोबदलाही दिला जात नाही. एकेकाळी गर्भ श्रीमंत मानला जाणार हा समाज आधुनिकीकरणामुळे तोटा सोसत पोटापाण्यापुरत्या उदरनिर्वाहाची साधने शोधत असल्याचे वास्तव चित्रण ज्ञानेश्वर कोलवेकरांच्या कथेतून दिसून येते.

### 3.2.8.1 स्त्री दुः ख, भावनाविवशता व स्त्री स्वभावाच्या भिन्न पैलूंचे चित्रण

ज्ञानेश्वर कोलवेकर यांच्या 'धडपड' या कथासंग्रहातील 'सह्याद्रीचा रामोशी' या कथेतून पार्वती या आईच्या माध्यमातून स्त्री दुःखाचे चित्रण करण्याचा प्रयत्न लेखक करतात. कित्येक वर्षांपूर्वी गाव सोडून पळालेल्या आपल्या मुलाचे निरोपपत्र आल्याने अर्जुन या आपल्या मुलाची परतण्याची वाट पाहणाऱ्या आईला त्याच्या निधनाच्या बातमीचे पत्र येते. गावातील टोळयांमध्ये सहभागी व्हायचे नसल्याने गाव सोडून गेलेला अर्जुन सैनिक म्हणून सैन्यात कार्यरत असताना चीनच्या युद्धात शहीद झाल्याचे समजताच एका वेगळयाच भावविवशतेत अडकलेली आई, आपला मुलगा त्याच्या वडिलांसारखा चोर हा शिक्का लागून मेला नाही तर सैन्यात लढता लढता शहीद झाल्याच्या अभिमानाने जीवनातील सारा आकांत हुंदक्यांनी व्यक्त करणारी आई या कथेत येते. 'वांझपण' या कथेत मूल नसल्याने वांझ म्हणून हिणवल्या गेलेल्या स्त्रीचे दुःख मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. मूल नसलेल्या शांताला आपल्याच मावशीच्या घरी मालती या मावसबहिणीद्वारे दुखावले जाते. एक स्त्रीच स्त्रीची शत्रू बनते अशा आशयाची ही कथा येते. मालती आपल्या मुलाला शांताच्या वांझपणाची बाधा पोहोचू नये तिची आपल्या मुलावर दृष्टीच पडू नये म्हणून दूर ठेवते. शांता तिशीकडे झुकू लागल्याने तिचे घाईगडबडीत मुलाशी बोलणे न होऊ देताच लग्न लाऊन दिले गेले. लग्न झाल्यानंतर आपला नवरा वेडगळ असल्याची तिला जाणीव होते. ती खंतावते. स्वत: पुढाकार घेतल्याने तिला दिवस जातात, पण मुलही नवऱ्यासारखे वेडगळ होण्याच्या भितीने ती हादरते व गर्भ पाडते. आपण वांझ नसून स्वत: मातृत्व नाकारलेली स्त्री असल्याने आपण वाच्यताही करू शकत नसल्याने ती भांबावते, व हतबल होऊन रूदन करते. ख्रिस्ती स्त्रियांच्या व्यथा मांडणारी 'वारूळ' ही कथा आहे. भरपूर पैसा कमाविण्यासाठी बोटींवर गेलेले त्यांचे नवरे व त्यामुळे परपुरुषाशी संबंध ठेवून आपल्या वासनांचे शमन करणारी ऑफेलीन व ॲनीची आई या कथेत येते. ज्ञानेश्वर कोलवेकर यांच्या 'गावबंधू' या कथासंग्रहात 'पुण्याई' ही स्त्रीचे भावविश्व चित्रित करणारी कथा येते. एका सर्वसामान्य सोनारांच्या कुटुंबात जन्माला आलेली, शिक्षणाची महत्त्वाकांक्षा असलेली माधवी या कथेत येते. सोन्याचे भाव खाली आल्याने ठप्प पडलेला वडिलांचा धंदा, सोनार समाजात जन्माला आलेली मुलगी म्हणून ठरलेले ओझे. शिक्षण म्हणजे शाप मानणारा समाज, मुलगा असला तर किमान धंद्यात हातभार लावील, मुलगी म्हणजे परक्याचे धन ही प्रबळ मानसिकता असलेल्या समाजात माधवीची कॉलेजमध्ये जाण्याची मनीषा असते. पण तिचे कोवळया वयात लग्न लावले जाते. सोनारकाम करणाऱ्या शंभूशी तिचा विवाह होतो. विवाहानंतर अकरावीचा निकाल जाहीर होतो, तिचे माहेरी न होणारे कौतुक सासरी होते. पुढचे शिक्षण घेण्यास

नवरा समर्थपणे पाठीशी उभा राहतो. पदोपदी सासूही खंबीरपणे पाठीशी उभी राहते. शिक्षण क्षेत्रात उत्तम कार्य केल्याने तिच्या सत्कारसमारंभात या गतआठवणीत ती रमते व आपल्याला इथपर्यंत पोहोचवणाऱ्या सासूबाईंचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त करते. याप्रसंगी सोबत असलेल्या नवऱ्याचा भावनिक आधारही तिला लाभतो. स्त्री शिक्षणाकडे पाहण्याची एक व्यापाक दृष्टी या कथेतून व्यक्त होते. सुनेला शिक्षणासाठी पाठींबा देणारी सासू अशा व्यक्तिरेखांतून लेखक आपल्या कथेतून समाजाला नवी दृष्टी देतात. पत्नीला पदोपदी साथ देणारा सोनार नवरा या कथेतून मांडत सोनारांमध्ये स्त्री शिक्षणाकडे पाहण्याच्या बदलत्या मानसिकतेचे चित्रण लेखक करतात.

'अरु' या कथेत विवाहानंतरही विवाहपूर्व संबंध असलेल्या आपल्या प्रियकरात गुंतलेल्या स्त्रीचे भावविश्व चितारण्याचा लेखक प्रयत्न करतात. आपल्या अरविंद या प्रियकरास धडा शिकविण्यासाठी प्रकाश या श्रीमंत घरातील मुलाशी लग्न झालेल्या सुलभाच्या प्रथमपुरुषी निवेदनातून ही कथा आकार घेते. आपल्या चिठ्यांना उत्तरे न देणारा, आपल्याशी शारीरिक जवळीक न साधणारा अरविंद या आपल्या प्रियकरास ती दूर करते पण प्रकाशशी लग्न केल्यानंतर जन्मलेल्या आपल्या मुलाला अरविंद व आपल्या प्रेमाची आठवण म्हणून 'अरु' हे नाव ठेवते. मुलाच्या जन्मानंतर आपल्या मावशीच्या शेजारी राहणाऱ्या अरविंदला आपल्या 'अरु' या मुलाची ओढ लागल्याने, अरविंदला आपल्या मुलापासून दूर राहण्याचे बजावून सांगते. आपल्याला प्रेमात फसवल्याचे सांगत अरविंदची कानउघाणी करत असताना अरविंद तिला तिच्या चुकीची जाणीव करून देतो. आपण आपल्या कर्तव्यांमुळे आंधळे प्रेम करू शकलो नसल्याचे तिला बजावतो. आपल्या निर्णयाचा पश्चाताप झालेली सुलभा परत आपल्या प्रियकराशी भावनिक नाते प्रस्थापित करू पाहते, आपण त्याला न विसरल्याचे सांगते, पण अरविंद तिच्यापासून मनाने दूर गेलेला असतो. त्याच्या प्रेमाची आठवण म्हणून फक्त अरविंदचे नाव ठेवलेले तिचे बाळ तिच्या हाती असते. या कथेतून स्त्रीसुलभ भावना व गैर समजामुळे उद्ध्वस्त झालेल्या नातेसंबंधाचे चित्रण लेखक करतात. 'अंगार' या कथेत रामदास व वृंदाच्या अधुऱ्या प्रेमाची कथा येते. मुंबईत असताना रामदास व वृंदाचे एकमेकांवर जुळलेले अबोल प्रेम, पण वृंदाचे लग्न तिच्याच मामाच्या मुलासोबत ठरल्याचे समजताच, आताच्या मुलींना सोनार असलेला पती आवडणार नाही अशी स्वत:ची समजूत काढत पीछेहाट करणारा रामदास या कथेत येतो. रामदासशी मनोमनी जुळलेली वृंदा, रामदास गोव्यात गेल्यामुळे तिला स्थळ म्हणून आलेल्या माणसाशी लग्न करते व स्वत:चे जीवन नरकात लोटते असे रामदासला कळते. तिच्या या परिस्थितीमागे आपलाच दोष असल्याचे शल्य त्याच्या मनाला वाटते, अशी कथा येते. 'अरु', 'अंगार' या

दोन्ही कथांमध्ये प्रेम असूनही गैरसमजाने झालेले प्रेमभंग व याचे आयुष्यभर मनात राहिलेले शल्य अशी कथाबीजे येतात.

ख्रिस्ती समाजजीवनाच्या पार्श्वभूमीवर 'बटाटो' ही कथा येते. गिल्बर्ट या बोटीवर काम करणाऱ्या आपल्या पतीच्या निधनानंतर ऑफेलीन व रॉबर्ट या आपल्या मुलांचा सांभाळ करणाऱ्या मायच्या(आईच्या) मनात आपली मुलगी ऑफेलीन लठ्ठ होत चालल्याने तिच्याशी कोण लग्न करणार ? असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे ऑफेलीनचे खाणे पिणे ती कमी करते, त्याचा परिणाम तिच्या तब्येतीवर होत असल्याने तिला सायकल घेऊन देते. पौंगडावस्थेत असलेली ऑफेलीन बारीक होते पण सायकल सोडत नाही कारण सायकलने रोजच्या ठरलेल्या वाटेवरून जाताना एल्विस नावाच्या तरुणाच्या घराजवळून ती जात असते. सायकलवरून पडता पडता आपल्याला झेलताना त्याचा नकळत स्पर्श झालेल्या पौंगडावस्थेतील ऑफेलीनचे एल्विसवर प्रेम जडलेले असते. स्त्री स्वभातील चांचल्य या कथेत लेखक चित्रित करतात. 'संकट' या कथेत स्त्री स्वभावातील लंपटपणा चित्रित करण्याचा प्रयत्न लेखक करतात. गोव्यातील काणकोण येथील आपले खेडेगाव सोडून मुंबईत मामा मामीकडे वास्तव्यास असलेल्या त्याच्याशी स्वप्नाली नावाची एक तरुणी लगट करण्याचा प्रयत्न करत स्वतःच्या जाळयात ओढण्याचा प्रयत्न करते. मामा मामीने विश्वासाने आपल्याला आसरा दिल्याने तो मात्र तिच्याशी अदबीने वागतो. नोकरीत कायम झाल्यानंतर आपल्याच जातीतील स्वप्नालीवर प्रेम करण्यात काय वावगं आहे असा प्रश्न त्याच्या मनात उपस्थित होतो. स्वप्नालीची चिठ्ठीही त्याच्याकडे पोहोचते. पण काही कामानिमित्त परत गावी गेलेल्या कथा नायकाला परत मुंबईत आल्यानंतर स्वप्नाली एका टेलर सोबत पाळल्याचे समजते. आपल्यावरील संकट टळून एक मोठे ओझे डोक्यावरून उतरल्याचे त्याला वाटते.

संवादात्मक पद्धतीने रुबाबदार तरुण व 'हाडकुळा' म्हणजेच बारिक तरुण या दोहोंच्या माध्यमातून परस्पर भिन्न प्रवृत्तींचे चित्रण 'फडफड' या कथेमध्ये येते. मुंबईच्या पार्श्वभूमीवर ही कथा येते. आपल्यावर प्रेम करत असल्याचे भासवत शारीरिक लगट करू पाहणाऱ्या तरुणीला आपण दूर लोटण्याचा केलेला प्रयत्न हाडकुळा तरुण आपल्या बोलण्यातून रुबाबदार तरुणास सांगतो. रुबाबदार तरुण, मुंबईत जगण्यासाठी तिची खोली मिळाली असती, शारीरिक संबंधानंतर लग्न करून तिच्या नोकरीच्या जोरावर संसार थाटात आला असता असा सल्ला हाडकुळया तरुणास देतो, पण असे करण्यास त्याचा स्वाभिमान आड येतो. एका स्त्रिच्या प्रेमात पडल्यानंतर तीच्याशी शारीरिक जवळीक साधत, पुढे ती गरोदर राहिली कि त्या संधीचा फायदा घेत तीच्याशी

लग्न करून आपल्या जगण्याची व्यवस्था करणाऱ्या तरुणाची प्रवृत्ती रुबाबदार तरुणाच्या माध्यमातून लेखक चित्रित करतात. रुबाबदार तरुणाच्या माध्यमातून जगण्याचे तत्वज्ञान सांगण्याचा लेखक प्रयत्न करतात. त्याच्या मते आयुष्य सुरळीत चाललेल्यांनी नीतिमत्तेची भीति बाळगायची. जीवनात आपले बस्तान नीट बसवायचे, नीतिमत्तेचा नंतर विचार करत आपण केलेल्या चुकीपासून नामानिराळे न राहता आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवत ते कर्तव्य बजावायचा प्रयत्न करायचा. हे सांगत सर्वसामन्यांच्या जगण्याच्या धडपडीविषयी बोलण्याचा प्रयत्न करतात. स्त्री स्वभावाचे भिन्न पैलू उलगडत स्त्री ही कितीही पुढारलेल्या विचारांची असली तरी भाबडी असते असे चित्र लेखक कथेतून साकार करतात. मानवी भिन्न प्रवृत्तींचे चित्रण करत स्त्री प्रवृत्तीचा पैलू मांडताना दोन्ही तरुणांशी संबंध ठेवणारी स्त्री एकच होती का? असा प्रश्न करत कथेची सांगता लेखक करतात. 'भिजूड' या कथेतून कौटुंबिक स्वरुपाची संसारकथा लेखक लिहितात. मिनाक्षी व मनोहरच्या सुखी संसाराचे चित्रण करत, कॉलऱ्याने मुले दगावल्याचे बातम्यांतून लक्षात येताच आपल्या मुलीला झालेल्या क्षुल्लक ओकारीनंतर, अनावश्यक अशा मुलीच्या मृत्युच्या भितीने घाबरलेल्या वडिलांचे चित्र मानोहर या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून लेखक या कथेत साकारतात. मिनाक्षीच्या माध्यमातून सुखी संसारासाठी प्रयत्नशील आलेल्या स्त्रिची कणखर, समंजस अशी भूमिका लेखक साकारतात. 'देवीचा जन्म' या कथेत आपली सारी इंद्रीये ताब्यात ठेऊन पंचमहाभूतांवर विजय मिळविलेल्या स्वामींच्या आश्रयास असलेली ती, स्वामींची निष्ठेने सेवा करते. स्वामी आश्रम सोडून जाणार असल्याचे समजताच ती अस्वस्थ होते. महात्त्म्याची सेवा अहोरात्र आपल्या हातून घडते हे ती स्वत:चे भाग्य समजते. स्वामींच्या सेवेत असलेल्या तिची आपल्यावरील निष्ठा बघून स्वामी त्यांना देवी म्हणू लागतात. स्वामींच्या एका व्याख्यानासाठी लोक अर्धा तास थांबलेले बघुन ती स्वामींची तपश्चर्या भंग करते व केलेल्या चुकीसाठी क्षमा मागते. स्वामी नात्या गोत्याच्या गुंतावळीतून, मोहातून जनमानसास बाहेर पडण्याचा संदेश देतात. तीही संसाराच्या मोहातून बाहेर पडायचा प्रयत्न करते तो स्वामी नकळत देवीच्या चिंतनात गुंग होतात. स्वामी आपले चिंतन करत असताना आपण खरेच देवी असल्याचे तिला वाटू लागते. ती नकळत स्वामींशी जोडली जाते व स्वामी तिच्याशी. सर्व मोहातून मुक्त झालेल्या स्वामींना लागलेली स्त्रीची ओढ, तसेच मोहातून बाहेर पडू पाहणारी ती स्वामींच्या मोहात अडकलेली व स्वत:ला देवी मानणारी अशा दोहोंच्या मानसिकतेचे चित्रण 'देवीचा जन्म' या कथेतून दिसून येते.

### 3.2.8.2 गोमंतकीय सोनार समाजाचा व्यावसायिक संघर्ष मांडणाऱ्या कथा

गोमंतकीय सोनार समाजाच्या व्यथा मांडण्यचा प्रयत्न ज्ञानेश्वर कोलवेकर आपल्या कथेतून करतात. 'रिकामी ऐट' ही अशाच आशयाची कथा ठरते. संपूर्ण दिवस अंगठी घडविण्याचे काम करून कामाचा मोबदला किमान २० रुपये मिळेल या आशेने पंधरा रुपये घर चालविण्यासाठी व पाच रुपये स्वतःच्या मौजेसाठी असे नियोजन करत दिवास्वप्ने पाहणारा नारायण या कथेत येतो. हरीश्चंद्र या सोनाराकडे अंगठीची कारागिरी करून फक्त दहा रुपये मिळवलेला नारायण खंतावतो. ५ रुपयांची पत्नी व मुलाबाळांना पुरेल इतकी भजी घेतो व पाच रुपयात दारू पिण्यास जातो. तिथे पांडू या बालमित्राच्या संगतीत भरपूर दारू पितो, खिशात असलेली भज्यांची पुडी त्याला वारंवार घरची आठवण करून देते. दारू पिल्याने पांडू सोबत झिंगत जाणारा नारायण वाटेत पुडी उघडतो. व्यसनाधीन नारायण व पांडू राखून ठेवलेली भज्यांची पुडीही फस्त करतात. गोव्यातील आधुनिकीकरणामुळे पारंपारिक व्यवसायिकांच्या माथी आलेले दुःख, दारिद्रय, व्यवसायांमध्ये असलेली चढाओढ त्यामुळे खचेलेली, संसाराची ओढताण सहन करणारे कुटुंबिय व त्यात भर म्हणून निर्माण झालेली व्यसनाधीनता व उद्ध्वस्त संसाराचे चित्र या कथेत येते. गोवा मुक्तिनंतरच्या कालखंडातील समाजजीवनातील बदलांचे चित्रण करत आधुनिक जगण्यातील दुष्परिणाम मांडणारी ही कथा ठरते. स्त्रीसुलभ भावविश्वाचे चित्रण 'कळेल लवकरच' या कथेत येते. सोनारकाम करणारा नवरा जोडीदार म्हणून असह्य झालेली ती या कथेत येते. सोनार फक्त रात्रंदिवस कष्ट उपसित असतात, नवे विचार त्यांना माहिती नसतात असे सोनाराविषयी तिला वाटत असते. पण प्रत्यक्ष आपल्याला भेटायला येणाऱ्या सोनार असलेल्या त्याला पाहिल्यानंतर, त्याच्या बोलण्यातून त्याच्या विचारांची प्रौढता तिला दिसून येते. तिला आपल्या सोनार असलेल्या भावी नवऱ्याची झालेली नव्याने ओळख तिचा होकार निश्चित करते. सोनार हा फक्त व्यावसायिक असतो, त्याला जगण्याविषयी काहीच भान नसते असे सोनार समाजाप्रती असलेले सर्वसामन्यांचे विचार अशा एकूण कथाबीजाचा आधार घेत ही कथा येते.

सरकारमुळे आर्थिक मंदीचा फटका बसल्यानंतर ज्या हातांनी दागिने घडविले त्याच हातांनी गोदीतील हेल्पर म्हणून काम करणाऱ्या सोनाराची व्यथा 'हेल्पर' या कथेत आलेली आहे. गोदीत काम करताना जीवाला धोका असल्यामुळे आपल्या बायका मुलांचे आपल्या पश्चात काय होईल या विचाराने तो अस्वस्थ होतो. आपली बायको आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्याला कामास पाठवते म्हणून तिच्याविषयी मनात तिरस्कार

निर्माण होतो. पण आपण निघत असताना तिचा रडवेला सूर व डोळे टिपणाऱ्या बायकोच्या आपल्यावरील प्रेमाची त्याला जाणीव होते. सोनार समाजात लहानपणीच शिक्षणाला डावलून मुलांच्या हाती धंदा सोपवला जाई, आर्थिक संकट आल्यानंतर पोटा पाण्यासाठी शिक्षण नसल्याने मिळेल ते काम करणाऱ्या सोनार समाजाचे चित्रण या कथेत येते. मुंबईच्या पार्श्वभूमीवर आलेल्या 'हमाल' या कथेत अगदी तरुण वयात सुवर्णविक्रीचा धंदा सचोटीने पुढे नेण्याची संधी सदनंदाला लाभते, आपले वडील अमृतशेट यांच्या अव्यावहारिपणामुळे त्यांच्यावर ओढवलेली परिस्थिती आपल्यावर ओढवू नये याची तो काळजी घेतो. जानकी या मुलीतही जास्त गुंतून राहायचे नसल्याचे मनास बजावतो. पण सरकारकडून आकस्मिकपणे सुवर्णनियंत्रणाची घोषणा होते. चौदा कॅरेटपेक्षा जास्त कसाचे दागिने घडवायला बंदी आणली जाते. बावीस कॅरेटच्या चालू दागिन्यांवर ही बंदी असल्याने व्यापारी सर्व सोने सदानंदकडून नेतात. गावी घरी पैसे पाठविण्यास त्याची पंचाईत होते त्यामुळे शेवटी मुंबईत पत्र्याचे डबे बनविणाऱ्या कारखान्यात तो नोकरी पत्करतो. सोनार कामाव्यतिरिक्त अन्य कामाचा अनुभव नसल्याने शेवटी त्याला हमालीच करणे भाग पडते. आनंद जाधव या पात्राच्या माध्यमातून मुंबईतील कामगारांचे संप नव बौद्धांच्या चळवळीची जाणीव सदानंदला कारखान्यात काम करताना होते. मुंबईतल्या धावपळीच्या जगण्याचे चित्रणही लेखक करतात. कालांतराने मंबईत आलेल्या सदनंदाला कारखान्यात आपल्यासोबत काम करणारा सवंगडी सुलतान भेटतो. सुलतानाने कमावलेले वैभव पाहून सदानंद अचंबित होतो. बेधडकपणे कशाचीच तमा न बाळगता त्याने हे वैभव मिळविलेले असते. आणि तसेच जगण्याचा सल्ला तो सदानंदलाही देतो. सदानंदची प्रेयसी जानकीचा ट्रेनखाली येऊन अपघात झालेला असतो. प्रेमविरहामुळे तिने आत्महत्या केल्याचे सुलतान त्याला सांगतो. पण छत्तीस वर्षांनी भेटलेला सुलतान पत्नीचे नाव विचारतो तेव्हा मिश्किलपणे 'जानकी' असल्याचे सदानंद सांगतो, पण तोपर्यंत पोलिसांनी शिट्टी फुंकल्याने सुलतान सदनंदाच्या बायकोचे खरे नाव ऐकल्याविना निघतो. (या कथेचा पल्ला दीर्घकथात्मक आहे. अकारण दोन कथाबीजे एकमेकात गुंफलेली आहे आणि एकाही कथाबीजाला कथाकाराने योग्य न्याय दिलेला नाही असे आढळते. काळाचा मोठा पट या कथेत फ्लॅशबॅक तंत्राचा वापर करून लेखक मांडतात)

स्त्रियांचे मन आपल्या सोन्याच्या दागिन्यांमध्ये भावनिक दृष्ट्या गुंतलेले असते. तिचे दागिन्यांवर जीवापाड प्रेम असते, पण सोनाराच्या बायकांना परिस्थितीमुळे दागिने गहाण ठेवल्याशिवाय गत्यंतर नसते. अशा एकूण आशयाची 'कांकणे' ही कथा येते. गिऱ्हाईकाचा दागिना करायचा असल्याने सोनार असलेल्या लक्ष्मीच्या पतीने तीन वर्षांपूर्वी नेलेली कांकणे तो तिला परत करतो. दागिने बनवण्याचे कारखाने सुरू झाल्याने व सोने

विक्रीसाठी गावातील लोकं शहराकडे वळल्याने, गावातील सोनारांना काम नसल्याने त्यांच्यावर ओढवलेल्या स्थितीचे चित्रण या कथेत येते. लक्ष्मीचा मुलगा दिलीप हा शिक्षित आहे. सोनार समाजातील आजची पिढी शिक्षण घेत नोकरीच्या शोधात असल्याचे लेखक कथेतून सांगण्याचा प्रयत्न करतात. पण मुलगा स्थिरस्थावर होईपर्यंत संसाराचा गाडा चालविण्याची जबाबदारी सोनारकाम करणाऱ्या विनायक व त्याची पत्नी लक्ष्मीवर येते. किमान एक तरी सोन्याचा दागिना गावातील सोनाराकडे द्यावा या हेतून आलेली वितोरीन 'सेमेन' (ख्रिस्ती लोकांमध्ये परिधान केला जाणारी सात कांकणे) बनविण्यास येते. दागिन्याचे अर्धे पैसे वितोरीन विनायक या सोनाराकडे देते. सोन्याच्या भावाचे पूर्ण पैसे न मिळाल्याने बांगड्या बनविण्यासाठी सोने खरेदी करण्यासाठी आपल्या बायकोच्या हातातील कांकणावर नजर ठेवून असलेला सोनार व मंदीच्या दिवसात पतीस धंद्यासाठी आपण कांकणे दिल्यास पुन्हा किती वर्षांनी आपल्या परत हाती येतील या प्रश्नाने हादरलेली बायको असे चित्र 'कांकणे' या कथेत येतो. गावातील सोनाराकडे जाणे कमी होत आहे त्यात आर्थिक मंदीचा फटका बसलेल्या सोनाराच्या जीवनाचे चित्रण 'गावबंधू' या कथेत येते. आर्थिक मंदीतून उठल्यानंतर धंदा स्थिरस्थावर होत असल्याचे समाधान सदानंदाला असते. आपली घर गृहस्थी चांगली चालल्याने, रोज खुलणारी, घराचा सांभाळ करणारी पत्नी लाभल्याने संसाराचे सुखी चित्र त्याच्या डोळ्यापुढे असते आणि दुसरीकडे परत आर्थिक मंदी येईल अशी भितीही वाटत असते. ठरलेले गिऱ्हाईक असलेला नाझरेथ येतो, सोन्याच्या वाढलेला दर सांगताच आपण केलेली 'मास्कात'(हाताची साखळी) विकायचे असल्याचे सांगतो. सोन्याच्या वाढीव दरात सदानंदला ती विकत घेणे भाग पडते. सोन्याचा भाव उतरू नये म्हणून सदानंद लगेचच मडगाव या शहरात जाऊन 'मास्कत' विकतो. काहीच नफा न मिळाल्याने खंतावतो. नाझरेथला शिव्याशाप देतो. खंतावलेल्या अवस्थेत मद्यालय गाठत थोडीशी पिण्याचा विचार करत असताना तिथे त्याला नाझरेथ भेटतो. आपला गावबंधू असल्याने सदानंदला आपल्या पैशात मद्य पाजण्याचे नाझारेथ ठरवतो. बारमधे गावाबंधुंच्या संगतीत भरपूर मद्य पितो. सकाळपासून शिव्याशाप देणारा नाझरेथ आता त्याचा मित्र बनून त्याला घरी सोडतो. सरिता त्याला त्याची जाणीव करून देते. व आपण गावबंधूंच्या संगतीत बायकोशी प्रतारणा करत भरपूर पिल्याने सदानंद खंतावतो. अशी एकूण मंदीत अडकलेल्या सोनाराची व्यथा कथेत येते. परप्रांतियांनी हडपलेले गोमंतकीय सोनारांचे धंदे व गोमंतकीय सोनारांच्या वाताहतीचे चित्रण 'जिणं' या कथेत येते. मुंबईत सोनार काम शिकायला आलेला दत्ता हरकाम्या ठरतो. कधी काळी दत्ताच्या वडिलांकडे काम करणारा व आज दत्ताचा मालक असलेल्या माणसाने दत्ताच्या वडिलांची फसवणूक केलेली असते. बापाच्या सोन्यात तांब्याचे मिश्रण करून दत्ताच्या बापालाच

गंडवून तो आपला व्यवसाय थाटतो. मालकाने दिलेले सोने विकायला गेला असता चोर म्हणून पकडला जातो. जास्ती मिळालेले पैसे त्यांच्या हाती ठेवत आपली सोडवणूक करतो. गोवा सोडून सोनारकामासाठी मुंबईला गेलेल्या त्याला पुन्हा आपल्या गावाची ओढ लागते. आई आजारी असल्याचे सांगूनही ऑर्डर असलेले दागिने बनवून जाण्याची सक्ती त्याचा मालक करतो. अपार परिश्रमाने तो दागिने बनवतो व पैसे घेण्यास जातो, पण सहाशे रुपयांच्या बदलात तीनशे रुपये त्याच्या हातावर ठेवले जातात. 'ढेकुण' या कथेमध्येही मारवाड्यांकडून सोनारकाम करणाऱ्यांची होणारी फरफट येते. संसाराची स्वप्ने पाहून निष्ठेने काम करणारे सोनार, पण योग्य मोबदला न मिळाल्याने त्यांच्या आयुष्यात येणारी हतबलता या कथेतून दिसून येते. पडलेल्या ढेकणावर दया दाखवणारा मालक, सर्वसामान्य सोनारकाम करणाऱ्या आपल्या कामगाराला ढेकणसारखा चिरडतो अशी प्रतिकात्मकता या कथेत येते. परप्रांतीय मालकाकडून होणारी फरफट 'वाढदिवस' या कथेत लेखक चित्रित करतात. मालकाकडे काम करून रोज त्याला शिव्या झाडल्या जातात. ऐन वाढदिवसाच्या दिवशी मिळालेली सोन्याची मास्कोत तो विकण्याचा प्रयत्न करतो पण मालकाच्या भितीने दहा रुपयाच्या बदल्यात ती मालकालाच देऊन टाकतो. त्या तुटपुंज्या पैशांनी खायला घेत ती खाऊ आपल्या आवडत्या जानकीला देतो. जानकीच्या वडीलांची हरवलेली आपणच मालकाला नेऊन दिल्याचा त्याला पश्चाताप होतो. मालकाने दिलेले दहा रुपये वाढदिवसाच्या दिवशी खर्च केल्याने परत मास्कोत मालकाकडून मागून घ्यायचा पर्यायही त्याच्यापुढे उरत नाही. सोनारकाम करणारा, संसाराची रंगीत स्वप्ने पाहणारा पण परिस्थितीपुढे हतबल ठरलेल्या तरुणाचे चित्रण या कथेत येते.

### 3.2.8.3 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण

'खालमुंडी' या कथेत सदैव डोके खाली घालून चालणारा रमाकांत निवेदकाला भेटतो. त्या दोघांची मैत्रीही जमते. बऱ्याच दिवसांनी रमाकांतची भेट झाल्याने त्याच्याकडून निवेदकाला आश्चर्यकारक गोष्ट समजते. फोरास रोडवरील वेश्यावस्तीत गेलेल्या रमाकांतला संभोग करणे शक्य होत नसल्याने त्याच्या मनात स्वतःच्या लैंगिकतेविषयी प्रश्न निर्माण होतात. आपण तृतीयपंथीय असल्याचे त्याला वाटते. निवेदक त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो, एड्स पासून दूर रहायचे असेल तर लग्न करण्याचा सल्ला देतो. रमाकांतचे लग्न होते पण निवेदकास लग्नाचे आमंत्रण दिले जात नाही. काही दिवसांनी रस्त्यात बायकोसह दिसलेला रमाकांत निवेदकाला टाळत बायकोला घेऊन पळ काढतो. त्याच्या वागण्याचा अर्थ निवेदकास लागत नाही असा या

कथेचा आशय आहे. माणसाची आपल्या लैंगिकतेविषयी असलेली अस्वस्थता या कथेत येते. 'उतारवय' ही मानवी वासनावृत्तीचे चित्रण करणारी कथा आहे. उतारवयात सरस्वती आणि आपली पुन्हा भेट होणार व आपण पुन्हा प्रवास करणार हे समजताच प्रभाकर गत आठवणीत रममाण होतो. श्रीधर हा प्रभाकरचा आतेभाऊ. सरस्वतीचे श्रीधरशी लग्न होते व लग्नानंतर तीन दिवसांनी देवळात जायचा कार्यक्रम ठरतो. गाडीत सरस्वती प्रभाकरला खेटून बसते. तिच्या नवऱ्यापेक्षा प्रभाकर रुबाबदार असतो. तिची वक्षस्थळे प्रभाकरच्या कोपऱ्याला स्पर्शू लागतात. मुद्दामहून आपल्या जवळ येऊ पाहणाऱ्या सरस्वतीमुळे प्रभाकर बावरतो पण सरस्वती मात्र स्मित हास्य करत गाडीतून उतरते. तरुण वयातील ही स्पंदने प्रभाकरच्या मनात घर करून राहतात आणि कित्येक वर्षांनी सरस्वतीच्या जावयाच्या सांगण्यावरून उतारवयात प्रभाकर व सरस्वतीचे गावी एकत्र जाण्याचे ठरते. इतक्या वर्षांनीही ती तितकीच सुंदर दिसत असते. प्रभाकर आणि सरस्वतीत प्रवासात मूलं बाळं, घर संसाराच्या गप्पा होतात. सासू व आपल्यात झालेले वाद, नवऱ्यामुळे असमाधानी असलेली ती अशा अनेक गोष्टी सांगता सांगता सरस्वती, आपल्याला प्रभाकर सारखा नवरा हवा असल्याचे नकळत बोलून जाते. प्रभाकर गोंधळून जातो. आपण उतारवयात असल्याची जाणीव त्यांना असते. प्रवासात त्यांना झोप लागते. मध्ये उठताच प्रभाकरला सरस्वतीचे डोके आपल्या खांद्यावर असल्याचे जाणवते. आपण म्हातारे झाल्याचे स्वतःस तो बजावतो, व मनात उमटलेल्या वासनांची राख करण्याचा प्रयत्न करतो. तिची झोपमोड होऊ नये याची काळजी घेत तसाच बसतो. पण भावनिकदृष्ट्या उतारवयात तो तिच्या जवळ येतो.

परिस्थितीमुळे व्यसनात बुडलेल्या स्वामी नारायणाला दारूतून बाहेर पाडण्याचा सल्ला शेट देतो. 'देवा, ज्या परिस्थितीला मी बदलू शकत नाही ती स्वीकारण्यास मनाची प्रसन्नता मला दे' अशा आशयाचे पत्रक शेट त्याला वाचायला देतात. माणूस सर्वश्रेष्ठ असल्याने आपण काय करावे आणि काय करू नये हे आपल्याला ठरवता आले पाहिजे असल्याचे सांगतात. वाल्याचा जसा वाल्मिकी झाला त्याचप्रमाणे आपण ठरवल्यास सुधारणे शक्य असल्याचे सांगतात. दोन वर्षांपूर्वी स्वामीनारायण स्कूटर धुण्याच्या निमित्ताने शेटकडे येतो व त्यांची ओळख होते. शेटना आपले दु:ख मनमोकळेपणी तो सांगू लागतो व शेटही त्याचे ऐकून घेतात. मुंबईत हेल्पर म्हणून कामाला असताना स्वामीनारायणाचे एका तमिळ मुलीशी सूत जमते व त्यांचे लग्नही होते. पण स्वामीनारायणाच्या मवाळ स्वभावाचा फायदा घेत ती त्याला लुबाडून सहा महिन्यांच्या आत दुसऱ्या माणसासोबत पळून जाते. स्वामीनारायणाची शोकांतिका ऐकून त्याला व्यसनमुक्त करून एक चांगला माणूस बनवण्याचा निर्णय शेट घेतात. पण दारुड्या मित्रांच्या सांगण्यानुसार शेट फक्त 'लिडर' बनण्यासाठी,

समाजसेवेचा आव आणण्यासाठी स्वामीनारायणाला दारू सोडण्याविषयी सांगत असल्याचे स्वामीनारायणास पटविले जाते. चांगले विचार चुकीच्या माणसाच्या हातात पडल्याची अस्वस्थता शेट अनुभवतात. आपण जे काम करू पाहत होतो ते अर्धवट राहिल्याने व त्याबदल्यात आपल्याला शिव्या ऐकाव्या लागल्याने, आपली शक्ती व आपल्या आव्हानांचा आवाका केवढा? असे प्रश्न त्याच्या मनात येतात व तो दारुड्या स्वामीनारायणास दिलेल्या मजकुरातील पहिल्या ओळीची अंमलबजावणी स्वत: करत देवाला प्रार्थना करतो की, ज्या माणसांना आपण बदलू शकत नाही त्यांना स्वीकारण्याचे सामर्थ्य आपल्याला दे. अशी 'हे प्रभो' ही कथा 'भोलानाथ' या कथासंग्रहात येते. योग्य मार्गदर्शनाच्या ऐवजी अयोग्य गोष्टींना स्वीकारून परिवर्तनास तयार नसलेली प्रवृत्ती शेवटी स्वीकारून जगावे लागते अशा आशयाची ही कथा आहे. गोव्यातील मडगाव शहरात वाढलेली गर्दी, निवेदकाला भेटलेला एक तरुण जो स्वत:ला पुरोगामी म्हणणारा, स्वार्थी, स्वत:च्या स्वातंत्र्यसैनिक असलेल्या वडिलांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतल्यावर आपल्याला वाळीत टाकल्याचे मानणारा, मुक्तीनंतर पेन्शनशिवाय आपल्या बापाने मिळविले काय? असे म्हणणारा, स्वत:पुरताच विचार करणारा, सिगारेट ओढणारा रंगेल वृत्तीचा तरुण या कथेत येतो. पुरोगामी म्हणजे समाजाचा विचार नव्हे का? आपण सार्वजनिक जीवनात जे चूकीचे वागतो त्या गैरकृत्यात पुरोगामित्व नसते का ? असा प्रश्न निवेदकाला पडतो. पुरोगामित्वाचा आव आणत प्रतिगामी वृत्तीच्या छायेखाली वावरणाऱ्या मानवी प्रवृत्तीवर ही कथा भाष्य करते.

### 3.2.8.4 सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न

'झोपडी' या कथेत काशिनाथची शोकांतिका मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. दोन पिढ्यांच्या जागेवर थाटलेल्या झोपडीत संसार थाटणाऱ्या काशिनाथच्या पत्नीचे बाळंतपणात मुलासह निधन होते. गरिबीमुळे पैशांच्या अभावी पत्नीचे निधन झाल्याने किमान पूर्वजांची आपली झोपडी सांभाळण्यासाठी, पैसे मिळवून आपल्या नांवावर करून घेण्यासाठी परगावी जाऊन पैसे कमवतो. पण कालांतराने आपल्याला दिलेला शब्द मोडून भाटकाराने पूर्वजांची झोपडी जमिनदोस्त करत त्या जागी थाटण्यात आलेली भाटे त्याला अस्वस्थ करतात. भाटकार शाहीत संपूर्णपणे उद्ध्वस्त झालेला काशिनाथ व्यसनाच्या आहारी जातो. ग्रामीण पार्श्वभूमीवर प्रामुख्याने कुळ मुंडकरांचे प्रश्न मांडणारी 'झोपडी' ही कथा येते. ग्रामव्यवस्थेत भाटकारांकडून होणारी सर्वसामन्यांची पिळवणूक या कथेतून येते सुखवस्तू उच्चभ्रू घराणे व मानसिकतेचे चित्रण 'मदोन्मत्त' या कथेत लेखक करतात. डेंटिस्ट असलेले डॉ. आल्बर्ट रुग्णाचे दात तपासताना शेजारून जाणाऱ्या एका मोर्च्याकडे

पाहतात अशी कथेची सुरूवात होते. बँक कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी एका सुखवस्तू बँक कर्मचाऱ्यांचा तो मोर्चा असतो ज्यात डॉ. आल्बर्टची बायको डॉलीही सहभागी असते. भरगच्च पगार असून सुखी, उच्च राहणीमान असललेल्या डॉलीचे व डॉ. आल्बर्टचे संसारचित्रही लेखक वाचकांसमोर मांडतात. आपल्या पत्नीची पगारवाढ व्हावी म्हणून तिच्या मोर्च्याचे समर्थन करणारा डॉ. आल्बर्ट आपल्या दवाखान्यात रिसेप्शनिस्ट म्हणून असलेल्या सर्वसामान्य गरीब घराण्यातील ॲन्थनीच्या पगारवाढीस मात्र नकार देतो. त्यामुळे कामावर गैरहजर राहिलेल्या ॲन्थनीला मस्ती चढली आहे असे म्हणतो. स्वतःच्या आधीच भरगच्च असलेल्या पगारात वाढ व्हावी म्हणून लढणारी मोर्चेकरी डॉलीही ॲन्थनीला माज आल्याने त्याला कामावर न घेता अन्य एखाद्या माणसाला शोधण्याचा सल्ला देते. गरीब व उच्चभ्रू समाजातील दरीचे चित्रण लेखक करतात. माज चढल्याचे ठरवले गेलेले गरीब व खरेच माज चढलेल्या उच्चभ्रूंच्या उन्मत्ततेचे चित्रण 'मदोन्मत्त' या कथेत येते. 'प्रतिकार' या कथेत पूर्वापार चालत आलेला शिंप्याचा धंदा हातातून गेल्याने नामदेव खारवी बनतो. पिढीजात शिंप्याचा व्यवसाय असलेल्या नामदेवचे बापाच्या धंद्यात मन रमेनासे होते. वडिलांचे निधन झाल्यानंतर आणि प्रामुख्याने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुंबईतील शिंपी गोव्यात येतात व आपला धंदा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. शिंपीकाम नीट येत नसल्याने नामदेवचे मशीन धूळ खात पडते व नामदेव बायको मुलांच्या पोटापाण्यासाठी खारवी बनतो. मासे पकडून विकू लागतो. देवभोळा व नशीबावर भिस्त ठेवणारा नामदेव मिळेल त्या मोबदल्यात रामचंद्राला मासे विकून परततो. आपल्या नशीबात कष्टच असल्याचे त्याला वाटते. संसाराचा रहाटगाडा ओढत असताना त्याच्या पत्नीची तब्येत खालावते, टी.बी.ची लक्षणे दिसू लागतात. उपचारासाठी पैशांची गरज असल्याने मुकाट्याने मिळेल त्या मोबदल्यात रामचंद्राला मासे विकणाऱ्या नामदेवला आपण विकणाऱ्या माशांचे खरे मोल कळते. त्यामुळे जास्त पैशांची मागणी करताच रामचंद्र भडकतो. रामचंद्र आणि नामदेव यामध्ये खटके उडतात, नामदेव नोटा फेकून देतो, नोट परत नामदेवच्या पायाशी येते त्यावेळी देवभोळया नामदेवला रामचंद्र लक्ष्मीला लाथाडल्याचे पटवून देतो. शेवटी नामदेव हतबद्ध होतो. नोटा उचलतो व चालू लागतो. देवभोळया व हतबल अशा नामदेवच्या मानसिकतेचे चित्रण लेखक या कथेच्या माध्यमातून करतात.

गोव्यातील कुंकळ्ळी गावातील, परिस्थितीमुळे फसलेल्या भोलानाथची शोकांतिका 'भोलानाथ' या कथेत लेखक मांडतात. फुटबॉल खेळताना इजा झाल्याने हॉस्पिटलमध्ये असताना प्रेयसीने दिलेला दगा व शेवटी आयुष्याला कंटाळलेला भोलानाथ या कथेत येतो. भाटकाराच्या जागेवर असलेली खोप भोलानाथ जत्रेला गेला असता बळकावली जाते. शेवटी एका कोंबड्याच्या खुराड्यात रहाण्याची पाळी त्याच्यावर येते. पाऊस वाऱ्याचा

त्याला सामना करावा लागतो. गावातील पोरे त्रास द्यायला लागतात. वाऱ्याने वादळाने असलेला निवाराही मोडतो. आसरा मागणारा फजितीचा विषय ठरतो. कुंकळ्ळीच्या शांतादुर्गेच्या छत्रोत्सवात देवीला ओवाळणाऱ्या विठ्ठलाचे घर मात्र आंब्याचे झाड मोडून पडता पडता थोडक्यात बचावल्याने त्याच्याप्रती सहानुभूती दाखविणारी लोकं आणि कुंकळ्ळीत एकानेही आपल्याप्रती सहानुभूती दाखवू नये, याची खंत त्याला वाटते. "सांग सांग भोलानाथ, तुझं लग्न होईल का?" म्हणत चिडवत फिरणाऱ्या मुलांना त्याच्या लग्नाचा विषय काढून चिडवल्याने त्यांना झोडपून काढावेसे वाटते. तो त्यांच्यावर दगड उचलणार तोच भोलानाथला चिडवू नका असे आपल्या सवंगड्यांना सांगत अजून मुले येऊ लागतात. भोलानाथचे घर मोडल्याने सहानुभूती दाखवतात. आता कुठे थांबणार हा प्रश्न विचारताच, जखम वगैरे झाली आहे का याची विचारपूस करतात. आपली विचारपूस करणाऱ्या लहान मुलांना पाहून भोलानाथ कोसळतो. ओक्साबोक्शी रडू लागतो. समोरच्या लहान मुलांचे डोळे पाणावतात असा भास भोलानाथला होतो. भोलानाथप्रती सहानुभूती शेवटी मोठ्यांच्या नव्हे तर लहान मुलांच्या डोळयात असते. 'हजाराचा काशांव' या कथेत निकलूच्या मरणानंतर हजारांचे काशांव म्हणजेच शवपेटी त्याच्यासाठी आणली जाते. रात्री दहा वाजेपर्यंत गावातील आतोन व गावातील अन्य सवंगड्यांसोबत पसऱ्यार म्हणजे दुकानावर गप्पा मारणाऱ्या निकलूची दुसऱ्या दिवशी निधनाची बातमी मिळाल्याने ते हादरतात. निकलुने सांकवावरून म्हणजेच पूलावरुन स्वत:ला तळयात झोकून देत आत्महत्या केलेली असते. निकलुच्या तब्येतीच्या तक्रारी असतात, त्यात बायकोच्या भांडणांनी तो जगण्याला कंटाळतो. पैसा मिळेपर्यंत त्याची बायको त्याला किंमत देते. कमाई बंद झाल्यानंतर बायकोचा त्रास सुरू होतो. आपली तब्येत बिघडलेली असल्याने व पुढे अजून बिघडल्यास आपल्याला आपली बायको औषधपाणी करणार नाही ही भीती असल्याने निकलुने अस्वस्थ होत हे पाऊल उचललेले असते. मरणोपरांत मात्र नवऱ्याला काळजाचा तुकडा म्हणत दु:ख व्यक्त करते. सालासांव निकलुच्या शवपेटीसाठी हजार रुपये खर्च करते. जिवंत निकलुपेक्षा मृत्यूनंतर मात्र त्याचा देह भाग्यवान ठरतो. अशी 'हजाराचा काशांव' ही कथा येते.

'भोलानाथ' हा संग्रह महत्त्वाचा ठरतो. त्यांच्या कथेत विविध विषय येतात. 'भोलानाथ' या कथासंग्रहातील 'शल्य' या कथेत माणसाच्या बदलत्या राहणीमानावर लेखक भाष्य करतात. प्रसिद्ध कंपनीचा मॅनेजर असलेला शरश्चंद्र कमलाकर बोरकर आपल्या पोटाचा वाढता घेर कमी करण्यासाठी निवेदकाकडे योगा शिकण्यास येतो. क्लायंट सोबत बैठकीत बसायला लागत असल्याने नकळत त्याचे त्या बैठकींमुळे मद्यपानही वाढलेले असते. त्यावर मात करण्यासाठी बोरकर निवेदकाकडे येतात. सुरुवातीला नियमित येत नंतर कामामुळे

उशीरा येणारे बोरकर शेवटी पूर्णपणे योगासनांचे वर्ग सोडून जातात. बऱ्याच दिवसांनी बोरकरांची व निवेदकाची भेट होते. बोरकरांच्या आग्रहास्तव निवेदक त्यांच्या बंगल्यावर जातात. कंपनीचे सगळे ऐश्वर्य असल्याने ते टिकवून ठेवण्यासाठी आरोग्याची तमा न बाळगता बैठकींना बसावे कागते, क्लायंट सोबत दारू प्यावी लागते आणि ते न केल्यास आपल्याऐवजी दुसरा कुणीतरी ते करेल व आपली जागा हिरावली जाण्याची शक्यता असल्याचे बोरकर निवेदकांना सांगतात. सुखवस्तू जगण्यातही असलेली स्पर्धा आणि त्यात आरोग्याचा दिलेला बळी निवेदकाच्या लक्षात येताच बोरकरांनी गुरुदक्षिणा म्हणून दिलेले पैसे त्याला टोचू लागतात.

### 3.2.8.5 गोव्यात असलेल्या परप्रांतीयांचा प्रश्न

आपल्या गावातून गोव्यात आलेला परप्रांतीय सिद्धप्पा गोमंतकीय वातावरण, पैसा उधळणारी माणसे, या एकुण स्थितीचे निरीक्षण करतो. इथल्या लोकांची भाषा समजून त्यांना फसविणे शक्य असल्याचे त्याला समजते. काम करून जास्ती पैसे आकारण्याचा तो विचार करतो. शामलू या आपल्याआधी पाच वर्षे गोव्यात आलेल्या आपल्याच गावबंधूकडून लोकांना कसे फसवायचे याचा धडा घेतो. लोकांच्या बंगल्यांच्या कुंपणाच्या आत साप सोडून त्यांना पकडून भाबड्या लोकांना फसवून बक्कळ पैसा जमवण्याचे तंत्र शिकवतो. परप्रांतियांचा गोव्याकडे येणारा लोंढा व भाबड्या गोमंतकीयांची होणारी फसवणूक या कथाबीजावर ‘कमाई’ ही कथा आकार घेते. ‘घाटी राजू’ या कथेत परप्रांतीय असलेला राजू गोव्यात हॉटेलमध्ये काम करत असतो, परप्रांतीय असल्याने ‘घाटी’ म्हणून कितीही हिणवले तरी त्याबद्दल राग द्वेष व्यक्त न करता गोव्यात स्वत:चे हॉटेल थाटण्याचे स्वप्न राजू बघत असतो. पण एका चोरीच्या आरोपामुळे त्याची नोकरी जाते. निवेदकाचा बुशकोट(शर्ट) शिवून आणण्यासाठी पैसे घेऊन जातो व त्या पैशातून राजू शर्ट खरेदी करतो. काही दिवसांनी लगेचच परत करतो. निवेदकात व त्याच्यात एक चांगले नाते निर्माण होते. पण पगारवाढ करत नसलेल्या हॉटेल मालकाविरुद्ध बोलल्याने त्याची हकालपट्टी केली जाते. हॉटेलमध्ये राहिलेला बुशकोट त्याला परत न केल्याने रात्री हॉटेलची कौल काढून तो मिळवण्याचा प्रयत्न करताना तो सापडतो. निवेदकाच्या त्याच्याविषयीच्या भावना दूषित होतात. कालांतराने झालेल्या एका भेटीत राजूने केलेल्या कृत्याचे कारण निवेदकाला समजते. आणि कधी तरी हॉटेल व्यवसाय सुरू करू पाहणाऱ्या राजूची दिशा बदलल्याचे त्याला जाणवते. राजूने आता हॉटेल कामगार युनियनमध्ये स्वतःला झोकून आलेले असते व गोव्यातील हॉटेल कामगारांना एकत्र करण्याचे काम त्याच्याकडे आलेले असते. भूमिपुत्र म्हणून निवेदकाला आपल्यातला खुजेपणा जाणवू लागतो. व परप्रांतीय येऊन

गोमंतकीयांवर वरचढ होणार का हा प्रश्न उपस्थित करताना, बदलत्या गोव्याचा वेग आपल्या हातात आहे का ? असा निवेदकाच्या मनात शेवटी प्रश्न उपस्थित होतो.

गोवा मुक्तीनंतरच्या कालखंडातील बदलांवर भाष्य करणारी 'सालपटं' ही कथा आहे. परप्रांतीय असलेले व खासकरून घाटावरून आलेल्या लोकांना गोव्यात घाटी म्हटले जाते. तीही त्यांच्यापैकीच एक असते. भाटकाराच्या भाटातील आंब्याची सालपटं काढल्याने तिला मारहाण केली जाते. आजूबाजूचे लोक भाटकारास तिला सोडण्याची विनंती करतात. भाटकारची समजूत काढताना वातावरण तापते. लोक लहान मुलीची बाजू घेतात. परप्रांतीय गोव्यात येऊन गोवा धुळीस मिळविल्याचे भाटकाराचे म्हणणे असते. भाटकरशाही आज कुठेतरी संपुष्टात येत असल्याचे चित्र या कथेतून व्यक्त होते. 'होली है!' या कथेत गोमंतकातील वास्को या शहराच्या पार्श्वभूमीवर परप्रांतियांच्या झोपडपट्ट्यातील जीवनाचे चित्रण करतात. परप्रांतियांनी गोमंतकात केलेल्या होळीच्या सणउत्सवातील उच्छादाचे चित्रण 'होली है!' या कथेत येते. गोव्यात गणेश चतुर्थी हा मोठा उत्सव पण होळीचे फॅड परप्रांतियांनी गोव्यात आणले व त्यामुळे मारामारी, दारू पिणे या गोष्टीही होळी समारंभात वाढल्या.  यात नशेत अंगावरून उतरलेल्या कपड्यांचे भान नसलेला कलप्पा, अम्माच्या असलेल्या दोन चोळयांपैकी एक चोळी घालून स्त्री बनून अश्लील चाले करणारा नारायण, होळीत अशा मिरवणुकी काढत मिळविलेल्या पैसे दारूवर उडवणारी झोपडपट्ट्यातील परप्रांतियांची टोळी. गोमंतकात झोपडपट्ट्यांत वाढणाऱ्या वेश्याव्यवसायांवर लेखक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतात. लेखकाचा बदलत्या गोमंतकीय समाजजीवनाचा वेध घेत वास्तवावर भाष्य करण्याचा प्रयत्न या कथेतून दिसतो. ज्ञानेश्वर कोलवेकर यांच्या 'वाटचाल', 'पिकनिक', 'वारूळ', 'सायबिणी पाव गे' या कथा गोमंतकीय समाजजीवनातील बदलांवर भाष्य करताना दिसून येतात.

### 3.2.9 सु. म. तडकोड यांचे कथालेखन

गोमंतकीय समाजजीवनातून बाहेर येत, गोमंतकीय कथेच्या प्रांतात एक नवा अविष्कार सु. म. तडकोड यांच्या कथेतून झाला. 'डोळयातले जग' (२००७) हा त्यांचा कथा संग्रह प्रसिद्ध झाला. तडकोडांच्या कथालेखनात 'फुगे', 'एलिझाबेथ', 'धग' या कथा सोडल्यास त्यांची एकंदरीत कथा, त्यांच्या कथेतील पात्रे गोमंतक प्रदेशापुरती मर्यादित राहिली नाही. प्रादेशिक वर्तुळातून तडकोडांची कथा बाहेर आली. आधुनिक नातेसंबंधातील ताणेबाणे टिपणारी ही कथा महानगरीय जाणीवा व्यक्त करते. आधुनिक जीवनातील विसंगती

टिपत मानवी अस्तित्वाचे विविध कंगोरे शोधण्याचा प्रयत्न ही कथा करते. नव्वदोत्तरी काळातील गोमंतकीय मराठी कथाकारांपैकी एक प्रयोगशील कथाकार म्हणून तडकोडांच्या कथांचा विचार करावा लागतो.

'प्रिय...' या पहिल्याच कथेमध्ये प्रियकराच्या व्यक्तिमत्वाशी जोडलेली स्त्री प्रियकरापासून दूर होत स्वतंत्र, मुक्त होते. पत्रातून आपल्या असण्याची जाणीव करून देणारी ती शेवटी आपण अजूनही असल्याची जाणीव करून देते. आपल्या दीदी व भावजी यांच्याजवळ दिल्लीला काही दिवस राहिल्यावर तिचे जीवन विस्तारत जाते, बदलत जाते व प्रियकराप्रती असलेले प्रेम कमी होते. दिल्लीत गेल्यानंतर भावजींचे विद्यापीठीय विश्व, वरदराज या पत्रकाराच्याद्वारे पत्रकरिता विश्वाची ओळख होते. एका उच्चभ्रू जगताची ओळख झाल्याने तिच्या वेशभूषेत, केशभूषेत बदल होतो, तिच्या कलागुणांना वाव मिळू लागतो. एकेकाळी प्रियकराच्या संशयी जाळ्यात अडकलेली ती, आधुनिक जगाकडे ओढली जाते. केस कापले, ड्रिंक्स घेतले, जीन्स – फ्रॉक घातले तर काय होईल असा प्रश्न प्रियकराला करत आपण स्त्रियांनी स्वत:ला जखडून का घ्यावे? नीतिमत्तेच्या जाळ्यात स्वत:ला जखडून न घेता आपल्या कार्यक्षमतेचा विचार का करू नये असे प्रश्न विचारे. आपल्या दीदी घरी नसताना सहजरीत्या भावाजींशी शरीरसंबंध ठेवते. व त्यात काही अनैतिक असल्याचे तिला वाटत नाही. उलट आपल्या आयुष्यात असलेले निखिल, वरदराजन, गौतम, आशुतोष अशा पुरुषांशी संबंध ठेवण्यात काही वावगे नसल्याचे सांगत आधुकिक जगतात नैतिक व अनैतिकतेतील धुसर होणाऱ्या सीमारेषा याचे चित्रण कथेत येते. 'स्वप्न वास्तव' या कथेत जेरूषाच्या वाट्याला आलेले भोग येतात. तिच्या आयुष्यात आलेल्या वरद या पत्रकाराची, स्त्रिया आपल्याला वापरून फेकून देतात अशी तक्रार असते व जेरूषा अत्यंत प्रामाणिकपणे त्याची रखेली बनून राहते. आपली मुलगी तरलाही वरदची रखेली बनू नये म्हणून वरदला सोडून निखीलकडे जाते. जेरूषा जोपर्यंत आपणहून आपल्याला सोडून जाणार नाही तोपर्यंत तिचा हरप्रकारे प्रतिपाळ करण्यापलीकडे आपल्या हातात काय आहे? असा प्रश्न स्वत:ला विचारत स्वत:ला पुअर रेटेड प्रियकर ठरवणारा निखिल, अशापद्धतीने वरद, जेरूषा, निखिल यांमधील नात्याचा गुंता लेखक चित्रित करतात. 'बहाण्याचा तराणा' या कथेत श्रीकांत, रेवा, विद्या यांच्या त्रिकोणाची कथा येते. अत्यंत मनस्वी, कमिटमेंटला मानणारी विद्या पीएचडीसाठी फिल्ड वर्क करायला जपानमध्ये जाते. या दरम्यान श्रीकांतला औरंगाबादच्या प्रवासात भावी पतीला भेटण्यासाठी निघालेली रेवा भेटते. मनोविश्लेषणात्मक पद्धतीने रेवा हे व्यक्तिमत्व या कथेत येताना दिसते. स्वतःलाच नकोशी झालेली रेवा आत्महत्या करू पाहणारी पण न करणारी अशी आहे. श्रीकांतशी झालेल्या संवादात टेप केलेला आवाज ती त्याला पाठवते. रेवाने पाठवलेल्या टेप्स पाहून श्रीकांत रेवात गुंतला असल्याचा

राग विद्याला येतो. आपले विद्यावर अजूनही प्रेम आहे हे सांगूनही तिला पटत नाही. दुसरीकडे विद्याला खरोखरच रेवावर व श्रीकांतचा संशय होता का? की फक्त श्रीकांतपासून दूर जाण्यासाठी तिला पळवाट हवी होती? कारण तिला भेटलेल्या स्टीवशी तिचे भावबंध जुळलेले असतात. दुसरीकडे पूर्णतः विद्यावर प्रेम असलेला व रेवावर नव्हे तर पुरुषांचा आवाज टेप करणाऱ्या तिच्या छंदावर धुंद असलेल्या श्रीकांतच्या गुंतागुंतीची कथा येते. नातेसंबंधामधील गुंतागुंत तसेच मनोविश्लेषणात्मक पद्धतीने मानवी वृत्ती प्रवृत्ती या कथेमध्ये लेखक चितारताना दिसतात.

'तो, ती आणि मांजर' या कथेमध्ये नोकरीच्या पहिल्या दिवशी मृत्यू झालेल्या तरुणीची कथा येते. चांगल्या वस्तू विकत घेता याव्यात यासाठी ओव्हरटाइम करणाऱ्या तिच्या वडिलांचा कार्यकाळ संपतो. आता ती नोकरीसाठी बाहेर पडते पण कामासाठी निघताना बाहेर पत्ते खेळणारा तिचा भाऊ, आपली बहीण पहिल्याच दिवशी कामाला जात असतानाही शुभेच्छा देत नाही. पुढे मांजर दिसल्यानंतर तिच्या भाववृत्तीत बदल होतो आणि बुलडोझरने उद्ध्वस्त केलेले तिचे स्वप्न, आधुनिक जगण्यात यंत्राने निर्माण केलेल्या विध्वंसावर भाष्य करतात. मानवी अस्तित्वाचे वेगवेगळे कंगोरे या कथेमध्ये उमटताना दिसतात. 'एत सेतरा' ही रघुनाथ हरिराम लाड या तिशीतल्या 'होमो'ची कहाणी आहे. स्वतःचे जग व इतरांचे एक जग अशा दोन पातळयांवर जगणाऱ्या रघुनाथवर जेरूषाचे प्रेम जडते. रघुनाथचे बॉस असलेल्या गृहस्थाची ती पती आहे, पण आपला पती 'होमो' असल्याकारणामुळे त्या वस्तूस्थितीचे भांडवल करून ती घटस्फोट घेऊ पाहते. कित्येक वर्षांनी रघुनाथची भेट झाल्यानंतर ती उमलून येते पण रघुनाथही 'होमो' असल्याचे समजतात ती कोसळते. मानवी संवेदनेचे स्वरूप आधुनिक काळात भीषण होत असल्याचे कथा सांगते. आपण कितीही उच्चभ्रू असलो तरी आपण शेवटी 'एत् सेतरा'च असतो यावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे. 'ढग' व 'फुगे' या प्रादेशिक पार्श्वभूमीवर आलेल्या कथा दिसून येतात. 'धग' या कथेत दारुडा असलेला सगुण आपल्या पत्नीत गुंतलेल्या पत्रकाराची हत्या करतो. पोर्तुगीजांना शरण आणण्यासाठी आलेल्या भारतीय सैनिकांच्या आगमनामुळे गोव्यात मुक्त वातावरण मिळेल व आपल्याला त्याचा लाभ होईल म्हणून आश्वस्त राहतो. 'फुगे' या कथेमध्ये स्त्रीची फुगे विकून चाललेली जगण्याची धडपड लेखक चित्रित करतात. अत्यंत प्रयोगशील पद्धतीने मानवी अस्तित्व, नातेसंबंध अशा भिन्न पातळीवरचे अनुभवविश्व लेखक टिपतात.

### 3.2.10 उदय नाईक यांचे कथालेखन

उदय नाईक यांचे 'अवसर' (२०११), 'घुमटगाज' (२०१८) हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले. गोमंतकातील ग्रामीण लोकसंस्कृती, लोकसमजुती, परंपरा यांच्या पार्श्वभूमीवर 'घुमटगाज', 'चवथ', 'देव', 'भोवंडी', 'रोट' 'पाडवा', 'अवसर' या कथांमधून ग्रामीण लोकजीवनाशी जुळलेल्या ग्रामीण मनाचे चित्रण येते. सामाजिक प्रश्नांकडे डोळसपणे पाहणारे लेखक प्रभावीपणे आशयसूत्रे साकारताना दिसून येतात.

### 3.2.10.1 सामाजिक स्पंदने टिपत मानवतावादी दृष्टीकोनाची उपेक्षा व्यक्त करणाऱ्या समाजात बळावलेल्या प्रवृत्तींचे चित्रण करणाऱ्या कथा

उदय नाईक यांच्या काही कथांमध्ये लेखकाला लाभलेल्या मानवतावादी दृष्टीचा प्रत्यय वाचकांस येतो. 'शोधिसी मानवा!' या कथेतून लेखकाला लाभलेल्या संवेदनशील मनाचा परिचय वाचकांना होतो. देवळाच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक करून पुण्य कमावण्यास मल्लिकार्जुन देवालयाच्या बाहेर जमलेली गर्दी पण भुकेल्या माणसाला माणुसकीच्या नात्याने मदत न करता उलट लाथाडणाऱ्या समाजाचे चित्रण लेखक या कथेतून करतात. तिकीट कलेक्टरकडून रेल्वेतून हाकलली गेलेली बाई, आपल्या तान्हुल्या मुलास घेऊन श्री देव मल्लिकार्जुनाच्या आवारात अन्नाच्या आशेने येते. तिथल्या शिपायाकडूनही हाकलली जाते. लोक भरपूर पुण्य मिळविण्यासाठी मल्लिकार्जुनास दुग्धाभिषेक करण्यास जातात. एकीकडे तिच्या बाळाचे केविलवाणे रडणे तर दुसरीकडे काळया पिंडीवर ओघळणाऱ्या शुभ्र धारा व चाललेला मंत्रघोष याचे चित्रण लेखक करतात.आपल्या मुलासाठी ती तिथे दिसणारा एक दुधाने भरलेला तांब्या उचलते, दूधाचा तांब्या ठेऊन गेलेला माणूस धावत पळत येतो व तिला शिव्यांची लाखोली वाहतो. तोवर तिच्या हातातून तांब्या निसटलेला असतो. काही दूध तिच्या पदरावर सांडते व उरलेले दूध फरशीवरून वाहू लागते. तिला लाथाडण्यात येते. आपल्या दुधाने भरलेल्या पदरावरचे दूध ती बाळाला पाजू लागते. देवाच्या पिंडीवर वाहिलेले दूध जमिनीत गडप होते व श्री मल्लिकार्जुनाच्या मुर्तीवरचे हास्य मात्र गढुळ होत जाते. पुण्य कमावण्यासाठी देवाच्या पिंडीवर दुग्धाभिषेक केला जातो पण मानवतावादी वृत्तीचा अभाव असलेल्या या जगण्यात पोटापाण्यासाठी धडपडणाऱ्या जीवांची मात्र कोणाला पर्वा नसते. असा मानवतावादी सूर 'शोधिसी मानवा' या कथेत व्यक्त होतो.

कथाकाराचे संवेदनशील मन सामाजिक स्पंदने टिपते याचा प्रत्यय ‘महाप्रसाद’ या कथेतून येतो. देवदर्शनास गेलेली वृद्ध काकीबाय देवळात दर्शनाला गेली असता देवळातील भटजी लगबगीने पुढे येत तिला जास्त वेळ न रेंगाळता दर्शन घेण्याचे बजावतो. दुसरीकडे आलेल्या श्रीमंत माणसाने मात्र, दिलेले पाचशे रुपये घेत लांब लचक सांगणे करतो. त्यांना प्रसाद म्हणून हार व केळी दिली जातात. देवळातील महाप्रसादासाठीच्या रांगेत काकीबाय थांबते तर पंगतीत बसण्यासाठी लोकांची तुडुंब गर्दी असते. अग्रशाळेतील दार श्रीमंत पांडूबाबासाठी हळूच उघडले जाते. व जेवणासाठी रांगेत पुढे जाणाऱ्या काकीबायवर मात्र महाजन खेकसतो. थोड्यावेळाने अग्रशाळेचे दार उघडते. गर्दी तिला ढकलून जाते. त्या खाली कोसळतात. त्यांच्या हाता पायांवर पावले पडू लागतात. दोन्ही अग्रशाळा पुन्हा भरतात व धक्याबुक्यांनीच पोट भरलेली ती वृद्धा परतीच्या वाटेला लागते. देवाच्या दारीही होणाऱ्या उच्चनीचतेच्या सामाजिक भेदाचे चित्रण ‘महाप्रसाद’ या कथेत येते. आजचा समाज हा संवेदनाहीन व आत्मकेंद्री बनत चालल्याचे चित्रण त्यांच्या कथेत येते. समाजाचे विलक्षण भान असलेली ‘रस्ता रोको’ ही कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. विरोधी पक्षनेते नीळकंठ साळवी यांच्या सूचनेनुसार कामगार चळवळीचा भाग म्हणून ‘रस्ता रोको’ आंदोलन निश्चित केले जाते. या आंदोलनाची मानवी संवेदना बधीर करणरी अशी क्षणचित्रे लेखक टिपतात. कितीतरी इंटरव्ह्यू नापास झालेली कोमल या वेळी मंत्र्याची शिफारस कशीबशी मिळवते व लगबगीने इंटरव्ह्यू साठी निघते. पण वाटेत ती जात असलेली बस, काचेचे तुकडे, दगड धोंडे टाकून कामगार युनियनमार्फत अडविली जाते. सर्वसामान्यांच्या जीवावर उठलेल्या चळवळीतील कार्यकर्त्यांमुळे तिला घरी परतणे भाग पडते. इंटरव्ह्यू देता न आल्याने आपल्या आई वडिलांचे वाढते वय, भावाचे शिक्षण, स्वत:चे लग्न या जबाबदाऱ्यांची भिस्त नोकरीवर ठेवलेली कोमल मानसिकदृष्ट्या कोसळते. दुसऱ्या प्रसंगात रोहिणीने स्टोव्ह पेटवताच स्टोव्हचा स्फोट होऊन ती पूर्ण भाजते. तिला हॉस्पिटलमध्ये नेण्यास बाहेर चाललेल्या ‘रस्ता रोको’ आंदोलनामुळे रिक्षेवाले तयार होत नाहीत, शेवटी बऱ्याच वेळाने उस्मानकाका तयार होतो. आंधळ्या झालेल्या कामगारांच्या जमावातून वाट काढत हॉस्पिटलमधे पोहोचतात पण तोवर रोहिणीची प्राणज्योत मालवते. तिसऱ्या प्रकरणात कामगार युनियनच्या संपाचा पुढारी असलेल्या रघुनाथच्या बायकोला प्रसुतीच्या कळा येऊ लागतात. संपातून बाहेर पडलेल्या रघुनाथला जमाव आवरणे अशक्य होते. त्याची पत्नी मरणप्राय वेदना सोसते, हॉस्पिटलमध्ये नेण्यास वाहतूक अडविल्याने तो संप मागे घेण्याचा प्रयत्न करतो पण जमावाच्या डोळ्यांत खून संचारलेला असतो. धावत पळत तो घरी येतो पण त्यानेच पुकारलेल्या संपामुळे त्याच्या बायकोचे प्रसूतीनंतर मुलाचा जन्म देत निधन झालेले असते. टाहो फोडणारे अर्भक व चादरीत लपेटलेला पत्नीचा देह

पाहून तो कोसळतो. संध्याकाळच्या सहाच्या वेळी कुठून कुठून आलेली सगळी माणसे निघू पाहतात. पण 'रस्ता रोकोमुळे त्यांच्या सर्व वाटा अडवल्या जातात. सुलतानला गोळ्यांवशिवाय श्वास घेणे कठीण होतेय हे बघून भीतीने वृद्ध हमीद खुदाची करुणा भाकत असतो. सकाळच्या वेळी गावातून आलेली मीरा गौळण गर्दीत अडकते व सकाळपासून उपाशी असलेल्या आपल्या मुलाच्या काळजीने चिंतीत होते. इतक्यात तिथे असलेल्या किशाच्या चहाच्या गाड्याकडे जात हमीद चहा मागतो. सकाळपासून गर्दीत अडकलेली माणसेही त्याच्या भोवती जमतात. तेवढेच थोडे गिऱ्हाईक मिळाले म्हणून किशा चमकतो. एक दिवसही बंद पाळता येत नाही ? असा प्रश्न विचारत दातओठ खात येणारी माणसे जळत्या स्टोव्हवर स्टूल फेकून आग लावून गरीबाचा धंदा उद्ध्वस्त करतात. दिवसभराच्या या 'रस्ता रोको'ने निर्माण केलेल्या या चार शोकांतिका आणि त्या रात्री अकरा वाजता राजकीय नेत्यांची बंगल्यात रंगलेली पार्टी. सर्वसामान्यांना चेतवणारे राजकारणी व स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेणारी सर्वसामान्य जनता. संप, घोषणाबाजी, जाळपोळ करून स्वत:च्याच सग्यासोयऱ्यांना त्रास देणारी जनता. राजकारणाची पोळी भाजणारे राजकारणी व जनतेत आपसात वाद निर्माण करणारी सर्वसामान्य जनता व विरोधी पक्ष काय किंवा सत्ताधरी पक्ष काय, "आम्ही सगळे भाऊ भाऊ" असा सूर लावणारे राजकारणी या कथेच्या शेवटी दिसून येतात. राजकारणामुळे सर्वसामान्यांच्या होणाऱ्या पिळवणूकीचे चित्रण लेखक करतात.

'नरकासुर' या कथेत नरकासुराच्या देणगीसाठी लोकांना छळणाऱ्या मुलांच्या टोळक्याचे चित्रण येते. दारू पिऊन लोकांशी दादागिरी करणारी टोळी, रोख रक्कम न देता चिल्लर देणाऱ्या लोकांच्या अंगावर जाणारा टोळक्यातला राजेश दिसून येतो. आपाला हार्ट ॲटॅक आलेला असतो व हॉस्पिटलमध्ये नेत असताना देणगीसाठी आपाला नेणारी गाडी अडवली जाते. नरकासुरास पैसे न दिल्यास सोडणार नसल्याचे पांडू सांगतो. आपल्या वडिलांना हृदयविकाराचा धक्का आल्याने आपली वाट सोडण्याची विनंती यशवंत करतो. पण त्यांना त्रास देत वडिलांच्या उपचारानंतर डॉक्टरांना देण्यास नेलेले ५०० रुपये रमेश यशवंताकडून हिसकावून घेतो. एवढ्यावर न थांबता टोळक्याकडून गाडीचा टायर पंक्चर केला जातो. या कालावधीत आपा प्राण सोडतात. आपाच्या तोंडून वाहणारा फेस पाहून हंबरडा फोडणारी त्यांची मुले व दुसरीकडे नरकासुराची प्रतिमा वेडीवाकडी नाचवत जाणारी मुले प्रतिनरकासुरच भासतात. अशापद्धतीने मानवी संवेदना व माणुसकी हरवलेल्या असुरी प्रवृत्तींचे चित्रण लेखक 'नरकासुर' या कथेतून प्रतिकात्मक पद्धतीने लेखक करतात.

'भंगार' या कथेतील नारायण मास्तरांच्या घराबाहेरच परप्रांतीय इसमाकडून भंगार अड्डा घालण्यात येतो. मास्तर त्याबद्दल जाब विचारताच मुनिसिपाल्टीच्या पागी या नगरसेवकास हजारो रुपये दिल्याचे तो इसम सांगतो. आपल्या घरासमोरील भंगार अड्याने ते हैराण होतात. नगरसेवकांकडे जात भंगार अड्यावर बंदी आणावी म्हणून प्रयत्न करतात. पण सरकारची जागा नसल्याने आपल्याला काही करता येणार नसल्याचे ते सांगतात. नगरसेवक पागीच भंगार अड्डेवाल्याला शह देतात. व म्हातारा मास्तर म्हणत टिंगल उडवतात. मास्तर म्युनिसिपाल्टी, पोलिस, उपजिल्हाधिकारी सर्वांना अर्ज देतात पण कायद्याच्या अंमलबजावणीतील रटाळवाणेपणाला कंटाळून खंगतात. भंगार अड्ड्यामुळे जीवाणूंचा, सापांचा सुळसुळाट वाढू लागतो. आणि एके दिवशी भंगार अड्डा पेट घेतो. भडकलेल्या आगीत मास्तरांची खोप (झोपडी) जाळून जाते व भडकलेली आगीत मास्तरांचे घरही पेट घेते. मास्तर आता नवीन घर घेतात. सुखाने तिथे रहात असताना तिथेही केरळातून आलेला परप्रांतीय इस्माईल अड्डा घालण्यासाठी आलेला असतो. 'हिजडा' या कथेत सर्वत्र थैमान घालत लोकांना लुबाडणाऱ्या हिजड्याचे चित्रण लेखक करतात. लहान मुलांपुढे येऊन कानशीलांवर कटकट बोटे मोडत त्यांच्याकडून पैसे गटवणारा, कुणाच्या हनुवटीला, कुणाच्या गालाला, कुणाच्या खांद्याला हात लावत पैसे लुबाडू पाहणारा, खरेदीसाठी थांबलेल्यांच्या हातातल्या नोटा लुबाडणारा व हिजड्यांच्या शिव्यांचा श्राप लागतो या समजूतीने त्रास देण्यास मोकळा असलेला हिजडा या कथेतून दिसतो. एका लहान मुलाचा बाप आपल्या मुलावर 'हाय हाय' करून धपाटा घालणाऱ्या हिजड्यावर चिडतो. काही केल्या हिजडा पाठ सोडत नसल्याने तो त्याच्या कानफटात थप्पड लावतो. बाजूची मंडळीही पुढे सरसावतात व हिजड्याला मारहाण केली जाते. हल्ला गुल्ला पाहून रेल्वे पोलीस येतात व हिजडा सुटतो. काही लोक हिजड्याकडे सहानुभूतीने बघतात. हिजडा सूर्य मवाळल्यानंतर आपल्या परतीच्या वाटेला लागतो. झुडूपात एक कार उभी असते. खिशातून गाडीची चावी काढून तो गाडीचे दार उघडतो. हिजड्याचे सोंग घेत हिजड्याचा धंदा करून बक्कळ पैसे कमावणाऱ्या, आयुष्य आरामात जगणाऱ्या लोकांचे वास्तववादी चित्रण 'हिजडा' या कथेत येते. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये' असे म्हणत, हिजडा पैशांसाठी सर्वसामान्यांना कशा पद्धतीने फसवतो याचे वास्तववादी चित्रण लेखक करतात.

'हत्ती' या कथेत बागायतीत हत्तीने केलेल्या विध्वंसाचे, तांडवाचे चित्रण लेखक करतात. बागायतीची नासधूस करत बागायतीत घुसलेला हत्ती मधुच्या वडिलांना चिरडतो. त्या दिवसापासून मधुला हत्ती नकोसा होतो. शाळेत मास्तर हत्तीचे चित्र काढायला लावताच त्याच्या जखमा ताज्या होतात. फळ्यावरील हत्तीच्या

चित्राकडे तो तिरस्काराने बघतो. घरी आल्यानंतर आपल्या अंगणात आलेल्या हत्तीची पूजा होत असल्याचे पाहून त्याला राग येतो. आपली आईही हत्तीला ओवाळण्यास ताट घेऊन आल्याचे बघताच तो हादरतो. आईने पाया पडून हत्तीला देण्यास सांगितलेले पैसे तो हत्तीवर फेकून देतो व सर्वांना खोटारडे म्हणत रडत पळत सुटतो. हत्तीच्या नावाने उदो उदो करणाऱ्या, ‘हत्ती आला... हत्ती आला...’ म्हणत नाचणाऱ्या मुलांचा आवाजही त्याचा पाठलाग करू लागतो. ‘हत्ती’ या कथेतून कोवळया बालमनाच्या विश्वात हत्तीने वडिलांना जीवे मारल्याचा ठसा, वडिलांच्या शरीरावर उमटलेले रक्ताचे डाग बालमनावर कोरल्याने उमटणाऱ्या तिरस्काराचे पडसाद ‘हत्ती’ या कथेतून लेखक चित्रित करतात.

### 3.2.10.2 बोधप्रधान स्वरूपाच्या कथा

बातमी’ या कथेत एखादी अफवा बातमीसारखी कशी पसरू शकते याचे चित्रण करतात. इंजेक्शन टोचणारी टोळी अशी बातमी गोवाभर अस्वस्थता निर्माण करते. शाळेतील मुलांना गेटबाहेर लाल झगा घातलेल्या महिला इंजेक्शन टोचत फिरत असलेली बातमी पसरते. एड्सच्या रक्ताने भरलेली इंजेक्शन्स एक माथेफिरू टोळी टोचतेय अशी बातमी पसरली जाते. त्यामुळे भितीनेच बसमध्ये काहीतरी टोचल्यासारखे वाटताच एक बाई किंचाळते. गर्दीच्या ठिकाणी फिरणाऱ्या प्रत्येकाच्या मनात प्रचंड भिती निर्माण झालेली असते. आशू व केतन ही शाळकरी मुले गर्दीत लोकांची फजिती करण्यासाठी टाचणी टोचतात व एड्सचे इंजेक्शन म्हणून अफवा पसरते. या अफवेचा फायदा घेत लोकांची फजिती करण्यास पुढे सरसावलेली एक प्रवृत्तीही या कथेतून दिसून येते. अंधश्रद्धा व अफवा कशा पसरविल्या जातात याचे प्रत्ययकरी चित्रण ‘बातमी’ या कथेतून येते. काही काळापूर्वी पसरलेल्या अशाच स्वरूपाच्या गोव्यातील अफवेची आठवण करून देणारी ही कथा ठरते.

‘शेवाळ’ या कथेत कर्तव्यदक्ष व लाच न घेणाऱ्या आपल्या नवऱ्याला प्रमोदला शालू त्याच्या प्रामाणिक स्वभावामुळे दोष देते. उंची कपडे, नेकलेस व गाड्या घेऊन फिरणाऱ्या इतरांच्या नवऱ्याशी त्याची तुलना करते व पतीला सोडून जाते. निळकंठ जाधव आपल्या बेकायदेशीर जमिनीच्या व्यवहारावर सही घेण्यास प्रमोदकडे येतो पण लाच न घेऊ पाहणाऱ्या प्रमोदची तत्त्वनिष्ठा आड येते व निळकंठ जाधव यांचा प्रस्ताव अमान्य करत प्रमोद फेटाळतो. आपल्या प्रामाणिकतेमुळे बायको सोडून गेल्याचे कळताच दिलेली लाच स्वीकारून पत्नीच्या मनाप्रमाणे वागण्याचा निर्णय प्रमोद घेतो. त्यावेळी लाच घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या घरात धाड पडल्याने प्रमोदची बदनामी झाल्याचे व नोकरीही गेल्याचे शालूला समजते. आपल्यामुळे आपल्या नवऱ्याची अब्रू गेली यामुळे ती

अस्वस्थ होते. दुसरीकडे एका मैत्रिणीच्या नवऱ्याच्या गाडीला अपघात झाल्याचे बघत गाडी नसलेली बरे असे तिला वाटते. आपल्या हट्टामुळे आपला पती लाच स्वीकारण्यास गेला असल्याच्या जाणिवेने तिचे हृदय धडधडू लागते. 'शेवाळ' या प्रतीकाच्या माध्यमातून शेवाळ कितीही सुंदर आणि मखमली असले तरी त्यावरून चालणं धोकादायक असल्याने आपटून कपाळ मोक्ष होऊ शकतो त्याचप्रमाणे जीवनात वरवर सुखी व सुंदर दिसणाऱ्या गोष्टी आपले जीवन मातीमोलही करू शकतात अशी भीती या कथेतून व्यक्त होते.

### 3.2.10.3 समकालीन सामाजिक प्रश्नांवर, समाज वास्तवावर भाष्य

'भाषणबाजी' या कथेत बेकारी, शिक्षण, बालमजुरी या विषयी आपली पुरोगामी मते मांडणारे पुढारी मनोहरराव पाटील. भाषणबाजीनंतर शिक्षणासाठी चोपडी घेण्यास पाच रुपये मागण्यासाठी आपल्याकडे आलेल्या महादेव व त्याचा मुलगा शिवाला पैसे देण्यास नाकारतो. शिकून आपल्याला काय करायचे आहे? असा प्रश्न विचारत, शिवाला शाळेत न पाठवता आपल्याकडे वाड्यात कामासाठी पाठवण्यास सांगतो. भाषणबाजीत शिक्षणाचे महत्त्व सांगणाऱ्या, बालमजुरीला विरोध करणाऱ्या मनोहरराव पाटील यांच्या माध्यमातून लेखक ढोंगी भाषणबाजी करणाऱ्या स्वार्थी राजकीय प्रवृत्तीचे चित्रण करताना दिसून येतात.

'दुर्बुद्धी' या कथेत चिकणमाती मिळत नसल्याने मूर्तिकार बाबी मेस्त गणपतीला गाऱ्हाणे घालत मूर्ती तयार करण्यासाठी चिकणमाती मिळत नसल्याचे सांगतो. मातीचा दर्जा घसरल्याने माती बडवायचे ठरवतो. माती आणण्यासाठी कामगार मिळत नसल्याने तो त्रस्त होतो. एका दिवसाचे तीनशे रुपये याप्रमाणे माणूस मिळवून देण्याचे भिकू कबूल करतो. वर्षपद्धतीप्रमाणे चिकणमाती असलेल्या जमिनीकडे जाताच ती जमीन एका मोठ्या बिल्डरने घेतल्याने तो बाबीला अडवतो. या वर्षी माती नेण्याची परवानगी देत पुढच्या वर्षी आपण इथे हॉटेल बांधणार असल्याचे सांगतो. माती मिळविल्यानंतर कारागीर मिळविण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू होतात. रंग, कारागिरांची फेती यामध्ये भरपूर पैसा खर्च होतो व मूर्तींच्या किंमती वाढतात. महाग असलेली चिकणमाती नको म्हणून पारंपारिक धंद्यात असलेल्या कारागिरांना डावलून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या कमी किमतीच्या मुर्त्या आणल्या जातात. या सगळ्याला कंटाळलेला बाबी चतुर्थीनंतर विसर्जित केलेले गणपती पुन्हा वर काढतो. पुढच्या वर्षी याच मूर्ती ठीकठाक करून विकायचा निर्णय घेतो. विहिरीत उतरलेल्या बाबूची एका गावकऱ्याला चाहूल लागल्याने तो गावातील लोकांना गोळा करतो. मूर्तीची विटंबन करणाऱ्या समाजकंटकांचे हे काम असल्याचे त्यांना वाटू लागते. विहिरीतील मूर्ती वर ठेवण्यास आलेला बाबी झाडीत लपतो व गावकऱ्यांपासून

स्वत:ची सुटका करून घेत आपल्याला विसर्जन झालेले गणपतीबाप्पा वर काढण्याची दुर्बुद्धी झाल्याने स्वत:लाच दुषणे देतो. व आपल्याला संकटातून सोडवण्यास गणपतीकडे सांकडे घालतो अशी कथा येते. पारंपारिक धंद्यांना लागलेली ओहोटी व पारंपारिक धंद्यापुढे असलेल्या प्रश्नांचे चित्रण 'दुर्बुद्धी' या कथेत येते.

गोव्यामध्ये चालणाऱ्या 'धिरियो' परंपरेचे चित्रण लेखक करतात. धिरियो खेळा अंतर्गत दोन रेड्यांना चेतवले जाते व त्यांच्यात मनोरंजनासाठी व पैशांसाठी भांडण लावले जाते. कोणता रेडा जिंकणार यावर बेटिंग केली जाते व जनावरांना नाहक त्रास दिला जातो. या गोव्यातील पारंपारिक खेळाच्या पार्श्वभूमीवर 'धिरियो' ही कथा येते. फ्रान्सिस व सांतानचे आपापसात वैर असते. सरपंचपदाच्या निवडणुकीत सांतानला फ्रान्सिसने हरविल्याने सांतानच्या मनात राग धुमसत असतो. फ्रान्सिसचा रेडा ड्रॅगन व सांतानच रेडा रेडक्रॉस या दोहोंना चेतवले जाते याचे चित्रण करताना लेखक लिहितात, "सांताननं बुटीतला रेबा रेडक्रॉसवर फासला. फ्रान्सिसनं बादलीतलं बर्फाचं पाणी ड्रॅगनवर ओतलं. दोघेही रेडे चवताळले. सांताननं रेडक्रॉसची शेपटी प्रिगळली. फ्रान्सिसनं अणकुचीदार खिळ्याची काठी ड्रॅगनवर हाणली. वाळू उडवतच दोन्ही रेडे उसळले. डोकी खाली करून पुढे झेपावले. लोक बादलीतून पाणी, रेबा फेकू लागली. रेड्यांनी एकमेकांना जबरदस्त धडका दिल्या. शिंगाचा खडखडाट सुरू झाला. शिग एकमेकांत अडकू लागली. सुटू लागली. अंगात घुसू लागली. लाल रक्त सांडू लागलं. अचानक ड्रॅगननं जोरदार धडक दिली. त्याची शिंगं रेडक्रॉसच्या पोटात घुसली. रेडक्रॉस दूर फेकला गेला. भस्सदिशी रक्त आलं. जमाव आरोळ्या ठोकू लागला. "मार काबार कॉर... किल हिम. फिनीश कॉर..." फ्रान्सिस ओरडला. "गेटअप रेडक्रॉस... उठ उठ. फायट. फायट.." रेडक्रॉसची अवस्था बघून सांतान ओरडला. रेडक्रॉस हैराण झाला होता. रक्तानं माखला होता. ड्रॅगनच्या डोळ्यांत खून भरला होता. पाठीवर काठीचा दणका बसताच ड्रॅगन उसळला. ड्रॅगनचा अवतार बघून रेडक्रॉस थरारला. कसाबसा उठला. वाट फुटेल तिकडे पळू लागला. जमाव गडबडला. सैरावैरा धावू लागला. रेडक्रॉसला वाट देऊ लागला."[6] जीवाच्या आकांताने उधळलेला रेडक्रॉस दर्याच्या दिशेने धावत सुटतो व चारशे – पाचशे फुटांवर चिऱ्यांच्या तळपावर कोसळतो. व गतप्राण होतो. अमानुषपणे पैज जिंकणारे आरोळी ठोकतात. रेडक्रॉसच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी सांतान बुलडॉग या नवीन रेड्यावर तीस हजार रुपयांची धिरी लावून रिंगणात उतरवतो. फ्रान्सिसचा रेडा ड्रॅगन व सांतानचा रेडा बुलडॉग या दोहोंमध्ये भांडण चेतवले जाते. बुलडॉग ड्रॅगनवर भारी पडू लागतो. अचानक लोकांमध्ये उसळी घेतली जाते, लोकांमध्ये चेंगराचेंगरीला सुरूवात होते. फ्रान्सिस उधळलेल्या ड्रॅगननला अडविण्याचा प्रयत्न करतो तर सांतान बुलडॉगला चेतविण्यास त्याच्या पाठीवर चाबकाचा फटकारा ओढतो. त्याच्या पाठीवर

सळसळून वळ उठतात व बुलडॉग सांतानवर चाल करून येतो. बुलडॉगची जोरदार धडक त्याच्या पोटात बसते, सांतान फेकला जातो व माडावर आपटतो. रक्ताळलेल्या सांतानला धिरियो सोडण्यास सांगणारे वडील आठवतात. मुक्या जनावरांना सतावू नकोस, जर ती चवताळली तर माणूस मेल्याशिवाय ती सोडत नाहीत असे सांगणारे वडील आठवतात. सांतानला उठायला जमत नाही. बुलडॉग फुरफुरत माती उडवत परत त्याच्यावर प्रहार करण्यास सज्ज असतो. रक्ताळलेल्या हाताने सांतान, “किल हिम...किल हिम...किल दॅट बास्टर्ड...” असे चेतवीत असतो. जनावरांना स्पर्धेत जुंपत त्यांना सूड उगविण्याचे माध्यम बनवलेल्या सांतानला स्वत:चा जीव गमवावा लागतो. गोव्यातील धिरियो परंपरेतील अमानुषता या कथेत व्यक्त करताना लेखक दिसतात.

नोकरी मिळविण्यासाठी व नोकरी मिळाल्यानंतर पैशांसाठी वाढलेल्या भ्रष्टाचारी वृत्तीचे चित्रण ‘चिरीमिरी’ या कथेत येते. सर्वसाधारण कॉन्स्टेबलीची नोकरी मिळविण्यासाठी कॉन्स्टेबल कवळेकर रिवणकार या स्थानिक आमदाराला दोन लाख रुपये देतो. नोकरीचा पगार घरखर्चाला पुरत नाही. मुलाची फी, औषधे याचा खर्च कसा बसवावा हे त्याचे रोजचे प्रश्न असतात. पुन्हा पन्नास साठ हजारांचे असलेले कर्ज फेडता फेडता नाकी नऊ येत असल्याने कवळेकर लोकांकडून मिळणारी चिरीमिरी म्हणजे जमवलेल्या लाचेच्या पैशातून आपल्या संसाराचा खर्च निभावतो. पोलिसी नोकरीत हाच फायदा असल्याचे त्याला वाटते. मोठ मोठे पोलीस कमिशनर खातात तर आपण थोडं खाल्लं तर काय बिघडले ? अशा विचारांचा कवळेकर दिसून येतो. वाहतुकीची कोंडी शिस्तीत आणण्यासाठी त्याची मडगावच्या सर्कलवर नेमणूक केली जाते. प्रचंड वर्दळ असलेल्या त्या रस्त्यावर वाहतुकीचे नियम तोडून जाणाऱ्या माणसाला अडवून लाच घेता येईल या आशेने तो आनंदी होतो. दारू पिऊन गाडी भरधाव वेगाने हसत खेळत, ओरडत चालविणाऱ्या पोरांना दारू पिऊन गाडी चालवत असल्याने पकडतो, पोलीस स्टेशनमध्ये डांबण्याची धमकी देतो व लोकांपासून थोडे दूर नेत त्यांच्याकडून पैसे वसूल करून आपला खिसा भरत त्यांना सोडून देतो. सोडण्याच्या बदलात शंभर रुपयांच्या पाच नोटा त्यांच्याकडून वटवतो. दुपारच्या वेळी परत ड्युटीवर गेला असताना त्याला साहेबांचे बोलावणे येते व शाळेतून येणाऱ्या त्याच्या मुलास भरधाव येणाऱ्या गाडीने ठोकर मारल्याने मुलाची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे समजते. चौकशीअंती आपण लाच घेऊन सोडून दिलेल्या मुलांनीच आपल्या मुलाला ठोकरल्याचे सत्य त्याला कळते. लाच घेतलेले पैसे खिशात नागिणीसारखे डसू लागतात व कवळेकर हतबल होत खाली कोसळतो.

एड्स झालेल्या जोडप्याने आत्महत्या केल्याने त्याच्या निष्पाप मुलाच्या जीवनाच्या वाताहतीचे चित्रण ‘निष्पाप’ या कथेत येते. एड्सच्या रुग्णाला दिल्या जाणाऱ्या किळसवाण्या वागणुकीचे चित्रण या कथेत येते. आपल्याकडे येणारी माणसे आपल्याला व आपल्या आई वडिलांच्या मृतदेहांना किळसवाण्या नजरेने बघत असल्याची जाणीव त्याला होते. आई वडिलांच्या मृत्यूपश्चात त्याची जबाबदारी काका काकीवर येते. लहान मुलाला एड्स झाल्याकारणाने संसर्ग होऊ नये म्हणून उमाकाकी त्याला गोठ्यात ठेवते. तिथे किड्या मुंग्यात व घाणीत तो चिमुकला जगत असतो. पत्रकारांकडे ही आयती संधी चलून येते. एड्सग्रस्त बालकाच्या गोठ्यात झालेल्या सोयीवर बातम्या होतात. पत्रकार त्याला घेऊन निघून जाताना ते चिमुरडे डोळे पुन्हा आई वडिलांना शोधू लागतात. एड्सग्रस्तांसाठी उभारलेल्या केंद्रात त्याला नेले जाते. त्याची तपासणी करून त्याला एड्स झाल्याचे नश्चित केले जाते. आपल्याला पेशंट मिळाला, व दर महिन्याला प्रती पेशंट दोन हजार रुपये मिळणार असल्याने आपल्या कमिशनसाठी थांबलेले एड्सग्रस्तांसाठी काम करणाऱ्या प्रवृत्तीचे चित्रण कथेत येते. त्या चिमुकल्याला दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी त्याला ओरबाडले जाते. थोबाडीत मारून त्याला फरफटत नेले जाते. त्याच्या अंगाची सालपटं निघतात. आई वडिलांना हाका मारत तो टाहो फोडतो कॉन्क्रिटच्या भिंतीत त्याच्या वेदनेचा प्रतिध्वनी उमटत असतो. वाचकांना अत्यंत भावूक करणारी कथा चिमुकल्या एड्सग्रस्त मुलाची शोकांतिका मांडत. समाजातून हरवलेली मानवतावादी दृष्टी निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करते.

प्रभाकरच्या आई उर्मिलाचा आपल्या एकुलत्या एक मुलाचा थाटात लग्न करण्याचा विचार असतो पण परजातीय मुलीशी लग्न करण्यास वडील परवानगी देणार नसल्याने प्रभाकर रजिस्टर पद्धतीने लग्न करतो. प्रभाकर व रंजनाच्या विवाहाला पाच वर्षे पूर्ण होतात पण दोघांना करियर करायचे असल्याने त्यांच्या घरात अजून पाळणा न हलल्याने नातवंडाचे चेहरे पाहण्यास आसुसलेली उर्मिला या कथेत येते. शेजारच्या आमोणकरबाईंच्या नातवाकडे विरंगुळा म्हणून ती जाऊ लागते. नातवाला खेळवणाऱ्या आमोणकरबाईंचा तिला हेवाही वाटतो व आजच्या पिढीचे विचार पार बदलून गेल्याचे तिला वाटू लागते. शेवटी ती आपल्या मुलाशी व सुनेशी बोलते. आपल्याकडे मुलाच्या संगोपनास काहीच कमी नसल्याचे बजावते उर्मिलेची सून तिला काळ बदलला असल्याचे सांगून, चूल व मूल यात आपल्याला रस नसल्याचे सांगते. प्रभाकराचे वडील नातवंडाचा चेहरा पाहण्यास आसुसलेले असतानाच त्यांचे निधन झालेले असल्याने आपणासही माणूसघाण्या जगात करमत नसल्याने तटस्थपणे आपली गावी जाण्याची व्यवस्था करण्यास उर्मिला सांगते. दोन पिढीतल्या वैचारिक संघर्षाचे व आजच्या पिढीच्या बदलत्या विचारांचे चित्रण या कथेत येते. आपल्या आयुष्यातल्या शेवटच्या दिवसांतली

संध्याकाळ सोनेरी असणार की रखरखीत दुपारच आपल्या नशिबी आहे? या संभ्रमात असलेल्या नातवंडासाठी आसुसलेल्या उर्मिलेचे चित्रण कथेत येते.

'अंध दिवस' या कथेत मुलांवर संस्कार करणारा, कर्तव्यदक्ष असा गोपाळ गुरुजी व शिक्षणाचेही राजकारण करू पाहणारा तेटांबे मास्तर या दोन भिन्न प्रवृत्तींचे चित्रण येते. अंध दिवसाच्या निमित्ताने अंध माणसांच्या अडचणी, त्यांचे दु:ख काय असते हे मुलांना समजावे म्हणुन गोपाळ गुरुजी एका कार्यक्रमाचे आयोजन करतात. पण इतर मास्तर त्याच्या या कार्याला नाके मुरडतात. सुंदर शाळेचा किताब मिळविण्यासाठीच हा सगळा खटाटोप ते करत असल्याचे त्यांचे म्हणणे असते. व्यवस्थापानही गोपाळ मास्तरांचे भक्त असल्याचे सांगत तेटांबे त्यांना हिणवत असतो. गोपाळ गुरुजींच्या ऐवजी आपली हेडमास्तर म्हणून नेमणूक व्हावी अशीही तेटांबेची सुप्त इच्छा असते. त्यामुळे गोपाळ मास्तरांचा काटा काढण्यासाठी तो खेळी करतो. अंध दिवसाच्या दिनी मुले ठरलेल्या कार्यक्रमानुसार डोळयांवर पट्ट्या बांधून अंधांच्या अडचणी समजून घेण्याच्या प्रयत्नात असतात. त्यावेळी नंदू परब रेलिंगजवळ येतो कठड्यावरून खाली पडतो. तेटांबे मास्तराने शिपायाला पैसे देऊन रेलिंग हलवलेली असते व ऐन वेळी गोपाळ गुरुजींना आवाज बदलून फोन करत त्यांचे लक्ष दुसरीकडे विचलीत केलेले असते. मुलांजवळ ठेवलेल्या रेगे मास्तरांना शौचालयात पाठवण्याची खेळी रचली जाते. नंदू परब हा विद्यार्थी तेटांबेनी आखलेल्या खेळीनुसार खाली कोसळतो व त्याची दृष्टी हरवून बसतो. पश्चातापाने गोपाळ मास्तर गळून पडतात. आपला विद्यार्थी असलेला नंदू आपल्यामुळे आंधळा झालेला आहे असे त्यांना वाटू लागते. नंदू मोठेपणी ताटली बडवून भीक मागत असल्याचे त्यांना स्वप्न पडते व प्रायश्चित म्हणून स्वत:च्याच डोळयांवर पट्टी बांधतात व आंधळेपणा स्वीकारतात. सत्तेसाठी चालणारे राजकारण व बळावलेल्या स्वार्थी प्रवृत्तींवर ही कथा भाष्य करते.

'भेट' या कथेत रुद्रेश सीमाला काणकोण पुढील असलेल्या गोव्यातील चापोली गावात घेऊन जेतो. एकदा असाच चापोलीला प्रोजेक्टच्या कामानिमित्त एकटा आला असता, हरणासारख्या दिसणाऱ्या मेरू या प्राण्याशी आपले भावबंध जुळल्याने सीमाला आपला सखा मेरू दाखवावा या हेतूने तो तिला चापोलीला घेऊन आलेला असतो. तेथील बंगल्याची देखरेख करणाऱ्या शाणुकाकांना तो मेरुबद्दल विचारतो तेव्हा अधून मधून मेरू दिसला होता पण हल्ली नाहिसा झाल्याचे सांगता तुमच्या येण्याने तो निश्चितच येईल असे शाणुकाकांकडून त्याला उत्तर मिळते. मागच्या भेटीत भेट झालेला आपल्या बंगल्यापुढील बंगल्याचा मालक प्रमोद गावकर रुद्रेश

व सीमाला पुन्हा भेटतो व आपल्याकडे येण्याचे निमंत्रण देतो. प्रमोदच्या बंगल्यात गेलेला रुद्रेश त्याच्या डोळ्यात सीमाप्रती दिसणारा विकार टिपतो. आपण उगाच तिथे गेल्याचे त्याला वाटू लागते. गप्पा गोष्टींसाठी प्रमोदच्या बंगल्याच्या दिवाणखान्यात गेले असता त्यांना भिंतीवर मेरूचे शीर दिसू लागते. आपण एकाच गोळीत त्याला संपविल्याचे पोकळ कर्तृत्व प्रमोद सांगू लागतो. भिंतीवरील मेरूच्या कपाळावर असलेल्या काळ्या ठिपक्यावरून रुद्रेश आपल्या मेरुला ओळखतो. आपली व मेरूची अशी भेट झाल्याने तो खिन्न होतो व अत्यंत नाट्यमय पद्धतीने संतापाने खवळलेला रुद्रेश प्रमोदवर बंदूक उभारून, बंदुक आवळून धरतो. मुक्या प्राण्यांवर प्रेम करणारा रुद्रेश व आपल्या प्रतिष्ठेसाठी जनावरांची शिकार करून त्या पोकळ अभिमानाला मिरवणाऱ्या एका प्रवृत्तीचे चित्रण प्रमोदच्या माध्यमातून लेखक करतात.

'राक्षस' या कथेत बालमजुरी घडवून आणत मुलांपासून शिक्षणाचा अधिकार ओरबाडून घेत घरकामाच्या निमित्ताने त्यांना घरात कोंडून त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या सामाजातल्या राक्षसी प्रवृत्तीचे चित्रण 'राक्षस' या कथेत येते. शिक्षणात हुशार असलेल्या नलूला घरच्या गरिबीमुळे तिची सावत्र आई, डॉक्टर असलेल्या एका गृहस्थाच्या घरातील लहान मुलास सांभाळण्याच्या कामावर पाठवून देते. ती त्या डॉक्टर सोबत न जाता शाळेतच जाण्याचा हट्ट धरते पण लहानगी नलू अपयशी ठरते. तिथे लहान लहान चुकांमुळे आधी तोंडावर व्रण उमटतात, नंतर पुढे गालांवर चटके दिले जातात. नलू आपल्या मुलाला मुद्दाम त्रास देत असल्याचा समज करून डॉक्टर तिची मारझोड करतो. व कोंडून ठेवतो, चटके देतो. संधी साधून नलू धूम ठोकते. व मुलांना घरकामाच्या कामाला ठेवत त्यांचे हालहाल करणाऱ्या डॉक्टराची कामगिरी गावभर पसरते. नलूला बालविकास केंद्रात भरती केली जाते. तिथे नलूची परिस्थिती सुधारते पण नशीब मात्र पुन्हा त्याच राक्षसी वृत्तीच्या जबड्यात तिला टाकण्याचा प्रयत्नात असते. बालविकास केंद्रातील फोंडेकर बाई तिला मूल सांभाळायच्या कामाच्या बदलात भरपूर पैसे घेत एका नवीन गृहस्थाच्या घरात पाठवण्याच्या तयारीत असते. हतबल नलू मात्र आपल्याला शाळेत जायचंय या आशेने ओरडत असते. बालविकास केंद्रही आज विकासापेक्षा लहान मुलांना बालमजुरी करायला लावते या कटू वास्तवाचे चित्रण नलूच्या शोकांतिकेतून लेखक मांडू पाहतात.

ग्रामीण समाजजीवनात देवळात बेताळ देवाला बळी स्वरूपात बकरा अर्पण करण्याच्या चालिरीतीच्या पार्श्वभूमीवर 'बकरा बळी' ही कथा येते. 'बकरा बळी' देण्याच्या पद्धतीचे चित्रण कथेत येते, सात वर्षांचा सोनूही वडिलांबरोबर जत्रेला जातो व बळी का देतात? असा प्रश्न त्या बालमनात उमटतो. गावचे भले व्हावे म्हणून

आपल्या पूर्वजांनी ही प्रथा सुरू केली असल्याचे त्याला सांगण्यात येते. बकऱ्याला बळी देणारा प्रसंग सोनू व नानू, रामू, शंकऱ्या हे सवंगडी लक्षपूर्वक बघतात. उत्सव संपतो. गावाच्या माळावर ते चौघे खेळण्यास जमले असता बाकी खेळांचा कंटाळा आल्याने 'बकरा बळी' खेळण्याचे ठरवितात. रामू पुजारी, शंकऱ्या वाजंत्री व बळी देण्यास मदत करणारा बनतो, नानू बकरा व सात वर्षाचा सोनू स्वत: सर्वांपेक्षा मोठा असल्याने बकरा कापणारा फोंडू बनतो. बकरा बळीच्या दिवशी पाहिलेली प्रत्येक विधी ती मुलं करतात. शेवटी बकरा बनलेल्या नानूच्या गळयावरून कोयता फिरवत असताना जानू वेळीप तिथे पोहोचतो. नानूच्या गळयातून रक्त ठिबकत असताना तीन मुलांनी त्याला पकडल्याचे पाहतो व नानूची सोडवणूक करतो. जत्रेत पाहिलेली प्रथा मुले खेळ म्हणून खेळत असल्याचे पाहून मल्लिकार्जुनाच्या देवळात आपण आलो नसतो तर काय झाले असते असे म्हणत बकरा बळी प्रथेला शिव्या देत पैंगीण गावची वाट धरतो. 'बकरा बळी' या कथेच्या माध्यमातून लहान मुलांच्या मनावर अयोग्य संस्कार करणाऱ्या अमानुष अशा रूढी पद्धतींचा लेखक विरोध करताना दिसून येतात.

'केतकरांची गोष्ट' या कथेत नवीनच लग्न होऊन आलेल्या केतकरांचे काही तरी बिघडल्याचे डिचोलकरांना वाटू लागते. डिचोलकर मित्रत्वाच्या नात्याने विचारपूस करतात तर त्याची बायको चिडचिडी, उलट उत्तर देणारी, मानाविरुद्ध वागल्यास ओरडणारी अशा तिच्या स्वभावातला विसंगतपणा केतकरांना असह्य झाल्याचे त्याला कळते. साध्या साध्या गोष्टीत त्यांच्यात खटके उडू लागतात. थोडेफार ॲडजस्ट करण्याची सवय लावावी असा सल्ला डिचोलकर केतकरांना देतो. केतकरांची बायको राजश्री व सासूबाईंमध्ये खटके उडू लागतात. आधी लग्नानंतर काम करण्यास नकार देणाऱ्या केतकरांचे म्हणणे ऐकणारी राजश्री आता मात्र ते म्हणणे अमान्य करत काम करण्याचा हट्ट धरते. ऑफिसमध्ये स्त्रियांचे बॉसशी संबंध निर्माण होतात याची भीती केतकरांना असते. राजश्रीशी जुळवून घेण्याचा आपण प्रयत्न केला पण तो सफल होत नसल्याचे सांगत केतकर घटस्फोट घेण्याचा विचारही करतात. पण शेवटी बाळाच्या आगमनाच्या बातमीने सगळे काही बदलते. एकमेकांवरचा त्यांचा राग दूर होतो. सासू सुनेचे कौतुक करत लाड पुरवते, राजश्रीलाही काही दिवसांच्या अशांतीचे आपणच कारण असल्याने खंत वाटू लागते. नवीन जीव बदल घेऊन येतो. निवेदकाला प्रश्न पडतो. मुलाचे आगमन काही कारणांनी झालेच नसते तर? पण आपल्या विचारांना बाजूला सारत केतकराच्या सुखी संसाराकडे पाहून तोही सुखावतो. आजच्या सर्वसामान्यांचे प्रश्न, छोट्या छोट्या गोष्टींमुळे नात्यांमध्ये होणारी भांडणे याचे चित्रण 'केतकरांची गोष्ट' या कथेत येते.

‘फेरी’ या कथेत आपल्या भज्यांचा गाडा थाटून उदरनिर्वाहासाठी प्रयत्न करणाऱ्या राधाबायच्या माध्यमातून गरिबांच्या जगण्याची शोकांतिका लेखक मांडतात. वर्षानुवर्षे एका ठिकाणी आपला भज्यांचा गाडा थाटून सेंट तेरेझाच्या फेस्तला भजी विकणाऱ्या राधाबायची फरफट सुरू होते. तिची जागा बळकावण्याच्या प्रयत्न होत तिची हकालपट्टी केली जाते. राधाबायचा मुलगा व सून अपघातात बळी जातात, तिचा नवरा अर्धांगवायूचा झटका आल्याने अंथरुणावर असतो. मुलगा व सुनेपश्चात राहिलेली नातही आंधळी असल्याने तिला सोबत घेऊन ती भजी विकण्यास आलेली असते. महागाई असल्याने काही पैशांच्या बदल्यात तिला बेसन उसने मिळालेले असते. फेस्त संपल्यानंतर भजी विक्री करून बेसनच्या पीठाचे पैसे देण्याचे ती कामत खाजेकारास कबूल करते. पण सरकारदरबारी माणसांकडून व समाजातील गुंड प्रवृत्तींकडून तिची पिळवणूक केली जाते या हृदयद्रावक अशा वास्तवाचे चित्रण ‘फेरी’ या कथेतून होताना दिसते. नगरपालिकेच्या टॅक्सच्या नावाखाली पैसे उकळण्यास एक माणूस तिच्या गाड्याजवळ येतो. गिऱ्हाईकासाठी तिष्ठत थांबलेली राधाबाय गिऱ्हाईक नसल्याचे सांगताच तिच्या भज्यांच्या फळीवर जोरात हात मारून भजी उधळतो. भजांची रस्त्यावर होणारी नासाडी पाहून आपले काळीजच चिरडत असल्याचे तिला वाटू लागते. रस्त्यावर पडलेली भजी ती पटापटा वेचू लागते. वाहने खोळंबली जातात, निर्दयपणे पोलीस तिला दांड्याने ढोसत बाजूला व्हायला सांगतो अशी कथा येते. संवेदना आणि माणुसकी हरवलेल्या समाजाचे चित्रण ‘फेरी’ या कथेत येते. ख्रिस्ती फेस्त म्हणजे उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आधारित या कथेत फेस्तचे चित्रण आलेले दिसून येते. फेस्ताला ‘पुरसांव’ला आलेले लोक, ‘लोकांचे वाईट करू नये, लोकांना मदत करावी’ असे शेरमांव म्हणजेच उपदेश देणारा ख्रिस्ती धर्मगुरु पाद्री इत्यादींचे चित्रण या कथेत येते.

### 3.2.11 दयाराम पाडलोस्कर यांचे कथा लेखन

गोमंतकीय कथेची परंपरा पुढे नेत आशयदृष्ट्या समृद्ध अशी कथा देणारे महत्त्वाचे कथाकार म्हणून नव्वदोत्तरी कथाकारांमध्ये दयाराम पाडलोस्कर या महत्त्वाच्या कथाकाराचा विचार करावा लागतो. त्याचा ‘कागदी होड्या’ हा पहिला कथासंग्रह २००९ साली प्रसिद्ध झाला. तद्नंतर ‘खपली निघाल्यानंतर’ (२०१६), ‘बावळ’ (२०२१) असे एकूण तीन कथा संग्रह प्रसिद्ध झाले. दयाराम पाडलोस्कारांच्या ‘बावळ’ या कथासंग्रहास साहित्य अकादमीचे नामांकनही झाल्याने, साहित्य अकादमीच्या मराठी साहित्य विभागात स्थान मिळविल्याने गोमंतकीय कथा लेखन परंपरेत दयाराम पडलोस्करांच्या कथेने मानाचा शिरपेच मिळविला. सर्वसामान्यांच्या

शोकांतिका, स्त्री जीवनातील दु:ख, प्रेमभावना, मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करणारी ही कथा, ग्रामजीवनातील भिन्न अनुभवांना केंद्रस्थानी ठेवत आशयसूत्रे गुंफते तसेच गोमंतकीय समाजजीवनात होणाऱ्या बदलांवर प्रकाश टाकण्याच्या प्रयत्नात एक वेगळी वाट चोखाळताना दिसून येते.

### 3.2.11.1 स्त्री जीवनाच्या शोकांतिका

'ती' या कथेमध्ये असफल ठरलेली प्रेमकथा लेखक मांडतात. ऑफिस सुटल्यावर बसस्टॅंडवर निवेदकाची व तिची भर पावसात भेट होते. बसस्टॅंडवर भिजतच आलेल्या तिला नुसत्या तोंडओळखीमुळे तिला छत्रीत न घेता निघालेला असतो. पण तिच्या सौंदर्यावर मात्र तो पुरता भाळलेला असतो. ती त्याच्या नकळत शेजारी बसते व त्यांच्यात संभाषण वाढते. चार पाच वेळा भेट झाल्याने ती आता निवदेकाशी बिनधास्त बोलू लागते. पण नंतर कितीही ठरवून तिला भेटण्याचा प्रयत्न केला तरी ती भेटत नाही. बॉस आपल्यावर खूष असल्याने त्याच्यासोबतच ये जा करत असल्याचेही ती सांगते. त्यामुळे तिच्यावर जीव जडण्याआधीच निवेदक सावध होतो. तिचे बॉसशी चांगले संबंध प्रस्थापित झाल्याचे कळताच निवेदक खंतावतो. त्यावेळी त्याच्या चेहेऱ्यावरील ताण तणाव पाहून माणसाने सावध असणे गरजेचे आहे. जग विचीत्र असल्याने विचारपूर्वक पाऊल टाकणे गरजेचे असल्याचे, तसेच स्वत:ला हरवून बसल्यास स्वत:लाही सापडणार नसल्याचे ती सांगते. तिचे बॉसशी लग्न झाल्याचे त्याला समजते. बॉससारखे सुखी आलिशान जगणे आपणही तिला देऊ शकलो नसतो म्हणत तो आपल्या मनाची समजूत घालतो व चांगल्या घराण्यातील सुसंस्कृत मुलीशी लग्न करतो. मुलाबाळाच्या जन्माने सुखाचा संसार करत असतो. तर दुसरीकडे आपल्याला भेटणाऱ्या तरुणीने म्हणजेच 'श्रीमती सरिता अजित शर्मा' हीने पतीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचे त्याला समजते. आपण आपल्याला विसरू नये नाहीतर परत स्वत: स्वत:ला कधीच सापडू शकणार नाही म्हणणारी ती स्वत:ला न शोधताच, स्वत:ला गमावून बसली होती. आपण त्यावेळी तिच्याप्रती असलेल्या आपल्या भावना मांडून तिला अडवायला हवे होते का? या प्रश्नाच्या संभ्रमात लेखक पडतो. जगण्याविषयीचे तत्त्वज्ञान त्यांच्या कथांमध्ये पेरलेले दिसून येते.

'तुझ्याचसाठी' या कथेत एक सर्वसामान्य ग्रामजीवन जगणारी भागी येते. स्वप्नात येणाऱ्या पण चेहरा न पाहिलेल्या राजकुमारच्या प्रेमात ती पडते. त्या राजकुमारासोबत लग्नाचे स्वप्ने रंगवते. स्वप्नात भेटणाऱ्या राजकुमारास शोधण्यास भटाच्या तळयावर जाऊ लागते. आपले लग्न अन्य व्यक्तीशी होऊ नये, आपण घरच्यांना

ओझे बनू नये म्हणून लाडात वाढलेली भागी घरातले सर्व काम मुकाट्याने करू लागते. अचानक बदललेल्या आपल्या मुलीच्या वागण्याने जायली ही भागीची आई अस्वस्थ होते. आपल्या मुलीला स्वप्नात एक राजकुमार स्वरूप तरुण त्रास देत असल्याचे कळताच अंधश्रद्धाळू बाबा भटजीकडे जाते. मुलीची पत्रिका मांडून तिच्या वाटेत शनी अडथळा आणत असल्याने कडक उपवास केल्यास तिला योग्य असलेला वर आपोआपच चालत येणार असल्याचे बाबा भटजी सांगतात. मुलीच्या नशीबाचा विचार करता करता जायली अंथरूण धरते व तिचे निधन होते. आईच्या निधनानंतर वडिलांना आपला भार होईल या हेतूने स्वप्नात सतावणाऱ्या राजकुमारास सोडून, आलेल्या स्थळाला भागी होकार देते. आपण न पाहिलेला राजकुमार हाच असेल या आशेने लग्न करते. लग्नानंतर आपल्याशी लग्न झालेला पुरुष हा आपल्यापेक्षा वयाने खूप मोठा असल्याचे पाहून ती कोसळते. पण शेवटी आपल्या स्वप्नातला तो राजकुमार हाच असल्याचे ती स्वत:स बजावते व म्हातारे सौभाग्य त्या काळोख्या रात्रीला साक्षी ठेऊन स्वीकारते. भागीच्या माध्यमातून सुखी जीवनाचे स्वप्न पाहणारी पण शेवटी आलीय भोगासी म्हणत जीवनात आलेले मुकाट्याने स्वीकारणारी अशी स्त्री 'तुझ्याचसाठी' या कथेमध्ये येते.

गावात आलेल्या डॉक्टरच्या फसव्या प्रेमात बळी पडलेल्या रंजनाची कथा 'वासनाबळी' या कथेत येते. गावात आलेला डॉक्टर सभ्यपणाचा आव आणत, रंजनाला प्रेमाच्या जाळ्यात फसवत शरीरसुख घेतो. रंजनाला दिवस गेल्यानंतर तिला गावंढळ संबोधून गर्भ पडण्यास सांगतो. डॉक्टरांना विरोध करत रंजना त्या गर्भास जीवापाड जपते. दुधाचा व्यवसाय करून मुलीचे पालनपोषण करत तिला डॉक्टर बनवते. रंजनाची मुलगी गौरी मोठी झाल्यानंतर तिच्या मनात आपल्या बापाविषयीचे प्रश्न उपस्थित होतात, शेजारचा दिनूकाका आपल्या आईला रोज कमरेला पदर खोऊन  काम करताना बघत असल्याने आपल्या आईने व्यभिचार केल्याचे तिला वाटते. लहानपणी दिनूकाकाने वेळप्रसंगी मदत केल्याने तिचा संशय बळावतो. ती आपल्या आईला सोडून दूर गावात पणजीला वास्तव्यास जाते. मुलीच्या दुरावाण्याने रंजनाचे निधन होते. निधनानंतर आपल्या खऱ्या वडिलांची ओळख दिनूकाकांकडून आलेल्या पत्रातून गौरीला होते. गावात आलेल्या डॉक्टरवर प्रेम करून आपली आई फसल्याचे तिला कळते. दिनूकाका व आपल्या आईत काहीच संबंध नव्हते तर फक्त नेत्रसुख घेत तिच्या आईच्या देहास पाहणाऱ्या दिनूकाकाची गौरीच्या शिक्षणास मदत होईल म्हणून वासनामय नजर आयुष्यभर सोसल्याचे दिनूकाका पत्रातून गौरीस सांगतो. आपल्यासाठी वासनेची बळी पडलेली आपली आई व तिचे उपकार मृत्यूपश्चात गौरीच्या लक्षात येतात. वेश्या व्यवसायात अडकलेल्या संगीताची शोकांतिका 'गढूळ पाणी' या कथेत लेखक मांडतात. सकूच्या एका मागोमाग पाच मुली जन्माला येतात. सकूला आपल्या मुली

जड झाल्या नसल्या तरी सकूच्या नवऱ्याचे व्यसन वाढल्याने गावातील कमला सकूला व तिच्या मुलींना नावं ठेवते. सकूच्या अत्यंत सुंदर असलेल्या संगीता या मुलीच्या जिव्हारी सकूचे शब्द लागतात. संगीता औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या आपली मैत्रीण नंदाला आपल्यासाठीही काम शोधण्यास सांगते. नंदाच्या प्रयत्नांनी संगीताला नोकरी मिळते. नोकरीवर ये जा करताना संगीताच्या लावण्यामुळे दिवसेंदिवस तिच्या चाहत्यांमध्ये भर पडत जाते. संगीताच्या वृत्तीत फरक पडू लागतो. पैशांची उधळण करून तिच्या कारखान्यातला मॅनेजर सर्वप्रथम तिचा फायदा घेतो. भरपूर पैसे मिळत असल्याने संगीताही वाहवत जाते. संगीताने मिळविलेल्या पैशांमुळे सकू पैशांच्या मोहजाळात फसते व मुलीस इतके पैसे कुठून मिळतात हा प्रश्न विचारणे टाळते. दारुडा वडीलही आपल्या मुलीचे गोडवे गाऊ लागतो. तरुणांकडून संगीता 'गढूळ पाणी' संबोधिली जाते. गढूळ पाण्याचा मोठा सागर झाल्याने आता तिथे मोठमोठी जहाजे लागतात अशी तरुणांमध्ये बोलबाला सुरू होतो. संगीता एक सर्वसामान्य लावण्यवती मुलीची एक वेश्या बनते. रोज ऑफिसच्या बसमधून गढूळ पाण्याच्या गोष्टी ऐकणारा निवेदक बाबनी सत्याची पडताळणी करण्यास गावात जातो. गावातील केशवकडून त्याला पैशांच्या मोहाने शरीरविक्री करणाऱ्या संगीताच्या कर्मांची कहाणी कळते. संगीता एक वेश्या बनून अनेकींचे संसार उद्ध्वस्त करते. शेवटी एका माणसापासून तिला दिवस जातात. तो वेश्येशी लग्न करू इच्छित नसल्याने ती विष प्राशन करते व तिचे निधन होते. सकू आपल्या मुलीच्या चूकीकडे दुर्लक्ष केल्यामुळे धाय मोकलून रडते. पैशांच्या मोहाने स्वत:च्या जीवनास उद्ध्वस्त करण्याचे ठरलेली संगीता अनेकींचे संसार पैशांच्या मोहाने उद्ध्वस्त करते व शेवटी तिचा बळी जातो.

बकुळीच्या फुलासारखी हसणारी, सौंदर्याने बहरलेली, अत्यंत सुंदर अशी फुल जनार्दन नाईक नावाची मुलगी कॅशियर असलेल्या पाडलोस्करांकडे येते, पाच हजार घेताना काही शंभरांच्या नोटांची मागणी करत, पाडलोस्कारांचे आभार मानत निघून जाते. तिच्या जाण्यानंतरही तिचे डोळे त्याला ओळखीचे वाटतात, अस्वस्थ करून सोडतात. त्यात मॅनेजर साळुंखे त्याच्या जवळ येत त्याला प्रेमाच्या भानगडीत न पडता लग्न करण्याचा सल्ला देतो. ऑफिसमधून निघाल्यानंतरही तिचे घारे डोळे त्याची पाठ सोडत नाही. व तो भूतकाळात शिरतो. लहानपणी गावात कुळागरांची वानरांनी केलेली नासाडी त्याला आठवते. वानारांपासून मुक्त होण्यासाठी वानरमाऱ्यांना बोलावण्याचा निर्णय गावात घेतला जातो. वानरमारे जमात गावात येते लोकांचे काम करत गावातच स्थायिक होते. त्यांच्यात घाऱ्या डोळयांची 'फूल' नावाची मुलगी असते. निवेदक पाडलोस्करांच्या आईला ती लळा लावते. आई वडिलांसोबत ती रानात राहत असल्याने निवेदक तिला 'रानफूल' असे संबोधतो.

निवेदकाच्या घरी ये जा होत असल्याने ती त्यांची भाषाही शिकते. तिच्या वडिलांना बोलवून निवेदकाची आई तिला शाळेत दाखल करण्याचे सांगतात. पण तिची आई हयात नसल्याचे सांगत तिचे वडील झपाझप पावले टाकत जातात. फूल ही वानरमाऱ्यांसोबत असली तरी ती या जमातीतील नसावी असा संशय पाडलोस्करांच्या आईला येतो. हळूहळू फूल गावात, गावातील शाळकरी मुलांत रमते, निवेदकाची आई तिला शाळेत दाखल करते. निवेदकाच्या आईची फूल स्वखुशीने कामे करते. 'रानफूल' तिसरीत पहिला क्रमांक मिळवते. पण तिचे वडील तिच्या शिक्षणाच्या वाटेत येतात, निवेदकाच्या आईला सुनावतात. व रानफुलास फरफटत शिव्या देत घरी नेतात. फूल ही त्याची मुलगी नसल्याचा आईचा संशय बळावतो, आपल्यापासून दूर गेलेल्या फुलसाठी निवेदकाची आई धाय मोकलून रडते. कितीतरी वर्षांनी वानरमारी जमात पळून गेल्याची बातमी गावभर पसरते. आई रानफुलासाठी अंथरूण धरते. फुलला शोधण्याचा प्रयत्न होतो पण वानरमारे जमात सापडत नाही. कालांतराने फुलला ते विसरतात. कित्येक वर्षांनी लहानपणीची फूल निवेदकाला बँकेत भेटते. घाऱ्या डोळयांची मुलगी रानफूलच असल्याचा शिक्कामोर्तब निवेदक करतो. आईला घरी येऊन फूल भेटल्याचे सांगतो. एका दिवसाची रजा घेत फुलच्या बँकेच्या खात्याद्वारे तिचा पत्ता शोधून काढतो. तिच्या पत्याचा मागोवा घेतो. रानफुलाची तिच्या शेजारी राहणाऱ्या गृहस्थांकडे चौकशी करता त्याला रानफुलाची शोकांतिका समजते. वानरमारी जमातीकडून ती विकली जाते. दहावीपर्यंतचे शिक्षण तिला दिले जाते व शेवटी तिला विकत घेणारा गृहस्थ तिला पैशांसाठी वाममार्गाला लावतो. रानफूलाला विकत घेत स्वत:ही तिचा उपभोग घेतो. रानफूलाची शोकांतिका समजल्यानंतर रानफुलास आपल्या आईने जीव लावल्याने निवेदक दु:खी होत, रानफूल रानात न राहता बाजारी झाल्याचे समजल्यानंतर हतबल निवेदक घराची वाट गाठतो.

'एक धागा सुखाचा' या कथेमध्ये लेखक रुपाची शोकांतिका मांडतात. रूपाच्या लग्नानंतर तिच्या नवऱ्याची रमाकांतची आई हृदयविकाराच्या झटक्याने मारते. आपल्या पत्नीमुळे हे झाल्याचे समजून रुपाला व तिच्या कुटुंबियांना टाळतो. रूपाचे मन शरीरसुखासाठी तळमळते. नियतीने त्याच्यावर केलेला आघात आपल्या पायगुणांवर ढकलल्याने व आपल्यापासून दूर राहत असलेल्या आपल्या पतीचे परस्त्रीसोबत संबंध असल्याचा संशय तिच्या मनात निर्माण होतो. तिला आपल्या लग्नापूर्वीच्या प्रियकराची आठवण येते. आखाती देशात गेलेल्या महेशचे अपघातात खोल दरीत कोसळल्याने निधन झालेले असते. त्याचा मृतदेह सापडलेला नसतो. महेशवर रूपाचे आधी प्रेम असल्याने तिची लग्ने मोडली जातात. शेवटी दूर गोव्यातून महाराष्ट्रात तिचे गुपचूप पद्धतीने लग्न उरकलेले असते. रूपाचा व रामाकांताच्या सुकलेल्या संसाराला पुनरुज्जीवित करण्याचा शेजारची

राधी सल्ला देते. रूपाही मागच्या गोष्टी विसरून रामाकांताला नव्याने सामोरे जाण्याचा प्रयत्न करते. पतीला घाबरून वागणारी रूपा आता मोकळी होते. रूपाच्या संसाराला आरंभ होतो. दुसरीकडे अपघातात निधन झाल्याचा समज झालेला रूपाचा प्रियकर परततो. प्रेमवेडा महेश रुपाची शोधाशोध करतो. रुपाला दिवस जातात त्यामुळे रूपापासून महेशचे सत्य लपविण्याचा तिच्या माहेरचे प्रयत्न करतात. रुपाला बाळंतपणासाठी माहेरी आणण्याआधी महेशला समजावून सांगण्याचा निर्णय तिचे वडील झिलबा घेतात. पण त्याआधी रमाकांत रुपाला घेऊन तिच्या माहेरी येतो. तिची चाहूल लागताच महेश तिच्याकडे येतो. महेशला आता ती नकार देते. आपल्याला प्रेमाचा अर्थ आपल्या पतीने शिकविल्याचे बजावते. महेश वेडा होत गावभर फिरतो. रमाकांतशी त्याची गाठ पडते व रमाकांतला रूपाच्या पूर्वीच्या प्रेम प्रकरणाबद्दल समजते. व पुन्हा रमाकांत तिला सोडून काहीच समजून न घेता परततो. स्त्री जीवनातील आलेला एक सुखाचा धागा अन् शंभर दु:खाचे धागे असा एकूण सूर ही कथा व्यक्त करते. या कथेतील स्त्री रूपा ही दु:खातून सूखाकडे जाते पण सुख पूर्वपदी येत असताना दु:खात पुन्हा लोटली जाते अशी शोकांतिका येते.

'संपलेल्या एका पर्वासाठी' या कथेत दया आणि देवकीच्या प्रेमप्रकरणाची चर्चा गावभर सुरू असते. दयाचा सावंतवाडीच्या घाटावर अपघात होतो व तो मृत्यूमुखी पडतो. दयासोबत गावातील विश्रामची मुलगी रेखा गेलेली असते, तिचेही अपघाती निधन होते. देवकीवर डोंगर कोसळतो. अख्खा गाव त्यांच्या मृत्यूमुळे हळहळतो. निवेदक दाजीच्या मनात रेखा दयासोबत का गेली असा प्रश्न पडतो. देवकी दयाचे प्रेमप्रकरण माहिती असल्यामुळे गावकरी रेखाबाद्दल वाईट विचार करत नाहीत. देवकीच्या भवितव्याचा प्रश्न असल्याने तिला लग्न करण्यास विनविले जाते पण दयाच्या मृत्यूपश्चात आपण लग्न करणार नसल्याचे ती बजावते. दाजी तिला तिच्या दु:खापेक्षा दयाच्या आईचे दु:ख मोठे असल्याचे सांगतो. दाजीसोबत ती माईस भेटण्यास जाते त्यावेळी दयाचे देवकीवर प्रेम नव्हते तर रेखावर जीवापाड प्रेम होते असा गौप्यस्फोट दयाची आई देवकीसमोर करते. दया देवकीच्या निमित्ताने रेखाला पाहायला यायचा हे माईला समजलेले असते. देवकीचा मोहऱ्यासारखा वापर करून तीला फसविल्याने, रेखाला सून म्हणून स्वीकारण्याचे माई अमान्य करते व त्या दोघांचा संसार सुखाचा होणार नाही असा शाप देते. देवकीसमोर या गोष्टीचा गौप्यस्फोट केल्यावर माई व देवकी हुंदका देत एकमेकींना आलिंगन देतात व संपलेले एक पर्व मागे टाकतात. प्रेमात स्वत:च्या भावनांना समर्पित करणारी पण फसलेल्या स्त्रीची व्यथा लेखक मांडतात.

'आनंदी' या कथेत नदीच्या पात्राने त्यांचे प्रेम अनुभवलेले असते. त्यांच्या प्रेमाचा सुगंध काठाकाठात वाहत जाणाऱ्या नदीच्या पात्रात भरून गेलेला असतो व तीही सागरवेडी बनते. पण नंतर ती कधी नदीच्या काठावर फिरकत नाही. अचानक एके दिवशी कुठल्यातरी संकटात सापडल्यागत ती येऊन बसते. नदी तिला खळखळून हाक घालते व सावरण्याचा प्रयत्न करते. आज नदी तिची रक्षक ठरते. मानवी दु:खांशी, संवेदनेशी समरस झालेला निसर्ग प्रतिकात्मक पद्धतीने नदीच्या माध्यमातून 'आनंदी' या कथेतून येताना दिसतो. तिच्या आयुष्यात खंबीरपणे तिच्यामागे उभा असलेला आनंद, आखाती देशात जातो व लवकरच परतण्याचे आश्वासन देतो. सोन्याचे दिवस त्यांच्या आयुष्यात येतात. आनंदने पाठवलेल्या पैशांचा ती सदुपयोग करते, घरात नातेवाईकांची वर्दळ वाढते. पण आनंदी मात्र शरीरसुखासाठी आसुसलेली असते. शरीरसुखाच्या अशेने तुषार या आपल्या आतेभावास ती बळी पडते. तिची पाळी चुकते. त्यात आनंद परतणार असल्याची बातमी तिला देतो. शेवटी गरोदर रहिल्याने व आपण आपल्यावर निरपेक्ष प्रेम करणाऱ्या आनंदची फसवणूक केल्याने आत्महत्या करते. एके काळी रक्षक ठरलेली नदी तिची भक्षक ठरते. स्त्री जीवनाचे चित्रण या कथेत होताना दिसून येते.

### 3.2.11.2 व्यक्तींच्या दु:खद कहाण्या

'दिगंबर' या कथेत लहानपणापासून बालगोपाळांचा सांगती असलेला दिगंबर गावातील मुलांना फिरवायचा. मुलांना घेऊन पाटावर खेळण्यास जत्रेत जायचा. जत्रेतील दशावताराच्या कहाण्या मुलांकडून वाटेत ऐकत काकुल्या ह्या आपल्या आईला ऐकवायचा. दहावी पास होऊन निवेदक असलेला राजाराम मुंबईत काकांकडे जातो व तिथेच स्थायिक होतो. यात निवेदक असलेला राजाराम म्हणतो की आपला चित्रपट नशीबरूपी पडद्यावर कसा नावलौकिक कमावेल हे प्रत्येकाला स्वत:च्या बुद्धीने निश्चित करावे लागते व तसे केल्यासच संसाररूपी महासागरात जीवनाच्या तारूस किनारा लाभतो. जगण्यासाठी योग्य बुद्धी गरजेची असते अन्यथा जीवनाची वाताहत होते हे जीवनाचे तत्त्वज्ञान या कथेतून लेखक मांडतात. या कथेतील दिगंबर जुगाराच्या छंदात पार बुडतो. राजाराम गावी परतताच त्याच्याकडूनही पैसे घेत जुगार खेळतो व धुळीस मिळतो. आपला मुलगा सुधारेल म्हणून काकुल्या आपल्या मुलाचे लग्न लावते. पण लग्नानंतरही नातवाच्या चेहऱ्याकडे बघून परिस्थितीशी दोन हात करण्याशिवाय तिच्याकडे पर्याय उरत नाही. दिगंबरची बायको भावाच्या शेतात कबाडकष्ट करून मुलांच्या भवितव्यासाठी कष्ट करते. एके दिवशी दिगंबराचे राजारामास, पन्नास हजारांची

मागणी करत आपल्याला एक संधी देण्यास विनविणारे, आपण कष्ट करून पैसे कमवू पाहत असल्याचे सांगणारे पत्र येते. घरच्यांना न सांगता, राजाराम पन्नास हजार पाठवूनही देतो. वर्षे जातात पण दिगंबरचा निरोप येत नाही. पण गावातून राजारामच्या दादाकडून दिगंबरचे निधन झाल्याची बातमी येते. दिगंबराच्या बायकोच्या सांत्वनासाठी राजाराम गाव गाठतो त्यावेळी त्याला दिगंबर मटक्याचा धंदा तेजीत चालवून श्रीमंत झाल्याचे समजते. मटकाकिंग म्हणून ओळखला जाणारा दिगंबर कुठल्यातरी आजाराने अस्वस्थ होता याची माहिती मिळते. दिगंबरने आपण दिलेल्या कष्टाच्या कमाईतून गैर धंदे केल्याने राजारामाला वाईट वाटते. तसेच आपल्याला खुशाली न कळविल्याची खंत वाटल्याचे व्यक्त करतो. राजारामच्या पैशांचा गैरवापर केल्याने दिगंबराने पैशांबद्दल तिला काहीच कळू न दिल्याचे दिगंबरची पत्नी सांगते. राजारामने दिलेल्या पैशांमुळे आपल्या दारी श्रीमंती आल्याचे सांत्वनसमयी दिगंबरची बायको सांगते व आपल्या अंतिम समयी पैसे परत करण्याचे आपल्या पतीने सांगितल्याचे सांगते. दिगंबर दोन लाख राजारामासाठी ठेऊन जातो. पण राजाराम मात्र आपल्या कष्टाच्या कमाईचे दिलेले पन्नास हजार घेतो. व दिगंबर गेल्याचे सत्य स्वीकारत तो कसा गेला या बद्दल विचार करतो अशी ही कथा येते. अयोग्य निर्णयांनी होणारी जगण्याची वाताहत याविषयी लेखक बोलताना दिसून येतात.

'बी तसं भात' या कथेतील निवेदक गतआठवणीत रमतो. त्याला आलेल्या दर स्थळाला नावे ठेऊन मुलीला स्वत:च्या लग्नासाठी नापसंत ठरवणारा अहंकारी हरिकाका आठवतो. शेवटी निवेदकाच्या वडिलांपेक्षा दोन वर्षांनी मोठा असलेला हरिकाका स्वत:च लग्नाला असंमती दर्शवतो. पण शेवटी गरिबाघरची मुलगी चालेल असे म्हणत नारायण म्हणजेच निवेदकाच्या वडिलांना विनविण्याचा प्रयत्न करतो पण नारायण ऐकत नसल्याने नारायणची पत्नी आवडे मात्र हरिकाकाचे लग्न जुळवते. लग्नानंतर बाप होण्याच्या बातमीने हरिकाका आनंदतो. मुलाच्या भवितव्यासाठी अपार कष्ट घेतो. निवेदकाच्या शाळेत शिकणारा हरिकाकाचा मुलगा मात्र चंगळवादी बनतो. मुलांशी हेकेखोरपणे वागल्याने मुलेही त्याच्यापासून लांब राहतात, सगळ्या विषयात नापास झाल्यानंतर हरिकाका निवेदकाच्या आईजवळ 'आवडे'जवळ येत आपल्या मुलामुळे निर्माण झाली आपली व्यथा सांगतो. मुलावर योग्य संस्कार व्हायला हवे होते याची जाणीव आवडे करून देते. दीपक कितीतरी मुलींचे आयुष्य बापाच्या पैशांनी उद्ध्वस्त करतो, जन्मदात्यांना मारझोड करतो. समजावू पाहणाऱ्या आवडेलाही झिडकारतो. मुलाच्या वागणुकीमुळे हरिकाका आवडेची माफी मागायला आलेले असता आवडे हरिकाकांची कानउघडणी करते. एके काळी इतरांच्या मुलींना नावे ठेवून आपल्या अहंकारी वृत्तीने नाकारणाऱ्या हरिकाकांसारखाच आज

हरिकाकांचा मुलगा अहंकारी बनल्याचे सांगत ‘बी तसं भात’ या उक्तीचा आधार घेत आवडे हरीकाकांची कानउघाडणी करते.

पैसा नसला तरी जीवनाची सर्कस आनंदाने चालविणाऱ्या, आई वडिलांच्या मृत्यूनंतर पोरका झालेल्या न्हानूची ‘नशीब’ ही करुण कथा येते. परगावातून प्रेमविवाह करून गावात आश्रय घेऊन संसार थाटायला आलेले न्हानूचे आई वडील न्हानूला उकिरड्यावर टाकून झोपडीस आग लाऊन आत्महत्या करतात. पैशांची अपेक्षा न करता न्हानू टिचभर पोटासाठी गावातील लोकांचे मिळेल ते काम करतो. लग्न होऊन संसार थाटायला आपल्याकडे घरही नसल्याने तो दु:खी असतो. पांडग्याच्या मुलीला रामग्याच्या भर लग्नात मागणी घालतो. पांडग्याचा राग रोष सहन करावा लागल्याने, न्हानू श्रीमंत होऊन पांडग्याच्या जैग्या या मुलीचा हात मागण्यास परत येण्याचा निश्चय करून गाव सोडतो. न्हानू गाव सोडून गेल्यानंतर आलिशान गाड्या घेऊन गावात आलेले गृहस्थ न्हानूची चौकशी करतात. मुंबईहून आलेली श्रीमंत घराण्यातील ती दोन माणसे म्हणजे न्हानूचा मामा व काका असल्याचे गावकऱ्यांना समजते. भाचा जीवंत असल्याचे कळल्याने गावात आल्याचे ते गावकऱ्यांना सांगतात. श्रीमंत घराण्याचा मुलगा असलेला न्हानू नशीबाच्या खेळाने पांडग्याच्या मुलीलाही मिळत नाही व न्हानूचे नशीबही खोटे असल्याने श्रीमंत घरातील असूनही न्हानू गाव सोडून गेल्याने ती श्रीमंती त्याच्या नशिबी येत नाही. न्हानूच्या नशीबाचा खेळ व करुण अशी कथा ‘नशीब’ या कथेतून येते.

ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर ‘तायडी’ ही कथा आलेली दिसते. कथेचा निवेदक भायग्या व तायडी या दोहोंमधील भावाबहिणीचे नाते अत्यंत समरसतेने लेखक चित्रित करताना दिसतात. भावंडामध्ये उडणारे लहान मोठे खटके, लहानपणी जयेशवर भाळणारी तायडी, त्याच्याशीच मोठेपणी लग्न करू इच्छिणारी तायडी व या सगळ्यात तिच्या मागावर असलेला भायगा असे चित्रण कथेत येते. तायडीने दहावी पास व्हावे अशी जयेशची इच्छा असते. दोघेही संसाराची स्वप्ने एकमेकासोबत रंगवतात. तायडी दहावी नापास होते, निवेदक दहावी पास होऊन पोलीस भरतीसाठी प्रयत्न करतो व जयेश बारावी पास होऊन पुढील शिक्षण घेतो. तायडीला भाऊबीजेच्या ओवाळणीला आपण तिचे जयेशशी लग्न लावून देणार असल्याचे सांगतो. वयानुसार बहिण भावाचे प्रेम परिपक्व होते पण तायडीला रक्ताचा कर्करोग होतो. जयेश तिच्याशिवाय जगू शकणार नसल्याने आकांत करतो, अख्खा गाव तिच्यासाठी हळहळतो. शेवटी तिचे निधन होते. तायडीच्या निधनानंतर कोसळलेल्या भायग्याच्या मनोवृत्तीचे चित्रण लेखक करतात. तायडी गेल्यानंतर जयेश लग्न करून मोकळा होतो.

पण भायग्या मात्र स्वप्नातही तायडीला शोधतो.स्वप्नात तिला जयेशने लग्न केल्याचे सांगतो. स्वप्नात तायडीही त्याला आपल्यासाठी जयेशने अविवाहित का रहावे असे विचारते, आपली तायडी मोठी झाल्याचे त्याला वाटते. कोंबड्याच्या बांगेत त्याला जाग येते. तायडी नसल्याच्या दु:खाने कोसळणाऱ्या भावाच्या मनस्थितीचे चित्रण लेखक करतात.

गावात जगणारी माणसे ही एकमेकांच्या मदतीसाठी तत्पर असतात. असाच तातूच्या पूर्वजांना पंचायतीच्या वतीने गावात घर बांधायला परवानगी दिली जाते. 'तातू गणपती बुडवंक वयता' यात तातूची कथा येते. लग्न न झालेला पण गणेशोउत्सवात सगळ्यांच्या गळ्यातला ताईत असलेला तातू मुलांचा आवडता असतो. गणेश विसर्जनात जड मूर्त्यांना पाच वेळा बुडवून मुलांना वर दाखवणारा असा तातू असतो. गावात गणेशमूर्तीचे विसर्जन करून पैलतीरावरच्या गावात विसर्जन करण्यास गेलेला तातू परत येत नाही. गावातील सगळी मंडळी त्याला शोधण्याचा प्रयत्न करतात. तातू येणार म्हणून वीस बावीस दिवस निवेदकाची आई त्याच्यासाठी देवीचा प्रसाद राखून ठेवते. तातूच्या घरात आता कुलूप काढून एक दारुडा दारू ढोसत बसलेला असतो. तातू गावातून नाहिसा झालेल्या घटनेस पंधरा सोळा वर्षे उलटतात तरी गणपती विसर्जित करून परतत असताना नदीच्या पात्रातून कोणीतरी पोहत पैलतीरी जात असल्याच्या भासाने 'तातू पलीकडचे गणपती बुडोवंक वता' म्हणजेच तातू आजही पैलतीरी गणपती विसर्जन करण्यास जातो असा ग्रामस्थांचा समज निर्माण होतो.

### 3.2.11.3 प्रेमभावनेचे चित्रण

'कागदी होड्या' या कथेत सईच्या निवेदनातून कथा येते. तिच्या गावात शेजारच्या काकूंच्या घरी गोबऱ्या गालांचा, घाऱ्या डोळयांचा, गोरापोन असलेला रजत येतो. अगदी खेळण्याबागडण्याच्या वयात दोघांच्या हृदयाच्या तारा जुळतात. सुट्टीसाठी आलेला रजत आपल्या घरी निघतो. सरकारी नोकरीत असलेल्या रजतच्या आई वडिलांची वेग वेगळ्या ठिकाणी बदली होत असते. वर्षं जातात पण सई रजतची वाट पहात असते. लहानपणी रजतसोबत सोडलेल्या कागदी होड्या ती त्याच्या आठवणीने सोडत जाते. रजतपासून दूर राहिलेल्या पंधरा वर्षांच्या ती पंधरा होड्या सोडते. एके दिवशी सईला पंधरा होड्यांसह एक चिठ्ठी येते. रजतच्या पंधरा कागदी होड्या पाहून आनंद झालेली सई चिठ्ठी वाचून भरदुपारच्या रखरखत्या आगीत जाळून जाते. तिच्यावर नितांत प्रेम करणाऱ्या रजतचे अपघाती निधन झाल्याचे समजते. आता तिच्यासाठी फक्त रजतने ठेवलेल्या पंधरा कागदी होड्या शिल्लक असतात. लहानपणी फुललेल्या सुंदर प्रेमभावनेचे तितक्याच नाजुकतेने

चित्रण करत लेखक वाचकाला या कथेत रमवतात व शेवटी अनपेक्षित असा धक्का देत प्रेमातील शोकांतिका मांडण्याचा प्रयत्न करतात.

### 3.2.11.4 मूल्यऱ्हासाचे चित्रण

मानवी मूल्यव्यवस्थेला हादरे देण्याचा प्रयत्न पाडलोस्करांच्या काही कथांमध्ये होताना दिसतो. त्यादृष्टीने 'तिला वाचवायला हवं होतं' ही कथा महत्त्वाची ठरते. दिसायला सुंदर असणाऱ्या अरुणाचे विवाहित असलेल्या निवेदकाशी एक वेगळेच ऋणानुबंध निर्माण होतात. ट्राफिक सिग्नलवर काही दिवसात अरुणा दिसत नसल्याने निवेदक तिच्या मैत्रिणीकडे चौकशी करताच ती आजारी असल्याचे समजते. निवेदक तिला भेटण्यास जातो अन् अचानक एक दिवस तिचे निधन झाल्याचे त्याला समजते. तिला डोळेभरून शेवटचे पाहता यावे यासाठी तो तिचा मृतदेह ठेवलेल्या शवागृहात जातो. तिथे डॉ. सुनील तिच्या मृतदेहाशी अश्लील चाळे करत असल्याचे पाहून खिन्न होतो. ती आपल्याला अस्पष्ट आवाज देत असल्याचे त्याला जाणवते. पण शवागरात काम करणारा त्याचा मित्र त्याला अडवत असल्याने तो हतबल बनतो. तिची होणारी विटंबना आपण पहिली, तिचा अस्पष्टसा आवाजही आपल्याला आला तरी आपण तिला वाचवू शकलो नाही याची जाणीव त्याला होते. तब्बल बावीस वर्षांनीही हे शल्य त्याच्या मनात दडलेले असते.

### 3.2.11.5 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण

'साध्वी' या कथेतील तुक्याकाकाची मुलगी कस्तुरीचे सौंदर्य सर्वांना भुरळ पाडण्यासारखेच असते. लहानगा निवेदक बंडू त्याचा सवंगडी असलेला गणू कस्तुरीस कस्तुरीदीदी संबोधतो पण तिच्या सौंदर्याकडे टक लावून बघण्याची त्याला सवय जडते. कस्तुरीदीदीचे लग्न ठरल्याची बातमी बंडूला मिळते. बंडू त्यावेळी दहावीला असतो. बंडू व कास्तुरीदीदीमध्ये एक खेळीमेळीचे नाते निर्माण झालेले असते. कस्तुरीदीदीने न्हाव्यांच्या घराण्यातील सदाशिवबरोबर प्रेम विवाह केल्याचे त्याला समजते. जातीची अडचण असूनही संयम ठेवत तुक्याकाकाने हे लग्न पार पाडलेले असते. मामाकडे असलेला बंडू दहावीत एक विषयाला नापास झाल्यानंतर मामाचा रोष सहन करतो व शेवटी अभ्यासाचा ध्यास घेतल्याने गावाशी त्याचा संबंध हळूहळू कमी होतो. काही काळाने कस्तुरीदीदीच्या पतीचे अपघाती निधन झाल्याचे बंडूला समजते. उदरनिर्वाहासाठी ती आपल्या लहानग्या बाळाला हृदयाशी धरून शहर गाठते. तिच्या पतीच्या जागेवर कंपनीत तिला काम मिळते.

बंडूलाही इन्शुरन्स कंपनीत मॅनेजरपदी नोकरी मिळते. ज्युनियर मॅनेजर सौ. वैशाली सदाशिव कोरगावकर यांची व मॅनेजरपदी असलेल्या बंडूची ओळख होते. लहानपणीच्या सवयीप्रमाणे तो तिचे चकाकणारे सौंदर्य न्याहाळू लागतो. तिच्यासाठी कंपनीच्या फ्लॅटमध्ये सोय करून देतो. अनेक चंचल विचार त्याच्या मनात येतात. वैशालीचा पती अपघाती गेल्याचे व तिला एक पाच वर्षाचा मुलगा असल्याचे त्याला समजते. बंडूच्या आईचे त्याच्या विवाहासाठी प्रयत्न चाललेले असताना वैशालीशीच विवाह करावा असे त्याला मनोमन वाटते. पण वैशालीस ते मान्य असले का? आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या विधवेशी लग्न केल्यास घरचे काय म्हणतील? असे अनेक प्रश्न त्याला सतावू लागतात. आईने हट्टाने तब्येतीचे कारण देऊन बोलावल्यामुळे आठ दिवसांच्या रजेवर बंडू गावी जातो. जाताना वैशालीला भेटून ऑफिसची जबाबदारी सोपवत निघतो. बंडूचा मामाच्या सुंदर मुलीशी विवाह ठरवला जातो. मुकाट्याने बोहल्यावर चढण्याशिवाय त्याच्याकडे मार्ग नसतो व वैशालीला विसरणेही कठीण जाते. लग्नाच्या दिवशी वैशाली घरी येते व बंडूला सर न म्हणता बंडू म्हणून हाक मारते. वैशाली हीच कस्तुरीदीदी असल्याचा गौप्यस्फोट होतो. बंडूच्या चंचल मनाला तिने बरोबर ओळखलेले असते. कस्तुरीदीदीने तिच्यावर तुटून पडणाऱ्या वाईट नजरांना कधीच स्वीकारले नसल्याने ती खरी पतिव्रता ठरल्याचे गावातील मधुकाकाचे म्हणणे असते.

'होलम' या कथेत लग्नाला नकार देणार रामू व आपल्या हयातीत नातवंडांचे सुख आपल्याला आपला मुलगा देऊच पाहत नसल्याने कंटाळलेले रामूचे वडील दामूकाका व आई यमूकाकी या कथेत येतात. व सुंदर मुलीच्या प्रतिक्षेत 'होलम' मोडणारा रामू या कथेत येतो. चांगली अंगाखांद्याने भरलेली बायको मिळावी म्हणून गावात झाडाच्या खाली बसून ओम नम: शिवाय मंत्राचा जप करतो व लोकांच्या फजितीचा विषय बनतो. सखाराम रामुसाठी 'होलम' घेऊन येतो. एका सुस्वरूप मुलीशी त्याचा विवाह ठरतो. दामूकाका रामूच्या विवाहासाठी भरपूर पैसे खर्च करतात. एकही पैसा खर्च न करता लग्नाच्या बोहल्यावर चढलेल्या रामूला आपली चूक समजते व लग्नानंतर शेतात मेहनत करून आपल्या आईवडिलांना सुखात ठेवण्याचा निश्चय रामू करतो. लग्नाचा दिवस ठरतो. विवाहस्थळी नवऱ्याची मंडळी पोहोचल्यानंतर नवरीमुलगी प्रियकरासोबत पळून गेल्याचे समजते. भरपूर खर्च केलेले दामूकाका चिडतात व मुलींकडच्या माणसांशी झालेला खर्च परत करण्याचा किंवा दुसऱ्या मुलीशी रामूचा विवाह करण्याचा प्रस्ताव ठेवतात. मोठ्यामुलीपेक्षा छोटी मुलगी जास्त सुंदर असल्याचे पाहताच रामूही मनोमन खुश होतो. 'होलम' या कथेत गावातील लग्न जुळवणाऱ्या 'होलम' या पद्धतीच्या

पार्श्वभूमीवर, लग्न तुटले तरी सुंदर अशा धाकट्या मुलीशी लग्न होईल या विचारांनी मनोमन खुललेल्या रामूच्या माध्यमातून मानवी मनोवृत्तीचे चित्रण येते.

### 3.2.11.6 सर्वसामन्यांच्या जगण्याचे चित्रण

गरीब परिस्थितीत जगणाऱ्या कुटुंबाची व्यथा 'चोपडी' या कथेत येते. जुनाट कौलातून ठिबकणाऱ्या पावसाच्या थेंबांमुळे आई कंटाळलेली असते. घरभर पावसाचे पाणी ठिबकत असल्याने आपली हिशेबाची चोपडी मुलाच्या दप्तरात नीट सांभाळून ठेवण्यास वडील सांगतात. त्या चोपडीत अनेक गोष्टी असतात. पुढच्या वर्षीच्या फायद्या तोट्याची बेरीजही आताच वडिलांनी काढून ठेवलेली असते. मुलाची चोपडी व वडिलांच्या हिशेबाच्या चोपडीत भांडण जुंपते. मुलाची चोपडी वडिलांच्या चोपडीस वांझोटी म्हणत आपलं पाचवं अपत्य खेळणार असल्याचे सांगते. वडिलांची चोपडी ढसाढसा रडू लागते. दुसऱ्या दिवशी ती पुन्हा वडिलांच्या हाती जाते पण मुलाच्या चोपडीचे शब्द तिच्या जिव्हारी लागलेले असतात. मुलाची दहावी संपल्यानंतर शिक्षणाचा खर्च पेलत नसल्याने शिक्षणास रामराम ठोकला जातो. हिशेबाच्या चोपडीमुळे दप्तरात शिक्षणामुळे गर्भारणाचा गर्व मिरवणाऱ्या चोपडीचा बळी जातो. मुलगा शिक्षण अर्धवट सोडून पोलीस खात्यात सर्वसामान्य नोकरी मिळवतो व वडिलांच्या मृत्युनंतर नकळत हिशोबाची जीर्ण जुनी चोपडी त्याच्या हाती येते. आज मुलगा बेरीज वजाबाकीच्या हिशेबात अडकणाऱ्या अंकांचे उत्तर शोधताना मोठ्या गर्वाने मुलांच्या दप्तरातील गर्भारणारी चोपडी पाहत असतो. चोपडी या प्रतिमेतून सर्वसामान्य माणसाची संसार जुळवण्याची बेरीज वजाबाकी असा एकूण हिशेब 'चोपडी' या कथेत लेखक मांडतात.

'भजन' या कथेत पोटापाण्याच्या विवंचनेत असलेली नमला आणि आत्माची संसारकथा लेखक मांडतात. बायको व दोन मुलांचा संसार असलेल्या आत्माला गोड गळ्याचे वरदान लाभलेले असते. गावातील अभंग, भजनांच्या देवालयातील मैफिलींना त्याच्या गोड अभंगाशिवाय रंग चढत नाही. बापूभटही त्याने म्हटलेल्या 'कांदा मुळा भाजी अवघे' या अभंगाचा शौकीन असतो. देवालयातील एका कार्यक्रमात आत्माची वाट पाहत मैफिल संपते. आत्मा आपल्या मानलेल्या बहिणीकडे गेल्याचे त्यांना समजते. जो तो आत्माच्या गायकीसाठी तळमळतो. पण नमला ही आत्माची बायको मात्र त्याच्या गोड गळ्याची वैरीण असते. आत्माला गाऊन पोटाची काही व्यवस्था करता येत नसल्याने ती त्याला खडे बोल सुनावते. रागाच्या भरात बहिणीकडे गेलेला आत्मा परत येत नाही. १५ दिवस जातात आणि एक दिवशी आत्माची बहिण घरी आली असता आत्मा

त्यांच्याकडे गेलाच नसल्याचे नमलाला कळून चुकते. आत्माशिवाय वर्षे जातात, आत्मा येत नाही. आत्माचा मोठा मुलगा सरकारी कारकून होतो, धाकट्या मुलाला गोड गळा लाभल्याने तो एका गायकाच्या बरोबर मुंबईत दूरदर्शनवर मोठ्या मैफिली रंगवतो. गणेश चतुर्थी निमित्त येणार असलेल्या धाकट्याच्या वाटेकडे नमलाचे डोळे लागलेले असतात. त्याच वेळी एक भिक्षुक गात दारी येतो. त्या भिक्षुकाला गाणे गाऊ न देता नमला भिक्षा देण्याचा प्रयत्न करते. ती न स्वीकारता तो साधू पुढे जातो. बापूभटाच्या दारात 'कांदा मुळा भाजी अवघे' हा अभंग गात असताना बापुभट तो साधु म्हणजे दुसरा तिसरा कोणीच नसून आपला आत्मा असल्याचे ओळखतो. आपली ओळख पटल्याने आत्माही भिक्षा न घेता भराभर निघतो. एका कलावंताची आपल्या कलेविषयीची असलेली आपली निष्ठा आणि त्यास नावे ठेवल्याने घर दार, मुलं-बाळं, पत्नी या सर्वांना सोडून मार्गक्रमण करू पाहणारा आत्मा अशी कथा येते.

प्रत्येक गोष्टीसाठी हट्ट धरणारा बाळगा 'पेज' या कथेत येतो. पेजेसोबत बटाट्याच्या कापांसाठी हट्ट करणारा, हवं ते मिळालं नाही की आकांत करून घर डोक्यावर घेणारा बाळू आणि अगदी विरोधी स्वभावाचा समंजस असा बाळूचा भाऊ राजू असतो. गरिबीमुळे कठीण परिस्थितीशी झगडत भविष्याची सुंदर स्वप्ने पाहणारा रामू असतो. दहावीच्या परीक्षेत नापास झालेला बाळू घर सोडून पुणे गाठतो. बाळूचे हट्ट पुरवणारी बाळूची आई त्याच्या आठवणीने झिजून जाते, राजूकडे पाहत जगते. बाळूचे वडीलही त्याच्या येण्याची आशा सोडून देतात. मिळेल ते खाऊन पोट भरणाऱ्या बाळूला एक धनिक आसरा देतो. आत्मियतेने सगळी कामे करणारा बाळू शिकू लागतो. तिथे वर्षा नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतो व धनिक पुढाकार घेऊन त्याचे लग्न वर्षाशी अगदी धूमधडाक्यात लावून देतो. पण बाळूचा सुखी संसार चालला असता नवी कोरी गाडी घेतलेल्या बाळूचा अपघात होतो व बाळू थोडक्यात बचावतो. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे वर्षा बाळूसाठी मेथीची पेज घेऊन हॉस्पिटलमध्ये जाते. त्यावेळी बाळूला पेज व बटाट्याच्या कापांसाठी कसरत करणाऱ्या आपल्या आईची आठवण होते व आईच्या आठवणीने तो बायकोसह घरी परततो. गावात भरपूर सुधारणा झाल्याचे चित्र त्याला दिसते. आपल्या घराच्या अंगणात पोहोचताच तो गतआठवणीत रमतो. आई वडील व भावाला पाहण्यास तो अत्यंत भावूक व उत्सुक झालेला असतो. पण ते न दिसल्याने व दाराला कुलूप दिसल्याने केविलवाणा होतो. कितीतरी वर्षांनी त्याला बालमित्र भेटतो व तो त्याला पेज जेवण्यास घरी नेतो. त्यावेळी त्याचा बालमित्र सुभल्या सत्य परिस्थितीची जाणीव करून देतो. त्याचा भाऊ राजूने एका मोठ्या शहरात स्वत:चे ऑफिस उघडलेले असते व गावी बाळूच्या आठवणीत झुरणाऱ्या आई वडिलांचे निधन झालेले असते. पंचवीस वर्षांनी गावात आलेला

बाळूला आपल्या मित्राच्या बायकोने वाढलेली पेज आपल्या आईनेच वाढली असल्याचे वाटते. आई वडिलांपासून दुरावल्याने मुलांमध्ये निर्माण होणारी दरी व मुलांवरच्या अविरत प्रेमात झुरत जगणारे आईवडील अशा कथेच्या माध्यमातून नातेसंबंधात आलेल्या बदलांचे चित्रण लेखक करतात.

### 3.2.11.7 ग्रामीण समाजजीवनातील 'बावळा'ची क्षणचित्रे

जातीबाह्य विवाह आणि 'अवाटाचो बवाळ' अशा एकूण आशयसूत्रास केंद्रस्थानी ठेऊन 'बवाळ' ही कथा येते. गावातील भानुमतीचे तारामतीच्या सुनेशी वैर असते. त्यामुळे ती तारामतीच्या सुनेला बोल सुनावते. तारामतीच्या सूनेलाही याचा प्रचंड राग येतो. कंबर लाचकावणाऱ्या तारामतीच्या सुनेला पाहून भानुमती तिला देवळीण संबोधते. खेड्यात जगणाऱ्या माणसांच्या आयुष्यात चाललेल्या गोष्टींची माहिती सहज गावभर पसरते. पत्नीचे निधन झालेला पक्या लोचट नजरेने स्त्रियांना पाहत असल्याची जाणीव अख्या गावभर माहिती असते. गावातील केशवचा मुलगा मुलींना फिरवत असल्याचेही भानुमतीकडून अवाटभर 'बवाळ' करत पसरवले जाते. परंपरेनुसार काळ्या आवयच्या घरात सभा बोलावण्यात येते. केशवचा मुलगा जातीबाह्य विवाह करण्याच्या प्रयत्नात असल्याने भानुमतीचा त्याला विरोध असतो. अशाच पद्धतीने जातीबाह्य विवाह परंपरा गावात फोफावेल, देव बाटणार अशी भीती ती व्यक्त करते. आपल्या एकुलत्या एक मुलाने आपल्याला हव्या त्या मुलीसोबत संसार थाटावा अशा विचारांचा केशव असतो. आपल्या पत्नीची तो समजूत काढतो पण भानुमतीने उठवलेल्या बवाळामुळे आतून पूर्ण कोसळतो. शेवटी कौल घेऊन देवळातील अवसरास प्रश्न विचारत प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न होतो. धुर्यावर देवाचा अवसर येतो. तारामतीच्या मुलाने आधी जातीबाह्य विवाह करून देवास बाटविला व आता केशवाचा मुलगा देवास बाटविण्याच्या प्रयत्नात असल्याचे भानुमती अवसरास सांगते. धुर्याच्या अंगात संचारलेला देव मंडपभर नाचू लागतो व नंतर शांत होतो. देवाचा निर्णय ऐकण्यास गाव सज्ज होतो. सज्जनाला जवळ बोलवत त्याच्या हातात पाच तांदूळ देतो. व आपली पिळगी म्हणजेच पिढी जो निर्णय घेणार तो निर्णय आपणासही मान्य असल्याचे देव सांगतो. लोकांवर देवाने निर्णय सोपवल्याने भानुमातीचा मुलगा सगुण्या पुढे येतो व जातीबाह्य विवाह केलेल्या तारामतीच्या मुलाबरोबर केशवचेही घर बाहेर ठेवण्याचा सल्ला देतो. सगुण्याच्या या निर्णयावर शिक्कामोर्तब होतो. धुर्याच्या अंगातील देव शांत होतो. राजारामच्या मुलीला पतीकडून मारहाण केली जाते त्यावरचा निर्णय मात्र घेतला जात नाही. मात्र घेतलेला निर्णय जुनाट वाड्यावरील न्हानूला पटत नाही. देव कधीच ग्रामस्थांवर निर्णय सोपवत नाही, व अवसर येणाऱ्यांवर खरंच देवाचा अवसर

येतो का? हा प्रश्न तो उपस्थित करतो. माणूस हा माणसांबरोबर विवाहबद्द होतो, जात पात देव तयार करत नाहीत तर माणसेच तयार करतात, त्यामुळे जातीबह्य विवाहामुळे देवास फरक पडत नसल्याचे न्हानू गावकऱ्यांना सांगतो. पण सत्य गावकऱ्यांना पटत नाही. तारामतीच्या मुलाबरोबर केशवाच्या घरास गावापासून अलिप्त ठेवणे हा निर्णय गावाकडून स्वीकारला जातो.

गावातील समजुतीच्या पार्श्वभूमीवर आधारित 'अवगत' ही कथा येते. आपल्या बहिणीने आत्महत्या केली नसून तो खून असल्याचे मृत बाईच्या भावाचे म्हणणे असते. त्यासाठी योग्यरीत्या पोस्टमोर्टेम व्हावा अशी मागणी व त्याने केलेल्या बावलाचे चित्रण लेखक करताना. मूल होत नसल्याने तिला घरच्यांकडून त्रास दिला जातो. गरोदर असताना मुलालाच जन्म दिला पाहिजे अशी ताकीद दिली जाते. तिखळी असल्याने त्रास दिला जातो. शेवटी कंटाळून ती आत्महत्या करते. पोस्टमोर्टम करून मृतदेह पतीच्या स्वाधीन करण्यात येतो. पोलीस मृतदेह पोहोचविण्याच जाताच तिच्या मृत्यूचा आपल्यावर आळ घेतला जात असल्याने घाबरून गेलेला तिचा नवरा गोपी पोलिसांना आपणास भीती वाटत असल्याने अडवून ठेवतो. पोलिस खात्यात कार्यरत असलेले कोनाटकर व निवेदक पाडलोस्कर यांनी 'अवगती'च्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कार करण्यासाठी गावातील ग्रामस्थांमध्ये चाललेल्या तसेच अंत्यविधीपूर्व वातावरणाचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षणातून 'बवाळा'चे चित्र रेखाटतात. सीमेवर 'अवगती' ठरलेल्या मृतदेहास पुरण्यास जागा देण्यास ग्रामस्थ नकार देतात. शेवटी 'सीमेधडी' ग्रामदैवत असलेल्या राखण्याच्या भरवशाने बापू आपली जागा देण्याचे ठरवतो. दुसऱ्या गावातील ग्रामस्थांचा त्रास होऊ नये म्हणून पाडलोस्कराच्या आधारे तिन्हीसांजेच्या वेळीस अंत्यसंस्कार करण्यास खड्डा खणून ठेवला जातो. भरपूर वेळ तिष्ठत थांबलेला पाडलोस्कर एकदाचो सुटलो म्हणून खुश होतो तर वरिष्ठाकडून मिळालेल्या आज्ञेनुसार पूर्ण अंत्यविधी पार पाडेपर्यंत तिथेच थांबतो.

'धालोच्या मांडावरचा खेळ' या कथेत यशवंताचा कुणाल व सितारामची केतकी या दोघांमध्ये लहानपणी धालांच्या मांडावर फुललेले प्रेम पण दोघांच्या आयांमध्ये धालांच्या मांडावरील भांडणामुळे निर्माण झालेले वैर. केतकीला शिव्या देत, पायपुसणे म्हणत, तिला मुलबाळ होऊ नये म्हणून शिव्या देणारी कुणालची आई यांचे चित्रण या कथेत येते. कुणाल व केतकीमध्ये वाढती जवळीक, त्यांच्याबद्दल गावकऱ्यांमध्ये कुजबुज चालल्याने कुणाल वडिलांच्या सांगण्यावरून पळून जात केतकीशी विवाहबद्ध होतो. घरात आई या नात्याचा स्वीकार करत नसल्याने कुणाल केतकीला घेऊन शहरात येतो. केतकी व कुणाल हळूहळू संसारात रमतात.

कुणालला बढती मिळते, घरात चारचाकी येते, कुणाल व केतकीच्या प्रेमास बहार येत असताना त्यांना बाळाची चाहूल लागते. मुलाच्या आगमनाची बातमी गावात पोहोचल्यानंतर आपला राग रोष विसरून कुणालची आई त्यांना फोन करते व पुन्हा त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करते, पण दुखावलेल्या कुणालला ते अमान्य असते. केतकीला मुलबाळ होऊ नये म्हणून शाप देणारी कुणालची आई केतकीला आठवते. पण नियती कुणाल व केतकीशी वेगळाच खेळ खेळते. त्यांचे मूल मृतावस्थेत जन्माला येते. कुणाल व केतकी दु:खाने पोळली जातात. कुणाल तिला सांभाळण्याचा प्रयत्न करतो पण केतकीची चिडचिड वाढू लागते. केतकी व कुणाल चारचाकीने बाहेर पडले असता त्यांच्या भरधाव धावणाऱ्या गाडीचा तोल जातो व गाडी आम्रवृक्षाला धडक देते. केतकी शुद्धीवर येते तर कुणाल बेशुधावस्थेत स्टेअरींगवर पडलेला असतो. कुणाल पाण्यासाठी, पाणी पाणी म्हणत विव्हळू लागतो. ती त्याच्या डोक्यावरील रक्त वाहणाऱ्या जखमेवर हात दाबते. कुणालकडे पाहून अर्धमेली होत कुठून तरी मदत मिळेल या आशेने जोरजोरात मदतीची याचना करते. गाडीतील गणपतीच्या मूर्तीला हात जोडून आपल्या वागण्याबद्दल माफी मागते, तिला फडफडणाऱ्या पेपरवर एक चित्र दिसते. कुणालसोबत बोलताना बाळाच्या आठवणीने पान्हाळलेला तिच्या छातीचा ओलावा तिला जाणवतो व ती हळूच आपला पदर बाजूला करत, तहानेने विव्हळणाऱ्या कुणालला पदराखाली घेते. बाळाच्या मृत्यूमुळे विव्हळणारी केतकी कुणाल आपले सर्वस्व असल्याने त्याच्यासाठी जगावे ही भावना आपल्या वागण्यातून व्यक्त करते. धालांच्या मांडवावर फुललेल्या प्रेमामुळे गावात उठलेला 'बवाळ' व कुणाल व केतकीच्या प्रेमाची भावनिक तार या कथेत लेखक छेडण्याचा प्रयत्न करत केतकीच्या माध्यमातून एका हळव्या स्त्रीचे विश्व चितारण्याचा प्रयत्न करतात.

गावातील नाट्य संस्कारांनी पोसलेला, प्रेरित झालेला व नाटकात रमणारा रामग्या 'नाटक' या कथेतून येतो. एकापेक्षा एक अशी चांगल्या नाटकांची तो निर्मिती करतो पण स्वत: नाटकात भूमिका बजावत नाही. रामग्याचे लग्नाचे वय उलटते, माथुकाकी म्हणजेच रामग्याची आई लग्नाचा आग्रह करत राहते. पण रामग्या मात्र स्वत:ला विसरून नाटकच जगतो. गावातील मुलींची छेड काढणाऱ्या दोन टवाळ खोरांवर तो नाटक लिहितो. गोव्यातील पेडणे गावाच्या ग्रामीण बोलीत हे नाटक लिहिल्याने, पेडणेकरांची अब्रू चव्हाट्यावर आणल्याने त्याच्या नाटकाला विरोध केला जातो. गावातील सज्जनल्या, शंभूल्या व वाकड्या रुपल्याने अनेक अयोग्य निर्णय घेत गावात 'बवाळ' म्हणजेच गोंधळ माजविलेला असतो. केशवच्या मुलाने जातीबाह्य लग्न केल्याने गोंधळ करत त्यांना गावाबाहेर ठेवलेले असते. आता आपल्या बोलीतून आपली अब्रू चव्हाट्यावर आणल्याचा रामाबद्दलचा अपप्रचारही शंभूल्या व वाकड्या रुपल्याकडून सुरू होतो. आपली भाषा ही निसर्गदत्त असल्याने

त्या भाषेचा आपण अभिमान बाळगणे गरजेचे आहे असे म्हणत देवळाचा अध्यक्ष असलेला सोनू शिरोडकर त्यांना खडे बोल सुनावतो. गावातील सज्जनल्या, शंभूल्या व वाकड्या रुपल्या यांच्या विरोधाला न जुमानता रामग्याला गावाबाहेर ठेवण्याचा निर्णय सुनावतात, रामग्याचे जगणे असह्य करून ठेवतात, गावातील गावकरी त्याच्याशी अबोला ठेवतात. गावातील नाटकांचा दिग्दर्शक म्हणून आता रामग्याच्या ऐवजी रुपेश उर्फ वाकडो पाडेलीकराचे नाव घेतले जाते. रामग्याच्या एका वेगळया जीवनाच्या नांदीची ती सुरूवात असते. रामगा आता मुंबईत जातो. मुंबईतील जेष्ठ दिग्दर्शक राजाभाऊ पिंगळे आणि रामग्याची भेट होते. फुटपाथवर पाणी पिऊन जगणाऱ्या रामग्याला अब्दुल भेटतो. आणि अब्दुलच राजाभाऊ पिंगळे व रामग्याच्या भेटीचे कारण ठरतो. नाटकाची भूक आणि वेड असलेल्या राजाभाऊकडून रामग्यावर नाट्यसंस्कार केले जातात. रामग्याने लिहिलेले, आणि पेडण्याच्या बोलीचे धिंडवडे काढण्यास रामगा निघालेला आहे असे म्हणत गावाने नाटकावरच नव्हे तर रामग्यावर सुद्धा ज्या नाटकामुळे बहिष्कार टाकला, त्या नाटकाचे नाव नाटकाच्या सुरूवातीला घेतो. रामचंद्र तुळसकर लिखित ‘झिंक चॅक झिंक बाबग्याचा लगीन’ असे नाव घेताच रामग्याचा हुंदका बाहेर फुटतो. नाट्यलेखक म्हणून त्याला योग्य मानधन दिले जाते. ‘झिंक चॅक झिंक बाबग्याचा लगीन’ या नाटकाचे शंभर प्रयोग होतात. राजाभाऊ रामग्याला जगाचा सामना करायला शिकवतो. रामग्याचा नाट्यलेखक रामचंद्र म्हणून तो प्रसिद्ध होतो. त्याच्या मुलाखती प्रसिद्ध होतात.  रामचंद्र गावात आपल्या बाजूने असलेया सोनूला आपली मुलाखत दूरदर्शनवर येणार असल्याचे सांगतो. आख्खा गाव सोनूच्या घरी मुलाखत बघण्यास जमतो. ‘गावाने आपल्यावर अत्याचार केला नसता तर आपण इथपर्यंत पोहोचलो नसतो’ असे उत्तर ऐकून गावकऱ्यांना आपली चूक कळते. आपली पेडण्याची बोली श्रेष्ठ असल्याचे त्यांना पटते. रामग्याचा गावात सत्कार करण्याचा विचार मांडला जातो. पण एवढ्या मोठ्या माणसास पुढाकार घेऊन बोलावणार कोण? असा प्रश्न गावकऱ्यांपुढे असतो.

बंडू या लहान मुलाच्या भावविश्वाला आकार देत ‘कवाट’ ही कथा आलेली दिसून येते. मामाने दिलेल्या काळया कोंबडीवर बंडूचे प्रचंड प्रेम असते. काळया कोंबडीसाठी आणलेले भाताचे गोळे इतर कोंबड्या खातात म्हणून बंडू कोंबड्यांना शिव्या देत त्याचा ‘बवाळ’ सुरू होतो. पांढऱ्या कोंबडीवर मारण्यास उचललेली लाथ काळया कोंबडीवर पडल्याने कोंबडी कॉऽऽऽ कॉऽऽऽ करून धावत सुटते व आठवडा उलटतो तरी परतत नाही. बंडू तिची शोधाशोध करतो, वेतोबाच्या देवळात जाऊन स्वत:लाच दोष देतो, गोधडीत तोंड खुपसून रडतो, तिच्या पांढऱ्याशुभ्र अंड्यांसाठी आसुसतो. गंगल्याच्या कुत्र्याने काळया कोंबडीला खाऊन टाकल्याचे बंडूच्या आईला समजते. कोंबडीच्या वाटेवर आस लावून बसलेल्या बंडूमुळे ती अस्वस्थ होते व कुत्र्याने कोंबडीला

खाऊन टाकल्याची वाच्यता त्याच्यापुढे करत नाही. आपला मुलगा झोपेत बडबडतो, घामाघूम होतो, रडतो असे ती भटजींना सांगते. त्याला काही नडले बाधले आहे का ते पाहण्यास सांगते. आपल्या नवऱ्याने हरवलेल्या बैलामुळे कण्हत कण्हत जीव सोडल्याने मुलगाही त्याच्याच वळणावर जातो का अशी भीती आईला असते. भटजी सीमेवरच्या 'देवचार'ला पाच केळी अर्पण करण्यास सांगतो. आपल्या वडिलांनी बैलाच्या विवंचनेने आजारपणास कवटाळले व आपणही तेच करत आईला त्रास देत असल्याचे भान बंडूला असते. पण आपल्याला कोणी तरी मागे ओढत असल्याचे बंडू आपल्या आईला सांगतो. भटजीने दिलेला दोरा बांधून घेतो. काही दिवसांनी बंडूत बदल जाणवू लागतात. एके दिवशी मित्र गळ्यात दोरा घातल्याने चिडवत असल्याने अंगात बळ संचारल्यागत दोरा तोडून टाकतो. शेवटी बंडूला गणपत भटजींकडे घेऊन जावे असे सकूला म्हणजेच बंडूच्या आईला वाटते. कोंबडी शोधायला मामाला आणुया असे बंडू आईला सांगतो. पुन्हा बंडू कोंबडीची रट लावत असल्याने सकू घाबरते. आपल्या गेलेल्या पतीकडे मुलास बरे करण्यास सांकडे घालते. बंडूने गळ्यातून दोरा काढल्यास भुते कोंबडीला खाऊन टाकणार असे सांगत दटावत सीमेवरच्या 'देवचार'ला पुन्हा पाच केळी देण्यास भटजी सांगतात. घरी गेल्यानंतर कोंबड्या ओरडत असल्याचे त्यांना ऐकू येते. बंडूचे मित्र धावत पळत येत काळ्या कोंबडीने झुडुपात अंडे दिल्याचे सांगतात. माळावरील हुसकेच्या झुडुपात असलेली अंडी पाहून आपली कोंबडी जीवंत असल्याचे बंडूला वाटते. अंडी अलगद उचलून तो बनियानात घालतो. व घरची वाट चालतो. भविष्यात काय होणार हे त्या बालमनांस ठाऊक नसते. अंडी काळ्या कोंबडेची की अजून कोणाची याबद्दल कोणालाच माहिती नसते. बंडू अंडी घेऊन घरी पोहचतो. दुपारच्या वेळेत कोंबड्यांचा आकांत सुरू होतो. अंडी कोणाची हा प्रश्न शेवटी मांडून लेखक वाचकासही असवस्थ करतात. उत्कंठावर्धक असा शेवट साधत अंडी कोणाची. काळ्याकोंबडेचीच? की एखाद्या सापाची? जो घरापर्यंत पोहोचलाय. अजाण बालकाचे भविष्य काय असा प्रश्न मांडत कथेची खालीलप्रमाणे सांगता लेखक करतात. ''बंडू अंडी घेऊन स्वयंपाक खोलीत गेला. आई कुठे त्याला दिसली नाही. एक- दोन त्यानं आईला हाका घातल्या. आईचा काही ओ मिळाला नाही. बंडूनं वेळ न दवडता चुलीवर तवा ठेवला. चुलीत आग केली. कांदा-मिरची चिरून विळी कोपऱ्यात होती तशी ठेवली. उकळलेल्या अंड्या पेक्षा भाजलेली अंडी बंडूला खूप आवडायची. काळ्या कोंबडीच्या अंड्यावर त्याचा जीव होता. कांदा-मिरची चिरून ठेवलेल्या पातेल्यात त्यानं अंडी फोडून घातली. व्यवस्थित चमच्यानं घोळवली. चुलीवरचा तवा तापला की नाही, पाहण्यासाठी त्यानं जवळच्या पोहऱ्यातलं पाणी तव्यावर शिंपडलं. तवा तापल्याची खात्री होताच त्यान पुन्हा एकदा अंडी चमच्यानं घोळवली. हळू तव्यावर ओतली. चाळ.. चूळ..

चाळ... चूळ आवाज घरभर झाला. तेवढ्याच जोरात बाहेरच्या कोंबड्यांचा आकांतही वाढला. काही क्षणानंतर बंडूच मन तृप्त झालं. कपटी पावलानं चालणारी संध्याकाळही क्षणभर थांबली. गावभर भाजलेल्या कवटांचा वास पसरला. कळायला मार्ग नव्हता. काळ्या कोंबडीच्या कवटांचा की...?"[7]

'शिवाडो' या कथेत हिंदू असलेल्या रामग्याशी ख्रिस्ती धर्मीय ॲना विवाहबद्द होते. मुलबाळ होत नसल्याने विधीनुसार ॲनाला हिंदू धर्मात आणले जाते व ॲनाची सीता होते. हळू हळू त्या दोघांमध्ये खटके उडू लागतात. मारामारीला सुरूवात होते आणि घर सोडून गेलेला रामगा घरी परतत नाही. सीता रामग्यासाठी काही काळ घरात थांबते पण स्वप्नी येणारा साप आता सोनेरी रुपात भास देत तिला सतावू लागतो. एके दिवशी हृदयावर दगड ठेवून घराला कुलूप लावून सीतेची पुन्हा ॲना होत फ्रॉक घालून घराबाहेर पडते व अख्ख्या गावासाठी चर्चेचा विषय ठरते. ॲना व्हिक्टर गोम्सच्या घरी जाते. व्हिक्टर गोम्स या वृद्धाच्या भाटाच्या देखरेखीच्या बदलात भाटातील घरात राहू लागते. रामग्याची आठवण आल्यास त्याला शिव्या देत असते. भाट व भाटातील घराची जबाबदारी ॲनावर सोडून गेलेला भाटकार आपल्या घरी परततो. ॲना त्यांची निष्ठेने सेवा करते. रामग्याशिवाय कित्येक वर्षे जगलेल्या ॲनाला भाटकाराची ओढ लागते पण ती स्वत:वर ताबा ठेवते. भाटकार पुन्हा भाट सोडून जायला निघताना ती कोसळते. पुन्हा एकाकी पडते. दुसरीकडे ॲनाला आण्टी म्हणणारा, वेळोवेळी तिच्याकडे पैशांची मागणी करणाऱ्या येसल्याच्या व्यसनाला व जाचाला कंटाळून येसल्याची बायको व मुले रामग्याच्या घरी आसरा घेतात. ॲनाला सतावणारा साप येसल्याच्या कुटुंबीयांना सतावू लागतो. सापाच्या रूपाने रामगाच येतो असा येसल्याचा समज निर्माण होतो. दोन दिवस ॲना दृष्टीस न पडल्याने तिच्या घराचे दार फोडले जाते. सापाने दंश केल्याने ॲनाचा मृत्यू झालेला असतो. येसल्या सापाच्या रूपाने येणाऱ्या रामग्याला दोषी ठरवतो. व शेवटी ॲनाला कोणीच नसल्याने नैसर्गिक मृत्यू म्हणून तिच्या मृत्यूची नोंद केली जाते. ॲनाने हिंदू धर्म स्वीकारल्याने ख्रिस्ती धर्मगुरूंच्या म्हणण्यानुसार गावातील ख्रिस्ती बांधव तिला स्वीकाराण्याची टाळाटाळ करतात. दोन गटात वादविवाद होतात व शेवटी दाजीच्या म्हणण्यानुसार हिंदू पद्धतीने तिच्यावर अंत्यसंस्कार करण्याची तयारी सुरू होते. ॲनाचा 'शिवडा' फोडून अंत्यविधी पार पडण्यास कोणीही तयार नसल्याने प्रश्न निर्माण होतो. येसुल्याला कधीकधी पैसे देणाऱ्या ॲनाचा 'शिवडा' फोडून म्हणजे मडके फोडून अंत्यविधी येसल्याने करावा असा प्रस्ताव येसल्यापुढे मांडला जातो. दारूच्या भरात येसल्या आपण ॲनाचा नव्हे तर सीतेचा 'शिवडा' फोडणार असे म्हणतो. अंत्यविधी पार पाडल्यानंतर सीतेची अस्ती भरावी लागतील व पुढील विधी करावे लागतील असे म्हणत गावातील भाईभट निघून जातो, पोटापाण्याची ददात

असलेल्या येसुल्याला आता दारूच्या नशेत दारावर उभी असलेली बायको दिसू लागते. आता आपला 'शिवडा' फोडून मुलांना खा, असे ती म्हणत असते. रूढी समजुतीच्या नावाखाली माणसांची होरपळ 'शिवडो' या कथेत येते. ग्रामव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर लोकसमजुतीमुळे उद्ध्वस्त झालेल्या स्त्रीजीवनाचे चित्रण या कथेत येते.

दयाराम पाडलोस्कर यांची कथा वाचताना लक्षात येते की संमिश्र असे अनुभवविश्व हे लेखकाच्या जगण्याचा भाग आहे. त्याच्या अनेक कथेत कृषिजीवनातील अनुभवविश्वातील अस्सलपणा व वास्तवाचे चित्रण झालेले दिसते. दयाराम पाडलोस्कारांच्या कथा वाचताना ग्रामीण कथाकार म्हणणेही रास्त ठरते इतक्या ताकदीने ते ग्रामीण विश्व चितारतात. तर दुसरीकडे आधुनिक जगण्यातील बदलांचे चित्रही त्यांची कथा मांडते. 'खपली निघाल्यानंतर' जखमेतून घळाघळा रक्त वाहते त्याचप्रमाणे पात्रांच्या माध्यमातून अनेक शोकांतिकांची मांडणी करून आपल्या संवेदनशील अशा मनाची खपली निघाल्यानंतर घळाघळा वाहणाऱ्या संवेदनेचे प्रकटीकरण लेखक या कथांमधून करतात असे म्हणावे लागेल.

### 3.2.12 गजानन देसाई यांचे कथालेखन

गजानन यशवंत देसाई यांचे 'कुळागर' (२००५) व 'नियोग' (२०१७) असे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले. ग्रामजीवनातील समाजवास्तवाचा वेध घेणाऱ्या, भिन्न स्तरावरील माणसांच्या जीवनमानाच्या, राहणीमानाच्या अनुषंगाने त्यांच्या कथा आलेल्या दिसतात. ग्रामीण समाजजीवनातील बदलांवर, बदलत्या मानसिकतेवर, ब्राह्मण, दलित व ग्रामजीवन जगणाऱ्या लोकांच्या जगण्यातील संघर्ष, ग्रामीण कृषीसंस्कृतीशी जुळलेली माणसे, ग्रामजीवनातील राजकारण, ग्रामीण चालिरीतींचे चित्रण करत ग्रामजीवनातील अंधश्रद्धेवर, ग्रामीण वास्तव इत्यादींवर लेखक भाष्य करतात. त्यांच्या कथांमध्ये ग्रामजीवनाबरोबरच सर्वसामान्य माणसांच्या धडपडीचे, मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण दिसून येते त्याचबरोबर जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारी, स्त्रीचे भावविश्व मांडणारी कथा आलेली दिसून येते.

#### 3.2.12.1 ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण

ग्रामीण लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर ख्रिस्ती लोकांचे जगणे चितारत आलेली 'होलपांडा' ही कथा महत्त्वाची ठरते. वडील दारुडा असल्याने व आईचा जळून मृत्यू झाल्याकारणाने जुझेचा मामा त्याला गावी घरी नेतो. तिथे गेल्यानंतर जुझेच्या मनाला लागलेली गावची ओढ लेखक चित्रित करतात. आपल्या गावातील

माळ्यावरील राखण्याचे गाणे, काजूच्या दिवसातील कोळंब्यावर येणारा काजूचा घमघमाट, आंब्या फणसांचा गोडवा व तितीवची 'कांतारं' (गीत) इ. गोष्टींच्या आठवणीने व्यथित होणारा जुझे कथेत येतो. ग्रामीण संस्कृतीचे चित्रण करत असताना प्रामुख्याने ग्रामीण ख्रिस्ती समाज केंद्रस्थानी असलेल्या या कथेत दिसून येतो. गाळ टाकून मासे पकडणारा 'गांथन' करून विकणारा बस्त्यांव हा जुझेचा वडिल व गावातील त्यांचे एकमेव ख्रिश्चन कुटुंब. पण गावातील लोकांकडून जुझेच्या मायला म्हणजेच आईला विहिरीवर पाणी भरण्यास मनाई असते. ख्रिस्ती लोक डुक्कराचे मांस खात असल्याने ग्रामीण भागात अस्पृश्यता पाळली जात असल्याचे कथेत येते. ग्रामजीवनातील आठवणींच्या पार्श्वभूमीवर तब्बल वीस वर्षांनी परतलेला जुझे नव्या बदलांना सामोरे जातो. गावचा चेहरामोहरा बदलल्याने अस्वस्थ होतो. फॉरेनहून आलेला जुझे गावी रहायला येतो. पण बदलता काळ त्याच्यावर जबरदस्त 'होलपांडा' मारतो अशी ही कथा येते. 'नियोग' या कथासंग्रहातील 'तो' ही कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. या कथेतील निवेदकही गतआठवणीत रमणारा दिसून येतो. ग्रामीण भागात 'कुळी' वाचण्याची परंपरा पाळली जाते. दारादारात नंदी बैलाच्या माध्यमातून कुळाच्या आणि कुटुंबाच्या सत्कर्माविषयीची माहिती नंदीबैल घेऊन येणारा गात देत असतो. लहानगा निवेदक, त्याला नंदीबैलाचे आणि नंदीबैल घेऊन येणाऱ्या माणसाच्या जीवनाचे वाटत असलेले अप्रूप या कथेत कथन करतात. 'एका पांगळ्या माणसाचा बैल अंगावर पडून मृत्यू झाला' अशी बातमी वाचताच निवेदकाच्या लहानपणाच्या आठवणी जाग्या होतात. आजच्या बदलत्या आधुनिक जगाला सामोरे जाणारा हा निवेदक आहे. लहानपणी गावात येणारा नंदीबैल व नंदीबैल सजवून घेऊन येणारा गृहस्थ याचे वर्णन लेखक करतात. निवेदकाच्या लहानपणी गावात येणाऱ्या नंदीबैलाची सुवासिनी बायकांकडून पूजा केली जायची. नंदीबैलास घेऊन येणारा गृहस्थ कुळी सांगायचा. त्या गृहस्थाशी लहानग्या निवेदकाचे जुळलेले भावबंध लेखक या कथेत चित्रित करतात. नंदीबैलास घेऊन लोकांच्या दारोदारी फिरत कुळी वाचण्याची परंपरा चालू ठेवणे आज कमीपणाचे वाटत असल्याचे सत्य या कथेत नंदीबैलास घेऊन निवेदकाच्या दारी आलेला 'तो' व्यक्त करतो. रात्री विसावत असताना त्याचा नंदीबैल गावकऱ्यांच्या पोरसात म्हणजेच बागेत शिरतो. सकाळी नंदीबैलाच्या पोशाखात असताना ज्या नंदीबैलाची पूजा करण्यात आली त्याच नंदीबैलाचा सजवलेला साज उतरवल्यानंतर तो रात्री बागेत घुसल्याने त्याला गावकऱ्यांचा राग रोष सहन करावा लागतो. आपल्या नंदीबैलाची परिस्थिती पाहून लोकांना फक्त देखावा हवाय. नंदीबैलाच साज चढवला तर देव आणि साज नसल्यास त्यांच्यासाठी तो नुसता बैल अशी समाजाची असलेली मानसिकता 'तो' स्पष्ट करतो. त्यानंतर कित्येक वर्षे नंदी बैल खेळवणारा माणूस गावात फिरकत नाही. अंगावर बैल खेळवत असताना दुर्दैवी

ठरलेला आपल्या गावात येणारा 'तो'च नसेल ना? या प्रश्नाने त्याच्या अंगावर काटा येतो. या दोन्ही कथांमध्ये बदलांना सामोरे जाणारा निवेदक हा स्वप्नरंजनातून सत्यातील बदलांकडे वाटचाल करताना दिसून येतो.

### 3.2.12.2 भाटकरशाहीतील अनैतिकतेचे चित्रण

गजानन देसाईंच्या 'प्राक्कलन' या कथेतील नकोशी या केशव गावडेच्या बायकोला रामा भाटकाराचा मुलगा आपल्या जाळ्यात ओढतो. गावात याची चर्चा होते. लग्नानंतर खेळल्या जाणाऱ्या हास्यमजेशीर खेळात केशव तोंडात दिलेल्या खोबऱ्याचा चोथा करून नकोशीवर फेकतो. अपमान सहन न झालेल्याने नकोशी सूड भावना मनात ठेवते व पतीला फसवत भाटकाराच्या मुलाशी अनैतिक संबंध ठेवते. या गोष्टीला बरीच वर्षे उलटतात. गावात बदल होतो. नकोशीची मुले व भाटकाराच्या नाती वयात येतात. वृद्ध झालेला केशव शेतात राबतो. ग्रामीण जीवनातील राहणीमान लेखक या कथेतून चितारण्याचा प्रयत्न करतात. 'पेज' व 'सुके खारे' जेवणारा, खांद्यावर कांबळी घेऊन विडीचे झुरके घेणारा केशव असे चित्रण कथेत येते. केशवच्या घराच्या पाकोटीला लाकडं आणि गोवऱ्या ठेवण्यासाठी केलेल्या पडवीत कुणी तरी बोलत असल्याचे केशवाला वाटते. त्यावेळी आपल्या थोरल्या भावाचा सतरा-अठरा वर्षाचा मुलगा व रामा भाटकाराची चौदा वर्षाची वर्षांची नात गुलूगुलू गोष्टी करण्यात मग्न असल्याचे पाहून त्याला धक्का बसतो. पण आपल्या पुतण्याने भाटकाराच्या नातीस पटवल्याने आनंदी होतो. कधी काळी आपल्या पत्नीला भाटकाराच्या मुलाने फसवले आज आपल्या पुतण्याच्या माध्यमातून आपल्या केलेल्या फसवणुकीचा सूड उगवल्याचे समाधान केशवला लाभते. भाटकाराला पाहून मिश्किलपणे हसणारा केशव त्याला आज आपल्या आनंदाचे कारण म्हणजे आपल्या लग्नाचा वाढदिवस असल्याचे सांगतो.

### 3.2.12.3 मानवी वृत्तींचे चित्रण

भल्या मोठ्या कुटुंबात जन्मलेला निवेदक सर्वांकडून लाडवला जातो पण आईकडून मात्र त्याला शिस्त लावण्याचा प्रयत्न होत असतो. शेजारी असलेल्या गणूची आई वारल्याने देवाला बिस्किटाची आशा दाखवत, आपलीही आई देवाघरी जावी, आपल्या आईला नेल्यास रोज एक बिस्कीट देण्याची भाबडी विनवणीही तो करतो. आई मात्र आपल्या लेकरास सद्बुद्धी मिळावी म्हणून देवाची विनवणी करत असते. बऱ्याच दिवसांनी एका नाटकास गेलेला निवेदक नाटकातील वेड्या मुलाचे आई देवाघरी गेल्यानंतरचे हाल पाहतो. आपल्या कृत्याचा

त्याला पश्चाताप होतो व रडत आईला मिठी मारत शहाणपणा अंगीकारतो. लहानग्या मुलाचे परिपक्व होत चालणारे मनोविश्व साकार करणारी प्रक्रिया 'प्रक्रिया' या कथेत येते. 'नियोग' या कथासंग्रहातील 'नियोग' या कथेत पौंगडावस्थेत असलेल्या परेशचे आपल्याच आजोळी एका खोलीत राहणाऱ्या जोडप्यांमधील २० -२५ वर्षाच्या स्त्रीबद्दल असलेले आकर्षण याचे चित्रण येते. १२-१३ वर्षांचा असलेला निवेदक परेश नकळत तिच्याकडे ओढला जातो. स्नानगृहात तिला पाहताना आपल्या कुमारवयातील मनोवस्थेचे चित्रण करतो. परेशची चोरी ती स्वत: पकडते आणि स्वत:च्या शरीरसुखाच्या लालसेने त्याला जवळ घेते. त्यालाही तिच्या शरीराची चटक लागते. मोठेपणी स्वत:चे लग्न ठरल्यानंतर परेशला तिची आठवण होते. आपल्या पौंगडावस्थेत ती आपल्याशी असे का वागली या प्रश्नाने अस्वस्थ होत तो तिला भेटण्यास जातो. कित्येक वर्षांनी भेटल्यानंतर ती शाळेत शिक्षिका असल्याचा गौप्यस्फोट होतो. आपल्या लग्नाची निमंत्रणपत्रिका पुढे केल्यानंतर आपल्यासारखाच दिसणाऱ्या १५ वर्षाच्या मुलाला पाहून तो दिग्मूढ होतो. अपत्य व शरीरसुखासाठी निवेदकाशी जोडलेली मिनाक्षी व पौंगडावस्थेतील स्त्री आकर्षणाने भारावलेला परेश यांच्या मनोवृत्तीचे चित्रण करणारी ही कथा ठरते.

'दान दक्षिणा' या कथेत दारिद्र्यामुळे संघर्षमय जीवन स्वीकारणारा जोशी भाट आपल्या मुलीने स्वीकारलेल्या तडजोडीमुळे हिंदू धर्मातील लग्नसंस्थेतील तकलादूपणावर विचार करतात. कन्यादान हे सर्वश्रेष्ठ दान असले तरी या दानाबरोबर इतकी दक्षिणा का घ्यावी ज्या दक्षिणेच्या ओझ्यानेच दान करणारा दबून जावा ? असा प्रश्न त्यांना पडतो. हर्षलचा शेवटी विवाह संपन्न होतो. विवाहानंतर एके दिवशी पुरोहितास गाय दान देण्यासाठी भाटकर जोशी भटाकडे येतो. भाटकाराचे बोल ऐकत जोशी भट चमकतो. धर्म, पाप, पुण्य, दान दक्षिणा यामुळे आपल्या मुलीच्या शोकांतिकेची जाणीव त्याला पुनश्च होते. भटजी लगेचच दान स्वीकृत करण्याचा निर्णय सांगतात व ८००० रुपयांची आणलेली गाय दान करताना सोबत तितकेच मूल्य दान दक्षिणा म्हणून द्यावे लागेल अन्यथा ते पूर्ण होणार नाही असे भाटकारास सांगतात. गाय दानाचे पुण्य मिळणार नाही या भितीने भाटकारही ती मागणी मान्य करतो. हुंड्यासारख्या सामाजिक चालिरीतीला सुरूवातीला विरोध करणारा जोशी भट शेवटी परिस्थितीमुळे स्वत: भाटकाराकडून पैसे उठवतात.

### 3.2.12.4 सर्वसामान्य माणसांच्या जगण्याचे चित्रण

सर्वसामान्य माणसाची जगण्यातील धडपड, तोचतोचपणा याचे चित्रण 'हाफ डे' या कथेत लेखक करतात. अतिशय कष्टाने सातवीपर्यंतचे शिक्षण घेतलेला व सर्वसामान्य प्युनची नोकरी करणारा विश्राम कामावर पोहोचण्यास उशीर झाल्याने ऑफिसमध्ये साहेबांची बोलणी खावी लागेल या भितीने 'हाफ डे' घेत अर्धा दिवसच कामाची हजेरी दर्शविण्याचा विचार करतो. ऑफिसला पोहोचण्याची तारेवरची कसरत करता करता पोट भरण्यासाठी चाललेली अनेकांची कसरत त्याच्या लक्षात येते. भाजीची पाटी घेऊन गावभर फिरणारी आई आठवते. दुर्गंधीयुक्त तंगडीशी खेळ करणारा कुत्रा, मेलेला उंदीर उचलून घाणीत सुख शोधत उंदराची चिरफाड करणारा कावळा, जीवंत घोरपड चिरून त्यांना उकळत तेल करून विकणारा माणूस, साहेबांच्या भावाच्या मृत्यूनंतर घरातील वातावरण अशा अनेक घडामोडी त्याच्या मनात थैमान घालतात. पोट भरण्यासाठी जनावरांना व माणसांना घाणीत लोळावे लागते असे त्याला वाटते. सर्वसामान्य माणूस घडलेल्या घटनांची संगती लावत पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठी धडपडत असतो. त्याचप्रमाणे विश्रामही आपण पाहिलेल्या घटनांमध्ये चार व एक आकड्याचे साम्य असल्याने चाळीस नंबरावर तीस व चौदा रुपयावर वीस असा मटका लावतो. मटक्याचा निकाल मात्र मुंबई २८ व कल्याण ४१ असा येतो. आपले गणित चुकल्याचे त्याच्या लक्षात येते. आपण हाफ डे घेतल्याने कल्याण या एकाच मटक्यासाठी अर्धा दिवस खेळणे अपेक्षित होते अशी नशीबाची संगती तो लावतो. बस चुकल्यामुळे त्याला घरी परत जायला उशीर होतो. घरी पोहोचण्याच्या वाटेवर त्याला पुन्हा एकदा कुत्रा दुर्गंधीयुक्त तंगडी घेऊन झोंबताना दिसतो. अत्यंत प्रतिकात्मक पद्धतीने माणसालाही कधी कधी पोटापाण्यासाठी स्वत:ला दुर्गंधीत झोकून देत तेच ते काम करत जगावे लागते. स्वप्नांचे डोलारे तो बघत असतो. पण नशीबावर भिस्त ठेऊन बांधलेले हे सर्वसामान्यांचे डोलारे अनेक विसंगतीमुळे उधळले जातात असा गहन आशय 'हाफ डे' ही कथा व्यक्त करते.

### 3.2.12.5 समाजातील रूढी पद्धतींवर भाष्य

गोमंतकात कौल घेणे यालाच 'प्रासाद घेणे' किंवा 'प्रसाद पाकळया लावणे' असे म्हटले जाते. या गोव्यातील चालीरीतिच्या पार्श्वभूमीवर 'कौल' ही कथा आलेली आहे. प्रसाद पाकळीवर आधी विश्वास न ठेवणारा निवेदक या कथेत येतो. पण कांता त्याला प्रसाद पाकळीसाठी घेऊन जातो. प्रसाद पाकळीतून कौल घेणाच्या पद्धतीचे चित्रण पुढीलप्रमाणे कथेत येते. उदा. " त्या माणसाने देवीची पाषाणाची मुर्ती पाणी लावून

चांगली धुवून घेतली आणि पंच्याच्या सोग्यानं चांगली पुसून काढली. बाजूला लोंबकळत असलेल्या नंदादीपामध्ये वात पेटवली, उदबत्ती अख्खा पुडा त्याने पेटवीला व पाण्यात बुडवून ठेवलेल्या पिटकोळीच्या फुलांच्या कळया पाषाणाला ओळीत लावण्याततो दंग झाला. पाषाणाच्या उजव्या बाजूला सात कळया लावल्या, तर उजव्या बाजूला एका खाली एक अशा सात कळया. देवीच्या हातात तलवार होती. त्या मुठीला एक ! : छातीला दोन ! गाभाऱ्यात पंचवीस वॅटचा एक बल्ब, त्याचा पिवळा प्रकाश! उदबत्तीच्या धुरासकट घमघमाट! देवीचे भलेमोठे वारूळ ! त्या वारूळाला असंख्य भोकं, अन् पायथ्याशी असलेल्या देवीच्या पाषाणाच्या मूर्तीला लावलेल्या लाल पिटकोळीच्या कळया ! वातावरण बरेच गुढ वाटत होतं आणि त्या वातावरणात शांतता अस्वस्थ करणारी होती! ‘चला हात जोडा’ कौल घेणाऱ्या काकांनी फर्मान सोडलं. तसा मी नारळाला हात लावून उभा राहिलो. ‘तुमच्या कुल देवाचं नांव सांगा.’ काका ‘रवळनाथ’ मी उत्तरलो. ‘हे बा रवळनाथा, तुजो अज्ञानी बालक आज तुज्या चरणापाशी येयलो आसा. काय खोटानाटां आसा, करणी करतूज आसात, जाल्या तुज्या पायापोंदा दवर, जाणट्यांची दया तयार कर, काय चुकला माकलां, तर क्षमा कर आणि तुजो दयेचो प्रसाद उजवो तिसरो पाचवो दी.” [8] गोव्यात घर दाराची राखण करण्यासाठी राखणेचा कौल घेतला जातो त्याचाही उल्लेख कथेत येतो. तसेच देवीची मागणी असेल तर स्वप्नात येऊन ती काही तरी मागते व त्या त्या वस्तूवर पाणी सोडण्याची पद्धत येते. कांताच्या सांगण्यावरून निवेदकावर काही करणी केली असल्याचे बघण्यास प्रसाद पाकळी म्हणजेच कौल लावला जातो. ग्रामदेवीला कौल लावल्यानंतर गेल्या वर्षी कुलदेवीच्या जत्रेत जाता आले नसल्याने रागावणी असल्याचे प्रसाद (कौल) लावणारा काका त्याला सांगतो. चुकीची माफी मागण्यास कौल मागितला जातो. तिसरी किंवा पाचवी पाकळी पडून कौल मिळविण्याचा प्रयत्न काका करतो. धंदा व्यवस्थित चालत नसल्याने कौल घेतला जातो त्यावेळी कुणीतरी करणी केल्याचे त्याला कळते. आपली कोणाशीच दुष्मनी नसल्याने तो संभ्रमात पडतो. शेवटी आपल्या गाडीचा व शिक्षक तळवडकरांच्या गाडीला धक्का लागल्याने त्यांच्या मनात आपल्याविषयी वाईट भावना असल्याची शंका व्यक्त करतो. तळवडकर चांगला, अध्यात्मिक विचारांचा माणूस असल्याचे त्याचं एक मन त्याला वारंवार सांगते. पण शेवटी मास्तरांनीच ‘मूठ’ करणी केल्याचा कौल लागतो. करणी निस्तरण्यासाठी बकरा मारण्याचे निश्चित होते. बकऱ्याची सर्व व्यवस्था कांताच्या मदतीने घाबरतच केली जाते. बकऱ्याच्या गळयात माळ घालून बळीस सज्ज केला जातो. बकऱ्यास पुन्हा मागे वळून न पाहण्याच्या अटीवर करणी निस्तरण्यासाठी घाडी निवेदक व कांताची पाठवणी करतो. दुसऱ्या दिवशी शिक्षक तळवडकर आपल्या घरी आलेले पाहून निवेदक अस्वस्थ होतो. लंडनला

असलेल्या मुलाकडे वर्षभर वास्तव्यासाठी जाणार असल्याने आपल्या झाडांचे स्प्रिंकलर रोज चालू करण्याची विनंती करण्यास ते आलेले असतात. त्यामुळे शिक्षक तळवडकर आपल्यावर करणी करत असल्याचा निवेदकाचा संशय मावळतो. कांता त्याला पुन्हा फोन करतो. देवास बकरा पावन झाला की नाही हे पाहण्यास पुन्हा प्रसाद पाकळी लावण्यास जावे लागणार असल्याचे सांगतो. तवडकर इंग्लंडला जात असल्याचे सांगून ते आल्यानंतर घेऊया अशी सबब निवेदक सांगतो. कांता फोन ठेवतो व त्याच वेळी देवाच्या फोटोवरचे फुल गळून खाली पडते. आपल्याला देवानेच कौल दिल्याचे त्याला वाटते व समाधानाने तो कामासाठी बाहेर पडतो. लोकांचे भावबंध जुळलेल्या काही गोमंतकीय समजुतीवर लेखक भाष्य करण्याचा प्रयत्न करतात. या अंधश्रद्धा आहेत असे सरळपणे न सांगता. या चालीरितींमधील फोलपणा आपल्या निवेदनातून सूचित करताना दिसतात.

'सरण' या कथेत गावातील नाईकांच्या घरातील वृद्धाच्या मर्तिकाच्या अंत्यविधीची जबाबदारी आपल्या खांद्यावर पेलणारे दिगंबर व म्हातृ येतात. दिगंबर आंब्याच्या झाडावर चढून लाकडांची व्यवस्था करतो तर म्हातृ बांबू घेऊन येत तिरडी बांधण्याची व्यवस्था करतो. मूलबाळ नसलेल्या म्हाताऱ्याचा भाचा तिथे हजार असतो. वृद्धाचे सावंतवाडीहून नातेवाईक येणार असल्यामुळे अंत्यसंस्कारास उशीर केला जातो. तीन वाजता अमावस्या सुरू झाल्यास आपण अंत्यविधीत मंत्रोच्चार करणार नसल्याचे भटजी सांगतो. भट न आल्यास आपणच भडाग्नी देऊया असे दिगंबर म्हातृला सांगत धीर देतो. वारशांबरोबर कोर्ट कचेऱ्यांमुळे नाईकने कायमचे शत्रुत्व स्वीकारल्याने वृद्धाच्या अंत्यविधीसही ते येत नाहीत. दुपारचे दोन वाजतात सूर्य ढळू लागतो. अंत्यविधीसाठी येऊ पाहणारे नातेवाईक जेऊन खाऊन येत आहेत अशी चर्चा सुरू होते. दारू ढोसत थांबलेले एक टोळके, दिगंबर, म्हातृ, भाचा अशी तुरळक मंडळी तेवढी अंत्यविधीसाठी थांबतात. अमावस्या सुरू होते व गावातील सगळी माणसे आपआपल्या घरी परततात. शेवटी नातेवाईक, नाईकांची बहिण उमा पोहोचते. मृतदेहाला अग्नी देण्यास भाचा व नातेवाईक तयार होत नाहीत. आपले आई वडील जीवंत असल्याने आपल्याला अंत्यविधी पार पाडणे शास्त्रानुसार मान्य नसल्याचे ते सांगतात. शेवटी सरकारी हॉस्पिटलमधून कर्मचारी येतात व चंद्रकांत नाईक म्हणजेच मृत झालेल्या वृद्धाने आपल्या मृत्यूपत्रात आपला देह न जाळता हॉस्पिटलमध्ये दान देण्यास कागदपत्र केल्याचे सांगतात. मृतदेहाचा अंत्यविधी चोख पार पडण्यासाठी धडपडणाऱ्या दिगंबर व म्हातृची चिंता वेगळीच असते. आपण तिरडी बांधली, मडके आणले, आगीची धुनी तयार केली, मसणात अर्धे सरण जाळले आणि या सर्व तयारीचे करायचे काय? असा प्रश्न त्यांना पडतो. या कथेत ग्रामीण भागातील मनोवृत्तींचे यथार्थ चित्रण केलेले दिसून येते. माणूस जातो पण शेवटी अंत्यविधी सुद्धा एक

सोपस्कार एक व्यवहार बनून जातो याचे चित्रण लेखक करतात. अंत्यविधीसाठी झटणारे दिगंबर व म्हातृ गावातील एका जबाबदार माणसाच्या मनोवृत्तीचे चित्र पुढे मांडताना दिसून येतात.

### 3.2.12.6 स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण

उल्का या स्त्रीचे भावविश्व अत्यंत सुंदररीत्या मांडण्याचा प्रयत्न 'काटे केगदीच्या झाडा' या कथेत लेखक करतात. सासूकडून आपल्याला प्रेम मिळाले पण आईने मात्र आपल्यात व आपल्या भावात नेहमी फरक केला, लग्नानंतरही मुलाचे घर समृद्ध व्हावे असे तिला वाटले पण मुलीच्या संसाराची पर्वा केली नसल्याची जाणीव आईच्या आजाराच्या अंतिम समयी उल्काला होते. सुनेची बाळंतपणे, घरातील काम या सर्व गोष्टी आईने केल्या पण स्वत:च्या ताब्येतीची मात्र काळजी घेतली नाही. अंतिमसमयी उल्कला आपल्याकडे ने म्हणून ती विनवू लागते पण आधीच वडिलांच्या वेळी वडिलांना आपल्याच घरी ठेवल्याने आपल्या पतीला पुन्हा त्रास का देऊ या विचाराने उल्काने ते टाळते. आईच्या भावांनी खूप आधीच पाठ फिरवलेली. माणसांची एकमेकांवर असलेली माया कालांतराने कमी का होते. असा नात्यांविषयीचा प्रश्न उल्काच्या मनात येतो. शेवटच्या आजारपणात आईचे सुनेकडून भरपूर छळ सुरू होतात. पावसाळ्यात तिला ओसरीवर ठेवतात. शेजाऱ्यांकडून आलेल्या पत्रातून तिला आपल्या आईच्या दयनीय अवस्थेची माहिती मिळते व ती ताबडतोब माहेरी जाते. आपल्या आईची अवस्था पाहून थिजते व भाऊ व भावजयीने तिच्याकडे दुर्लक्ष केल्याचे तिच्या लक्षात येते. तिला आपली आई गर्द रानात फुलणाऱ्या केवड्यासमान वाटते. उल्काचे आपल्या आईशी जुळलेले भावबांध अत्यंत प्रतिकात्मक पद्धतीने कथेच्या शेवटी लेखक मांडतात. उल्का विचार करते की केवडा सर्वांना सुगंध देतो पण तो काहींना आवडत नाही, तसाच आईने भावाला खूप जीव लावला पण त्याला ते नको होते. त्यात केवड्याप्रमाणे परिमळणाऱ्या आईचा दोष नव्हता. आणि आपणास प्रेम देत नसल्याने केवड्याच्या काट्यांची फिकीर आपण कधीच न केल्याचे उल्काच्या लक्षात येते. शेवटी आई ती आई म्हणत सुकलेला केवडाही सुगंध देतो, ज्याला नको त्यांनी न घेवो म्हणत आपल्या आईच्या वृद्धावस्थेला स्वीकारते व तिच्या मनातील आईविषयीची सर्व किल्मिषे गळून पडतात.

### 3.2.12.7 जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारी कथा

वैचारिक पातळीवर मैत्री जुळलेल्या दोन मित्रांच्या माध्यमातून जीवनाच्या अंतिम सत्यावर विवेचन 'अंतिम सत्य' या कथेतून झालेले दिसून येते. ऐकलेल्या एका व्याख्यानातून जीवनाचे अंतिम सत्य मृत्यू

असल्याची जाणीव मेघनला होते व त्याचे विचारचक्र सुरू होते. सुशिक्षित असलेले मेघन व प्रणव यांच्यात अंतिम सत्य काय याविषयीची चर्चा सुरू होते. जीवनाचे अंतिम सत्य मृत्यूच असेल तर जगण्यासाठी आपण इतके का धडपडतो असा प्रश्न मेघनला पडतो. या अनंत विश्वाच्या तुलेनेत आपले अस्तित्व काय असा विचार त्याच्या मनी येतो. मृत्यू हा कोणासाठी थांबत नसल्याचे दीड तासापूर्वीच भेटलेले आणि नंतर निधन झालेल्या काकांच्या बातमीवरून मेघनला कळते. कठड्यावर तोल जाता जाता मेघनला प्रणव बचावतो व सध्या तू जीवंत आहे हेच आपल्यामते अंतिम सत्य असल्याचे मेघनला सांगतो. गहन अशा विषयावर भाष्य करत आपण जगणारा वर्तमान हेच जीवनाचे अंतिम सत्य असल्याचे या कथेतून निर्देशित होते. कथेला विशिष्ट असे कथासूत्र नसले तरी गतीमान पद्धतीने आशयाचे एक सूत्र मांडण्याचा लेखक प्रयत्न करतात.

### 3.3 नव्वदोत्तरी कालखंडातील स्त्रियांचे कथा लेखन

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथालेखनात स्त्रीचे बदलते विश्व, स्त्रीचे प्रश्न, नातेसंबंधांमध्ये होणारे बदल, आधुनिक स्त्रीला खुणावणाऱ्या अनेक विषयांची मांडणी कथेतून होताना दिसते. नव्वदोत्तरी कालखंडातील महत्त्वाच्या स्त्री कथाकारांमध्ये वासंती नाडकर्णी, माधवी देसाई, ज्योती कुंकळकर, मेघना कुरुंदवाडकर, आरती दिनकर, अंजली अमोणकर, हेमा नाईक, प्रतिभा कारंजकर, रेखा पौडवाल, सुजाता सिंगबाळ, गिरिजा मुरगोडी या कथा लेखिकांच्या कथालेखनातील अनुभव व आशयविश्वाचा पडताळा खालील अभ्यासातून घेतला गेलेला आहे.

### 3.3.1 वासंती नाडकर्णी यांची अनुभवसंपन्न कथा

नव्वदपूर्व कालखंडात लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये वासंती नाडकर्णी या लेखिका महत्त्वाच्या ठरतात. त्याचे 'कौमुदी' (१९७६), 'प्यादी' (१९८२), 'असंही अपत्य' (१९८७) व नव्वदोत्तरी कालखंडात 'आकाशफूल' (१९९७), 'गिनीपिग' (२०१७) असे एकूण पाच संग्रह प्रसिद्ध झाले. वासंती नाडकर्णींच्या कथेविषयी नारायण महाले लिहितात, " त्यांच्या कथेतील आशयसूत्रे समकालीन वृत्ती – प्रवृत्तींतूनच निर्माण झालेली दिसतात. अनुभवातील निखळ वास्तवता हे त्यांच्या कथांचे वेगळेपण आहे. बदलत्या समाजजीवनाचा वेध त्या तटस्थपणे घेतात. भारतीय परंपरेतील स्त्री, तिचं कुटुंबातील स्थान, तिचे नातेसंबंध यांतील ताण तणाव रेखाटताना लेखिका जीवनाच्या वास्तव गाभ्यालाच हात घालताना दिसते."[9] स्त्री जीवनातील भिन्न अवस्था,

तिची होणारी मानसिक ओढताण, तिच्या विश्वाचा भाग असलेले नातेसंबंध इत्यादींचे चित्रण त्यांच्या कथालेखानातून येताना दिसतात.

'सोबत' या कथेत आपल्या व्यक्तिगत सुखांना फाटा देत भावंडांसाठी जगणारी स्त्री दिसून येते. 'चटका' या कथेत बाहेरख्याली पतीची व संस्कारक्षम मुलाशी जुळवून घेणारी गौरी, उशीरा शिक्षित झाल्याने पूर्वजीवनातील चुकलेल्या गोष्टींचे संदर्भ सापडल्याने मनोरुग्ण झालेली स्त्री 'तेरेझा' या कथेत येते. 'तृप्ता' या कथेतील आपल्या बाळासाठी वात्सल्याने तळमळणारी निलू येते. 'भाक', 'जावे त्याच्या वंशा' या कथांमध्ये नवऱ्याच्या वर्तनामुळे पत्नीच्या वाट्याला येणारे जीवन, 'अखेर' या कथेत ललिता या आपल्या प्रेयसीचे परपुरुषाशी संबंध असल्याने तिचा खून केलेला राया पोलिसांपासून लपत छपत आपल्या मित्राच्या घरी आसरा घेतो व शेवटी पकडला जाण्याच्या भितीने आत्महत्या करत आपण चालवलेल्या लपंडावाचा शेवट करतो. पुरुषाच्या संशयी वृत्तीमुळे स्त्री जीवनाचा होणारा अंत, असा विषय या कथेत अधोरेखित होताना दिसतो.

समकालीन प्रश्नांचा समावेश त्यांच्या कथांमध्ये होताना दिसतो. 'दबाव' या कथेत सुशिक्षित तरुणापुढे असलेला बेकारीचा प्रश्न येतो. मनोविश्लेषणात्मक स्वरूपाची 'वीक पॉईंट' ही कथा येते. मानवी मनाची मानसिक आंदोलने टिपणारी नाडकर्णींची कथा अनुभवसंपन्न आहे. यात लेखिकांपरत्वे पार्श्वभूमी, कथानक यामध्ये बदल जाणवतो. काही कथा शहरीकरणाच्या प्रक्रियेतील गोमंतकाचे वातावरण चित्रित करतात, काही अस्सल ग्रामीण गोवा, रुढी, परंपरा, समाजजीवन व एकूण प्रदेशनिष्ठा व्यक्त करणाऱ्या असल्याचे आढळते.

### 3.3.2. माधवी देसाई यांचे कथा लेखन

कोल्हापूर हे जन्मस्थान म्हणून लाभलेल्या पण गोव्यात जवळजवळ २५ वर्षे वास्तव्यास असलेल्या माधवी देसाई यांनी गोव्यात साहित्यिक कारकिर्दीचा प्रारंभ केला. 'अखिल गोवा साहित्य संमेलना'ची स्थापना करत गोमंतकाच्या मराठी साहित्य चळवळीचा त्या एक भागही बनल्या. त्याच्या कादंबरी, ललित लेखन, आत्मचरित्र अशा भिन्न साहित्यप्रकारांमधील साहित्यनिर्मितीबरोबर 'असं म्हणू नकोस'(१९९०), 'सागर'(१९९१), 'कथा सावलीची'(१९९४), 'किनारा'(२००१), 'शुक्रचांदणी'(२००२), 'नकोशी'(२००४) असे काही कथासंग्रह प्रसिद्ध झाले. भिन्न स्तरावरील स्त्रीचे भावविश्व चित्रित करणारी कथा माधवी देसाई यांनी लिहिली.

### 3.3.2.1. स्त्रियांच्या भावविश्वाचे चित्रण

'भैरवी' सारख्या कथेतून निशिकांतवर निस्सीमपणे प्रेम करणाऱ्या राधेचे भावविश्व लेखिका अलगदपणे टिपतात. शारिरीक आकर्षणाच्या पलीकडचे प्रेम करणाऱ्या व प्रेमात काठोकाठ बुडलेल्या स्त्रिया त्यांच्या लेखनातून दिसून आल्या. समजूतदार व समंजस अशा स्त्रीचे चित्रण त्यांच्या कथेने केले. 'आउट' या कथेमध्ये वडिलांच्या अकाली मृत्यूने मिनी या शाळकरी मुलीने स्वीकारलेला समजूतदारपणा व आई दुसरे लग्न करणार या भितीने आपण तिच्या आयुष्यातून 'आउट' होत आहे याची मनात दडलेली भीती असे स्त्रीसुलभ विश्व चित्रित करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या कथेच्या माध्यमातून करत एक पुरोगामी विचारांची स्त्री आपल्या चित्रित केली. दुसरेपणात लग्न झालेल्या सरलाला आपल्या पतीच्या पहिल्या पत्नीच्या नसण्यातही जाणवलेल्या अस्तित्वामुळे निर्माण झालेली भावावस्था लेखिका चित्रित करतात. आपला गाव, समुद्र यांच्याशी नाते जुळवून जगणाऱ्या सरलच्या माथी पुरुषाच्या आयुष्यातील रिकामी जागा भरताना आलेला पोकळपणा, भावविवषता लेखिका चित्रित करतात. चर्चबेल या कथेत एकाच पुरुषाला सर्वस्व देत आजीवन एकनिष्ठ राहिलेली रोझी ही कथानायिका महत्त्वाची ठरते. 'घरकुल' सारख्या कथेतून मध्यमवर्ग व उच्चमध्यमवर्गीय स्त्रीच्या विश्वातून बाहेर पडत एक सर्वसामान्य ग्रामीण स्त्रीच्या वाताहतीचे चित्रण येते. पाळण्यातच लग्न लावलेल्या तुळसाच्या पतीचे ती पाळण्यात असतानाच निधन होते. तिचे दुसरे लग्न न लावता म्हातारपणाची काठी म्हणून तिला पोसलेली असते. आपल्या स्वत:च्या घरकुलाचे स्वप्न उराशी बाळगून ती राबते पण शेवटी म्हातारपणाच्या आधारासाठी तिचा स्वप्नांचा बळी देत तिच्या स्वप्नांचाच चुरडा केला जातो. जबाबदारीमुळे कोवळया वयात लाभलेले प्रौढत्व आणि पन्नाशी उलटल्यानंतर सोळाव्या वर्षातील उमलणाऱ्या स्त्रीसुलभ भावना नीता या पात्राच्या माध्यमातून 'सोळावं वर्ष' या कथेतून लेखिका चित्रित करतात. 'वीस बाय दोन' या कथेत आयुष्यात खस्ता खात जीवन जगणाऱ्या समष्टी या स्त्रीच्या जीवनाची चित्तवेधक कथा लेखिका मांडतात.

'कथा सावलीची' या कथासंग्रहातील कथा स्त्री जीवनाला केंद्रस्थानी ठेऊन लिहिलेल्या आहेत. 'कथा सावलीची' ही पहिलीच कथा प्रतिकात्मक पद्धतीने येते. स्वत:च्या प्रज्ञेच्या शोधार्थ असलेला एकाकी वृक्ष, आपल्या मुळांशी अश्रुसिंचन करत पायाशी जीवन जगणाऱ्या सावलीची अवहेलना करतो, तिच्या आपल्याशी जुळलेल्या अस्तित्वाचा त्याला तिटकारा येतो. पण वृक्षाच्या प्रज्ञाकमळाला शोधण्याच्या प्रवासात सावलीही वृक्षाच्या पायाशी साधक बनून साधना करते. वृक्षाची साधना फळास येते, प्रज्ञाकमळाची प्राप्ती त्याला होते,

माणसांची वर्दळ त्याच्या आवारात माजल्याने त्याच्या आयुष्यातला एकांत नाहिसा होतो. माणसांकडून सावलीची हकालपट्टी केली जाते. आनंदाने धुंद असलेल्या वृक्षाला सावलीची अनुपस्थिती व माणसांचा सहवास आवडू लागतो पण माणसांकडून वृक्षाची पाने, फांद्या छाटत त्याने मिळवलेल्या प्रज्ञेला नष्ट केले जाते. आजीवन त्याची सेवा करत वाळीत टाकलेली सावली पुन्हा वृक्षाच्या मुळांशी येत अश्रुसिंचन करते, त्याच्या खोडात पुनरुज्जीवित होऊ शकणाऱ्या मुळांचे अस्तित्व तिला समजते व स्वत:च्या अस्तिवाचा विचार न करता ती वृक्षाच्या पुनरुज्जीवनास स्वत:च्या अस्तित्वाची आहुती देत वृक्षाच्या मुळाकडे झेप घेते. एक संबंध संपवत धरतीशी एकरूप होत मुळांसोबत एक नवीन स्थितप्रज्ञ प्रवास सुरू करते. वृक्ष आणि सावलीच्या माध्यमातून स्त्रीच्या माथी आलेला वनवास, तिची होणारी अवहेलना, आपल्या साथीदाराच्या इच्छा पूर्ण व्हाव्यात या हेतूने सदैव आपले आयुष्य त्याच्या चरणी वाहणारी स्त्री, बोचऱ्या शब्दांचा मारा सहन करत आपले अस्तित्व झिडकारत त्याच्या अस्तित्वासाठी झटणाऱ्या स्थितप्रज्ञ स्त्रीच्या जीवनाचा पैलू मांडणारी ही कथा ठरते. गोवा मुक्तीनंतरच्या काळात पोर्तुगीज अधिकारी असलेला आपला पती पोर्तुगालात गेल्याने वियोग अनुभवणारी ख्रिस्ती स्त्री डायनाच्या जीवनकहाणीचे व मनोवृत्तीचे चित्रण करत ‘लेडी डायना’ सारख्या कथेतून करत गोवा मुक्तीनंतरच्या स्त्रीजीवनाचा, समाजजीवनाचा व राजकीय स्थित्यंतराचा वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

‘हरवलेला चंद्र’ या कथेत लहानपणी लिंबोणीच्या झाडामागे लपलेल्या चंद्राला पाहणाऱ्या लीनाला तरुणपणी लग्नबंधनाने लाभलेला पतीरूपी चंद्र मधुर नसून कडू असल्याचे समजते. सप्तपदी चालताना झालेल्या नजरभेटीतील नवऱ्याची धगधगती वासना तिच्या जीवाला जाळून जाते. पुढे नवऱ्याच्या अपघाती मृत्युनंतर श्रीमंत सासू सासऱ्याकडून घराण्याचा वारसा श्रीमंतीच्या ओढीने बळकावण्याचा प्रयत्न होतो व मुलगाही निघून जातो. एकाकी जीवन जगत एकाकी अवस्थेत स्वत:चे सुख शोधणाऱ्या लीनावर इंजिनियर सानेंचे प्रेम जडते, सानेच्या प्रेमाने ती नकळत बहरत जाते व आयुष्यात आपण हरवलेल्या चंद्राला ती पुन्हा मिळवू पाहते. ‘जास्वंदी’ या कथेतील आई वडिलांच्या निधनानंतर समाजाच्या वासनी नजरांना फाटा देत मुसलमान दिलावरशी प्रेम करत धर्माच्या आवरणाच्या पलीकडे जात नाते निभावणारी व दिलावरच्या मृत्युनंतर माणुसकीचा धर्म निभावत एकाकी पडलेली जास्वंदी येते.

शुक्रचांदणी’ या कथासंग्रहात स्त्रीजीवनाच्या कहाण्या लेखिका मांडताना दिसतात. भिन्न स्तरातील स्त्रियांच्या जगण्याचे चित्र या कथांमध्ये येते. ‘अधांतर’ या कथेत पुरुषांची मक्तेदारी असलेल्या व स्वत:चे

वडीलही पोलीस अधिकारी असलेल्या पोलीस विभागात डी. एस. पी. होण्याचे स्वप्न बाळगणारी, पुरुषांशी स्पर्धा करू पाहणारी नीलांबरी, स्वत:त रुजवलेला पुरुषी अहंकार व तिच्यातील सौम्य बायकीपणा या द्वंद्वात अडकते. व आपला मग्रूरपणा सिद्ध करण्यासाठी चोरीच्या संशयाने आणलेल्या आदिवासी स्त्रीला गरोदर असलेल्या स्थितीत प्रचंड मारहाण करत मृत्युमुखी पाडते. 'मोनालिसा' या कथेतील भारतीय तत्वज्ञानाच्या ओढीने फ्रांस मधून आलेली ॲना भारतीय संस्कृतीच्या ओढीने कुलदीप या बडोदा संस्थानातील सरदार घराण्यातील मुलाच्या प्रेमात पडते. लग्न करून संसार थाटत मोनालिसा या मुलीला जन्म देते पण पतीच्या दुसऱ्या लग्नाने फसवली जाते. भारतीय संस्कृतीच्या तत्त्वांशी एकनिष्ठ असलेली पाश्चात्य स्त्री भारतीय संस्कृती फोल ठरू नये व पतीचे दुसरे लग्न फसवे ठरू नये म्हणून फसवे नाते मान्य करत घटस्फोट घेण्याचा निर्णय घेते. या प्रवासात तिला साथ देणारी दुसरी स्त्री म्हणजे तिची मुलगी मोनालिसा ठरते. 'झुबेदाची कोठी' या कथेत वेश्याव्यवसायातील वास्तव चित्रण करत सैफ अली या हळव्या पोलीस अधिकाऱ्याच्या मनोवृत्तीचे चित्रण येते. वडिलांच्या मृत्युनंतर आईचे परपुरुषांशी अनैतिक संबंध असलेले पाहून सुषमा अवघ्या पंधराव्या वर्षी घर सोडते. कोठ्यातील सुदाम या अठरा वर्षाच्या मुलाच्या प्रेमात पडते व वेश्याव्यवसायापासून अलिप्त राहत म्हाताऱ्या झुबेदाच्या कोठ्यात आश्रय घेते. कोठ्यातील सर्व बायांचा तिला लळा लाभतो व शेवटी त्या मुलीच्या उद्धारार्थ हळवा असलेला पोलीस अधिकारी सैफ अली तिला दत्तक घेतो. 'बाभळीची फुलं' या कथेत आपल्या नशिबामुळे व नियतीमुळे आपल्या आई वडिलांना, पतीला व मुलाला मुत्युने कवटाळल्याची समजूत करून बसलेली, आपण बाभळीच्या काटेरी झाडासारखी असल्याने आपल्या जवळ येऊ पाहणारी माणसे मृत्युमुखी पडतात असा समज करून आपण प्रेम करणाऱ्या प्रत्येक जवळच्या व्यक्तीच्या निधनाचे खापर स्वत:वर फोडणारी रत्ना येते. आयुष्यात बाभळीचे काटेरी झाड असले तरी तिच्यावरही नाजूक फुले असतात व दु:खाबरोबर सुखही असते, प्रत्येकजण स्वत:चे नशीब घेऊन जन्मलेला असतो असे सांगत रत्नाला आयुष्यातील सकारात्मक नजर देणारी सखी कथेत येते. हतबल व दु:खी स्त्रीला, दुसऱ्या स्त्री कडून लाभलेली सकारात्मकता या कथेत लेखिका चित्रित करतात.

'जमीन आसमान' या कथेत दोन पिढ्यांमधे असलेल्या वैचारिक अंतरावर कथा भाष्य करते. एके काळी भोळया स्वभावाची विजया चंचल स्वभावी विक्रमच्या प्रेमात पडते, लग्नापूर्वीच गरोदर राहिल्यानंतर विक्रम आपली जबादारी झिडकारतो, आपल्या घरच्या आश्रिताची मुलगी असल्याने घर व घराण्याच्या प्रतिष्ठेच्या बंधनामुळे विक्रमाची आई विजयाला भावी सून म्हणून नाकारते. कुमारी माता असलेली चंदा जन्मभर विधवा

म्हणून रहात मुलीचे संगोपन करते. आपल्याप्रमाणेच घर, वंश, प्रतिष्ठा यापायी आपल्या मुलीला स्थळे नाकारली जाणार ही सततची भीती तिचा पाठलाग करते. खानदान, घराणे, कुलशील, स्त्री – पुरुष या संज्ञांच्या पलीकडे जात आपल्यावर प्रेम करणारा माणूस महत्त्वाचा मानत, विजयाच्या मुलीला स्वीकारणारा चंदाचा भावी सासरा व तरूणपणात विजयावर प्रेम करणारा प्रताप कथेत येतो. आज जग बदललेले आहे व कुमारीमाता असून मुलांना वाढवणाऱ्या समर्थ स्त्रिया समाजात आहेत, आजच्या बेडर स्त्रीला समाज स्वीकारतो हा चंदाचा विश्वास सार्थ ठरतो. आजच्या समाजातील बदलांवर भाष्य करत दोन पिढीमधील स्त्रीकडे बघण्याच्या विचारांमधील जमीन आसमानचा फरक ही कथा अधोरेखित करते.

### 3.3.2.2. स्त्रीवादी स्वरूपाचे कथा लेखन

त्यांच्या कथा स्त्रीवादी दृष्टी स्वीकारताना दिसून आल्या. ‘जटा’ या कथेतून यल्लूबाई देवीची दासी म्हणजेच जोगतीण असलेल्या, दिसायला सुंदर असलेल्या रेणुकाचा या प्रथेतून मुक्त होण्याचा प्रयत्न, एका पुरोगामी वृत्तीच्या पुरुषावर असलेले तिचे प्रेम, शेवटी तिच्या आयुष्यातील तोच पुरुष तिला ‘जटा’ प्रथेतून बाहेर काढत दारुड्याशी विवाहबंधनात अडकवण्याचा प्रयत्न करतो. प्रेमभावनेने प्रफुल्लीत झालेल्या रेणुकाची फसवणूक होते. ती या लग्नाला नकार दर्शवत निघून जाते व पुन्हा देवीची सेवा करत आयुष्य व्यतीत करावे असे तिला वाटते. परिस्थितीशी लढणारी बंडखोर स्त्री त्यांच्या कथेतून दिसली. ‘असं म्हणू नकोस’ सारख्या कथेतून स्त्री स्वातंत्र्यासाठी भारतीय समाजपुरुषाच्या विरोधात जाणारे भान लेखिकेने कथेतून व्यक्त केले. ‘कैकेयी’ या कथेमधील संसाराच्या इच्छेने व लहान मुलीच्या हौसेने दुसरी बायको म्हणून लग्नबंधनात अडकलेली कथानायिका रजनी सावत्र आई म्हणून हिणवली जाते, कैकेयी ठरवली गेल्याने स्वत:च्या जीवनरथाचे चाक स्वत:च पेलत, आत्मसन्मानाला तडा न देता एकटीनेच पुढच्या प्रवासास सरसावणारी रजनी कथेत येते.

‘आई, तुझं चुकलंच’ या कथेत सासरचा जाच सोसलेल्या आपल्या आईला तिच्या हक्काची जागा मिळावी म्हणून बंडखोर भूमिका स्वीकारत आपल्या आईला तिचे अधिकार मिळवून देणारी शरावती कथेत येते. स्त्रीला आधार देणारी स्त्री या कथेच्या माध्यमातून लेखिका चित्रित करतात. उच्च मध्यमवर्गीय स्त्री जीवनाची शोकांतिका ‘आसावरी’ या कथेत लेखिका मांडतात. पेशाने स्त्रीरोगतज्ञ असलेली डॉ. आसावरी प्रेमविवाह केलेल्या डॉ. रामाकांतचे वेताचे वळ, सिगरेटचे चटके अशा पाशवी अत्याचारांना प्रेमापोटी सहन करते. सारी तृप्ती असूनही झिंग शोधणारा रमाकांत आपल्या नपुसकतेमुळे मूल होत नसल्याचे खापर आसवारीवर फोडत

दारूच्या अधीन जात तिच्यावर अत्याचार करतो. प्रेमापोटी आयुष्यभर त्रास सहन करणारी आसावरी वयाच्या पन्नासाव्या वर्षी आपल्यात अडकलेल्या रजनीकांत या पुरुषाचा आधार घेत त्याच्याशी विवाहबद्ध होते. 'लेकुरवाळ' या कथेत पतीने आपल्याला सोडून परदेशी दुसऱ्या स्त्रीशी संबंध ठेवल्याने नात्यातील अस्थिरपणा उमजून दुसरा विवाह नाकारत, नाती ही मनाचेच खेळ असल्याचे मानत एकटेपणा स्वीकारत स्थिर वृक्षाशीच नाते जोडणारी उर्वशी ही स्त्री दिसून येते. 'आकाशझेप' या कथेत नवरा, मुलगी रेशमा व घरच्यांवर अधिकार गाजवणारी, जगासाठी कर्तृत्ववान ठरलेली पद्मा इनामदार व अहंकाराने माजलेल्या आपल्या आईविरुद्ध जात निर्मळ मनाने सर्वसामान्य चित्रकार असेलल्या आकाशच्या प्रेमाला कवेत घेणारी व अनेक वर्षांपासून चाललेल्या आपल्या आईच्या हुकुमशाहीला झिडकारत स्वत:साठी निर्णय घेणारी स्त्री रेश्मा या व्यक्तिरेखेतून लेखिका साकारतात. 'स्वरमयी' या कथेतील भैरवाला गुरू मानत, संगीतसाधना करताना त्याच्या प्रेमात पडलेली पूर्वा व भैरव पासून पंडित भैरवनाथ या प्रवासात पूर्वाचा हात सोडून स्वार्थीपणे निघून गेलेला भैरव, ठाकूर घराण्याच्या प्रतिष्ठेस तडा पोहुचू नये म्हणून खानदानी घरात पूर्वाची समंती न घेता विवाह लावणारे तिचे वडील भूपेंद्र ठाकूर, वारस मिळण्यासाठी पत्नीला मरणप्राय यातना देणारा रईस घराण्यातला पूर्वाचा नवरा वीरेंद्र ठाकूर आणि भैरवाच्या जाण्यानंतर गुरू म्हणून पूर्वाच्या आयुष्यात येत, तिच्यातील भाषिक कसब ओळखून तिला लिखाणास प्रोत्साहित करणारा प्रा. सदानंद अशी भिन्न माणसे पूर्वाच्या आयुष्याला कलाटणी देत कडू गोड अनुभव देतात. जीवनाच्या यात्रेत भेटलेली ही माणसे म्हणजे न समजणारे पुस्तक असे मानणारी पूर्वा, नवऱ्याच्या जाचाला मागे टाकत, गायिकेपासून यशस्वी लेखिकेपर्यंतचा 'मी' ला समजून घेत प्रवास करते. तिच्यातील लेखिकेला पुस्तकरूपात आणण्यापर्यंतचा यशस्वी प्रवास करताना सदानंदने दिलेले प्रोत्साहन व त्यामुळे स्वत:च्या जीवनाला स्वत:च आकार देते, हे निदर्शनास येते.

### 3.3.2.3. माणसांच्या हतबलतेच्या कहाण्या

स्त्री भावविश्वापुरते मर्यादित न राहता माधवी देसाई यांच्या कथेचे विश्व भिन्न आशयसूत्रांना व्यक्त करताना दिसून येते. 'सागर' या कथासंग्रहातील सागर ही कथा वडिलांच्या हतबलतेवर भाष्य करते. समुद्राचे वेड आपणच आपल्या मुलाला लावल्याने, समुद्राच्या पाठीवर स्वार होऊन सूर्याचा गोळा पकडू पाहणारा संजू मरीन इंजिनीयर बनून जग कवेत घेण्याचे स्वप्न बघतो व सागरात पोहायला उतरला असता नाहिसा होतो. संजूच्या हरवण्याने आपला मुलगा मृत झाल्याचे समजून संजूची आई उल्काचा मृत्यू होतो. मुलगा व पत्नीच्या निधनानंतर

एकाकी पडलेले वडील शिवनाथ सागराशी नाळ जोडू पाहतात. संजूचा सुरजितसिंग बनून स्मगलर झालेला संजू कित्येक वर्षांनी परततो. आपल्या संस्कारांना मुलाने तडा दिल्याचे समजताच अश्रूंच्या सागरलाटांमध्ये घुसमटणाऱ्या वडिलांच्या भावावस्थेचे चित्रण कथेत येते.

'किनारा' या कथासंग्रहातील 'झिंग' या कथेत आयुष्यभर पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत असताना पत्नी लक्ष्मी सोडून फुलवंती या ठेवलेल्या बाईत रमणारा रवींद्र, झिंग उतरल्यानंतर पत्नीशी एकरूप होऊ पाहत, लेखक बनत एका वेगळ्या जीवनाचा स्वीकार करू इच्छितो. पण बायांशी संबंध ठेवणाऱ्या व शोभा नावाच्या एका तरुणीसोबत फिरणाऱ्या आपल्या नवऱ्याच्या फसवणुकीमुळे संयम संपलेली लक्ष्मी  आत्महत्या करते. पश्चातापाने बढती मिळालेल्या नोकरीला राजीनामा देत जीवनाची एकाकी वाट धुंडाळू पाहणाऱ्या रवींद्रच्या मनोवस्थेचे चित्र लेखिका रेखाटतात.

### 3.3.3. ज्योती कुंकळकर यांची स्त्री जीवनातील स्पंदने टिपणारी कथा

ज्योती कुंकळकर यांचा 'ओला पदर' हा कथासंग्रह १९९४ सालात प्रसिद्ध झाला. यातील ११ कथांमधून स्त्री जीवनातील भिन्न स्पंदने टिपण्याचा प्रयत्न त्यांनी केला. 'परिवर्तन' या कथेत तरुण वयाच्या सुनेचे मानसशास्त्रीय विश्लेषण मांडण्याचा लेखिकेने प्रयत्न केला. या कथेत १७ वर्षांची सून घरी येते व नवऱ्याला तातडीने कामासाठी परगावी जावे लागते. घरकामांना कंटाळणाऱ्या सूनेला कसे सांभाळावे हा प्रश्न सासूला पडतो. पुरुषाविना एकट्या पडलेल्या सुनेची मानसिकताही तिला समजते व तिची कीव येते. रजा घेऊन येणाऱ्या आपल्या मुलाचा ही सुंदर सून स्वीकार करेल का ? हा प्रश्न तिला सतावतो. मुलगा आल्यानंतर एका रात्रीत सुनेत परिवर्तन होते. न सांगताच ती घरातील सर्व कामे करू लागते, नवऱ्याच्या मागेपुढे करत त्याला हवं नको ते बघू लागते. कोवळ्या वयाच्या स्त्रीमध्ये नकळत झालेले परिवर्तन व तिची भावस्थिती सूचक शब्दात लेखिका सांगतात.लग्नाच्या बाजारात आज मुलीच्या गुणांना मोल नसते तर प्रत्येकाला मॉड, नटवी, मिळवती मुलगी हवी असते. आपल्या सद्गुणी मुलीचे लग्न जमत नसल्याने सालस मुलीपेक्षा आपली पळून गेलेली उठवळ मुलगीच बरी होती असे जेव्हा वडिलांना वाटते तेव्हा त्या मुलीच्या भावविश्वाला हादरे बसतात. आज स्त्रीच्या गुणांपेक्षा तिचे नटवी असणे, मिळवती असणे याला मोल दिले जाते. मुलगी कितीही लाडकी असली तरी मुलीचे लग्न ही आईवडिलांसाठी डोकेदुखीच असते असे चित्रण या कथेत येते.

एका सामान्य कौटुंबिक स्त्रीची व्यथा ‘ओला पदर’ या कथेत लेखिका मांडतात. आपल्या जीवनसाथीसह संसाराचा डोलारा सांभाळणारी स्त्री पतीच्या अकाली मृत्यूमुळे व स्वत:च्या आरोग्याच्या तक्रारीमुळे, आपला मृत्यू जवळ असल्यामळे आपल्या मुलाबाळांचे आपल्या पश्चात काय होणार? या प्रश्नाने त्रस्त होते. शेवटी मुलांची काळजी घेणारी आईस्वरूप व्यक्ति भेटल्याने आपल्या मृत्यूची काळजी न करता मुलांसाठी समाधानी असलेली व मृत्यूला समाधानाने कवेत घेऊ पाहणारी स्त्री दीपाच्या माध्यमातून ‘ओला पदर’ या कथेत येते. स्त्री जीवनाची संस्काराचा रहाटगाडा ओढताना स्त्री जीवनाची झालेली शोकांतिका व मुलाबाळांमध्ये अडकलेला तिचा जीव अशी ही भावनाप्रधान कथा आहे. ‘एक मुक्ता जाळयातली’ या कथेमध्ये स्वत:चे  शिक्षण, संगीताची आवड बाजूला सारत भावंडांच्या सुखाचा, शिक्षणाचा विचार करणारी, जबाबदाऱ्यांच्या ओझ्यात स्वत:ला हरवून बसलेली स्त्री नात्यांच्या पाशांपासून बंधनमुक्त होण्याचा प्रयत्न करते पण परिस्थितीमुळे पुन्हा स्वत:च्या सुखाला विसरत घरच्यांच्या जबाबदारीचे ओझे घेऊन जगणे तिच्या नशिबी येते.

‘तू जिंकलीस मी हरले’ या कथेत मिता व आशू या दोन मैत्रिणींच्या जीवनातील विरोधाभासाचे चित्रण येते. मिताने लग्न करून गृहिणीचे जीवन स्वीकारल्याने स्वत:चे जीवन संकुचित केल्याचे आशाला वाटते. मीताची गृहिणी म्हणून होणारी ओढताण तिला असह्य होते. शिक्षण घेऊन मीता फक्त संसार, मूल, पती यात रमत असल्याने चीडही व्यक्त करते. आशू स्वत: अविवाहित राहत, करियरमध्ये उच्चपद मिळविते व आपल्याला हव्या त्या पुरुषाकडून शरीराच्या इच्छा पूर्ण करते. आपले जीवन सार्थकी लागल्याच्या भ्रमात असते. मिताच्या आजारपणी मिताच्या घरच्या माणसांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता तिला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपल्याचे आशू अनुभवते व आशूच्या स्वत:च्या आजारपणात मात्र कामानिमित्ताने जवळ केलेल्या माणसांना, स्वत:ची वाहिनी, बहिण या सर्वांना ती असह्य झाल्याची जाणीव होते. संसारात स्त्री सुरक्षित आहे असा आशय कथेतून व्यक्त होतो. ‘माझा पप्पू’ या कथेमध्ये नोकरी आणि मातृत्व या दोहोंमध्ये स्त्रीची होणारी ओढताण व आपल्या मुलास वेळ न देऊ शकल्याने मातृत्वाच्या भावनेने गहिवरलेल्या स्त्री मनाचे चित्रण पूजा या स्त्री पात्राच्या माध्यमातून लेखिका करतात. ‘अतृप्ता’ या कथेत पतीच्या पुरुषी वासनेपुढे गर्भपात करत आपल्या मनाविरुद्ध मातृत्वाचा बळी देणारी व मातृत्वास आसुसलेली स्त्री दिसून येते. ‘आसमा’ या कथेत नवऱ्याचा आपल्याच बहिणीशी संबंध असल्याने व त्या संबंधातून जन्माला आलेले बहिण व नवऱ्याचे मूल, आपली आई लोकलज्जेस्तव आपले ठरवू पाहत असल्याने आसमा हादरते व हा मानसिक धक्का असह्य झाल्याने वेडी बनते.

नोकरीनिमित्त बाहेरगावी असलेला अजित आपल्या पत्नीच्या विवाहबाह्य संबंधाविषयी समजल्यानंतर आपण केलेल्या खऱ्या प्रेमापोटी पत्नीचा हात तिच्या प्रियकराच्या हाती देतो. पत्नीच्या संबंधाबद्दल तिटकारा व्यक्त न करणाऱ्या पतीचे उदातीकरण या कथेत केलेले दिसते. नवऱ्याच्या अनुपस्थितीत परपुरुषाशी संबंध ठेवत आपल्या मनावर ताबा ठेवण्यास दुबळी ठरलेली अभिलाषा ही स्त्री कथेत येते.'हा खेळ प्राक्तनाचा' या कथेत अनपढ मोलकरणीला मिळालेली लॉटरी स्वत:कडे ठेवत अक्काची फसवणूक करणारा आनंदराव. व आपल्या पतीच्या स्वार्थी वृत्तीमुळे त्याच्या कृत्याला विरोध दर्शवत, जीवनभर अक्का या आपल्या मोलकरणीला आपल्या आईसमान मानून घरात ठेवत तिच्या एकुलत्या एक नातीचा विवाह करून देणारी आशाबाई दिसून येते. मानवी स्वभाववृत्तींवर ही कथा भाष्य करते. 'उधळला पट' या कथेमध्ये लहानपणापासून दोन बहिणींमध्ये निर्माण झालेले अंतर, परस्पर विरोधी असलेल्या दोघींमधील स्वभावविसंगतीमुळे उडणारे खटके व आपल्या मोठ्या बहिणीच्या प्रियकराच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या स्वार्थी असलेल्या आरतीने उधळलेला बहिणीच्या स्वप्नांचा पट अशी कथा येते.

### 3.3.4 मेघना कुरुंदवाडकर यांचे कथालेखन

स्त्री जीवनातील, स्त्री स्वभावातील विविध छटा टिपणाऱ्या लेखिकांमध्ये मेघना कुरुंदवाडकर यांचे 'एकटी' (२००८), 'ती संध्याकाळ' (२०१०), 'पायऱ्या' (२०१६), 'तिच्या आभाळाचा तुकडा' (२०१७) हा दीर्घकथासंग्रह तसेच 'भरून आलेलं आभाळ' (२०१८), 'झाले मोकळे आकाश' (२०२१), 'तिच्या आतल्या चोरकप्प्यात' (२०२२) असे एकूण सात कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

#### 3.3.4.1 स्त्री जीवनाच्या शोकांतिका

'भरून आलेलं आभाळ' या कथेत एकाकी स्त्रीच्या जगण्याचा वेध घेण्याचा प्रयत्न मेघना कुरुंदवाडकर करतात. समर्पित आयुष्य जगणारी स्त्री आपल्या आयुष्यात येणाऱ्या कठीण प्रसंगांना कशा पद्धतीने सामोरे जाते याचे वर्णन ही कथा करते. या कथेमध्ये एड्सग्रस्त क्षिती दिसून येते. पर्यटक म्हणून गोव्यात आलेल्या व्यक्तीवर प्रेम व शरीरसंबंध ठेवल्याने एड्ससारखा रोग झालेली व पतीने सोडलेल्या क्षितीची शोकांतिका या कथेमध्ये येते. आयुष्यभर घर संसार मुलं यामध्ये खस्ता खाल्ल्यानंतर, उतारवयात नवऱ्याच्या निधनानंतर शेवटी आयुष्याच्या उत्तरार्धात एकाकी पडलेल्या स्त्री जीवनाचे चित्रण 'तिची ती' या कथेत लेखिका करतात. 'फसला मासा' या

कथेमध्ये आई-वडिलांना न सांगता परागवर प्रेम करून त्याच्याशी लग्न करणारी मेघा कालांतराने परागचे अन्य स्त्रीशी संबंध असल्यामुळे घटस्फोट घेते. प्रेमात ती शेवटी फसली जाते व एकाकी पडते.

### 3.3.4.2 स्त्री स्वभावाच्या भिन्न छाटा

'दुसरा डाव' या कथेमध्ये तटस्थ, कणखर व आपल्या मतांशी बांधील असलेल्या स्त्री स्वभावाचे चित्रण येते. नवरा बायकोमध्ये मतभेद झाल्याने उधळलेला तिच्या आयुष्याचा पहिला डाव, नवऱ्याशी घेतलेला घटस्फोट आणि मुलीपासून दुरावलेली ती शेवटी विश्वास या पुरुषाचा आधार स्वीकारत दुसरे लग्न करते. पण आपल्या तटस्थ स्वभावामुळे अनेक गोष्टीला विरोध करत नकळत दुसरा डाव उध्वस्त होतोय का? या विवंचनेत असलेली, दुसरा डाव हा हार-जीत यासाठी नसतो तर स्वतःला सावरण्यासाठी असतो या विचारांची स्त्री या कथेत दिसते. 'पुढची वाट' या कथेमध्ये गैरसमजामुळे पती व मुलापासून दुरावलेली स्वाती शेवटी सगळ्या दुःखावर मात करत आपल्या पूर्वीच्या प्रियकराशी लग्न करण्याचा निर्णय घेते. सगळ्या दुःखांना मागे टाकत आपल्या नव्या आयुष्याला नव्याने सामोरे जाते आणि नवीन मुलाच्या स्वागतासाठी सज्ज होते. मेघा कुरुंदवाडकर यांच्या कथेमध्ये आलेल्या नायिका या आपल्या आयुष्यातील दुःखांवर मात करत पुढे जाताना दिसून येतात. त्याच्या कथांमध्ये येणाऱ्या स्त्रिया मध्यमवर्गीय, स्वतंत्र विचारांच्या, न पटणाऱ्या पारंपारिक मानसिकतेला नाकारणाऱ्या, खंबीर विचारांच्या असल्याचे दिसून येते.

'गझल' या कथेमध्ये नात्यांमध्ये आलेला दुरावा आणि त्या दुराव्यामुळे शारीरिक व भावनिक दृष्ट्या एका दुसऱ्या पुरुषाशी जुळू पाहणारी, त्याच्यासोबत वेळ घालू पाहणारी अशी गीता 'गझल' या कथेमध्ये येते. 'अपघात' या कथेमध्ये अपघातानंतर तिच्या आयुष्यात आलेला डॉक्टर आणि कधीच पुरुषासाठी, घर संसारासाठी, मुला बाळांचा विचार न करणारी ती डॉक्टरकडे ओढली जाते. पण त्यांचा आधीच विवाह ठरल्याने तिने मनात बघितलेले स्वप्न विरून जाते आणि अपघाती झालेली ती भेट तिला जीवघेणी वाटते.

'ती संध्याकाळ' या कथेत आयुष्याच्या एका संध्याकाळी रमेश व श्वेताने अनुभवलेली एकमेकांच्या स्पर्शाची भाषा व श्वेताचे अजयशी लग्न झाल्यानंतर दुरावलेले आणि संपुष्टात आलेले त्यांचे नाते असे चित्रण करतात. कित्येक वर्षांनी रमेश व श्वेताची भेट होते व आपल्यात कधीच काहीच नसलेल्या आविर्भावात

असलेल्या श्वेताला रमेश म्हणतो की बायकांना वरचेवर झटकल्यासारखे वागणे उत्तम जमते. स्त्री स्वभावाचा एक पैलू या कथेत लेखिका मांडताना दिसून येतात.

### 3.3.4.3 स्त्रियांचे भावविश्व

'उरला सुगंध जुईचा' या कथेत मूल नसल्यामुळे मुलीला दत्तक घेतलेल्या राधाबाईचे भावनिक विश्व लेखिका साकारतात. मुलाच्या ओढीने एका मुलीला ती दत्तक घेते. तिला लहानाचे मोठे करते आणि शेवटी जुईच्या लग्नाचा विषय येताच जुईच्या लहानपणाच्या फोटोमध्ये रमणारी आई अशी एक भावनिक स्त्री व्यक्त झाली आहे. त्याचप्रमाणे जुईच्या माध्यमातून आपलं लग्न स्वतः ठरवणारी, स्वत:च्या आयुष्यातील निर्णय स्वत: घेणारी अशी स्त्री दिसून येते. 'मनाच्या काठावर' या कथेमध्ये मुलीच्या जन्मानंतर पतीचे इतर स्त्रीशी असलेल्या अनैतिक संबंधांमुळे पतीपासून दुरावलेली रेषा, घटस्फोटानंतर आपल्या मुलीला ही गमावते. दुसऱ्या लग्नानंतर तिच्या आयुष्यात पुन्हा मुलाची चाहूल लागते व आपल्यापासून तुटलेल्या आपल्या मुलीच्या आठवणीने गहिवरणारी आई या कथेत दिसून येते.

'पायऱ्या' या कथासंग्रहातील पायऱ्या या कथेमध्ये संसारामध्ये झालेली स्त्रीची ओढताण, शेवटी एकाकी अवस्थेत एकटेपणाला खुणावणाऱ्या घराच्या पायऱ्या, अशी एकूण कथा येते. 'शब्दांची ओंजळ' या कथेमध्ये नात्याला टप्प्याटप्प्यात एक वेगळी कलाटणी मिळत असते. लग्नानंतर सुरूवातीला फुलणारे प्रेम, त्यानंतर मूलंबाळं आणि त्यानंतर मुलं नोकरी निमित्त बाहेर गेल्याने फक्त एकमेकाचा आधार बनत जुन्या आठवणींना उजाळा देत जगणे. इथे फक्त दोन माणसांना एकमेकांच्या सहवासाची गरज असते याचे चित्रण लेखिका करतात. 'साई' या कथेमध्ये स्त्रीचे आपल्या मुलीशी जोडलेले भावबंध लेखिका चित्रित करतात. दत्तक घेतलेल्या साई या मुलीच्या लग्नानंतर ती दुरावणार यामुळे भावूक झालेली आई या कथेत येते. वेळ घालविण्यासाठी किटी पार्टीत जाणारी ती व पार्टीमधील त्याचत्यापणाला कंटाळलेली ती अशी 'किटी पार्टी' ही कथा येते. संसार बहराच्या काळात एकाकी पडलेल्या स्त्री जीवनाचे चित्रण त्यांच्या कथांमधून येते. 'नदी वाहते एकटी' ही अशाच आशयाची कथा येते. पतीच्या एकलकोंड्या स्वभावामुळे त्याच्यापासून दुरावलेली व पतीच्या मित्रामध्ये स्वत:चा भावनिक आधार शोधू पाहणारी स्त्री 'मी त्यांची मिसेस बोलतेय' या कथेत येते. कविता' या कथेमध्ये पतीच्या इतरत्र असलेल्या संबंधामुळे पतीपासून दुरावलेली व भावनावेगाने दुसऱ्या पुरुषाच्या जवळ आलेल्या स्त्रीचे भावविश्व कथेत येते. 'मृग तृष्णा' या कथेमध्ये नवऱ्यासोबतच्या रुक्ष जीवनात नाजूक, भावनिक

आधार शोधणारी ती उतारवयात भेटलेल्या मेजरमध्ये भावनिक आधार शोधू लागते. ‘आन्सा’ या कथेमध्ये आन्सा व लक्षाचे एकमेकांवर असलेले प्रेम व घरच्या विरोधामुळे तुटलेले प्रेमसंबंध, अशापद्धतीने स्त्री पुरुष संबधातील प्रेमभावना ‘ती संध्याकाळ’ या कथासंग्रहातील कथांचा स्थायीभाव बनलेल्या दिसतात. स्त्रीचे भाव विश्व चितारताना स्त्री पुरुष नातेसंबंधात आलेला दुरावा तसेच स्त्रीच्या आयुष्यात आलेल्या एकाकी अवस्थेवर त्यांची कथा भाष्य करते.

### 3.3.5 आरती दिनकर यांचे कथा लेखन

पेशाने डॉक्टर असलेल्या आरती दिनकर यांनी मृगजळ (२००८) व वेगळी वाट (२०१२) हे दोन कथासंग्रह लिहिले. ‘मृगजळ’ या संग्रहातील कथांमध्ये अधिकच्या काही कथांचा समावेश करत ‘वेगळी वाट’ हा कथासंग्रह समग्रपणे प्रसिद्ध झाला.

#### 3.3.5.1 आधुनिक स्त्री जीवनावर भाष्य

‘वेगळी वाट’ या कथासंग्रहातील ‘वेगळी वाट’ या पहिल्याच कथेमध्ये स्त्री स्वातंत्र्याचा विचार मनाशी बांधलेली एक मॉडर्न आधुनिक सॉफ्टवेअर इंजिनियर असलेली स्त्री दिसून येते. वेगळी वाट चोखाळू पाहणाऱ्या फसलेल्या अनघाची ही कथा आहे. शैलेश सोबत ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ मध्ये असलेली अनघा घरच्या विरुद्ध जाते दोन पिढी मधील वैचारिक मतभेद ही कथा दर्शवते. शैलेश नंतर जयंता या विवाहित पुरुषाच्या प्रेमात पडते. शरीर संबंध ठेवते व जयंता विवाहित असल्याचे समजतात आपण अविवाहित असुन आपला फायदा घेतल्याचे समजल्याने मंगळसूत्राशिवाय आपण सुरक्षित आहोत का असा प्रश्न तिला पडतो. घरच्यांपासून तुटलेली अनघा शेवटी वसतिगृहात राहण्याचा निर्णय घेते. ‘तडजोड’ या कथेतील ध्येयवादी नेहाला लग्न व मुलाबाळानंतर तडजोडीची भूमिका स्वीकारण्यास भाग पाडले जाते. एका वर्षासाठी जर्मनीत जाण्याची संधी मिळाल्याने नेहावर अभिनंदनाचा वर्षाव होतो पण वेळप्रसंगी नवऱ्याच्या करियरसाठी जमेल ती तडजोड करणाऱ्या नेहाला पतीची साथ मिळत नाही. आधुनिक स्त्री स्वतंत्र झाल्याची बोलबाल केली जाते पण शेवटी तिला ध्येयशून्यच जीवन जगावे लागते असा विचार या कथेत मांडलेला दिसून येतो. आरती दिनकरांच्या कथेतील नायिकांना स्त्री स्वातंत्र्याची जाणीव असलेली दिसून येते. स्वत:साठी मतप्रदर्शन करणारी त्यांच्या कथेतील स्त्री आधुनिक विचारांची जरी असली तरी शेवटी बंडखोर भूमिका न स्वीकारता, आपल्या स्त्री जाणिवा मनात घोळवत त्या

प्रश्नांना सोबत घेत, तडजोड स्वीकारत जगणारी स्त्री आहे. काळ बदलला तरी जीवनमूल्ये व संस्कार अत्यंत आवश्यक असतात हे सांगणारी 'संस्कार बीज' कथा येते. संसारी मुलगी पती सासू या सगळयांच्या अपेक्षा पेलता पेलता झिजलेली सुलु या कथेत येते. संसारात आपल्या माणसांसाठी राबली तरी ती अपुरी ठरलेली असते. आयु या आपल्या मुलीवर संस्कार करण्याचा, स्वतःच्या जबाबदाऱ्या स्वतः पेलण्यास प्रवृत्त करण्याचा ती प्रयत्न करते पण पतीमुळे लाडावलेल्या मुलीवर संस्कार करणे तिला जमत नाही परिणामी कालांतराने आयु स्वतःच्या वैवाहिक जीवनात तडजोड करू शकत नाही. सुलु आपल्या मुलीला स्वावलंबी बनणे गरजेचे असल्याचे सांगते. मुलगा व मुलगी दोघांना स्वावलंबी बनणे महत्त्वाचे असल्याचे सांगत समानतेचे सूत्र या कथेमध्ये गुंफलेले दिसते.

### 3.3.5.2 तटस्थ स्त्री भूमिका

'व्रत' या कथेतील साध्या, सरळ पण सुंदर असलेल्या पत्नी योगीतावर पंकज संशय घेतो. दोन मुलींच्या पश्चात झालेला तिसरा मुलगा हा आपल्या सुंदर पत्नीच्या अनैतिक संबंधातून जन्माला आल्याचे समजत, पत्नीला दोष देत DNA तपासणीचा पर्याय निवडतो. मूल आपल्या पतीचेच असल्याचे सिद्ध झाल्यानंतर आपल्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या आपल्या पतीशी नाते ठेवते पण शरीरसंबंध न ठेवण्याचे व्रत स्वीकारणारी तटस्थ स्त्री 'व्रत' या कथेत येते. स्वाभिमानी स्त्री स्वभावाचे चित्रण करणारी 'मानिनी' ही कथा येते. गरीब घरातील सुकन्या श्रीमंताघरची सून होते. नवऱ्याच्या रिकामटेकडे पणा मुळे सासऱ्याच्या जीवावर आयते पोट भरणे नाकारत अन्नत्याग करते. आपल्या आईच्या स्वाभिमानी वृत्ती व त्यागाच्या जाणीवेने सद्गतीत होणारा तिचा मुलगा अशी कथा येते. 'पुण्य कोटी कृष्ण' या कथेत अमेरिकन सून घरात आल्याने तिचा भारतीय संस्कृतीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न व शेवटी भारतीय संस्कृतीचे महात्म्य पटल्याने भारतातच स्थायिक होण्याचा तिने घेतलेला निर्णय अशी भारतीय संस्कृतीचा गौरव करणारी वेगळया आशयाची कथा येते.

### 3.3.5.3 स्त्री जीवनातील प्रश्नांवर भाष्य

लेखिका स्वत: डॉक्टर असल्याने 'मृगजळ' या कथेतून एड्स विषयक जागरुकता लेखिका करतात. राहुल या एड्सग्रस्त मुलाशी विवाह झाल्याने आईवडिलांचा एकमेव आधार असलेल्या विनयाला एड्सचा संसर्ग होतो. अमेरिकेत अनेक महिलांशी लग्नापूर्वी संबध ठेवलेल्या राहुलमुळे विनयाचा बळी जातो. पतीमुळे झालेल्या स्त्री जीवनाच्या उद्ध्वस्ततेची ही कथा आहे. मुलीपश्चात एड्स विषयीची जागरुकता करत एड्सच्या निर्मुलनाचे

प्रचार कार्य करणारी स्त्री विजयाच्या आईच्या माध्यमातून लेखिका दर्शवितात. ‘वंशाचा दिवा’ या कथेतून चार मुलीच जन्माला आल्याने विशाखा या स्त्रीची होणारी छळवणूक लेखिका दर्शवितात. तिसऱ्या मुलीच्या पाठीवर वेणी असल्याने चौथीही मुलगीच जन्मू नये म्हणून लहानग्या मुलीच्या पाठीला जागत्या लाकडाचे चटके देणाऱ्या अमानुष प्रवृत्तीचे चित्रण कथेत येते. स्त्रीचा समाजाने मांडलेला छळवाद व शेवटी चार मुलींनंतर जन्मलेला पाचवा मुलगा अतिलाडाने व्यसनी ठरतो व चारही मुली यशोशिखरावर पोहोचतात. ‘पश्चाताप’ या कथेत पुरुषी मानसिक विकृतीचे चित्रण येते. डॉक्टरी तपासणी करून अरुंधतीत काहीच दोष नसल्याचे सांगूनही मूल होत नसल्याने पतीचा जाच सोसणारी अरुंधती व आपल्यात काही उणीवा असूच शकणार नाहीत अशा पुरुषी अहंकाराने ग्रासलेला, स्वत:मधील शुक्राणूंची चाचणी करण्यास पुढे न सरसावणाऱ्या नवऱ्याच्या माध्यमातून शेखरच्या पुरुषी अहंकारी वृत्तीचे चित्रण येते. अपघाती पाय गमावल्यानंतर लाथा बुक्क्यांनी मारलेल्या अरुंधतीनेच सुश्रुषा केल्याने शेखरला झालेला पश्चाताप अशी कथा येते. स्त्री स्वभावाचे भिन्न पैलू मांडताना स्त्रीत असलेल्या मातृत्वाचे चित्र मांडणारी ‘मुक्ता गोखलेची आई’ ही कथा येते. मुक्ता गोखले या विद्यार्थिनीचा आईवरचा सुरेख निबंध वाचून बाई सुखावते. मुक्ता गोखलेला आई नसल्याचे समजताच स्वत:ला मुलबाळ नसल्याने व मुक्ताच्या ‘आई’ या निबंधातील भावनाप्रधान उतारे हृदयाला भिडल्याने, बाई मुक्ता गोखलेला दत्तक घेते. आई ही स्त्रीमध्ये उपजतच असते. आई बनण्यासाठी तिने मुलाला स्वत: जन्म देणे गरजेचा नसतो तर स्त्रीत असलेले मातृत्व तिला आईपण बहाल करते असा आशय व्यक्त करत मातृत्वाचा गौरव करणारी ही कथा ठरते.

### 3.3.5.4 विशुद्ध विनोदी कथा

त्यांच्या कथा लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कथेत आलेला विशुद्ध स्वरूपाचा विनोद विचारात घेणे गरजेचे ठरते. ‘गडबड घोटाळा’ ही अशाच पद्धतीची विशुद्ध विनोदी स्वरूपाची कथा येते. रोजरोज घरात येणाऱ्या पाहुण्यांना कंटाळलेले जोडपे मृदुला व निशिकांत, सुभाष या निशिकांतच्या मित्राच्या येण्याने झालेली दमछाक विनोदी पद्धतीने रंगवत आज अतिथी डोईजड होत असल्याचा एकूण किस्सा रंगवत द. मा. मिरासदारांच्या ‘माझी पहिली चोरी’ या कथेची आठवण करून देतात. मानवी स्वभावविसंगतीतून विशुद्ध अशा विनोदाची निर्मिती ‘विनिताच्या सासूबाई, राधाबाई!’ या कथेत लेखिका करतात. सून घरी असल्याने ऐन ५६व्या वर्षी म्हातारी झाल्याचा अविर्भाव आणत जीवाला जराही झिजू न देत सुख जगणारी राधाबाई कथेत येते. रोजरोज जीवाच्याने होत नाही म्हणून रडारड करणारी पण बाहेर फिरायला, हॉटेलमध्ये जायला तत्पर असलेली राधाबाई

या कथेत येते. दिवसभर खात, आराम करत वजन वाढूनही "मी काहीच खात नाही" असा समज म्हणजेच गैरसमज असलेल्या सासूबाईंच्या स्वभावविसंगतीवर उपहासात्मक स्वरूपाचा विनोद लेखिका करतात.

### 3.3.6 अंजली आमोणकर यांचे कथा लेखन

अंजली अमोणकर यांचे 'प्राक्तन' (१९९५), 'दुसरी बाजू' (२००१), 'आभाळ आपलं आपलं' (२००९), 'देणे' संचिताचे' (२०१८) असे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले. मानवी जीवनातून मानवी स्वभावाचे भिन्न असे भावनिक कंगोरे मांडण्याचा प्रयत्न अंजली आमोणकर यांची कथा करते. रक्तापलीकडे निर्माण होणाऱ्या नातेसंबंधावर त्यांची कथा भाष्य करते, त्याचबरोबर स्त्री जीवनाचे चित्रण करते. रहस्यात्मक पद्धतीने त्यांच्या काही कथा आलेल्या दिसून येतात.

#### 3.3.6.1 नातेसंबंधांवर भाष्य

'देणे संचिताचे' या कथासंग्रहातील 'वेणा' ही अशाच पद्धतीची कथा ठरते. नाना या दर्जेदार लेखकाचा लेखनिक म्हणून काम करणाऱ्या रमणला लाभलेला नानांचा आधार व दोघांचे रक्ताच्या नात्यापलीकडे जुळलेले भावबंध 'वेणा' या कथेतून लेखिका चित्रित करतात. 'वावटळ' या कथेत तरुणपणात आलेल्या मुलीला लहानपणी आपल्याला आईवडिलांनी दत्तक घेतल्याचे समजताच तिला वाईट वाटते व आत्महत्येचा प्रयत्न करते. आपल्याला आपली मुलगी मानत सांभाळणाऱ्या आईवडिलांच्या, आजीच्या विचारांनी सुखावते. 'काठी' या कथेमधील परदेशी गेलेली मुले कायमची दुरावल्याने, आईच्या अंतिमक्रीयेसही परदेशातून पोहचू न शकल्याने, आपल्या घरी लहान मोठी कामे करत आपला शिक्षणाचा भार पेलू पाहणाऱ्या नंदूला, नाना आपल्याला म्हातारपणी काठी हवी असल्याने दत्तक घेतात. रक्ताच्या नात्यापलीकडे मनातून नाती जोडली जातात याचा प्रत्यय लेखिकेच्या कथांमधून येतो.

#### 3.3.6.2 स्त्री जीवनाचे चित्रण

'मनाचिये गुंती' या कथेत स्त्री जीवनाची शोकांतिका लेखिका अंजली अमोणकर मांडताना दिसून येतात. लहान असतानाच मुले दगावल्याने व दत्तक घेतलेला मुलगा विष्णूही पळून गेल्याने जगणे विसरू बसलेली व जीवाचे हालहाल होऊनही मुलाच्या प्रतिक्षेत जीवनाचे लचके तोडू न देता तळमळत जगणाऱ्या आईचे चित्रण करत ताईची शोकांतिका लेखिका मांडतात. महाभारतातील कौरव पांडव युद्धाच्या तांडवाच्या

पार्श्वभूमीवर ‘सोंगट्या’ ही कथा येते. महाभारतात युद्धात प्राण गमावलेल्या पाचही पुत्रांसाठी शोक करण्यास एकही पांडव पुढे सरसावत नसल्याने दु:खाचा मारा एकटीने सोसत निद्रिस्त मुलांची कपटाने हत्या करणाऱ्या अश्वत्थामाची अवहेलना करणारी द्रौपदी, महाभारतातील संहारामुळे पुत्र निधनाचा दोषी कृष्णास ठरवत त्याच्या यादवकुळाच्या अंत होवो असा शाप देणारी गांधारी, कर्णाची जन्मदाती आई असूनही त्याचे जन्मरहस्यआजीवन स्वत:पर्यंत ठेवत शल्य मनी बाळगत जगणारी कुंती, कर्णाच्या मृत्युनंतर अश्रू ढाळत पश्चाताप करणारी कुंती अशी नशीबाच्या फटकाऱ्यातून न सुटलेल्या स्त्रिया, प्राक्तनाची अटळता सांगून जातात.

‘किंमत’ या कथेत लग्नाच्या पहिल्याच रात्री नवरा विवेकच्या हत्येनंतर हादरलेली संशोधक असलेली राधा नवऱ्याला प्रयोगशाळेत आणुन भिन्न प्रयोगातून पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करते. हत्येवेळी रक्ताने माखलेल्या शर्टवरील डागांचा आधार घेत क्लोनिंग करत टेस्ट ट्यूब बेबी निर्मिती करण्याचे ज्ञान आत्मसात करत, विवेकसारखे दिसणारे असंख्य विवेकांचे सैन्य निर्माण करू इच्छिते. विवेकची हत्या करणाऱ्यांचा सूड घेऊ पाहते. साथीदाराच्या प्रेमात बुडलेली स्त्री नवऱ्याला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयोग करते व प्रयोगशाळेत अपघाती आग लागल्याने, पतीच्या ओढीने स्वत:ला आगीत झोकून देत स्वत: स्वत:ची शेवटची आहुती देते. साथीदाराच्या प्रेमात आकंठ बुडेल्या प्रेमिकेची शोकांतिका ‘किमंत’ या कथेतून लेखिका मांडतात. सार्थक या कथेत यशस्वी गायिका म्हणून प्रस्थापित झालेल्या स्वातीला नातवंडांची लागलेली ओढ, अनाथाश्रमातील मुलीचा लागलेला लळा व मुलाने लहान मुलीला दत्तक घेतल्यानंतर जीवनाचे सार्थक झाल्याचा आनंद, अशाप्रकारे रक्तापलीकडे जाऊन हृदयाची तार जोडत, नात्यांत रमणाऱ्या स्त्रीचे भावविश्व ‘सार्थक’ या कथेतून लेखिका मांडताना दिसून येतात.

### 3.3.6.3 रहस्यात्मक स्वरूपाच्या कथा

रहस्यात्मक स्वरूपात कथाशयाची निर्मिती अंजली अमोणकर करतात. यात ‘किंमत’, ‘माध्यम’ या कथांचा विचार करावा लागेल. अत्यंत उत्कंठावर्धक पद्धतीने या दोन्ही कथा येताना दिसतात. ‘माध्यम’ या कथेत रावसाहेब या गृहस्थाच्या कारखान्यात भयंकर अपघात घडतो. हजार टन रसायन फिरणाऱ्या मिक्सरमध्ये रघू नावाचा कामगार उतरला असता, रावसाहेबांकडून सुपरव्हिजन करत असताना चुकून बटन दाबला गेल्याने रघूच्या शरीराच्या असंख्य चिंध्या होतात. दोन तीन दिवसात रावसाहेब व त्यांच्या पत्नीचा मृत्यू होतो. मृत पावलेला रघू कधी मैत्रिणीचे कधी भावाचे रूप घेत रावसाहेबांची मुलगी लतिकाला सतावत तिला हैराण करून

सोडतो. व तिच्याच भावाचे रूप घेत तिची हत्या करतो. लतिकाची हत्या होण्याआधीच त्याच्या भावाची हत्या झालेली असते. लतिकाला मदत करू पाहणारी शिक्षिका या प्रकरणाने भेदरते. सूडप्रवृत्तीतून ही कथा आकार घेताना दिसून येते. भूत, पिशाश्च, आत्मा यांच्या अस्तित्वातून रहस्यात्मक पद्धतीने आलेली 'आक्रीत' ही कथा येते. घराबाहेरील भिंतीच्या पलीकडील शाळेतील मुलांशी जुळली गेलेली लहानगी मिनु भिंतीवर चढून आपल्या बालमित्र मैत्रिणींना भेटण्याच्या प्रयत्नात भिंतीवर चढताना खाली पडते. त्यात झालेल्या दुखपातीत तिचा अंत होतो. मिनुच्या मृत्युनंतर तिच्या आवडत्या शाळेची, तिथल्या मुलांची भेट घेण्याकरिता निघालेल्या तिच्या आईवडिलांना तिथे शाळा नसून लहान मुलांच्या समाध्या दिसून येतात. त्या भयावहतेच्या जाणीवेने हादरलेल्या मिनुच्या आईवडिलांना दुसऱ्या प्रार्थनेचा व गाणाऱ्या मिनुचा आवज येऊ लागतो. मरणोत्तर आत्म्याच्या रूपाने अस्तित्वात असलेल्या माणसाच्या रहस्यमय अस्तित्वावर ही कथा भाष्य करते. 'प्रत्यंतर' या कथेत गोव्यातून मद्य तयार करण्याची वेगवेगळी तंत्रे शिकण्यासाठी एका मदिरालयात गेलेल्या कायतानला तिथल्या रहस्यमय व जादुई जगाचा प्रत्यय येतो. तेथील अब्जावधी शतकामध्ये बनविलेल्या दारुचे लिखित इतिहास ग्रंथ पाहून अचंबित होतो. सैतानाने तेथील ग्रंथांमध्ये गूढविद्येच्या सामर्थ्याने कैद केलेल्या माणसांचे रहस्य कायतानला समजल्यानंतर सैतानाची दुनियाच नष्ट करणारा कायतान 'प्रत्यंतर' या कथेत येतो.

### 3.3.7 हेमा नायक यांचे स्त्री जाणिवा व्यक्त करणारे व स्त्रीवादी स्वरूपाचे कथा लेखन

कोकणी साहित्यातील महत्त्वाचे नाव म्हणून हेमा नायक यांचा विचार केला जातो. हेमा नायक यांचा २०२० सालात 'एस्केलेटर आणि इतर कथा' हा मराठी कथासंग्रह प्रसिद्ध झाला. स्त्री विषयक जाणिवा त्यांच्या या कथासंग्रहातून येतात. स्त्री स्वातंत्र्याची जाणीव त्यांच्या कथेत व्यक्त होते. 'नकोशी' या कथेत मुलगी असल्यामुळे आणि जन्मतःच काळी असल्याकारणाने घरच्यांना नकोशी होते व तिचे नावही 'नकोशी' ठेवण्यात येते. हीच 'नकोशी' स्वावलंबी बनते, कमी शिकूनही व्यवसायिक म्हणून यशस्वी होते. 'नयनतारा' या कथेमध्ये देवदासी समाजात जन्मलेली नयनतारा दिसून येते. आपल्या मुलीने आयुष्यभर देवदासी म्हणून न जगता, पुरुषांची सेवा न करता नृत्याचे चांगले शिक्षण घेऊन नृत्यांगना बनावे अशा विचारांची नयनताराची आई या कथेत येते. देवदासी समाजाकडे पाहण्याची पुरुषांची वृत्ती या कथेत लेखिका अधोरेखित करतात. या समाजातील स्त्रियांनी दिवसभर देवळात झाड पुस करून रात्री आपली सेवा करावी, मनोरंजन करावे, पण आपल्या नावाचे कुंकू मात्र त्यांनी लावू नये अशा विचारांची पुरषप्रधान वृत्ती या कथेत दिसून येते. भाटकारशाही व भाटकार यांच्या रखेली

म्हणून ठेवल्या जाणाऱ्या कलावंतीण स्त्रियांचे चित्र येते. ‘पुनर्वैभव’ या कथेमध्ये पतीच्या मृत्यूनंतर संसाराचा डोलारा पेलणारी, मुलांच्या संगोपनासाठी धडपड करणारी स्त्री दिसून येते. या कथेतील गंगुबाई खडतर आयुष्य जगते तसेच अनेक सामाजिक बंधनातून तिला जावे लागते. स्त्रीला घरात गणपती स्वत: पुजता येत नाही. सणा-उत्सवाला घराची साफसफाई, श्रमाची कामे करणारी ही स्त्री फुलांचे हारही गुंफते, दुर्वापत्री आणू शकते पण गणपती पुजण्याचा अधिकार मात्र तिच्याकडे येत नाही अशा अनेक पुरुषसत्ताक पद्धतींना विरोध करणारी स्त्री या कथेत दिसून येते.

मुला बाळांसाठी जीवाचे रान करून जगणारी गंगुबाई आपल्या मुलाला ॲडव्होकेट म्हणजेच वकील बनविते, पण शेवटी मुलाकडून तिची फसवणूक होते व तिची संपत्ती बळकवण्याचा प्रयत्न होतो अशा एकूण कथेतून गंगुबाईचा कणखर, खंबीर, स्वावलंबी प्रवास कथेत येतो. मुलींना समान अधिकार मिळावेत म्हणून अट्टहास करणारी स्त्री गंगुबाईच्या व्यक्तिरेखाटनातून या कथेत येते. ‘तीन दिवस’ ही कथा मासिक पाळी सारख्या विषयावर भाष्य करताना दिसते. स्वतंत्र विचारांची मल्लिका या कथेमध्ये येते. लक्ष्मी नाव असलेल्या आपल्या पत्नीचे मल्लिका नाव असावे म्हणून मल्लिका अमरशेख सारख्या स्वतंत्र विचारांच्या स्त्रीची ओळख आपल्या पत्नीला देणारा सत्येन या कथेमध्ये दिसून येतो. स्त्री समानता हवी असेल तर स्त्री पुरुष यामध्ये भेद न करता स्त्री-पुरुष या दोहोंमध्ये समतोल साधत पुरुषप्रधान सत्तेविरुद्ध स्त्री आणि पुरुष या दोहोंनी मिळून लढावे असे सूत्र या कथेमध्ये दिसून येते. मल्लिकाला यशस्वी होण्यासाठी तिचा खंबीर आधार बनून राहिलेला सत्येन, आपल्या मुलीला मासिक पाळी आल्यानंतर कुंदनिका या आपल्या मुलीचे संगोपन करणारा व काळजी घेणारा सत्येन या कथेत लेखिका रंगवतात.

‘निवलकाणी’ या कथेमध्ये स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे चित्रण दिसून येते. नृत्याची आवड असलेल्या सोनालीवर अगदी लहानपणी, तिची मासिक पाळी सुरू होण्याआधीच्या कोवळ्या दहाव्या वर्षीच बलात्कार होतो. गावात मुलींवर अत्याचार होत असल्याकारणाने आपल्या मुलीवर कधीही ही पाळी येऊ नये या विचारांनी सदैव काळजीत असलेली सोनालीची आई आपल्या मुलीवर होणाऱ्या अत्याचाराला रोखण्यास असफल ठरते. बलात्कारानंतर नृत्य, हसणं, खेळणं सोडून अगदी दहा वर्षाच्या कोवळ्या वयात खंबीर बनलेल्या सोनालीचे बालपण तिच्यापासून हिरावले जाते. लग्नानंतर ती मुलाला जन्म देते त्यावेळी आपल्या पोटी जन्माला आलेला विक्रम मुलींवर बायकांवर अत्याचार करणाऱ्यांना चांगला धडा शिकवेल अशा पद्धतीने कित्येक

वर्षांपूर्वी असलेला मनातला राग व्यक्त करताना दिसते. गावातील मुलीवर अत्याचार करणाऱ्या संतोषची आई शेवटी त्याला दंड आपल्याच मुलाला अद्दल घडवून आणते अशी एकूण कथा येते. लेखिका मार्क्सवादी विचारांच्या असल्याकारणाने मार्क्सवादी विचारसरणी त्यांच्या कथेमध्ये विखुरलेली व कृत्रिमरित्या पेरलेली दिसून येते 'एस्केलेटर' या कथेमध्ये सर्वसामान्यांच्या विकासासाठी प्रगतीसाठी झटणारी सुलक्षणा व तिचा पती दिगंत दिसून येतो. देशाचा विकास साधायचा असेल तर आधी गरिब आणि कष्टकरी लोकांना आपल्यात सामावून घेऊन पुढे गेले पाहिजे. आपल्याकडे आपण दरी निर्माण केली आहे. गरीब माणूस गरीब होत चाललेला आहे आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत चाललेला आहे. आपल्या खालच्या आणि वरच्या पायरीमध्ये जमीन आसमानाचा फरक आहे आणि तो फरक कमी होण्यासाठी प्रयत्न करणारे जोडपे या कथेमध्ये दिसून येते. एस्केलेटरचा वापर एकाच पायरीवर स्थिर उभे राहून वर चढण्यासाठी होतो त्याचप्रमाणे सर्वांना समान संधी मिळाव्यात आणि सर्वांना वर जाता यावे ही विचारसरणी या कथेतून व्यक्त होताना दिसते.

### 3.3.8 प्रतिभा कारंजकर यांच्या कथेतील अनुभव विश्व

प्रतिभा कारंजकर यांचे 'कवडसे', 'कथा-प्रतिभा'(२०१५), 'कथा-कल्पना'(२०१८), 'अनुबंध' हे संग्रह प्रसिद्ध झाले. प्रतिभा कारंजकर आपल्या कथा लेखनामध्ये भिन्न स्वरूपाचे अनुभव गुंफताना दिसून येतात. 'मन चिंती ते' या कथेमध्ये बऱ्याचदा आपण एखाद्या व्यक्तीविषयी जो विचार करतो तशी ती व्यक्ती नसते किंवा त्या व्यक्तीचा हेतू नसतो असे सूत्र कथेतून देतात. 'गोवा टू बॉम्बे' या कथेमध्ये प्रवासात असताना सीटवर सापडलेल्या काळ्या बॅगमुळे त्याच्यात बॉम्ब असल्याच्या संशयाने उडालेला गोंधळ अशी कथा सर्वसाधारण असा अनुभव कथन करताना दिसते. आईच्या माध्यमातून लपून-छपून सिनेमाला जाण्याचा ती प्रयत्न करते व सोबत गेलेल्या आजीला स्मृतिभ्रंश असल्याकारणाने तिला तिथेच विसरून परतलेल्या स्त्रिया आणि तिची उडालेली तारांबळ अशी एक स्मृति 'स्मृतीतरंग' या कथेतून लेखिका मांडतात. 'असंही घडू शकतं' या कथेमध्ये पंजाबी मुलगी आणि मराठी मुलगा अनेकांच्या विरोधाला न जुमानता लग्न करतात आणि शेवटी त्यांचे घरचे एकमेकांचे सखे होत जातात. सर्वेश व रेश्मा जर्मनीला गेल्यानंतर त्यांच्या दोघांच्या आई वडिलांमध्ये एक मैत्रीचे नाते निर्माण होते व चौघे उतारवयात एकमेकांना आधार देत एकत्र राहू लागतात. भारताचे अनेकतेत एकता हे ब्रीदवाक्य खरे ठरते. 'ती वेळच तशी होती' या कथेमध्ये अचानक आपल्या घरी आलेल्या एका मुलीला कविता आधार देते एकेकाळी तिच्या आईने मागचा पुढचा कुठलाही विचार न करता पेटणाऱ्या बाईला अंथरूण लपेटून

आधार दिलेला असतो. अचानक आपल्या घरात घुसलेल्या मुलीला कुठलाच संशयास्पद प्रश्न न विचारतात तीही आश्रय देते. ती वेळ तशी होती आणि त्यामुळे आपण तिला आधार दिला असे आपल्या नवऱ्याला बजावणारी कविता ही स्त्री या कथेत येते. स्त्रीला अनेकदा स्त्रीचाच आधार हवा असतो ही भावना कथेतून व्यक्त होते. लेखिकेच्या मनपटावर कोरलेले भिन्न अनुभव त्यांच्या कथेतून व्यक्त होतात.

### 3.3.8.1 आधुनिक नातेसंबंधांवर भाष्य

'कम्पॅनियन' या कथेमध्ये राधाची लहानपणाची मैत्रीण पुनवा यांची ताटातूट होते. महार समाजातील पुनवा आणि उच्च समाजातील राधा या कथेत येते. लग्नानंतर पुनवा सासरी निघून जाते व राधा ग्रॅज्युएट होते, बँकेत नोकरी करू लागते आणि संसाराच्या रहाटगाडग्याच्या चक्रात हरवते. मूलंबाळं मोठी होतात परदेशी स्थायिक होतात आणि राधाचे मिस्टर हार्ट अटॅकने मरण पावल्यानंतर उतारवयात ती एकटी पडते. तिच्या आयुष्यात आलेला एकाकीपणा आणि सुनेचा वृद्धाश्रमात जाण्याचा सल्ला अशा एकूण स्थितीतून सद्यकालीन नातेसंबंध व परिस्थितीवर लेखिका भाष्य करतात. योगायोगाने तिच्या आयुष्यात पुन्हा पुनवा येते व लहानपणीची पुनवा आज तिची कम्पॅनियन बनते.

आधुनिक जगण्यात पैशांना लाभलेल्या अनन्यसाधारण महत्त्वामुळे नातेसंबंधांमध्ये ओढताण निर्माण होत आहे. आई-वडिलांची उतारवयात काळजी घेणे आजच्या पिढीसाठी त्रासदायक व डोकेदुखी ठरेलेली आहे. आज एकीकडे तर उद्या दुसरीकडे अशा पद्धतीने भावंडांमध्ये वृद्ध आई वडिलांचा 'पासिंग द पार्सल' खेळला जातो, याचे चित्रण 'पासिंग द पार्सल' या कथेमध्ये येते. 'मधुची आई' या कथेमध्ये मधुराज या आपल्या मुलाला पतीच्या निर्वाणानंतर सावरणारी, त्याची स्वप्ने पूर्ण करणारी आई शिक्षिका म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर एकाकी जीवन जगते. आपल्या मुलाच्या, सुनेच्या व नातवाच्या आगमनासाठी दिवाळीची तयारी करून सज्ज होते पण मुलगा येत नसल्याकारणाने खंतावते. शेवटी उतारवयात आपण खचलेल्या मनस्थितीत न राहता, मुलगा, सून व नातवासाठी केलेल्या खाद्यपदार्थांची अनाथाश्रमात वाटणी करते व फक्त मधूची आई म्हणून न राहता अनाथांची आई बनण्याचा निर्णय घेते. नातेसंबंधांमध्ये निर्माण होणारी दरी व माणसांच्या जगण्यात येणाऱ्या एकाकी स्थितीवर कथा भाष्य करत एका खंबीर स्त्रीचे चित्रण कथेत येते. गोव्यात स्थायिक झालेल्या वैशालीची आंटीशी झालेली ओळख आणि त्या ओळखीतून निर्माण झालेले नाते याचे चित्रण लेखिका करतात. समृद्ध घराण्यातील पण एकाकी असलेल्या आंटीला वैशाली आधार देते. वैशाली गावात गेल्यानंतर आंटी पुन्हा एकाकी पडते.

गावाहून आल्यानंतर आंटीचे निधन झाल्याचे तिला समजते पण निधनानंतरही बल्कांवावर रात्री बसलेली आंटी दिसल्याचे तिला जाणवते. रक्ताच्या नात्यांपलीकडे जुळलेले भावबंध हे मृत्युच्या नंतरही असतात हे ही कथा सांगते. 'नायिका' या कथेत आपआपल्या जोडीदारांच्या मृत्युपश्चात वृद्धाश्रमाचा आश्रय घेतलेल्या दोघांचा आयुष्याच्या उतार वयात एकत्र येण्याचा प्रयत्न होतो. मुले परदेशी स्थायिक झाल्याने आपले आयुष्य देशात घालवण्यासाठी एकाकी पडलेला तो व त्याच्या आयुष्याच्या नाटकाच्या तिसऱ्या अंकात नवरीच्या रूपाने आलेली ती त्याच्या जीवनाची साथी बनून जाते. प्रतिभा करंजकरांच्या 'फार्स' या कथेत शहरात स्थिरस्थावर होत फ्लॅट घेण्यासाठी गावाकडच्या घराचा वाटा विकून पैसे मिळवू पाहणारा गृहस्थ दिसून येतो. आज आधुनिक जगण्यामध्ये गावाकडची ओढ कमी झालेली आहे त्यामुळे भाऊबंदकीचा प्रश्न निर्माण होतो याचे चित्र या कथेत लेखिका करतात.

आईने मुलाच्या संसारात मुलाच्या व सुनेच्या नात्यात ढवळाढवळ केल्यामुळे उध्वस्त झालेला तिच्या मुलाचा संसार अशी एकूण कथा 'माता न तू वैरिणी' या कथेत येते. 'सजा' या कथेमध्ये संशयी वृत्तीमुळे जोडप्यामध्ये होणारे कलह परिणामी होणारा घटस्फोट आणि त्यात मुलांना नकळत दिली जाणारी सजा असा विषय कथेत येतो. माधवीच्या संशयी स्वभावामुळे मनोज व माधवी या दोघांमधील होणारे वाद घटस्फोटापर्यंत पोहोचल्यामुळे अकाली प्रौढ झालेली व आई-बाबा दोन्हींच्या सहवासासाठी आसुसलेली मनू अशी एकूण कथा येते. 'लिव्ह मी अलोन' या कथेमध्ये एकटीच वाढलेली स्त्री मुलगी एकत्र कुटुंबात लग्न होऊन जाते आणि तिला तिचा एकटेपणा हवा हवासा वाटतो. माणसांची गर्दी तिला सहन होत नसल्याकारणामुळे ती पतीला घेऊन वेगळे राहण्याचा प्रयत्न करते पण तिच्या मुलीला मात्र तिच्या घरच्यांची ओढ लागते आणि शेवटी तिला एकटेपणा सहन करावा लागतो. सासरच्या माणसांशी ती पूर्णपणे तुटते आणि तिच्या गढूळ स्वभावामुळे एकाकी पडते. 'लेबल' या कथेमध्ये कुठल्याच नात्याचे लेबल न लावता नवऱ्या बायकोप्रमाणे लग्न न करता 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये असलेले जोडपे सर्वसामान्य सोसायटीतल्या लोकांसाठी त्रासदायक ठरते. जग बदलते आहे आणि जगाबरोबर आपल्यालाही बदलणे गरजेचे आहे. पारंपरिक विचारांचे पगडे असलेल्या साने काकूंच्या मनावर नकळत नवीन विचार बिंबविले जातात. जागतिकीकरणाचा एक भाग म्हणून आपल्याकडे नातेसंबंधामध्ये निर्माण झालेल्या नवीन संकल्पनांवर ही कथा भाष्य करते.

### 3.3.8.2 स्त्रियांचे भावविश्व

'सावली' या कथेमध्ये मोठ्या बहिणीची सावली असली तरी ती आयुष्यभर तिची सावली बनून जाते. मोठ्या बहिणीने म्हणजे दीदीने वापरलेल्या सर्व गोष्टी लहानपणापासून तिला मिळत जातात आणि लग्नानंतर दीदीच्या झालेल्या अकाली मृत्यूनंतर तिचा नवरा व तिचा मुलगा तिच्या नशिबी येतो. दीदीचेच आयुष्य जगणे हे आपल्या प्राक्तनात लिहिले आहे का? या विवंचनेत ती असते. आपल्या स्वतंत्र अस्तित्वाचा शोध घेण्याचा ती प्रयत्न करते. पण शेवटी स्वतःमध्ये असलेल्या दीदीच्या अस्तित्वाचा स्वीकार करणे हेच तिच्या हाती राहते. दीदीची आठवण सावलीसारखी तिच्या मनाला चिकटून राहते अशी एकूण स्त्री जीवनाची विवंचना मांडणारी 'सावली' ही कथा येते.

'डाव मांडला होता' या कथेमध्ये विभा व दीप्ती या दोन मैत्रिणींची कथा आलेली आहे दीप्ती अमेरिकेमध्ये स्थायिक झाल्यामुळे करिअर करण्याच्या दृष्टीने विवाहबद्ध झालेले नसते तर विभा विवाहानंतर तिच्या सुखी संसारात रमलेली असताना मुलाबाळाची स्वप्न रंगवत असताना कॅन्सर सारख्या असाध्य रोगाची बळी पडते व सुखात असलेल्या विभाचा पती व सासरची मंडळी तिच्यापासून दुरावली जातात. कॅन्सरवर मात केल्यानंतर आपल्याला डावललेल्या पती व सासरच्यांकडे न जाण्याचा तटस्थ निर्णय ती घेते व तिच्या संसाराचा डाव उधळला जातो. 'संशयपिशाच्च' या कथेमध्ये पतीवर सारख्या घेतलेल्या संशयामुळे पतीपासून दुरावलेली रूपा येते. आपल्या साध्या भोळ्या पतीवर आपण संशय घेत असल्याकारणाने तो आपल्यापासून दूर होणार याची जाणीव होत माफी मागत पश्चाताप व्यक्त करणारी स्त्री येते.

'व्रण' या कथेत दहावीला असलेली विद्या अत्यंत कोवळया वयात तरुण अश्विनला आपले सर्वस्व देऊन बसते व गरोदर राहते. आई-वडिलांचा त्यांच्या नात्याला विरोध असल्याकारणाने तिचा गर्भपात केला जातो. गर्भपाताच्या माध्यमातून प्रकरण संपुष्टात आणले जाते, पण स्त्री मनावर उमटलेले पहिल्या प्रेमाचे व्रण पुसता येणे शक्य आहे का? असा प्रश्न लेखिका या कथेतून करतात. मुलींसाठी जग सुरक्षित नसल्याची राधाला झालेली जाणीव 'पेन' या कथेमध्ये आलेली आहे. 'उमरकैद' या कथेमध्ये अत्यंत सुंदर बायको असल्याने तिला घरात कोंडून ठेवणारा नवरा व नवऱ्याला कुठलाच प्रतिकार न करता तेच आपले प्राक्तन असल्याचे समजून शिक्षा अत्यंत आनंदाने भोगणारी स्त्री कथेत येते. 'हसले मनी चांदणे' या कथेमध्ये नवरा बायकोच्या नात्यांमध्ये आलेला दुरावा आणि घटस्फोटापर्यंत पोहोचलेले प्रकरण, पण बाळाच्या आगमनाने त्यांच्या आयुष्यात पसरलेले

चांदणे आणि त्या आनंदाने समाधानी झालेली, आपला पतीही आपल्या नात्याकडे सकारात्मकतेने पाहत असल्याने सुखावलेली स्त्री अशी कथा येते. स्त्री स्वभावाचे चित्रण करताना दैनंदिन जीवनानुभव लेखिका मांडतात. दैनंदिन जीवनात भिन्न भूमिका निभावणाऱ्या स्त्रियांच्या अनुभव विश्वातील अनेक पैलू लेखिका मांडतात. कारंजकरांच्या कथा या कथेपेक्षा अनुभव कथन करणाऱ्या आहेत. कामानिमित्त गोव्याहून मुंबईला गेलेल्या नवऱ्याने दुसऱ्या स्त्रीशी संसार थाटल्याचा तिला बसलेला धक्का. अशी ‘धक्का’ ही कथा येते. प्रतिभा कारंजकरांच्या कथेचा विचार केला तर त्यांची कथा दैनंदिन माणसाच्या जीवनातील अनुभव कथेतून व्यक्त करते.

### 3.3.9 रेखा पौडवाल यांचे कथालेखन

रेखा पौडवाल यांचा ‘अंतर्भाव’ हा कथासंग्रह २००८ साली प्रकाशित झाला. त्यांच्या कथालेखनात स्त्री जीवन केंद्रस्थानी ठेवत स्त्री जीवनाशी निगडीत प्रश्न, स्त्री पुरुष नातेसंबंध, स्त्रीचे भावविश्व, जगण्यातील संवेदनशीलतेचा अभाव असे भिन्न विषय आलेले दिसून येतात.

#### 3.3.9.1 स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचे चित्रण

स्त्री जीवनावर उमटणाऱ्या भिन्न पडसादांचे चित्रण ‘आक्रोश’ या कथेतून लेखिका करतात. या कथेत प्रसिद्ध कलाकार असलेल्या स्त्रीवर पतीच्या संशयी वृत्तीमुळे होणारे अत्याचार झेलत, समाजास स्त्री ही अबला नसून सबला असल्याचे सांगणारी, आपले दुःख समाजासमोर प्रदर्शित न करता झोपेच्या गोळीतून जिरविण्याचा प्रयत्न करणारी हतबल स्त्री या कथेत येते. स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे चित्रण ‘दृष्टीकोन’ या कथेत येते. या कथेत पुर्वाविवाहित व दोन मुलांचा बाप असलेल्या पुरुषाकडून सुशीलची फसवणूक होते, लग्नानंतर मिळालेला हुंडा बळकावला जातो. लग्नानंतर ती अनैतिक संबंधातून गरोदर राहिल्याचे सांगत, तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवत तिची हकालपट्टी केली जाते. कालांतराने आपली फसवणूक करणारा पुरुष हा झोपडपट्टीत व्यसनाधीन जीवन जगत असल्याचे निदर्शनास येताच आपली त्याच्या जीवनातून हकालपट्टी झाल्याने किमान आपण सुस्थितीत असल्याचा सुशीलचा दृष्टीकोन तयार होतो. आपल्या प्रेयसीवर असलेल्या संशयामुळे प्रेयसीला लाथाबुक्क्यांनी मारत प्रेयसीचा व तिच्या गर्भात वाढणाऱ्या आपल्याच मुलाचा खून करणारा व शेवटी पश्चातापाने कोसणाऱ्या पुरुषाच्या अत्याचाराचे चित्रण करत, होळीच्या दिवशी रक्ताची होळी खेळणाऱ्या गिरीशच्या प्रवृत्तीचे चित्रण ‘होळी’ या कथेत येते. घरकाम करून पोट भरणारी चंपा लग्नानंतर सुखी संसाराची

स्वप्ने रंगवते पण आळशी व त्रास देणारा नवरा मिळाल्याने, दारिद्र्यातच मुलाचे संगोपन करत असताना परत गर्भवती असल्याने दारिद्र्याने व शरीराने खचलेल्या स्त्री जीवनाच्या शोकांतिकेचे चित्रण ‘चंपा’ या कथेत येते. भारतात स्त्रीच्या सौंदर्याला तिच्या रंगाच्या निकषांवर मापले जाते. ‘चूक कुणाची?’ या कथेत सुस्वभावी गुणी व डिझायनर असलेली मीनू सावळ्या रंगामुळे नाकारली जाते. परत परत नकार मिळाल्याने मानसिकदृष्ट्या खचलेली मीनू परधर्मीय मुलाच्या प्रेमात पडते व आई वडिलांच्या विरोधाला न जुमानता प्रियकराकडे जाण्याचा निर्णय घेते. समाजाच्या वर्णविषयक संकुचित मानसिकतेमुळे कोसळलेल्या, प्रेम शोधणाऱ्या स्त्रीचे भावविश्व लेखक या कथेत चितारतात.

### 3.3.9.2 स्त्रियांच्या भावविश्वाचे चित्रण

स्त्री पुरुषांच्या मनोवृत्तीचे भावनिक पातळीवर चित्रण करत त्या दोहोंच्या स्वभाववैशिष्ट्यांमध्ये असलेल्या विरोधाभासाचे चित्रण रेखा पौडवाल यांच्या कथेमध्ये येते. याअनुषंगाने त्यांची ‘भेट’ ही कथा महत्त्वाची ठरते. प्रेमिकांसाठी वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या ‘वेलेंटाईन दिनी’ आपल्या प्रियकराच्या ओढीने भेटीसाठी आसुसलेल्या, गतआठवणीत रमलेल्या तिला त्याची प्रत्यक्ष भेट होते तेव्हा त्या भेटीतील प्रियकरामधील कोरडेपणा, भावनाशून्यता जाणवते व तिच्या मनोविश्वातील प्रीतीचा बंगला कोसळतो. अत्यंत सुखवस्तू घराण्यात व कामाससाठी परदेशी असलेला नवरा लाभल्याने आनंदित झालेली संगीता, लग्नानंतर मुलाचा जन्म, संगोपन आणि परदेशी असलेल्या पतीच्या विरहाने भावनाविवश होते. स्त्रीच्या भावनाविवशतेचे चित्रण ‘परदेशी’ या कथेत येते. ‘नातं’ या कथेत आईवडिलांच्या घटस्फोटामुळे मेरीच्या जीवनाची झालेली उलथापालथ, वडिलांकडून झालेले चांगले संगोपन पण आईच्या अहंकारी वृत्तीमुळे आईच्या मातृप्रेमापासून वंचित राहिलेली मेरी, वडिलांवर असलेल्या सूडबुद्धीने आईने आपले लग्न मोडल्यानंतर प्रेमळ अशा नवीन नात्याचा शोध घेते व शेवटी स्वार्थी जगात येशुशी नाते जोडत ‘नन’ बनते.

स्त्रीच्या संसारी जीवनाच्या वाताहतीचे चित्रण ‘कोलमडलेले जग’ या कथेत लेखिका करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर मुष्टियोद्धा असलेल्या मुलाच्या अपघाती निधनानंतर व्यसनाधीन झालेला तिचा निर्व्यसनी पती, दिशाहीन मुलगे व या परिस्थितीत आपले कोलमडलेले जग सावरत मुलाची क्रिडासंघात निवड व्हावी म्हणून झटणारी स्त्री या कथेत येते. मानसिक वाढ न होणाऱ्या संकेत या आपल्या मुलाचा दुर्दैवी अंत झाल्याने सोनालीच्या जीवनात निर्माण झालेली उदासीनता, मुलाच्या निधनानंतर आपले सर्वस्व गमावल्याची

तिच्या मातृहृदयाला झालेली जाणीव व त्याच्या आठवणीत जगू पाहणाऱ्या आई वडिलांच्या उदासीनतेचे चित्रण 'अंत' या कथेत येते. स्त्रीला लागलेली आपल्या प्रियकराची अनिवार ओढ, आपल्या प्रियकराच्या वाटेकडे डोळा लावून बसलेल्या रेश्मा प्रियकर न आल्याने खंतावते पण आपल्याला भेटण्यास येणाऱ्या प्रियकराची अपघाताने झालेली जखमी अवस्था पाहून हादरते, ऑफिसचे काम व प्रियकराची देखभाल यात अंतर येऊ न देता, आपल्या प्रियकराची शुश्रुषा करत आपल्या प्रेमाचे गुपित जपणारी पण आपल्या आवडत्या व्यक्तीसाठी धडपडणारी स्त्री 'गुपित' या कथेत येते.

### 3.3.9.3 स्त्री स्वभावाच्या भिन्न छटांचे चित्रण

'घरजावई' या कथेत आपल्या पतीची व वडिलांची वारंवार तुलना करत घरजावई असलेल्या आपल्या पतीला कमी लेखणाऱ्या, स्वत:च्या वकिलीचा तोरा मिरविणाऱ्या अर्चनाच्या वृत्तीला कंटाळून पलायन करणारा पती दिसून येतो. स्त्री स्वभावामुळे नाते संबंधात येणाऱ्या दुराव्यावर ही कथा भाष्य करते. 'सूड' या कथेतून आपल्या प्रेमाला नाकारून दुसरीशी विवाह केल्याने सूड उगविण्याच्या प्रयत्नात सतीशवर खोट्या बलात्काराचा आळ घेणारी व त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करणारी सोनाली दिसून येते. आज सूड उगविण्याच्या हेतूने समाजात निर्माण होणाऱ्या भयावह प्रवृत्तींवर ही कथा भाष्य करते. 'चुकलेली वाट' या कथेत अवखळ, अल्लड असलेली रूपा संजय या आपल्या बालमित्राच्या प्रेमात पडते. दुबईला मिळालेल्या नोकरीवर पाणी सोडून संजय तिच्याशी विवाहबद्ध होतो. संजयच्या तुटपुंज्या कमाईत असंतुष्ट असलेली रुपा मोहम्मदच्या जाळयात अडकते व त्याच्यासोबत दुबईत पळून जाते. श्रीमंतीच्या मोहाने पळून गेलेली रूपा दुबईत एका अरबाला विकली गेल्याची बातमी संजयपर्यंत पोहोचते. अवखळ, अल्लड अशा स्त्री स्वभावाचा एक पैलू रूपाच्या माध्यमातून मांडत मोहात बळी पडलेल्या स्त्री जीवनाचे वास्तव चित्रण ही कथा करते त्याचबरोबर मोह ही पापाची पहिली पायरी असते असा बोध देणारी ही कथा ठरते. 'मिलन' या कथेत आपण स्वतंत्र, स्वावलंबी, नोकरी करणारी असल्याने सुमित्रामध्ये असलेला अहंभाव व आपण पुरुष असल्याने आपण माघार का घ्यावी या पुरुषी अहंकाराने ग्रासलेला तिचा पती. दोहोंमध्ये अहंभावामुळे आलेला दुरावा व आयुष्याच्या संध्येला मुलीच्या लग्नाच्या वेळी एकमेकांच्या आधाराची गरज असल्याने अहंभाव दूर ठेवून दोघांचे झालेले पुनर्मिलन अशी कथा येते. अहंभावामुळे स्त्री पुरुष नातेसंबंधात येणाऱ्या दुराव्यावर ही कथा भाष्य करते.

### 3.3.9.4 स्त्री पुरुष नातेसंबंधातील गुंते

मुकूल या आपल्या प्रियकरापासून दुरावलेली पण त्याला सर्वस्व देत त्याच्याशी आलेल्या संबंधातून गर्भ राहिल्यानंतर अमोलशी विवाहबद्ध होत संसार करणाऱ्या मानसीचा, आपल्या मुलाच्या वाढदिवशी त्याच्या रक्ताच्या वडिलांची भेट घडवून आणण्याचा प्रयत्न फसतो. पण स्वत:च्या गुर्मीमुळे मुलाच्या अस्तित्वापासून अनभिज्ञ असलेला मुकूल अशी 'वाढदिवस' ही कथा येते. मूल होत नसल्याने आपला पुरुषार्थ सिद्ध करण्यासाठी दुसरा विवाह करणारा विश्वासराव दुसरी बायको गरोदर राहिल्याने आपला पुरुषार्थ सिद्ध झाल्याचा आव आणतो. पण दुसऱ्या पत्नीचा नोकराशी असलेल्या संबंधातून ती गरोदर असते ही सत्यपरिस्थिती असते. अनैतिकतेच्या जाळ्यात अडकलेली स्त्री व स्वत:चा पुरुषार्थ सिद्ध करू पाहणारी पुरुषी अहं भावना अशा मनोवृत्तीचे चित्रण 'पुरुषार्थ' या कथेत येते.

### 3.3.9.5 मानवी जगण्यातील शोकांतिका व मानवी वृत्ती प्रवृत्तीवर भाष्य

'धक्का' या कथेत अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत देवदत्तचे आईवडील त्याला डॉक्टरकीचे शिक्षण देतात. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कर्ज फेडू न शकल्याने वडील घर सोडून जातात व आईचे पतीच्या विरहाने निधन होते. आईवडिलांना सुखात ठेवायचे देवेंद्राचे स्वप्न स्वप्नच राहते. बरीच वर्षे वडिलांचा शोध घेणाऱ्या देवेंद्रला प्रोफेसर म्हणून नियुक्त झाल्यानंतर पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शवविच्छेदन शिकविण्यास गेल्यावर वडिलांचे शव दिसते व तो कोसळतो. कित्येक वर्षापासून शोधणाऱ्या वडिलांच्या शवरुपी झालेल्या भेटीत देवेंद्रवर झालेला मानसिक आघात तसेच स्त्री पुरुषांच्या जीवनात उपभोग घेऊ न शकणाऱ्या सुखासाठी चाललेले अविरत प्रयत्न व त्या वाटेत लाभलेल्या दु:खाचा सहवास रेखा पौडवाल यांच्या कथेतून व्यक्त होताना दिसून येते.

मानवी वृत्तीप्रवृत्तींवर भाष्य करणारी 'सौजन्याची ऐसीतैसी' ही कथा येते. या कथेत ऑफिसमध्ये आलेल्या नवीन सुंदर स्त्रीमुळे कर्मचारी वर्ग तिला रीझाविण्यास अदबीने वागू लागतो. ती वरिष्ठ अधिकाऱ्याची बायको असल्याचे समजताच पुन्हा कामात स्वैराचारी वागणे सुरू होते. सर्वसामान्य मानवी स्वभावाचा एक पैलू ही कथा टिपते.

### 3.3.9.6 व्यवहारीक जगण्यात मानवी संवेदनशीलतेवर भाष्य

लेखिका पेशाने डॉक्टर असल्याने, रुग्णाशी जुळणारे भावनिक नाते व्यक्त करणारी 'लाल साडी' ही कथा येते. वृद्ध गृहस्थाची सुश्रुषा करणाऱ्या डॉक्टरचे वृद्धाशी जुळलेले भावबंध व वृद्धाच्या निधनापूर्वी डॉक्टरला लाल साडी देण्याचा निरोप. अशा पद्धतीने लाल साडीची एक आठवण कथन करत, डॉक्टर व रुग्णात व्यवहारपलीकडे जुळलेल्या नात्यावर लेखिका प्रकाश टाकतात. गरीब, उपेक्षित, दीनदुबळयांवर वडिलांनी केलेल्या पापांचे परिशीलन म्हणून आपल्या वडीलांच्या वाटेने न जाता, पुढील आयुष्यात चांगले वागायचे असे ठरविलेले विश्वासराव डॉक्टरकीचा पेशा स्वीकारून दीन दुबळयांवर मोफत उपचार करतात. आपल्या येणाऱ्या पिढीला शापमुक्त करू पाहणाऱ्या डॉ. कुमारच्या उदात्त स्वभावाचे दर्शन 'शापमुक्त' या कथेतून होते. आजच्या जगात व्यवहारीकतेपुढे झुकलेली संवेदनशीलता व समाजास संवेदनशील माणसांची असलेली गरज यावर भाष्य करणारी 'पुनर्जन्म' ही कथा येते. व्यवहारी व संवेदनाहीन असलेल्या डॉ. उमेशवर ब्रेन ट्युमरची यशस्वी शास्त्रक्रीया झाल्यानंतर वैचारिक बदल होतो. फक्त व्यवहारासाठी डॉक्टरकी न करता गोरगरिबांच्या मदतीस पुढे सरसावलेल्या डॉ. उमेशचा असाध्य रोगावर मात करत त्याच्यात झालेले परिवर्तन हा त्याचा पुनर्जन्म ठरतो.

### 3.3.10 सुजाता सिंगबाळ यांची स्त्री पुरुषांच्या स्नेहविश्वाचे भावबंध टिपणारी कथा

अत्यंत नाजूक भावना अलगद व हळुवारपणे टिपण्याचा प्रयत्न 'स्नेहबंध' (१९९९) या कथासंग्रहातून सुजाता सिंगबाळ करताना दिसून येतात. स्त्री पुरुषांच्या स्नेहविश्वाचे भावबंध ही कथा टिपते. 'इंद्रधनुष्य' या कथेत कलावंत समाजातील प्रभाचे प्रवीणवर प्रेम जडते. नशिबाने परंपरागत आलेला वेश्याव्यवसाय झिडकारून प्रवीणशी लग्न करून व सुखी संसार करण्याचे तिचे मनोरथ तिच्याच मावशीकडून उधळले जाते. प्रवीण हा तिचाच भाऊ असल्याचे तिला सांगितले जाते. भावनाविवश प्रभा प्रवीणपासून दूर राहण्याचा निर्णय घेते. व पुढे परपुरुषामध्ये न गुंतता फक्त व्यवहार म्हणून वेश्याजीवनाचा स्वीकार करते. कालांतराने तिच्या सौंदर्याची भुरळ पडलेला प्रवीण तिच्या दारी येतो. प्रवीण तिचा भाऊ आहे असे म्हणत तिला फसवल्याचा गौप्यस्फोट मावशी करते. पण या वेळी प्रवीण मात्र तिच्यावरच्या कोवळया प्रीतीने नव्हे तर तिच्या विसरू न शकलेल्या सौंदर्याच्या आसक्तीने पैशांच्या मोबदल्यात आल्याचे तिच्या लक्षात येते. प्रीतीच्या बदल्यात व्यवहार मिळाल्याने प्रभा तो व्यवहार नाकारते अशी कथा येते. 'भातुकलीच्या खेळामधली...' या कथेत भाववेड्या जायूच्या प्रेमाची अधुरी कहाणी लेखिका मांडते. लहानपणापासून एकमेकांवर प्रेम करणारी जायू व महेश. पण जायूचे अबोल राहिलेले

भावविश्व महेशला समजत नाही. भावनाविवश होत गाणाऱ्या जायूचे भाववेडे विश्व आपल्याला टिपता न आल्याची जाणीव महेशला आपल्या लग्नाच्यावेळी होते व त्यांची कहाणी अपुरीच राहते. 'उमलल्या स्वप्नांच्या काळया' या कथेत लग्नानंतर स्वप्नाच्या माला गुंफत आपल्या नवऱ्याच्या आयुष्यात प्रवेश केलेल्या नीनाला लग्नाच्या अवघ्या पंधरा दिवसांनी नवऱ्याचा मृत्यू झाल्यामुळे पांढऱ्या पायांची ठरवली जाते. सासरकडून झिडकारलेली नीना नर्स बनून सेवा करण्याचा निर्णय घेते, यादरम्यान डॉक्टर सेनच्या प्रेमात पडते. दोघांमध्ये एक नाजूक प्रेमाचा धागा गुंफला जातो. पण आपल्या प्राक्तनावर अविश्वास दाखवत पुन्हा लग्नाची व लग्नानंतरच्या दुःखाची पुनरावृत्ती होईल या भितीने ती लग्नास नकार देते. डॉक्टर सेनला अन्य स्त्रीशी विवाह करण्यास सांगत स्वतः आपले आयुष्य त्यांच्या आठवणीत, त्यांच्या स्मृतीं जपत घालवण्याचा निर्णय घेते. अशारीरिक अशा प्रेमाची उदात्त कथा मांडत, प्रियकराच्या फक्त आठवणीच्या जोरावर उमलणाऱ्या नीनाच्या स्वप्नांच्या कळया, अशा पद्धतीने ही कथा येते. नातेसंबंधातील गुंतागुंत व नातेसंबंधात स्त्रीचे असलेले स्थान त्यांच्या कथेतून दिसून येते. 'कस्तुरीमृग' या कथेत कधीच भावनेच्या पाशात न गुरफटलेली, नात्यातला शिष्टाचार न समजणारी, मुलांना आईच्या मायेची गरज असते याची जाणीव नसलेली, प्रेम, द्वेष, मोह, मत्सर, पाश, बंधन, नाती या साऱ्याच्या पलीकडे असलेल्या आपल्या आईच्या स्वभावाला आपण आयुष्यभर दोष दिला व कस्तुरीमृगाला ज्याप्रमाणे आपल्यात असलेल्या सुगंधाची जाणीव नसते त्याचप्रमाणे आपण आईला ओळखूच शकले नाही, तिच्या मृत्युनंतर आपल्याला आईच्या स्वभावाची जाणीव झाल्याने आईशी मृत्यूपश्चात एक वेगळे भावबंध नकळत जुळवणारी कुंदा 'कस्तुरीमृग' या कथेत येते.

'गारठलेल्या वाटा', 'काही क्षण' या कथांमध्ये ड्रग्जच्या व्यसनाने विळख्यात अडकलेल्या मुलांच्या शोकांतिका लेखिका मांडण्याचा प्रयत्न करतात. 'काही क्षण' या कथेत ड्रग्जमध्ये अडकलेला अवी तिच्या प्रेमात पडून तिने स्वतःला सुधारण्याची अपेक्षा ठेवतो, पण कालांतराने त्याचा अपघाती मृत्यू होतो. आपण त्या क्षणी त्याचा आधार बनलो असतो तर तो जगला असता का? या विवंचनेत असलेली स्त्री कथेत येते. उच्चभ्रू समाजातील नातेसंबंधांमध्ये निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे चित्रण 'मृगजळ' या कथेत लेखिका करतात. आयुष्यभर ऐशो आराम, समाजकार्य, करियर या सर्वाला मृगजळ समजून सुख शोधणाऱ्या अनघाला आपला मुलगा मिहीर आपल्यापासून दुरावल्याची जाणीव होते. सर्व सुखसोयी असूनही काम, बिझनेस, स्पर्धा या गर्तेत अडकलेल्या स्त्री पुरुषांचे नातेसंबंध व निर्माण होणारा दुरावा याचे चित्रण 'वाळूचे मनोरे' या कथेत येते. 'खेळ रंगला पण' या कथेत आयुष्यभर पुरुषसत्ताक व्यवस्थेत जगलेल्या समीरला मिता बदलते. प्रत्येक गोष्टी अट्टहासाने मिळवू

पाहणारा समीर मितावर निस्सीम प्रेम करू लागतो. पण कोवळ्या भावना बहरत असताना मिताचा अपघाती अंत होतो. स्त्री पुरुषांच्या जीवनाच्या करुण कथा सुजाता सिंगबाळांच्या लिखाणात येतात. पतीला शुक्राणूंचा अभाव असल्याने कृत्रिम बीजारोपण करून मुलीला जन्म दिल्यानंतर, परपुरुषाच्या शुक्राणूतून बीजारोपण झाल्याने स्वप्ना या आपल्या मुलीला स्वीकारू न शकणारी व घराण्यास वंशाचा दिवा हवा असल्याकारणाने पुन्हा परपुरुषाच्या शुक्राणूंच्या माध्यमातून मातृत्व स्वीकारण्यास नकार देणारी स्त्री 'निवडुंग झाले मी!' या कथेत येते. या कथेतील नायिकेच्या मनातील स्त्रीत्वाचे द्वंद्व लेखिका स्पष्ट करताना लिहितात, "मुलाचा बाप कोण होता? कुणाचे रक्त तिच्या अंगी होते? सारं प्रश्नचिन्हं होतं. मुलाचा बाप कोण याचं उत्तर न देणारं कृत्रिम बीजारोपण. कृत्रिम शोध. यानं पत्नी पतिव्रता राहते. शरीर पवित्र राहातं. पण मन? मनाच्या स्थितीची पर्वा कुणी केली? शरीराच्या आत मन असतं. नाजूक भावना असतात. हे या आधुनिक युगातल्या माणसांना माहीत नव्हतं का? का फक्त सुख शोधायचं? सुख म्हणण्यापेक्षा प्रतिष्ठा शोधायची? 'वंशाला दीवा' हवा. स्वप्नाला भाऊ हवा म्हणून." [10] खोट्या प्रतिष्ठेपायी, अमान्य असूनही मनाविरुद्ध पती व्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या शुक्राणूंचा एकदा स्वीकार केल्यानंतर, निवडुंगाप्रमाणे बनत दुसऱ्यांदा कृत्रिम बीजारोपणाला ती नाकारते. 'दोष यौवनाचा' या कथेत यौवनाच्या गर्वात स्थळे नाकारणाऱ्या मनीषाचे शेवटी लग्न जुळून येत नाही. रुपाबरोबर समाजाला गुणांची कदर असल्याची जाणीव होत, आपल्याला हक्काचा माणूस हवा असल्याने संसार सुखास आसुसलेली स्त्री मनीषाच्या माध्यमातून लेखिका चित्रित करतात. .

### 3.3.11 गिरिजा मुरगोडी यांच्या स्त्री जीवनावर भाष्य करणाऱ्या कथा

गिरिजा मुरगोडी यांचा 'विधीसंकेत' हा कथासंग्रह २००९ सालात प्रसिद्ध झाला. स्त्री जीवनाशी निगडीत प्रश्नांना लेखिका आपल्या कथा लेखनातून पुढे आणताना दिसून येतात. 'तिचं लग्न' या कथेत मुलगी पसंत पडल्यानंतर हुंड्याची मागणी झेपत नसल्याने दु:खी मनाने लग्न तोडणारा मुलीचा बाप बळवंतराव, तर दुसरीकडे आपल्या मुलाला व सून म्हणून आपणास शमा आवडली असल्याने पत्नीच्या नकळत हुंडा देण्यासाठी स्वत:च पैसे देणारा सासरा दिसून येतो. जुन्या प्रथा परंपरेशी बांधील अशी एक भूमिका व हुंडा सारख्या सामाजिक प्रश्नाकडे पाहण्याची परिवर्तनशील भूमिका, अशा आधुनिक जगण्यात निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचे दोन दृष्टीकोन लेखिका आपल्या या कथेतून व्यक्त करतात. स्त्रीच्या माथी वैधव्य आल्यास तिला समाजाकडून वाळीत टाकले जाते याचा प्रत्यय त्यांच्या 'मेंदी' या कथेतून येतो. तरुणपणी ऐन बाविसाव्या वर्षी

दोन मुलांच्या जन्मानंतर पतीच्या अपघाती मृत्यूने शीलाच्या माथी आलेले वैधव्य व तिच्याच आईकडून, सासूकडून विधवा म्हणून वारंवार हिणवली गेलेली, विधवा म्हणून छोट्या छोट्या गोष्टींपासून दूर ठेवली गेलेली शीला या कथेत येते. तरुणपणी नटण्याची हौस मारून टाकण्यास भाग पडलेली वंचित स्त्री या कथेत येते. स्त्रीला सामाजिक रूढी परंपरा व बंधनात अडकवणारी दुसरी स्त्रीच असते याचा प्रत्यय 'तिचं लग्न', 'मेंदी' या कथातून येताना दिसतो.

स्त्रीला लहानपणीच संस्कारक्षम, जबाबदार बनविण्याच्या प्रयत्नात नकळत तिचे बालपण हिरावले जाते, अशा आशयाची 'मोठी?' ही कथा येते. लहानपणी सदैव जबाबदाऱ्यांचे ओझे वाहणारी, आईपासून तिच्या लाडापासून वंचित राहिलेली माधवी आपल्या मोठ्या मुलीला लहानपणी आपल्यासारखाच त्रास होऊ नये म्हणून प्रयत्न करते. स्वप्ना या आपल्या मुलीनंतर लहान भावंड जन्मले तरी स्वप्ना लहानच असल्याचे पतीला बजावते. गिरिजा मुरगोडी यांच्या कथेतील स्त्री प्रसंगी प्रत्येक गोष्टींचे समर्थन न करता वेळप्रसंगी विरोधही दर्शविते. 'निर्णय' या कथेत पहिल्या पतीच्या निधनानंतर केशवमध्ये आधार शोधणारी हळवी स्त्री लग्नानंतर आपल्या मुलाला होणाऱ्या पतीकडून सावत्रपणाची वागणूक दिली जाईल याची जाणीव होताच लग्न न करण्याचा निर्णय घेते. मुलांसाठी स्वत:च्या इच्छा त्यागणाऱ्या अशा मातृहृदयाचे भावविश्व या कथेत उमटताना दिसते. 'नियती' या कथेत आशा या आपल्या पत्नीच्या साडीने पेट घेतल्याने तिला वाचविण्याच्या झटपटीत रॉकेल सांडल्याने स्वत:ला भाजून घेणाऱ्या अजितचे त्या अपघाताने निधन होते. पत्नीवर ओढवलेला मृत्यू त्याने स्वत:वर घेतल्याने सासरच्यांकडून तिची अवहेलना होते. पतीच्या मृत्यूचा दाहक अनुभव उराशी बाळगून व इतरांची बोलणी सोसून, परिस्थितीवर मात देत मुलाबाळांसाठी संघर्ष करणारी स्त्री या कथेत येते. सासरच्यांकडून झालेले त्रास सोसूनही वेळप्रसंगी त्यांच्या मदतीस तत्परतेने गेलेली कणखर, जबाबदार, संवेदनशील अशा स्त्रीचे चित्रण 'नियती' या कथेतून येते. एक पिढी मागे जात स्त्री जीवनाची व्यथा लेखिका 'दैवगती' या कथेतून मांडताना दिसतात. अत्यंत कोवळ्या वयात लग्न झालेल्या तिला सासरच्या माणसांचे, सासूचे प्रेम लाभते. लाडाने सासरी लहानाची मोठी होत तारुण्यात पदार्पण करताच गरोदर राहते पण तारुण्य बहरत असताना तिच्या पतीचे सर्प डंखाने निधन होते. सासू सासऱ्यांचा पश्चात भाऊबंदकीचा त्रास सहन करत, एकुलत्या एक मुलीला वाढवत जीवनाचा खडतर प्रवास धैर्याने करणारी स्त्री कथेत येते. 'विक्षिप्त' या कथेतील नायिका, लग्नानंतर कसलीच नव्याची नवलाई नसलेल्या पतीच्या तुसड्या स्वभावामुळे स्वच्छंद, मनमोकळी असलेली ती बदलून जाते. नवऱ्यात गुंतून न जाण्याचा निर्णय घेते. मुले मोठी झाल्यांनतर आपआपल्या वाटा शोधतात पण तिचे मात्र तिच्या

नवऱ्यासोबत दोन किनाऱ्यांप्रमाणे समांतर जाणारे एकाकी आयुष्य सुरू होते. आयुष्याच्या उतारवयात नवऱ्याला झालेल्या असाध्य रोगाने ती हादरते व आयुष्भर नवऱ्याशी भावनिकदृष्ट्या अलिप्त राहिलेली ती, त्याच्या वेदना, त्याचे उपचार, या साऱ्याला सामोरे जात जीवन जगू लागते. आपली झालेली उपेक्षा विसरून कर्तव्यदक्ष जीवन जगणारे भारतीय स्त्रीविश्व ही कथा साकारताना दिसते. 'वादळ' या कथेत पतीच्या लग्नबाह्य संबंधाने हादरलेली ती सासूच्या सहाय्याने पूर्ववत होऊ पाहते. मुलीसाठी नवऱ्यासोबत जगत भावनिकदृष्ट्या मात्र अलिप्त राहते. कित्येक वर्षांनी मुलीच्या लग्नानंतर गहिवरलेल्या आपल्या पतीला आपसूकच आधार देऊ पाहत आपल्या पतीच्या शेजारी बसलेली भावनाप्रधान स्त्री या कथेत येते. मुकाट्याने संसाराचा डोलारा पेलणाऱ्या स्त्रीला घरात निर्णय घेण्याचा अधिकार मात्र नाकारला जातो याचे प्रत्ययकारी चित्रण 'सल' या कथेत येते. मुलगा वृद्धपकाळात आईवडिलांचा सांभाळ करू शकतो पण तेच स्वातंत्र्य मुलीला नसते. 'सल' या कथेतील स्त्री आपल्या आजारी वृद्ध वडिलांची सेवा करू इच्छिते. पण तिच्या घुम्या नवऱ्याकडून तिचा निर्णय झिडकारला जातो. आपल्या हक्कासाठी ती बोलते पण शेवटी वडिलांनी वृद्धाश्रमात राहण्याचा निर्णय घेतल्याने आपण वडिलांसाठी काहीच न करू शकल्याची स्त्री मनाला लागलेली बोच 'सल' या कथेत येते. 'दडपण' या कथेतील पहिल्या पत्नीने प्रियकराच्या मृत्यूनंतर मनाविरुद्ध लग्न लावले गेल्याने केलेल्या आत्महत्येमुळे पूर्वग्रह दूषित असल्याने, दुसरेपणी लग्न झालेल्या पत्नीला सोसावा लागणारा पती व सासरच्यांचा घुमेपणा व त्यामुळे तिच्या कपाळी आलेले तणावग्रस्त जगणे अशी 'दडपण' ही कथा येते. वाढते वय व साथीदाराची आवश्यकता असल्याने विवाहबद्ध झालेली मंजू नवऱ्याचे पहिले लग्न झाल्याने फसवली जाते. संपत्तीच्या लालसेने आपल्याला फसवून लग्न केल्याचे समजताच कोर्टात जात पतीला गजाआड करू पाहणारी बंडखोर मंजू 'विधिलिखित' या कथेत येते. 'शेवट' या कथेत आपल्या मैत्रिणीच्या जीवनातील कथाबीज रचत कथेतून स्त्री व्यथा मांडणाऱ्या निवेदिकेला आपलीच व्यथा कथेतून मांडल्याचे विभाचे पत्र येते. कथेतील नायिकेप्रमाणे विभाही शेवटी आत्महत्येचा पर्याय स्वीकारते. स्त्रीजीवनाची व्यथा ही आत्महत्येत संपल्याचे दर्शविल्याने मैत्रिणीच्या निधनाने सुन्न झालेली निवेदिका कथेत येते.

मुलं, संसार या सगळ्या गोतावळयात स्वत:चे स्वत्व हरवून बसलेल्या स्त्रीची 'हरवले ते...' ही कथा येते. स्त्री मुलाबाळात रमते, पतीच्या गरजा पुरवत आनंदात जगते. पण कालांतराने मुले आपल्या वाटेने जातात, पती आपल्या कामत व्यस्त होतो व प्रेमाचे धागे कमकुवत होत जातात. सर्वांसाठी सर्व करणारी ती स्वत:च्या आवडीनिवडी व 'स्व' लाच विसरते. 'कठपुतळी' या कथेतील स्वत:च्या जीवनातील महत्त्वाचे निर्णय इतरांनी

घेतल्याने आधी नवऱ्याने फसवून दुसरे लग्न केल्याने, नंतर वडिलांनी पुन्हा सासरी न पाठविण्याचा अट्टहास केल्याने मोठ्या मुलापासून दुरावलेली व शेवटी दुसऱ्या मुलाच्या वडिलांप्रती असलेल्या तिरस्कारामुळे शेवटपर्यंत एकाकी राहिलेली, इतरांच्या हातातील कठपुतळी बनून स्वत:चे अस्तित्व गमवून बसलेली गंगा ही स्त्री दिसून येते. वडिलांच्या मृत्युनंतर आठ भावंडामधील पाचवी मुलगी निर्मला भावंडांच्या भविष्यासाठी शाळा सोडते. आयुष्यभर भावांना चांगले जगणे, शिक्षण देण्यास राबते, समाजाच्या दृष्टीने कुरूप ठरल्याने व लग्नाची जबाबदारी अन्य कोणी घेत नसल्याने अविवाहित राहते. पुढे भावांच्या संसारासाठी, त्यांच्या मुलाबाळांच्या संगोपनासाठी स्वत:ला झोकून देते. पण भावांच्या संसाराला गरज असेपर्यंत ती त्यांच्या घरची आश्रित असल्याचे समजताच भावाच्या मुलांच्या संगोपनाच्या जबाबदारीबरोबरच स्वत: स्वावलंबी बनत, स्वत:चे पाळणाघर उघडत आपली समाजात एक जागा निर्माण करते. गिरिजा मुरगोडी यांच्या कथालेखनात 'वाट' ही वेगळ्या आशयाची कथा येते. आईच्या मृत्युनंतर गावातील, कुटुंबातील बदललेली स्थिती अनुभवणारा, नातेसंबंधात निर्माण होणारी दरी अनुभवणारा दिनू शिक्षणानिमित्त व नंतर नोकरीनिमित्त गाव सोडतो. हळूहळू गावातील एक एक दुवा तुटत जातो. गावात पैसे पाठविणे इथपर्यंत गावाशी त्याचे नाते मर्यादित राहते. भरभरून यश मिळालेल्या दिनूला गावाशी असलेली नाळ तुटल्याने यशही कमकुवत वाटू लागते. आपण यशस्वी होत असताना मुळे तुटल्याने माणसाच्या मनात निर्माण झालेली पोकळी, उदासीनता याचे चित्रण 'वाट' ही कथा करते.

### 3.4 समारोप

नव्वदोत्तरी गोमंतकीय स्त्री कथा लेखिकांचे विश्व स्त्री जीवनापुरते मर्यादित राहिलेले दिसून येते. अपवाद वगळल्यास १९९० पूर्व लेखन करणाऱ्या व १९९० नंतरच्या कालखंडात अविरत पणे कथा लेखन करणाऱ्या वासंती नाडकर्णी यांचे अनुभवसंपन्न विश्व कथेतून दिसून येते. स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण करणाऱ्या माधवी देसाईंच्या काही कथांमधून माणसांच्या हतबलतेच्या कहाण्या आलेल्या दिसून येतात. आरती दिनकर यांनी विशुद्ध विनोदी स्वरुपात कथा लिहित नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखनातून आशय विषयदृष्ट्या नाविन्यपूर्णता आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्याचप्रमाणे अंजली अमोणकर यांच्या काही रहस्यात्मक कथा आलेल्या दिसून येतात. त्याचप्रमाणे रेखा पौडवाल यांच्या काही कथांमधून मानवी जगण्यातील शोकांतिका मांडत, मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य केलेले दिसून येते. व्यावहारिक जगण्यात हरवलेल्या संवेदनशीलतेबद्दल त्यांची कथा भाष्य करते. नव्वदोत्तरी कथेतील हा वेगळेपणा सोडल्यास बहुतांशी कथा या स्त्रीचे भावविश्व चितारताना, स्त्री

जीवनाच्या शोकांतिका, स्त्री स्वभावाच्या भिन्न छटा, आधुनिक स्त्री जीवन, स्त्रीचे प्रश्न, स्त्रीमधील तटस्थपणा, आधुनिक नातेसंबंध, अशा स्त्री जीवनाशी निगडीत भिन्न आयमांना मांडण्याच्या प्रयत्नात गोमंतकीय नव्वदोत्तरी स्त्री कथा एकलकोंडे होत गेल्याचे दिसून येते.. स्त्री जीवन व स्त्री जाणिवांशी समरस होणाऱ्या गोमंतकीय नव्वदोत्तरी स्त्री लेखिका बंडखोर होत स्त्रीवादी बनताना दिसत नाहीत. अपवाद वागळल्यास माधवी देसाई व हेमा नाईक यांच्या कथांमध्ये स्त्री वादाची छटा आपल्याला दिसून येते. त्याचप्रमाणे नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखक ज्या ताकदीने ग्रामीण स्त्री जीवन व ग्रामीण स्त्रीच्या व्यथांशी समरस झालेला आहे त्या ताकदीने नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखिका झालेल्या दिसून येत नाहीत. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखिका या प्रामुख्याने शिक्षित, मध्यमवर्गीय असल्याने तसेच गोव्याबाहेरून येत बरीच वर्षे गोव्यात वास्तव्यास असल्यामुळे गोमंतकीय ग्रामीण जीवन हे तिच्या अनुभवकक्षेच्या पलीकडचे असल्याने स्त्री कथाकारांच्या लेखनाला मर्यादा आलेली दिसून येते.

१९९० नंतरच्या गोमंतकीय मराठी कथा लेखन परंपरेत, १९९० पूर्व लेखन करणारे व १९८० ते १९९०, २००० या दशकांत गोमंतकीय कथेचे दालन समृद्ध करणाऱ्या तिसऱ्या पिढीतील कथाकारांमध्ये जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, वासंती नाडकर्णी, विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर इ. कथाकारांचा उल्लेख करावा लागतो. १९९० नंतरच्या पूर्वार्धात पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर, वासंती नाडकर्णी, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल ठाकूर हे लेखक लेखन करताना दिसून येतात. १९९० च्या पूर्वार्धात लिहिलेल्या, प्रामुख्याने विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर यांच्या कथा पूर्वसुरींची मनोविश्लेषणात्मक कथा, गोवा मुक्तिपूर्व काळातील चळवळी, तसेच मुक्तीनंतरच्या गोमंत जीवनातील स्थित्यंतरांना सामोरे जाताना दिसते. १९९० नंतरच्या उत्तरार्धात म्हणजेच २००० ते २०२० दरम्यान लेखन करणाऱ्या चौथ्या पिढीतील लेखकांमध्ये विठ्ठल गांवस, नारायण महाले, मिलिंद म्हामल, चंद्रकांत गावस, सु. म. तडकोड, उदय नाईक, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई या लेखकांनी लिहिलेल्या दिसून येतात. नव्वदोत्तरी कालखंडाच्या उत्तरार्धातील गोमंतकीय कथेची पार्श्वभूमी शहरी असो वा ग्रामीण, गोमंतकाच्या वेगवेगळया स्तरावर झालेले बदल हा या कथेचा स्थायीभाव ठरतो. लेखकांपरत्वे पार्श्वभूमी, कथानक यामध्ये बदल जाणवतो. काही कथा शहरीकरणाच्या प्रक्रियेतील गोमंतकाचे वातावरण चित्रित करतात, काही अस्सल ग्रामीण गोवा, रुढी, परंपरा, समाजजीवन व एकूण प्रदेशनिष्ठा व्यक्त करणाऱ्या ठरतात. ही कथा गोमंतकातील प्रश्नांचा वेध घेते. गोमंतकातील ग्रामजीवनातील चालीरीतींच्या आधारे ग्रामजीवन चित्रण करते, भिन्न मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करत स्त्री जीवनाच्या व्यथा मांडते, प्रदेशनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न व बदलत्या

ग्रामाजीवनात शिरकाव झालेल्या आधुनिक जीवनाचा तसेच खा-उ-जा संस्कृतीचा वेध घेणाऱ्या ठरतात. नव्वदोत्तरी कथेचा विचार करत असताना कथा लेखन करणारी तरुणांच्या फळीतून निर्माण होणारी पाचवी पिढी गोमंतकीय कथेतून लेखन करताना दिसत नसल्याने आजचे आधुनिक जीवन, विज्ञान तंत्रज्ञानातील बदलांचे पडसाद जे समाजमानसावर, लोकजीवनावर उमटलेले आहेत त्याचे पडसाद लेखनातून उमटताना दिसत नाही. नव्वदोत्तरी मूळ कथेच्या प्रवाहात लेखन करणाऱ्या तरुण लेखक पिढीच्या समांतर गोमंतकीय कथा जाताना दिसत नसल्याने ही या काळातील कथालेखनाची मर्यादा म्हणावी लागते.

**संदर्भ**

[1] कोण्णूर, मयुरेश. "गोवा विधानसभा निवडणूक: 5 मुद्दे जे निकाल ठरवू आणि फिरवू शकतात." *BBC Marathi*, BBC, 12 Feb. 2022, https://www.bbc.com/marathi/india-60351592.amp.

[2] कोण्णूर, मयुरेश. "गोवा विधानसभा निवडणूक: 5 मुद्दे जे निकाल ठरवू आणि फिरवू शकतात." *BBC Marathi*, BBC, 12 Feb. 2022, https://www.bbc.com/marathi/india-60351592.amp.

[3] ठाकूर, विठ्ठल. *भार*. अजब पब्लिकेशन, कोल्हापूर. २००९. पृ. क्र. २८.

[4] गांवस, विठ्ठल. *कॅथरीन*. गमभन प्रकाशन, पृ. ६९.

[5] गांवस, विठ्ठल. *ओझे*. गोमंतक मराठी अकादमी, पणजी – गोवा. २०१०. पृ. क्र. १४१.

[6] नाईक, उदय. *अवसर*. गोमंतक मराठी अकादमी, पणजी – गोवा. २०११. पृ. क्र. २०.

[7] पाडलोस्कर, दयाराम. *बवाळ*. देवदया प्रकाशन, पेडणे – गोवा. २०२१. पृ. क्र. ११८.

[8] देसाई, गजानन. *नियोग*. यशअमृत प्रकाशन, साखळी – गोवा. २०१७. पृ. क्र. ६६.

[9] संपा. नाडकर्णी, एस्., एस्., सोमनाथ कोमरपंत. *गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड दुसरा (मुक्तीनंतरचा कालखंड)*. गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा. २००३. पृ क्र. ८४.

[10] सिंगबाळ, सुजाता. *स्नेहबंध*. गुलजार प्रकाशन, पर्वरी – गोवा. १९९९. पृ. क्र. ८४.